म. ग्रं. सं. ठाणें
विषय मु-प्रवास
क्र. ७४

# श्रीक्षेत्र अवंतिका

अर्थात्

# उज्जयिनी मार्गदर्शिका

केशवराव बळवंत डोंगरे.

EFBK-0004772

आलीजाह दरबार प्रेस,—लष्कर-ग्वाल्हेर.

# श्रीक्षेत्र अवंतिका

अर्थात्

# उज्जयिनी मार्गदर्शिका.

६६३६

हें अनेक विद्वानांच्या साहाय्यानें
व सहकारितेनें तयार झालेलें
लोकोपयोगी पुस्तक

केशवराव बळवंत डोंगरे,
यांनीं प्रकाशित केलें.

प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

REFBK-0004772

र-ग्वाल्हेर.

प्रथमावृत्ति २००० ] १९३१ [ किंमत दीड रुपया.



कै० माधवराव महाराज शिंदे.

॥ श्री ॥

आमचे प्रजावत्सल

कै० महाराजाधिराज माधवराव महाराज शिंदे

आलीजाह बहादुर

यांस

त्यांनी केलेल्या उज्जयिनी नगरीतील

लोकोपयोगी सुधारणेच्या

स्मरणार्थ

ही

मार्गदर्शिका

अत्यादरपूर्वक अर्पण केली आहे.

केशवराव बळवंत डोंगरे.

४७५२

# प्रशंसन.

भारतवर्षांतील अत्यंत प्राचीन, प्रसिद्ध, व पुण्यक्षेत्र मानलेल्या नगरांची ऐतिहासिक, धार्मिक, आणि स्थलवर्णनात्मक मांहिती देणारीं पुस्तकें तयार करणें हें भारतीयांचें मनोरंजक पण प्रयत्नसाध्य कर्तव्य आहे. त्यांतहि उज्जयिनी नगरीचें महत्व विशेष आहे. कारण हें फार प्राचीन कालापासून राजधानीचें ठिकाण आहे आणि ज्योतिषी लोकांनीं या नगरीला जगताचा मध्य मानून शून्य रेखांशावर बसविलें आहे, या दोन गोष्टींनीं हिचें स्थान काशीहून एकेपरी श्रेष्ठ आहे. या शहराचें सर्व दृष्टीनें वर्णन करणारें पुस्तक रा० केशवरावजी डोंगरे यांनीं ( उज्जनीचे सुभे असतांना ) तयार करविलें यांत त्यांची प्रशंसनीय मार्मिकता व कामगिरी दिसून येते. सरकारी कामाकडे लक्ष देऊनहि फुरसतीच्या वेळांत, प्राचीन कालापासून आतांपर्यंतचा या नगरीचा इतिहास व हल्लींची धार्मिक, राजकीय, औद्योगिक, माहिती देणारें हें पुस्तक त्यांनीं तयार करविलें त्याबद्दल ते तेथील लोकांच्या, जिज्ञासु प्रवाशांच्या, आणि एकंदर भारतवर्षाची माहिती गोळा करणाऱ्या संशोधकांच्या आदरास व आभारास पात्र आहेत यांत संशय नाहीं.

या पुस्तकांत दिलेली माहिती श्रमपूर्वक मिळविली असून साधार आहे. विशेषतः ऐतिहासिक माहिती जमा करण्यास त्यांस बराच प्रयास पडला आहे. आणि ती संगतवार जुळवून

त्यांनीं वाचकांपुढें ठेविली आहे, यांतहि त्यांचें कौशल्य दिसून येतें. धार्मिक माहिती एकत्र देणारीं पुस्तकें मिळतील, पण ऐतिहासिक माहिती भिन्न भिन्न ठिकाणीं विखुरलेली एकत्र संगतवार लावणें बुद्धिमत्तेचें काम आहे. रा० डोंगरे हे स्वतः विद्यासंपन्न असल्यानें त्यांनीं हें काम केलें आहे व त्यांत जुनी व नवी दृष्टि एकत्र आणली आहे. यामुळें हें पुस्तक सर्व लोकांस आवडेल अशी मला खात्री आहे.

प्राचीन माहिती जमा करतांना, माळवा देश पूर्वी अवंति या नांवानें प्रसिद्ध होता ही गोष्ट त्यांनीं मान्य करून, मालव लोक ग्रीकांच्या स्वाऱ्यांमुळें त्रस्त होऊन पंजाबांतून दक्षिणेस आले आणि त्यांच्या नांवानें हा देश पुढें प्रसिद्धीस आला, असा जो मी तर्क केला आहे तो रा० डोंगरे यांनीं घेतला आहे. ई० स० पू० ५७ चा संवत्संस्थापक विक्रम राजा याच लोकां-पैकीं असावा असा माझा सिद्धान्त आहे. पाश्चात्य ऐतिहासक हा विक्रम झालाच नाहीं असें ह्मणतात. पण मालव संवत् ई० स० पू० ५७ चा ते मानतात तरी तो स्थापिला कोणीं आणि कोणत्या कारणानें याचा ते उलगडा करीत नाहींत. तेव्हां संवत्संस्थापक कोणीं तरी असलाच पाहिजे; आणि विक्रमानें उत्तरेकडील शकांचा कोरूर युद्धांत पराभव करून साम्राज्य स्थापिलें अशी संगति जुळते. चंद्रगुप्तानें ई० स० ४०० नंतर जुन्या मालव शकाचें नांव बदलून विक्रम संवत् नांव चालू केलें असें विरोधी विद्वान ह्मणतात. पण चक्रवर्ती दुसऱ्याचा उष्टा शक कां घेईल आणि आपल्या वर्षापासून कां सुरुवात करणार नाहीं, असा हा विषय प्रसंगोपात् येथे विस्तारानें सांगितला याचें कारण, माझें मत

रा० डोंगरे यांनीं मान्य केलें आहे हें खरें, तरी त्याचीं कारणें विस्तारभयास्तव दिलीं नाहींत किंवा वादग्रस्त मुद्दा ह्मणून दिलीं नाहींत, तीं वाचकांसमोर जरूर यावीं. असो. मंदोसरचा जयस्तंभ उभारणारा यशोधर्मा, ई० स० ५०० च्या सुमाराचा, हाहि सम्राट असून यानें विक्रमसंवत् नांव ठेविलें, असाहि एक तर्क आहे. तो चुकीचा असला तरी याचें राज्य उज्जनीवर काहीं काल देवगुप्तापूर्वी असावें. कारण यानें काश्मीरावर एका पंडितास राजा ह्मणून पाठविलें हें राजतरंगिणीवरून प्रसिद्ध आहे. ज्याची सत्ता काश्मीरावर पोंचत होती त्या मंदोसरच्या सम्राटाची सत्ता उज्जनीवर असलीच पाहिजे. याचा उल्लेख या ग्रंथांत संशयित ह्मणून केलेला नाहीं असें वाटतें. जैन व बौद्ध धर्म एकाच धर्माच्या शाखा असें पृष्ठ १८ वर टीपेंत ह्मटलें आहे व आधार ज्ञानकोश दिला आहे. पहिला आचार प्रधान व दुसरा विचार प्रधान असेंहि ह्मटलें आहे, पण तें चिंत्य आहे. तसेंच आगम व पाशुपत यांतील भेद पृष्ठ २७ च्या टीपेंत सांगितला आहे, तो कशाच्या आधारें, हें व्यक्त नाहीं. असो. अशा एक दोन स्थलीं त्रुटी असल्या तरी सर्वत्र साधार माहिती चौकशी करून दिली असल्यानें ग्रंथाची प्रशंसा करणें सर्वथैव योग्य आहे. ऐतिहासिक भागांत अर्वाचीन भाग तर निश्चितच आहे, तोहि परिश्रमपूर्वक ग्रंथांत दिला आहे. पुढील माहितीहि अत्यंत मनोरंजक आहे. तात्पर्य हा ग्रंथ सर्वतोपरी लोकादरास पात्र आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

चिंतामण विनायक वैद्य.

# प्रस्तावना.

अवंतिका किंवा उज्जयिनी ( उज्जन ) ही नगरी भरतखंडांत अत्यंत प्राचीन असून धार्मिक व ऐतिहासिक दोन्हीं दृष्टींनीं फार महत्वाची आहे. ती स्वयं एक **महाक्षेत्र** असून शिवाय द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं **श्रीमहाकालेश्वराचें** तें स्थान असल्याकारणानें वैदिक धर्माच्या अनुयायांत तिचें माहात्म्य फार मानलें जातें. त्याच प्रमाणें, ती बुद्धपूर्वकालापासून गेल्या एकोणिसाव्या शतका-पर्यंत अनेक आर्य ( वैदिक ), जैन, बौद्ध, व यवन, राजांची राजधानी, व तशीच काहीं कालपावेतों परदेशांशीं चालणाऱ्या या देशाच्या व्यापाराचें केन्द्र, राहिली असल्याकारणानें भरतखंडाच्या इतिहासांतहि तिला महत्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. केवळ भारतवर्षांतच नव्हे, त्याच्या बाहेरदेखील तिची बरीच प्रसिद्धि आहे; व त्यामुळें, देशदेशांतरावरील यात्रेकरू व इतिहासप्रेमी यांची तेथे सारखी रहदारी चाललेली असते. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, या प्रवाशांपैकीं ज्यांना तेथील नुसती यात्राच तेवढी करावयाची असते, त्यांचें कार्य जरी तेथील तीर्थोपाध्याय ‘ येन केन प्रकारेण ’ साधून देतात, तरी पण त्यांतल्या त्यांत, ज्यांना तेथील इतिहासप्रसिद्ध स्थळेंहि बघून घ्यावयाचीं असतात त्यांना व विशेषतः, जे केवळ या नगरीच्या पूर्वकालीन राजकीय वैभवाचे अवशेष पाहण्याच्या व तद्विषयक माहिती मिळविण्याच्या उद्देशानें तेथे येतात त्यांना, तेथील प्रेक्षणीय स्थळांविषयीं विश्व-

-सनीय माहिती मिळण्याचें कांहीं साधन उपलब्ध नसल्यामुळें, प्रायः हताश व्हावें लागतें.

तीस वर्षांपूर्वी प. बळवंत कमलाकर माकोडे व आमचे वडील बंधु ती. रा. रामचन्द्र बळवंत डोंगरे यांनीं या क्षेत्रांतील मुख्य मुख्य देवता व तीर्थें यांची एक यादी तयार करून प्रसिद्ध केली होती. त्याखेरीज त्या यादीवरून किंवा तिच्याच धर्तीवर पुढें कोणीं हिंदी भाषेंत लिहिलेलीं ' अवंतिका तीर्थयात्रा, ' ' उज्जेन क्षेत्रयात्रा, ' ' उज्जेन ' या नावांचीं तीन-चार छोटेखानी पुस्तकें आणखी प्रसिद्ध झालीं; व तीं अद्याप उज्जनीस क्वचित् कोणाच्या संग्रहीं आहेतही. परंतु त्यांपासून जिज्ञासुचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

मिळून एकंदरींत, एका काळीं महत्वाच्या शिखरास पोंचलेल्या या नगरीसंबंधानें हल्लीं उपलब्ध असलेली, पण इतस्ततः विखुरलेली, लोकोपयोगी माहिती एकत्र होऊन ती एखाद्या पुस्तकाच्या रूपानें जनतेपुढें अद्याप आलेली नाहीं. उज्जनीस येणाऱ्या सुशिक्षित प्रवाशांना ही उणीव नेहमी भासते; व विशेषेंकरून, त्यांतल्या परद्वीपस्थ प्रवाशांकडून जेव्हां तेथील अधिकाऱ्यांना त्यांविषयीं विचारपूस होते तेव्हां त्यांना ( अधिकाऱ्यांना ) तर ती बरीच जाणवते.

स्वतः आह्मांलाच, आह्मीं उज्जनीस असतां, असे अनेक प्रसंग आले; व त्यामुळें उज्जनीविषयीं शक्य तितकी माहिती मिळवून ही **मार्गदर्शिका** तयार करवावी लागली.

हें पुस्तक पांच प्रकरणांत विभागलें आहे :— पहिल्या प्रकरणांत उज्जनीचें भौगोलिक स्थान दाखवून आधिदैविक व आधिभौतिक

कारणांनीं आजपर्यंत या नगरीचीं जीं अनेक स्थित्यन्तरें झालीं आहेत त्यांचें वर्णन थोडक्यांत केलें आहे. दुसऱ्या प्रकरणांत या नगरीचा, आर्यकालापासून कैलासवासी **माधवराव** महाराज **शिंदे** यांच्या कारकिर्दीपर्यंतचा, इतिहास दिला आहे. तिसरें प्रकरण केवळ यात्रेकरूसाठीं लिहिलें आहे; व त्यांत या क्षेत्राचें पुराणोक्त माहात्म्य, त्यांतील मुख्य मुख्य देवता, तीर्थें, यात्रा, त्यांचा ग्रंथोक्त कार्यक्रम, आणि देश-काल-परिस्थित्यनुसार त्यांत झालेला फेर-बदल, यांचें विवेचन केलें आहे. आणि चवथ्या व पांचव्या प्रकरणांत अनुक्रमें तेथील पूजनीय व प्रेक्षणीय स्थळांपैकीं मुख्य मुख्य स्थळांविषयीं मिळाली तेवढी माहिती दिली आहे. शिवाय या पुस्तकाला दोन परिशिष्टें जोडलीं असून त्यांत उज्जन नगरी-संबंधानें अवान्तर माहितीचा संग्रह केला आहे. आणि पुस्तकाच्या शेवटीं **भैरवगढासहित** उज्जन शहराचा एक नकाशा जोडला आहे व त्यांत तेथील सुप्रसिद्ध स्थळें दुसऱ्या परिशिष्टांतील क्रमानें— ह्मणजे त्या परिशिष्टांत तीं ज्या अनुक्रमांकांवर दिलीं आहेत त्या अनुक्रमांकानें—दाखविलीं आहेत.

अशा प्रकारची ही **मार्गदर्शिका** तयार करण्यांत ज्या ज्या विद्वानांनीं हातभार लावून हें कार्य शेवटास नेलें, त्यांच्या कृतीचा उल्लेखहि येथे केला पाहिजे. त्यांत, धारचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. रा. **काशीनाथ कृष्ण लेले** यांनीं उज्जनी संबंधानें बरीच ऐतिहासिक माहिती पुरविली; देवासचे डॉक्टर रा. रा. **शंकर रामचन्द्र ओक**, एल्. एम्. ॲन्ड एस., यांनीं 'श्रीशिवाजी' नांवाच्या साप्ताहिकांत प्रसिद्ध केलेल्या एतद्विषयक लेखांचा व उज्जन येथील **ठाकुर कन्हैयाललजी** यांनीं हिंदी भाषेंत लिहिलेल्या उज्जनीच्या वर्णनाचा, या **कामीं**

हवा तेवढा उपयोग करून घेण्याची परवानगी दिली; ग्वाल्हेर येथील पुराणवस्तुसंशोधन (Archæology) खात्याचे सुपरिन्टेन्डेन्ट रा० रा० **मोरेश्वर बळवत गर्दे**, बी. ए., यांनीं घेतलेले उज्जनींतील सुप्रसिद्ध स्थळांचे फोटो आह्मांला त्यांच्याकडून मिळाले; आणि या एकत्र झालेल्या माहितीवरून आह्मीं या पुस्तकाची सामान्य रूपरेषा आंखून दिल्यात्याप्रमाणें माधव कॉलेजांतील प्रोफेसर रा० रा० **नारायण बाळकृष्ण पराडकर**, एम्. ए., व ग्वाल्हेरचे माजी म्युनिसिपल एंजिनियर रा० रा० **माधवराव व्यंकटेश लेले**, बी. ए., एल सी. ई., या उभयतांनीं त्याचा एक मसुदा तयार केला. परंतु तो तयार झाल्यावर त्यांत दिलेल्या उज्जनीच्या इतिहासविषयक माहितींत अनेक फेरफार करणें प्राप्त झालें व सार्व जनिक उपयोगाच्या दृष्टीनें त्यांत या क्षेत्रासंबंधी धार्मिक माहिती देण्याचीहि अवश्यकता दिसूं लागली. तेव्हां त्या कार्यासाठीं अपेक्षित असलेले इतिहासविषयक ग्रंथ मिळवून देण्यांत इंदूरचे सरदार **माधवराव साहेब किबे**, एम. ए., रावबहादुर, यांनीं आह्मांला फार साह्य केलें. तशीच अवंतिक्षेत्राचें माहात्म्य, त्यांतील देवता, तीर्थें व यात्रा, या विषयीं बहुतेक लुप्तप्राय झालेली माहिती, उज्जन येथील संस्कृत पाठशाळेचे माजी मुख्याध्यापक प. काशीनाथ शास्त्री, साहित्याचार्य, व वेदशाळेचे अध्यापक वे० मू० दामोदर भटजी नाशिककर, यांनीं पुरविली. आणि आमचे बंधु रा० **रामरावजी डोंगरे** यांनीं ती सर्व सामग्री जुळवून घेऊन व जरूर तेवढीं स्थळें स्वतः पाहून ही **मार्गदर्शिका** लिहून दिली. त्यांचें लेखन चालू असतां, ग्वाल्हेरचे माजी चीफ-जस्टिस व पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे अध्यक्ष, रा० रा०

चिंतामणराव विनायक वैद्य, एम. ए., एलएल बी., यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन या **मार्गदर्शिकेचीं** पहिलीं दोन प्रकरणें काळजीपूर्वक पाहिलीं; त्यासंबंधानें अनेक उपयुक्त सूचना केल्या; बरींचशी नवीन माहिती दिली; आणि त्याप्रमाणें, तीं दोन्हीं प्रकरणें, पुन्हां लिहिलीं गेल्यानंतर तीं तपासून देण्याचीहि तस्दी घेतली. मिळून अशा रीतीनें या **मार्गदर्शिकेच्या** तयारींत आह्मांला अनेक विद्वानांनीं साह्य केलें असून त्याबद्दल आह्मीं त्यांचे अत्यंत ऋणी अहोंत. तसेंच, उज्जन येथील वेधशाळेचे सुपरिन्टेन्डेन्ट रा० रा० **गोविंद सदाशिव आपटे**, एम. ए., बी. एस् सी., व ज्योतिषाचार्य पंडित **सूर्यनारायणजी व्यास**, विद्यालंकार, प्रभृति ज्या ज्या विद्वानांनीं आह्मांला या कामीं थोड्याबहुतानें मदत केली त्या सर्वांचे आभार मानणेंहि उचित होय.

त्याचप्रमाणें, ग्वाल्हेर येथील आलीजाह दरबार प्रेसचे म्यानेजर रा० रा० **यशवंतराव तानाजी माणगांवकर** यांनीं या पुस्तकाचें बाह्यांग सजवून पुस्तक शक्य तितकें नीट-नेटकें छापून दिल्याबद्दल त्यांचेंहि आभार मानले पाहिजेत.

सरते शेवटीं सांगावयाचें हें कीं, परिस्थितिवशात् उज्जनी येथील देवस्थानें, तीर्थें व इतर प्रेक्षणीय स्थळें, यांची फार वाताहत झाली असून प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांत त्यांचीं जीं नांवें आढळतात त्यांपैकीं अनेक स्थळें हल्लीं तेथे कोठेहि दिसत नाहींत व पूर्वीं तीं कोठे होतीं तेंहि कळत नाहीं; आणि हल्लीं जीं स्थळें तेथें बऱ्या-वाईट स्थितींत विद्यमान आहेत त्यांच्या विषयींहि विशेष माहिती प्रायः तोंडी मात्र मिळते, लेखी फारशी

मिळत नाहीं. यास्तव, त्यांतल्या ज्या स्थानाविषयीं जेवढी माहिती विश्वसनीय मार्गानें मिळाली तेवढ्याचाच संग्रह या पुस्तकांत केला असून बाकीच्या स्थानांचा नुसता नामनिर्देश-मात्र केला आहे. त्याचप्रमाणें, मुसलमानी अमलदारीच्या पूर्वी उज्जनीस जे अनेक राजे-महाराजे होऊन गेले त्यांचेंहि काहीं चिन्ह तेथे शिल्लक राहिलेलें नाहीं. श्रीमहाकालेश्वराच्या मंदिराच्या जवळ-पास त्यांचे मोठमोठाले महाल होते, असें म्हणतात; परंतु आस्मानीं व सुल्तानीं या दोन्हीं कारणांनीं त्यांचा पूर्ण विध्वंस झाला असून त्या जागीं सांप्रत नुसतीं खिंडारेंमात्र दिसतात. महालांचे अवशेष तेथे काहीं दिसत नाहींत. यामुळ, त्यांविषयींहि येथे काहीं लिहितां आलें नाहीं. परंतु अशा प्रकारच्या अनेक त्रुट्या जरी या पुस्तकांत निरुपायामुळें राहिल्या आहेत तरी, उज्जनीस येणाऱ्या प्रवाशांना हल्लीं, या मार्गदर्शिकेच्या साह्यानें, शक्य तितकें आपआपलें कार्य सुव्यास्थित रीतीनें साधून घेतां येईल, असें वाटतें. आणि तेवढ्यापुरती जरी ती लोकोपयोगी ठरली तरी आमचा हा अल्पसा प्रयत्न पूर्ण सफल झाला, असें आह्मीं समजूं.

लश्कर-ग्वाल्हेर,<br>भाद्रपद्र शुक्ल ४ सवत् १९८८. } **केशवराव बळवंत डोंगरे.**

---

**नोट**—प्र० १ पृ० ९ वर उज्जयिनीची लोक संख्या ई. स १९२१ च्या शिरगिणतीप्रमाणें दिली आहे. तदनंतर चालू (१९३१) सालीं झालेल्या शिरगिणतीप्रमाणें तेथील लोक संख्या ३९१५९ हिंदु १५३९७ मुसलमान ९४ इतर, मिळून एकंदर ५४,६५० आहे.

॥ श्री ॥

# विषयानुक्रमणिका.


पृष्ठ.

अर्पणपत्रिका ... ... ...

प्रशंसन ... ... ...

प्रस्तावना ... ... ...

## प्रकरण १ लें—विषयप्रवेश.

अवंतिकेचें भूगोलावरील स्थान—तिचें प्राचीनत्व—गढ किंवा जुनी उज्जयिनी—वर्तमानकालीन अवंतिका—तिचीं अनेक स्थित्यन्तरें—क्षेत्रफळ—लोकसंख्या—हवामान ... १—९

## प्रकरण २ रें—अवंतिकेचा इतिहास.

### १. प्राचीन इतिहास

१. **आर्यकालीन अवंतिका**—पुराणांतील उल्लेख—ललित वाङ्मयांतील वर्णनें—तिचें धार्मिक महत्व—क्षेत्र, विद्यापीठ व राजधानी यांचा त्रिवेणिसंगम ... ... १०—१५

२. **आर्यबौद्धकालीन अवंतिका**—प्रद्योत—वासवदत्ताउदयनकथा—जैन व बौद्ध धर्मांचा प्रसार—मौर्य साम्राज्यांत समावेश—अशोक—अग्निमित्र—मालवांच्या स्वतंत्र राज्याची स्थापना—विक्रमादित्य—अवंतिकेच्या उत्कर्षाची पराकाष्ठा—विक्रमादित्यासंबंधानें भवति-न-भवति—विक्रम संवत्—शकवंशाची स्थापना—शकाब्दाचा

आरंभ—परदेशाशीं व्यापारी दळण-वळण--आर्यवैदिक ज्योतिषांत ग्रीक ज्योतिषाचा प्रवेश—ज्योतिषविषयक मूलसिद्धांताची रचना—अवंतिदेशाचा गुप्त साम्राज्यांत समावेश—पुन्हा स्वतंत्र राज्याची स्थापना—महासेन गुप्त——देवगुप्त——कन्नोजच्या साम्राज्यांत समावेश ... ... ... १५—३६

३. **बौध्दोत्तरकालीन अवंतिका**—पाशुपत मताचें खंडण—परमारांच्या स्वतंत्र राज्याची स्थापना—कृष्णराज—हर्षदेव—मुंजदेव—सिंधुराज—भोजदेव--श्रीमहाकालेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार—उदयादित्य—नरवर्मदेव—अर्जुनवर्मदेव——शमसुद्दीन अल्तमशची स्वारी—महाकालेश्वराच्या मंदिराचा विध्वंस व उज्जयिनीची लूट ... ... ... ३६—४६

## २ अर्वाचीन इतिहास.

१. **यवनकालीन अवंतिका**—जलालुद्दीन फीरोजशाह खिलजी—उज्जयिनीची दुर्दशा—"जें पूर्वी स्वर्ग होतें तें हल्लीं नरक झालें"—दिलावरखां घोरी—हुषंगशाह घोरी—महमूद खिलजी--नासिरुद्दीन खिलजी—महमूद (२रा) खिलजी—गुजराथ येथील सुलतानाचा ताबा—दिल्लीपतीचा अमल—मल्लूखान कादिर—सुजावलखां-बाजबहादुर—सवाई जयसिंग—मुसलमानी अमलाचा शेवट. ४६—५३

२. **पुन्हां हिंदुकालीन अवंतिका**—राणोजीराव शिंदे—देवस्थानांची पुनस्थापना व जीर्णोद्धार—जयाप्पा शिंदे—जनकोजी शिंदे—महादजी शिंदे—सरदारीचें राज्यांत रूपान्तर व त्याचा विस्तार—दिल्लीपतीची वजीरी—दौलतराव शिंदे— राज्यमर्यादांचा संकोच व राजधानीचें स्थलान्तर—जनकोजीराव ( २ रे ) शिंदे—जयाजीराव (२ रे) शिंदे—बायजाबाई साहेब—माधवराव शिंदे—उज्जयिनीची चिरस्मरणीय सुधारणा-जयाजीराव (३ रे) शिंदे-**सद्यःस्थिति**-उद्योगधंदे-



श्रीमान् जयाजीराव महाराज शिंदे.

दा. क्र. ४०७२.
६६३६

# श्रीक्षेत्र अवंतिका

अर्थात्

# उज्जयिनी मार्गदर्शिका.

## प्रकरण पहिलें.

सं. ग्रं.
३८/८

## विषयप्रवेश.

अवंतिका किंवा उज्जयिनी—हल्लींचें उज्जन—हें शहर अवंति देशांत, म्हणजे ज्याला मालव किंवा माळवा म्हणतात त्यांत, वसलेलें आहे. माळव्याची चतुःसीमा—उत्तरेस राजपूतना व मध्यहिंदुस्थानाचा बराच भाग, पूर्वेस बुंदेलखंड व भगेलखंड, दक्षिणेस विंध्याद्रि पर्वत आणि त्याच्या व सातपुड्याच्या मधल्या खोऱ्यांतून वाहणारी नर्मदानदी, आणि पश्चिमेस गुजराथ व राजपूतान्याचा दक्षिणभाग, ही असून त्याची समुद्राच्या सपाटीपासून उंची, दक्षिणेकडील विंध्याद्रीच्या बाजूची, सुमारें दोन हजार फुट आहे व ती उत्तरेकडे हळूहळू कमी-कमी होत गेली आहे. या प्रदेशाच्या मध्यभागीं, किंबहुना एकंदर भरतखंडाच्या मध्यभागीं म्हटलें तरी चालेल, समुद्राच्या सपाटीपासून १,६७९ फुट उंचीवर अंवतिका नगरी वसली आहे. आणि ती या देशाच्या मध्य बिंदूवर असल्याकारणानें भारतीय ज्योतिषशास्त्रवेत्त्यांनीं तिचे

रेखांश शून्य धरून तिला तद्दितर स्थलांच्या रेखांश मापनाचें मूलस्थान मानलें आहे. परंतु सांप्रत इंग्रजी अमलांत तो मान ग्रीनिचला दिला गेला असून, त्याप्रमाणें, इंग्लंडचे ज्योतिषी ग्रीनिचच्या वेधशाळेचे रेखांश शून्य मानतात व तेथून इतर स्थलांचे रेखांश ठरवीत असतात. आणि त्या मानानें पाहिलें असतां पूर्व रेखांश ७५°–५०' व उत्तर अक्षांश २३°–१०' हें अवंतिकेचें भूगोलावरील स्थान ठरतें.

हें शहर क्षिप्रा[1]नदीच्या पूर्वतीरावर वसलें आहे. क्षिप्रानदी इंदूर संस्थानांतील इंदूर याच नांवाच्या परगण्यांत पिउरा व उजेनी या दोन गांवांजवळ जानापावच्या खोऱ्यांतून निघाली आहे व उज्जन शहराच्या पश्चिमेकडून सरासरी १२० मैल उत्तराभिमुख वहात जाऊन जावरा संस्थानांतील सिपावरा नांवाच्या गांवाजवळ चम्बल-चर्मणवती—नदीस मिळाली आहे. या नदीच्या कांठीं उज्जन शहर केव्हां वसलें व तें कोणीं वसविलें हें सांगतां येत नाहीं. पुराणांतरीं त्याचीं जीं वर्णनें आहेत त्यांवरून, किंबहुना अवंतिक्षेत्र-माहात्म्यांत या नगरीच्या उत्पत्तिसंबंधानें जो कथाभाग सांगितला आहे त्यावरूनसुद्धां, तिच्या उत्पत्तिकालाकडे काहीं बोट दाखवितां येत नाहीं. तथापि अनेक पुराणांतील अनेक कथाभागांशीं तिचा काहीं ना काहीं संबंध जोडलेला दिसतो, व त्यावरून, उज्जन हें भरतखंडांत अत्यंत प्राचीन असें एक शहर आहे असें निःसंदेह म्हणतां येतें. स्कंदपुराणांतील अवंतिक्षेत्र-माहात्म्यांत या नगरीचीं अनेक नांवें सांगितलीं आहेत व त्या नांवांची उपपत्तिहि दिलेली आहे. त्यांत तिचें ‘ प्रतिकल्पा ’ असेंहि एक नांव आहे,

१. या नांवाविषयीं विशेष विचार पुढें प्रकरण ४ यांत करूं.

व त्यावरून, ही नगरी अनादिसिद्ध असून प्रत्येक कल्पाच्या आरंभीं याच जागीं विद्यमान असते, प्रादुर्भूत होत असते किंवा वसत असते, असा अर्थ निष्पन्न होतो. आणि त्यांतला श्रद्धेचा किंवा काल्पनिक भाग वगळला तरी, ही नगरी येथे फार प्राचीन काळापासून वसलेली आहे असं मानावेंच लागतें.

प्राचीन उज्जन शहर, किंवा त्याचा बराच मोठा भाग, इतिहासपूर्वकालीं केंव्हां तरी लगतच्या क्षिप्रानदीच्या महापूरांत सांपडून, त्यांत वाहून आलेल्या गाळांत दडलेला आहे. अथवा धरणीकंपामुळें तो भाग खालीं दडपला जाऊन त्यावर भोंवतालच्या प्रदेशाची धूळ–माती लोटली गेली आहे. हल्लींच्या उज्जन शहराच्या उत्तरेस, गाळाच्या किंवा मातीच्या थरामुळें उंच झालेला हा भूप्रदेश स्पष्ट दिसतो; व त्याला ‘ गड ’ किंवा ‘ जुनी उज्जन ’ म्हणतात. आणि तेथे थोडें खोल खणून पाहिलें असतां, जुनी नाणीं, जुनी भांडीं व जुनी इमारती लांकडें, सांपडतात.

खरें म्हटलें म्हणजे हल्लींचें सर्व उज्जन शहर पूर्वींच्या जुन्या उज्जन शहराच्या काहीं भागावर वसलें आहे असें दिसतें. निदान हल्लीं या शहरांत ठिकठिकाणीं जे मातीचे उंचवटे दिसतात त्यांच्या पोटांत तर जुन्या इमारती व जुनी मंदिरें निःसंदेह दडलेलीं आहेत. काहीं वर्षांपूर्वीं कोटांत श्रीविठ्ठलमंदिरासमोरचें एक घर काहीं कारणानें खणलें गेलें होतें, त्यांत अनेक तांब्या-रुप्याचीं नाणीं, जुन्या शिलालेखाचे दोन तुकडे, व एक लांबचलांब चुना-विटांची पक्की भिंत सांपडली.[1] ही भिंत श्रीमहाकालेश्वराच्या

---

१. हीं नाणीं व शिलालेखाचे दोन्हीं तुकडे येथील पंडित सूर्य नारायणजी व्यास यांच्या संग्रहीं आहेत.

प्राचीन मंदिराची असावी असें वाटतें. तसाच या शिलालेखाच्या दोन तुकड्यांचाहि त्या मंदिराशींच काहीं तरी संबंध असला पाहिजे. कारण त्यांच्या शिलेचा रंग व त्यावरील अक्षरें, हीं श्रीमहाकालेश्वराच्या हल्लींच्या मंदिरांत जो एक शिलालेखाचा तुकडा लागलेला आहे[1], त्याच्या रंगाशीं व त्यावरील अक्षरांशीं अगदी तंतोतंत मिळतात. भेद इतकाच कीं मंदिरांत लागलेल्या तुकड्यावरील प्रशस्ति श्रीमहाकालेश्वराची असून या दोन तुकड्यांवरील प्रशस्ति कोणी तरी राजाची दिसते. ज्या राजानें श्रीमहाकालेश्वराचें प्राचीन मंदिर बांधविलें त्याची कदाचित् ती प्रशस्ति असेल. परंतु त्यांपैकीं एका तुकड्यावर जे श्लोक आहेत त्यांचे अनुक्रमांक १८।१९।२२।२६ हे असून दुसऱ्या तुकड्यावरच्या श्लोकांचे अनुक्रमांक २६९।२७३ हे आहेत. बाकीचे श्लोक सांपडलेले नाहींत. यामुळें ती प्रशस्ति कोणत्या राजाची आहे हें कळत नाहीं. पण तें कसेंहि असो. या सांपडलेल्या वस्तुंवरून हल्लींचें श्रीमहाकालेश्वराचें मंदिर हें त्यांच्या प्राचीन मंदिराच्याच पायावर जरी बांधलें गेलें आहे तरी पण तें प्राचीन मंदिर हल्लींच्या मंदिरापेक्षां फार मोठें होतें व त्याचा काहीं भाग, किंबहुना बराच मोठा भाग, प्रस्तुत जी कोटाची वस्ती आहे तिच्या खालीं दडलेला आहे; हल्लीं ज्या शिलालेखाचे तुकडे सांपडले आहेत तो शिलालेख बराच मोठा, प्रचंड शिलेवर कोरलेला, असून तो पूर्वीं श्रीमहाकालेश्वराच्या त्या प्राचीन मंदिरावरच कोठे तरी लागलेला असावा; आणि दिल्लीच्या सुल्तान अल्तमशनें ज्या वेळीं तें मंदिर पाडलें त्या वेळीं त्या शिलालेखाचेहि त्यानें अनेक तुकडे करून ते इत-

१. हा तुकडा मंदिराच्या गाभाऱ्याच्या तिसऱ्या मजल्यांत आहे.

स्ततः फेंकून दिले असून त्यांतले जे तुकडे अद्याप सांपडले नाहींत ते कोटाच्या उंचवट्यांतच कोठे तरी दडलेले पडले असले पाहिजेत; असें अनुमान साहजिक रीत्या होतें. त्याचप्रमाणें रुद्रसागराच्या ईशान्य दिशेकडील टेकाडावर नुकतेंच काहीं दिवसांपूर्वी एका मुसलमानाचें पडकें घर, तेथील दगड-विटा वगैरे मसाला काढून दुसरीकडे नेण्यासाठीं किंवा अन्य काहीं उद्देशानें खणतांना तेथे शाळुंकेसहित एक शिवलिंग सांपडलें असून तें हल्लीं तेथे तशाच स्थितींत विद्यमान आहे. एवंच, हल्लींच्या या शहराच्या वस्तींत कोठेहि खणलें तरी तेथे पूर्वीच्या वस्तीचें अशा प्रकारचें काहीं ना काहीं चिन्ह सांपडतें; व त्यावरून पूर्वीची वस्ती किंवा 'जुनी उज्जन' केवळ गडाखालींच नव्हे, तर हल्लींच्या उज्जनीखालींदेखील सर्वत्र, बहुधा एकाच कालीं व एकाच प्रसंगवशात् दडली असून तिच्यावर हल्लींची उज्जन वसली आहे असें उघड दिसतें. पुराणवस्तुशास्त्रवेत्त्यांपैकीं कोणीं शोधकानें हा भूभाग खणून काढण्याचा सुव्यवस्थित प्रयत्न केल्यास अनेक प्रकारच्या पुरातन वस्तूंच्या रूपानें तेथें या शहराचा प्राचीन इतिहास सांपडण्याचा बराच संभव आहे.[1]

हल्लींची उज्जन हीदेखील बरीच जुनी असून प्राचीन कालापासून आजपर्यंत तिचीं अनेक स्थित्यंतरें होत होत शेवटीं तिला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें आहे. मुसलमानी अमलदारीच्या पूर्वी

1. " Scientific excavation would certainly yield interesting results " अशी सूचना लेफ्टनेन्ट-कर्नल ल्युअर्ड या विद्वान गृहस्थानेंहि ग्वाल्हेर स्टेट ग्याझेटियर ई० सन १९०८ यांत पृ. २९८ वर केली आहे; परंतु अद्याप तिकडे कोणाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

तिला सोन्याचे दिवस लाभले होते : त्यांतल्या महाकालेश्वराच्या उंच व भव्य मंदिराचें शिखर कित्येक मैलांवरून दिसत असे; सोन्या-मोत्यांनीं लदलेल्या बाजारपेठा व्यापारी व गिऱ्हाइक यांनीं नेहमीं गजबजलेल्या असत; राजपुरुषांचे सर्ववैभवसंपन्न व सर्वांग-सुंदर महाल आणि अधिकारी वर्गाचे व इतर श्रीमान नागरिकांचे मोठमोठाले वाडे विद्वान, गुणिजन व इतर गरजू लोकांनीं सदैव फुललेले दिसत; आणि शहराभोंवतीं सर्वत्र पसरलेल्या रम्य उद्यानांनीं त्याला अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती; असें तत्कालीन इतिहासावरून दिसतें. "हारांस्तारांस्तरलगुटिकान्कोटिशः शंखशुक्तीः, शष्पश्यामान्मरकतमणीनुन्मयूखप्ररोहान्। दृष्ट्वा यस्यां विपणिरचितान्विद्रुमाणां च भंगान्संलक्ष्यंते सलिलनिधयस्तोयमात्रावशेषाः" (श्लो० ३३). अशा प्रकारचें या नगरीचें वर्णन मेघदूतांत आलें आहे! पण त्यांतलें आज काय आहे? काहीं नाहीं! अल्तमशच्या लोकांनीं त्याचें नुसतें चिन्हदेखील तेथें शिल्लक ठेविलें नाहीं. आणि पुढें तेथे जी मुसलमानी अमलदारी चालू झाली त्यांत त्या शहराला निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. पूर्वीचें त्याचें सर्व वैभव नष्ट होऊन तें सर्व बाजूनें पुरतें नागवलें गेलें : पूर्वीच्या मंदिरांचा विध्वंस होऊन त्यांच्या जागीं मशीदी बांधल्या गेल्या, उद्यानांच्या जागा कबरस्थानांनीं व्यापल्या, व राजवाड्यांच्या जागीं नुसतीं मातीचीं ढिगारें दिसूं लागलीं; लूटमारीच्या योगानें त्रस्त होऊन व्यापारी वर्ग इतस्ततः पांगला गेला व बाजारपेठा ओस पडल्या; देवस्थानें उध्वस्त व तीर्थें भ्रष्ट झाल्यामुळें या क्षेत्राचें धार्मिक महत्वहि संपुष्टांत आलें; आणि जीवित व वित्त यांचें कसें तरी संरक्षण करण्यासाठीं राजकर्त्यांच्या डोळ्यांत सलणार नाहीं

अशा प्रकारची राहणी स्वीकारणे जनतेला भाग पडल्यामुळें वस्तीच्या रचनेला भलतचें वळण लागून उज्जन हें एक निकृष्ट प्रतीचें शहर बनलें. या पूर्वीच्या 'स्वर्गाला' मुसलमानांनीं 'नरक' करून ठेविलें आहे, असें एका युरोपियन इतिहासकाराचें म्हणणें आहे; आणि "कोठे ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयाचे ? । हर्म्य प्रासाद कोठे असति विलसले थोर ऐश्वर्य ज्यांचें ? ॥ कोठे त्या नाट्यशाला ? न दिसति नयना चंद्रशाला विशाला ! । रत्नांनीं पूर्ण गेले विपणि तळिं जणो अब्धिचे ते लयाला ॥ १ ॥ जेथे नाचति मोर मंजुळ रवें गातात जेथे पिक । वापीच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांग हंसादिक ॥ पुष्पांनीं लवल्या लता तरुवरां जेथे मिठी घालिती । उद्यानें दिसती न तीं वसत जीं क्षिप्रानदीच्या तटीं ॥ २ ॥" ( कै. वासुदेवशास्त्री खरे ) अशा प्रकारचे या नगरीविषयीं एतद्देशीयांचे दुःखोद्गार ऐकले म्हणजे त्याच्या त्या म्हणण्यांत किंचित् देखील अतिशयोक्ति नाहीं, असेंच मानावें लागतें.

ही साडेसाती संपून उज्जन शहर परत हिंदु अमलदारींत आलें तेव्हांपासून त्याच्या स्वरूपांत पुन्हा हळुहळु पालट होऊं लागला : पाडलेलीं मंदिरें पुन्हा उभारलीं गेलीं; राजवाडे बांधले

---

1. During the reign of Jalal-ud-din Firoz Shah (1290-6) the capture of a town called "Jhain" is mentioned. It is difficult to determine whether this is certainly Ujjain or not, but the discription undoubtedly points to it, as temples of great beauty and wealth are named and the historian adds that the destruction of this place "made a hell of paradise."—ल्युअर्डकृत ग्वाल्हेर राज्याचा ग्याझेटियर (१९०८), भाग १ ला, पृष्ठ ३०४.

गेले; उध्वस्त झालेले बाजार वसले; रस्ते रुंद होऊन सडका झाल्या व त्यांवर विजेचे दिवे लागूं लागले; घरोघर पाण्याचे नळ आले; जुनी घरें काढलीं जाऊन त्यांवर नव्या तऱ्हेच्या नव्या इमारती बनल्या; आणि याप्रमाणें हळुहळु एक एक पाऊल पुढें पुढें टाकीत हें शहर हल्लींच्या स्थितीस येऊन पोंचलें आहे.

एवंच हल्लींचें उज्जन शहर हेंदेखील फार प्राचीन काळीं वसलेलें आहे; पण पूर्वींच्या मुसलमानी अमलदारींत व हल्लींच्या हिंदु अमलदारींत त्याच्या रचनेंत अशी विलक्षण उलथापालथ झाली आहे कीं, आज त्याच्याकडे पाहिलें असतां त्यांत जुनें असें फारसें काहीं दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. बहुतेक सर्व नवी सृष्टि दिसते. आणि काहीं प्राचीन मंदिरें व मशीदी जमेस न धरतां नुसतें लोकवस्तीपुरतेंच बोलावयाचें असल्यास, या दोन अमलदारींत निरनिराळ्या राज्यकर्त्यांनीं आपआपल्या राजवटींत उज्जनीची रचना नखशिखांत नवी केली असें म्हणतां येईल.

हल्लीं या शहराची दक्षिणोत्तर लांबी सरासरी दोन मैल व पूर्व-पश्चिम रुंदी दीड मैल असून क्षेत्रफळ तीन चौरस मैल आहे. शहराच्या सभोंवार पूर्वी पक्का कोट होता. त्यांत ठिकठिकाणीं अनेक बुरुज व नदी-दरवाजा, अंकपाद-दरवाजा, हरसिद्धि-दरवाजा, असे अनेक दरवाजे, म्हणजे वेशी, बांधलेल्या होत्या. परंतु हल्लीं शहराच्या उत्तर व पश्चिम दिशांकडील कोट नुसता नामशेष झाला असून त्यांतले काहीं दरवाजे मात्र उभे आहेत. पूर्व व दक्षिण दिशांकडील कोटहि बराच पडला आहे; पण त्यांतला काहीं भाग अद्याप कायम आहे. हा कोट कोणीं केव्हां बांधविला हें कळत नाहीं. कोणीं त्याचा संबंध विक्रमादित्याशीं जोडतात, तर कोणीं

दिल्लीच्या बादशाहाचे सुभेदार दिलावरखां घोरी, बाजबहादुर, सवाईजयसिंग, यांपैकीं कोणाशीं तरी जोडून देत असतात. पण त्या सर्व कल्पना होत. विश्वसनीय अशी त्याविषयीं माहिती अद्याप मिळालेली नाहीं.

ई० सन १९२१ च्या गिणतीप्रमाणें येथील लोकसंख्या ३२,२०० हिंदु, ११,५०० मुसलमान व ३०० इतर, मिळून एकंदर ४४,००० आहे. हिंदूंत ब्राम्हण व वाणी यांचा भरणा अधिक आहे. ब्राम्हणांत देखील पूर्वीं केव्हां तरी गुजराथेंतून येऊन येथे स्थायिक झालेले गौड व औदीच्य शाखेचे ब्राम्हण अधिक असून दाक्षिणात्य, नागर, दसोरे वगैरे कमी आहेत. मुसलमानांत बोहोरे आणि सुन्नी, शिया, वगैरेंची संख्या बहुतेक समसमान आहे.

येथील हवामान समशीतोष्ण आहे. कडक उन्हाळा व कडक हिवाळा येथे प्रायः कधींच नसतो. उष्णतेचें मान येथे वैशाख-ज्येष्ठांत ६५ ते १०६ व कधीं कधीं ११२ अंशापर्यंत पोंचतें, आणि मार्गशीर्ष-पौषांत ९० ते ४२ व कधीं कधीं ३५ अंशापर्यंत उतरत असतें. उन्हाळ्यांत दिवसा ऊन कडक पडतें; पण तें किती जरी कडक पडलें तरी येथील रात्री नेहमी थंडच असतात व त्या आपल्या थंडपणाबद्दल प्रसिद्धहि पण आहेत. पर्जन्याचें मध्यम परिमाण ३२ इंच आहे; व येथील जमीन सुपीक असल्यामुळें २५ इंच पाऊसदेखील येथील पिकांस पुरेसा होतो.

---

१ जहांगीर याचें दक्षिणेकडील प्रवासवृत्त पहा.

# प्रकरण दुसरें.

## अवंतिकेचा इतिहास.

**अवंतिका—उज्जयिनी—उज्जन**—या क्षेत्राच्या इतिहासाचे दोन भाग ठळक दिसतात: (१) एक **प्राचीन**, म्हणजे पौराणिक, दंतकथात्मक व पुरातन लेखबद्ध **इतिहास**; आणि (२) दुसरा **अर्वाचीन**, म्हणजे ज्याला सामान्यतः ऐतिहासिक काल म्हणतां येतें, त्या मुसलमानी कालापासून वर्तमान कालापर्यंतचा **इतिहास**. हे या क्षेत्राच्या इतिहासाचे दोन भाग म्हणजे साधारणतः त्याच्या उत्कर्षाचे व अपकर्षाचे इतिहास होत.

### १. प्राचीन इतिहास.

१. **आर्यकालीन अवंतिका**—भरतखंडांत **अवंतिका** नगरी फार प्राचीन कालापासून वसलेली आहे. वैदिक वाङ्मयांत तिचा उल्लेख आढळला नाहीं. परंतु तदुत्तर कालीन वाङ्मयांत तत्संबंधी जे उल्लेख दृष्टोत्पत्तीस येतात त्यांवरून ही नगरी सूत्रकालाच्या व पुराणकालाच्या, म्हणजे सुमारें पांच हजार वर्षांच्या, पूर्वीपासून येथे विद्यमान आहे, असें अनुमान करतां येतें. कारण बौधायन सूत्रांत अवंतिदेशांतील मिश्र जातीयांचा उल्लेख करून त्यांच्यांत न मिसळण्याविषयीं तेंथे जाणाऱ्या वैदिकांना इषारा दिलेला आहे.[1]

---

१. बौधा० धर्म० अ. १.

यावरून त्या कालीं **अवंतिका** बरीच प्रसिद्धीस आलेली होती, तिच्या भोंवतालचा प्रदेश तिच्या नांवावर ओळखला जात होता, त्यांत आर्यजातीयांची वस्ती बरीच झालेली होती, त्यांच्या संस्कृतीचा तेथील मूळच्या रहिवाशांवर प्रभावही चांगला पडला होता व त्या जाती आर्यजातींत बऱ्याच मिसळल्या होत्या किंवा मिसळत चालल्या होत्या, असें दिसतें. तेव्हां अशा प्रकारची ही कार्यघटना होण्यांत जो काल व्यतीत झाला असेल तो अर्थातच बौधायन सूत्राच्या पूर्वींचा काल होय. रामायणांत, सीतादेवीच्या शोधासाठीं देशोदेशीं जाण्यास सिद्ध झालेल्या वानर मंडळाला सुग्रीवानें वाटेंत लागणाऱ्या देशदेशांतराची माहिती देतांना अवंतिकेचा उल्लेख केला आहे.[1] महाभारतांतील सभापर्वांत, राजसूय यज्ञाच्या प्रसंगानें दक्षिणेकडील राजांकडून करभार घेण्यासाठीं निघालेल्या सहदेवानें अवंतिदेशावर स्वारी केल्याचें वर्णन असून उद्योगपर्वांत अवंतीच्या विंद व अनुविंद या दोन राजांनीं युद्धांत कौरवांकडून भाग घेतल्याचें वर्णन केलें आहे.[2]

श्रीमद्भागवतांत श्रीकृष्ण व बलराम हे या नगरींत सांदीपनी नांवाच्या गुरूच्या आश्रमांत विद्यार्जनासाठीं येऊन राहिल्याची कथा दिली आहे;[3] व त्यावरून तत्कालीन एकंदर चौदा विद्या व चौसष्ट कला यांचें सांगोपांग अध्ययन-अध्यापन करण्याचें एक फार मोठें विद्यापीठ ह्मणून **अवंतिका** नगरी सर्वत्र नांवाजलेली होती, असें दिसतें. त्या वेळेस येथे राज्य कोणाचें होतें, राजा

---

१. कि. कां. सर्ग ४१, ४२.

२. सभा प. अ. ३१; व उद्यो. प. अ. १८.

३ भाग. स्कं. १० पूर्वार्ध, अ. ४५.

कोण होता व राज्यव्यवस्था कशी होती, हें भागवतावरून किंवा इतर ग्रंथांवरून निश्चित करतां येत नाहीं. परंतु तदनंतर येथें भद्रसेन, गंधर्वसेन, रणकदेव, वगैरे चंद्रवंशीय राजांनीं राज्य केल्याचीं जीं वर्णनें अग्निपुराण, गरुडपुराण, स्कंदपुराण, विष्णु-पुराण, वगैरे अनेक पुराण ग्रंथांत आढळतात त्यांवरून, व पुढें प्रद्योत, शूद्रक, भर्तृहरि, विक्रमादित्य, या राजांनीं राज्य केल्या-च्या ज्या कथा उपलब्ध आहेत त्यांवरून, ही नगरी फार प्राचीन कालापासून, जसें एक सर्वश्रेष्ठ विद्यापीठ, तशीच ती अत्यंत वैभवशाली अशा अनेक राजांची धनकनकसंपन्न राजधानी म्हणून-हि सर्वत्र प्रसिद्धीस आलेली होती, असें अनुमान होतें. तत्कालीन अनेक ग्रंथांत तिला कनकशृंगा, अमरावती, पद्मावती, पुष्पकरं-डिनी, विशाला अशा प्रकारचीं अनेक सार्थ नांवें देऊन तिचा बराच गौरव केलेला आहे.

त्यानंतरच्या संस्कृत ललित वाङ्मयांत तर या नगरीची स्तुति-स्तोतारणें मुक्तकंठानें गायिलीं गेलीं आहेत; व शूद्रककृत मृच्छकटिक, सोमदेवभट्टकृत कथासरित्सागर, कालिदासकृत मेघदूत व बाणभट्टविरचित कादंबरी, या ग्रंथांत तीं यथेच्छ पहावयास सांपडतात.

अवंतिका नगरीच्या या प्रशस्ति, आपल्यापुढें काव्यरूपानें येत असल्यामुळें, कविकल्पना मानल्या जाण्याचा संभव आहे. परंतु त्या कविकल्पना जरी मानल्या तरी त्या निर्मूल व अतएव टाकाऊ मात्र मानतां येणार नाहींत. त्यांत थोडी-फार अतिश-योक्ति असणें स्वाभाविक आहे; पण तिच्या मुळाशीं ऐतिहासिक सत्यहि बरेंच असावेंसें वाटतें. "......श्रीविशालां विशालाम्"

"हैमं तालद्रुमवनमभूदत्र तस्यैव राज्ञः" "स्वल्पीभूते सुचरित फले स्वर्गिणां गां गतानां, शेषैः पुण्यैः कृतमिव दिवः कान्तिमत्खंडमेकम्" या मेघदूतांतील कालिदासाच्या उक्ति व तसेंच मृच्छकटिकांत रेखाटलेलें वसंतसेनेच्या विस्तीर्ण वाड्याचें शब्दचित्र, यांतील अतिशयोक्तिवर्णन हें उज्जनीच्या तत्कालीन सांपत्तिक वैभवाचें दृश्य डोळ्यापुढें असल्याखेरीज करतां येणार नाहीं. मूळांत त्याला काहीं आधार हा असलाच पाहिजे. आणि या देशांत परदेशांतून येणाऱ्या सोन्या-मोत्यांच्या व्यापाराचें व परदेशांत या देशांतून जाणाऱ्या उंची वस्त्रें, हिरे-माणकें, वगैरे मालाच्या व्यापाराचें, त्या कालीं, उज्जन हें केंद्र बनलें होतें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध असून तें या नगरीच्या तत्कालीन सांपत्तिक वैभवाचें कारण दिसतें. त्याचप्रमाणें, अशा प्रकारच्या धनकनकसंपन्न शहरांत वसंतसेनेसारख्या विश्वयोषितांचा धंदा कसा किफायतशीर रीतीनें चालूं शकतो त्याचें प्रत्यंतर आपल्यास मुंबई-कलकत्यासारखीं शहरें आजहि दाखवितील. तेव्हां उज्जन नगरीच्या स्वर्गतुल्य वैभवाचें मेघदूतांतील वर्णन, आणि तेथील वसंतसेनेच्या सात चौकी वाड्याचें व चारुदत्तासारख्या नामांकित व्यापाऱ्याच्या खालावलल्या स्थितीचें मृच्छकटिकांतील वर्णन, या नुसत्या कविकल्पना कशा मानतां येतील ? अर्थात् तसें न मानतां तें त्या वेळच्या परिस्थितीनें प्राप्त झालेलें उज्जनीचें वर्णन आहे, असें मानणें हा उचित पक्ष दिसतो.

धार्मिक दृष्ट्या या नगरीची पवित्रता, पूज्यता व श्रेष्ठता ही या देशांत तिला वैज्ञानिक, सांपत्तिक व राजकीय वैभव प्राप्त होण्याच्याहि पुष्कळ पूर्वींची आहे. किंबहुना, ती तिच्या ठिकाणीं

निसर्गसिद्ध आहे. कारण येथे या नगरीची गणना क्षेत्रांत झालेली आहे; आणि जें स्थान स्वभावतःच पवित्र असतें, व अतएव "गंगेसि मिळतां गंगाजळ" या न्यायानें केवळ संसर्गमात्रेंकरून जेथे सर्व पातकांचा क्षय होतो, सर्व दोष नाश पावतात, तें स्थान क्षेत्र[1] म्हणवत असतें. तेव्हां या नगरीचें पावित्र्य स्वभावसिद्ध आहे, ही गोष्ट उघड होय. शिवाय, श्रीमहाकालेश्वर या क्षेत्राचे अधिपति असल्याकारणानें त्याचें माहात्म्य फार वाढलें असून भरतखंडांत तें पूर्वीपासून एक महाक्षेत्र मानलें गेलें आहे. त्याचप्रमाणें या क्षेत्रांतून क्षिप्रेसारखी पुण्यनदी वहात असल्यामुळें त्याच्या पावित्र्यांत आणखीहि भर पडली आहे. आणि येथील 'अंकपाद' नांवाची भूमि ही भगवान् श्रीकृष्ण व बलदेव यांच्या पादस्पर्शानें पुनीत झाली असल्यामुळें हें क्षेत्र शैव व वैष्णव या दोन्हीं संप्रदायांत सारखेंच पूज्य मानलें जात असतें.

एवंच, याप्रमाणें या नगरींत, सर्व पातकांचें निरसन करणारें असें क्षेत्र, सर्व विद्यांचें आगर असें विद्यापीठ आणि सर्व राजैश्वर्यसंपन्न व व्यापारकेंद्रीभूत अशी राजधानी, यांचा त्रिवेणीसंगम झाल्याकारणानें तिला आर्यकाळीं फार महत्व आलें होतें. भाविक यात्रेकरी, सर्वशास्त्रपारंगत असे मोठमोठे विद्वान व सकलकलानिष्णात असे नामांकित गुणिजन, यांची येथे सारखी रहदारी चाललेली असे. आणि येथील तत्कालीन राजांत अनेक राजे स्वतः उत्कृष्ट विद्वान, रसिक, मुक्तहस्तानें विद्यार्जनाला उत्तेजन देणारे, विद्वानांची यथायोग्य संभावना करणारे, व गुणिजनांचा यथेच्छ परामर्श घेणारे, असल्याकारणानें त्यांची सभा उत्तम विद्वान,

१. क्षीयते पातकं यत्र तेनेदं क्षेत्रमुच्यते—स्कंदपुराण.

उत्तम कवि, उत्तम नाटककार, यांच्या योगानें नेहमी फुललेली असे. राज्यकारभाराबरोबर तेथे सवडीनुसार वैज्ञानिक चर्चा, धर्मविचार, काव्याचें वाचन व नाटकांचे प्रयोगहि पण होत असत. मिळून थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ही नगरी एके काळीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष, या चतुर्विध पुरुषार्थांचें महाद्वार बनली होती, असें प्राचीन ग्रंथांवरून दिसतें.

२. **आर्यबौद्धकालीन अवंतिका**—ख्रिस्ती सनापूर्वी सहाव्या शतकांत एकंदर भरतखंडाचे सामान्यतः उत्तरापथ, मध्यदेश व दक्षिणापथ, असे तीन भौगोलिक विभाग मानले जात असत; आणि त्यांत बुद्धाच्या वेळीं **अंग, मगध, काशी, कोसल, वाजी** ( वज्जैन, वज्जी ), **मल्ल, चेदी, वत्स, कुरू, पांचाल, मत्स्य, शौरसेन** (शूरसेन), **वृशाका** ( वस्सका ), **अवंति, गांधार** व **काम्बोज**, हीं सोळा राज्यें स्थापित होतीं. ‘ अंगुत्तरनिकाय ’ नामक बौद्ध ग्रंथांत या सोळा राज्यांच्या समुच्चयाचा ‘ षोडशजनपद ’ या नांवानें उल्लेख केला आहे. यांपैकीं **शौरसेन** देशाच्या राजाला त्या ग्रंथांत ‘ अवंतिपुत्त ’ असें एक टोपण नांव दिलेलें आहे, व त्यावरून, त्या देशाचा तत्कालीन राजा हा **अवंति** देशाच्या राजाचाच कोणी तरी वंशज असावा असें अनुमान होतें. या सोळा राज्यांत **मगध, कोसल, वत्स** व **अवंति**, हीं चार राज्यें प्रमुख होतीं; आणि **राजगृह, श्रावस्ती, कौशाम्बी** व **उज्जयिनी** ( उज्जन ), या अनुक्रमें त्यांच्या राजधान्या होत्या. या सोळा राज्यांवर आधिराज्य असें त्या काळीं कोणाचेंच नव्हतें. सर्व राज्यें स्वतंत्र होतीं; आणि त्यांत काहीं राज्यें प्रजासत्ताक असून त्यांना ‘ गण ’ ही संज्ञा दिली जात असे.

अवंतिका नगरींत या कालीं क्षत्रिय कुलोत्पन्न मगधवंशीय सुप्रसिद्ध राजा प्रद्योत हा राज्य करीत होता. तो बुद्धदेवाचा समकालीन होता; व तो येथे राज्य करीत असतां किंवा त्याच्या कांहीं पूर्वीं भरतखंडांत बौद्ध धर्माचा उदय झाला होता. हा राजा फार शूर व धाडसी असल्यामुळें त्याचा सर्वत्र दरारा असे. इतर सर्व राजे त्याला वचकत असत. प्रद्योतानें अनेक राजांवर केलेल्या स्वाऱ्यांचीं वर्णनें मध्यमनिकायादि बौद्ध ग्रंथांत पहावयास सांपडतात. त्यानें एकदां मगध देशाच्या अजातशत्रुवरहि स्वारी केली होती; परंतु मध्येंच बेत फिरल्यामुळें तिकडे जाण्याचें सोडून त्यानें आपला मोर्चा वत्सराज उदयनाकडे वळविला. उदयनहि पांडववंशी क्षत्रिय असून शूर होता. शिवाय त्याचा मंत्री यौगंधरायण हा चाणक्यासारखा राजनीतिज्ञ, राजकार्य-कुशल व फार बुद्धिवान होता. तेव्हां अशा प्रबल शत्रूशीं सामना करून त्याला परास्त करणें सोपें नाहीं, असें वाटल्यावरूनच कीं काय न कळे, प्रद्योतानें उदयनाला युक्तिप्रयुक्तीनें जंगलांत एकटा गांठून पकडलें व आपल्या राजधानीस आणून कैद केलें. एवंच अशा प्रकारच्या प्रद्योताच्या स्वाऱ्या नेहमींच होत असल्यामुळें इतर सर्व राजे त्याला फार भीत असत; आणि त्या भीतीचीं किंवा त्याच्या शौर्याचीं निदर्शक अशीं 'चंडसेन,' 'महाचंडसेन' हीं उपपदें त्याच्या नांवापुढें जोडलीं गेलीं होतीं.

उदयन हा गायन-वादन कलेंत निष्णात असल्यामुळें, त्याला कांहीं दिवस बंदिवासांत ठेविल्यानंतर, प्रद्योतानें आपली मुलगी वासवदत्ता हिला गायन-वादन शिकविण्याच्या कामीं त्याची

१ बुधिस्ट इंडिया (बौद्ध भारत), पृ. १-३.

योजना केली. त्याप्रमाणें, वासवदत्तेला गायन शिकवीत असतां उदयनाचा व तिचा जो काहीं दिवस सहवास घडला, त्यांत तीं उभयतां परस्पर प्रेमबद्ध झालीं. इकडे उदयनाला सोडविण्याचा प्रयत्न त्याचा मंत्री यौगंधरायण हा करीतच होता. त्याला त्या उभयतांच्या परस्परानुरागाची गुणगुण समजल्यावर त्याचा फायदा घेऊन त्यानें वासवदत्तेसह उदयनाला तेथून युक्तिप्रयुक्तीनें पळविलें.[1] प्रद्योताला ही वार्ता कळल्यानंतर त्यानें त्यांचा पाठलागहि केला; परंतु तत्पूर्वींच तीं उभयतां आपल्या राज्यांत, वत्सदेशाच्या हद्दींत, जाऊन पोंचलीं होतीं. यामुळें प्रद्योताला काहीं करतां आलें नाहीं. त्याची सर्व धांव-पळ फुकट गेली. आणि हें प्रणयी जोडपें जसें प्रेमबद्ध झालें होतें तसेंच तें आपल्या राजधानींत, कौशाम्बींत, पोंचल्यानंतर विवाहबद्धहि झालें. "प्राप्यावन्तीनुदयनकथा कोविद्ग्रामवृद्धान्" ( श्लोक ३० ) असें कालिदासानें या कथेसंबंधानें मेघदूतांत उद्गार काढले आहेत; व त्यांवरून त्या कालीं ही वासवदत्ता-उदयन-कथा अवंतिदेशांत सर्वतोमुखीं होती, असें दिसतें. शिवाय, त्यांवरून कालिदासाचा काल या वृत्तानंतर तीन-चारशें वर्षांचा असावा, असेंहि अनुमान करतां येतें. सोमदेवभट्टकृत कथासरित्सागरांतहि ही कथा दिलेली आहे; आणि भासकविकृत 'स्वप्नवासवदत्ता' व 'प्रतिज्ञायौगंधरायण,' या दोन सर्वोत्कृष्ट नाटकांचा तर ती मुख्य विषयच झालेली आहे.

कोणी ह्मणतो वासवदत्तेचा उदयनाशीं विवाह असा मुळींच झाला नाहीं. तर ती त्याच्या बरोबर पळून गेल्यानंतर विवाह न करतां तीं उभयतां परस्पर प्रेमवशात् पतिपत्नी या नात्यानें एकत्र

१. प्रद्योतस्य प्रियदुहितरं वत्सराजोऽत्रजन्हे—मेघदूत श्लो. ३२.

रहात असत. महावग्ग नांवाच्या बौद्ध ग्रंथाचा कर्ता दुसरेंच काहीं सांगतो. पण तें कसेंहि असो; या कथाभागावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं, त्या कालीं राजस्त्रिया किंवा राजकन्या यांनां गायन-वादनादि ललित कलांचें शिक्षण दिलें जात असे, त्यांचे विवाह प्रायः प्रौढ वयांतच होत असत, प्रेमवशात् युक्तिप्रयुक्तीनें घडवून आणलेले त्यांचे विवाहसंबंध फारसे निंद्य मानले जात नसत, आणि राजघराण्यांत गोषाची चालहि बहुतेक नसावी व असली तरी ती बंदिवासाच्या मर्यादेपर्यंत गेलेली नसावी.

प्रद्योतानंतर जवळ जवळ तीनशें वर्षांतील या देशाचा इतिहास उपलब्ध नाहीं. त्याच्या पश्चात् नुसत्या त्याच्या उत्तराधिकाऱ्यांच्या तीन-चार पिढ्यांचा उल्लेख कोठे कोठे आढळतो; पण त्यांच्या वेळची, अर्थात् प्रद्योतानंतरची, येथील राजकीय परिस्थिति कशी काय होती तें कळत नाहीं. ईसवी सनाच्यापूर्वी सहाव्या किंवा सातव्या शतकांत एका मागून एक उदयास आलेल्या जैन व बौद्ध[1] या दोन धर्मांच्या प्रसाराचें कार्य या तीनशें वर्षांत जसें इतरत्र तसेंच येथेहि चालू असलें पाहिजे. दक्षिणागिरी या नांवाचा बौद्धांचा एक फार मोठा मठ येथे होता व त्यांत हजारों बौद्ध भिक्षु रहात असत. त्याचप्रमाणें जैनांच्या अनेक तीर्थंकरांचीं मोठमोठालीं मंदिरेंहि येथे होतीं. तेव्हां त्या दोन्हीं धर्मांच्या अनुयायांचे व पुरस्कर्त्यांचे येथील वैदिकांशीं वादविवाद,

---

१. जैन व बौद्ध या दोन धर्मांत म्हणण्यासारखा भेद नाहीं. एक आचारप्रधान व दुसरी विचारप्रधान अशा त्या एकच धर्माच्या दोन शाखा आहेत, असें म्हटलें तरी चालेल. ( ज्ञानकोशांतील या दोन्हीं धर्मांचें सविस्तर विवेचन पहा ).

प्रसंग विशेषीं त्यांचीं संघर्षणें व त्यांच्या झटापटी, हे प्रकारहि येथें त्या कालीं घडत असलेच पाहिजेत. पण त्यासंबंधाचे उल्लेख कोठें आढळत नाहींत; व त्याविषयीं विश्वसनीय माहिती मिळत नाहीं.

ई. स. पू. २८६ त किंवा त्याच्या काहीं पूर्वीं अवंतीचें राज्य पाटलीपुत्र ( पटना ) येथील मौर्य-साम्राज्यांत समाविष्ट झालें. वस्तुतः या साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्य यानें मगध येथील नंदवंशाचा उच्छेद करून ई. स. पूर्वीं ३२२ तच केली होती; परंतु त्या वेळीं, अवंतीचें राज्य त्याच्या अंकित जरी झालें असलें तरी त्याच्या साम्राज्यांत सामिल झालें नव्हतें. त्याचें निराळें अस्तित्व होतें. कारण चंद्रगुप्ताची कारकिर्द ई. स. पू. २९८ त संपेपर्यंत या देशांत त्याचा कोणीं सुभेदार नेमला गेला नव्हता. यावरून, चंद्रगुप्तानें आपल्या साम्राज्याची स्थापना केली तेव्हां केवळ मगध देशाच्या उत्तरेकडील राज्यें मात्र त्यानें पादाक्रांत केलीं होतीं, दक्षिणेकडे तो आला नव्हता; किंवा निदान दक्षिणेकडील राज्यें त्यानें खालसा केलीं नव्हतीं. पुढें, चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार साम्राज्य-पदारूढ झाल्यानंतर त्यानें दक्षिणेवर स्वारी करून तीं आपल्या साम्राज्यांत सामिल केलीं[1], त्यांच्या बरोबर हें अवंतीचें राज्यहि त्यांत सामिल केले गेलें असावें असें वाटतें. कारण अवंतिदेश मौर्य-साम्राज्याचा सुभा झाला तेव्हां त्यावर सम्राट बिंदुसार याचा मुलगा अशोक हा सुभेदार नेमला गेला. अशोक हाच येथील पहिला सुभेदार होय. आणि त्याला बिंदुसार यानें

१. सत्यकेतु विद्यालंकारकृत मौर्य-साम्राज्याचा इतिहास ( हिंदी ), पृष्ठ ४२७.

तक्षशिला येथून बदलून अवंति येथे ई. स. पू. २८६ या वर्षी पाठविलें असा इतिहास आहे. तेव्हां त्याच वर्षी किंवा त्याच्या वर्ष-दोन-वर्ष पूर्वी अवंतीचें राज्य मौर्य-साम्राज्यांत समाविष्ट झालें असावें, असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं.

अशोक या देशाचा सुभेदार होऊन आल्यावर तो उज्जनी-सच रहात असे; व त्याच्या अमलदारींत उज्जनीची भरभराटहि चांगली होती. हें शहर परदेशी व्यापाराचें मुख्य केन्द्र किंवा उतारपेठ पूर्वींच बनलेलें होतें. पश्चिम किनाऱ्यावरील अनेक बंदरांचा उत्तर हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांशीं चालणारा व्यापार या पेठेच्या द्वारा चालत असे. भडोच व सूरत येथून उंची कापड व नकशीदार भांडीं हीं येथे येऊन नंतर येथून इतरत्र जात असत.[2]

अशोक ई. स. पू. २७३ त साम्राज्याच्या गादीवर आल्या-नंतर त्यानें उज्जनीस एका मोठ्या विद्यालयाची स्थापना केली; बौद्ध भिक्षुसाठीं विहार बांधले; व यात्रेकरूसाठीं धर्मशाळा बांधविल्या. त्याच्या कारकिर्दींत राज्यांतील उद्योगधंदे, व्यापार, वगैरे खात्यांची देखरेख व व्यवस्था लोकनियुक्त मंत्रि-मंडळाकडे सोंपविलेली असे[3]. त्यानें तेथे 'नरक' नांवाचें एक कारागृह गांवाबाहेर बांधविलें होतें, असें ह्यूएनसंग नांवाच्या चीनी प्रवाशानें आपल्या

---

१. इतिहासशिरोमणि राधाकुमुद मुकर्जीकृत अशोक ( इंग्रजी ), पृष्ठ ४४.

२. त्या वेळच्या व्यापारी दळण-वळणाचे मार्ग परिशिष्ट १ यांत पहा.

३. व्हिन्सेन्ट स्मिथ याचा प्राचीन भारतीय इतिहास ( इंग्रजी ), पृष्ठ ११२, १३६, १४५.

प्रवासवृत्तांत लिहिलें आहे[१]. ज्याची 'नरक' ही संज्ञा पूर्ण अन्वर्थ होती असें एक कारागृह अशोकानें आपली राजधानी पाटलीपुत्र, येथेहि बांधविलें होतें; व पुढें त्यानें तें आपल्या हयातींतच तोडवूनहि टाकलें.

अशोक-अवदानादि बौद्ध ग्रंथांत या राजासंबंधानें अनेक चमत्कारिक कथा दिलेल्या आहेत. त्या ग्रंथांचे कर्ते ह्मणतात कीं वर सांगितलेल्या नरकसंज्ञित कारागृहांत अनेक प्रकारचीं शस्त्रें, चक्रें, तप्त तेलाच्या कढया, लोहशूल वगैरे, मनुष्याला यम-यातना भोगावयास लावण्याचीं साधनें, नेहमी तयार ठेविलेलीं असत; व त्याच्या कोटाभोंवतीं एक रमणीय उद्यान निर्माण केले गेलें होतें. हे उद्यान पाहून पांथस्थांना त्यांत क्षणभर विश्रान्ति घेण्याची साहजिक इच्छा होई, व तेथे जाण्यास कोणालाहि मनाई नसल्यामुळें अनेक लोक त्यांत शिरत. पण आंत गेलेला मनुष्य पुन्हा बाहेर न येतां तो कारागृहांत कोंडला जाई; आणि अशा रीतीनें फसवून त्याला आपल्या ताब्यांत घेतल्यावर अधरोक्त साधन-सामग्रीच्या द्वारा त्याचे हाल हाल करून त्याला यमसदनाची वाट दाखविण्यांत अशोकाला मौज वाटत असे! तो साम्राज्यपदारूढ झाला तेव्हां त्यानें राजवंशांतल्या सर्व पुरुषांची मुला-बाळांसुद्धां स्व-हस्तानें कत्तल केली. अशोक हा काहींसा कुरूप असे; व त्या त्याच्या कुरूपतेसंबंधानें, एके दिवशीं त्याच्या अंतःपुरांतील स्त्रिया आप-आपसांत बोलतांना, सहज दोन शब्द बोलून गेल्या. पण ही गोष्ट

---

१. बीलचें 'बौद्धकालीन लेख' भाग २, पृष्ठ २७१; व कनिंग-हॅमचें 'भिलसा टोप्स' पृ. ९६.

अशोकाच्या कानीं जातांच त्यानें त्यांच्या त्या अपराधाबद्दल—कोणीं ह्मणतात त्यांनीं राजोद्यानांतील अशोक वृक्षाच्या कांहीं फांद्या तोडल्या या अपराधा (?) बद्दल—त्यांना आपल्यापुढें फरफरा ओढीत आणून जिवंत जाळलें! मिळून अशा प्रकारचें अशोकाच्या क्रूरपणाचें, एखाद्या बकासुराला मात्र शोभणारें, चित्र या ग्रंथकारांनीं रेखाटलें असून त्याला बौद्धधर्माचा उपदेश झाल्यावर—अर्थात् त्या उपदेशाच्या प्रभावानें—त्याचा तो स्वभाव पालटून तो सैतानाशोकाचा धर्माशोक बनला, असें ते पुढें सांगत आहेत. परंतु बाबू रमेशचंद्र दत्त यांच्या मतें बौद्धांच्या या दंतकथा सर्वथा निर्मूल असून केवळ बौद्धधर्माची महति विशेष खुलवून दाखविण्यासाठीं त्या रचल्या गेल्या आहेत.[1] आणि विचाराअंतीं हाच प्रकार बहुधा खराहि असावा असें वाटतें. कारण अशोकाच्या सुप्रसिद्ध धार्मिक प्रवृत्तिवरून त्यानें बौद्धधर्माची दीक्षा घेण्यापूर्वींहि तो कोणत्या ना कोणत्या धर्माचा अनुयायि किंवा अभिमानी हा असलाच पाहिजे, असें साहाजिक अनुमान होतें. कोणीं ह्मणतात तो जैन होता; तर कोणीं ह्मणतात तो इंद्र-अग्नि-सूर्यादिकांची उपासना करणारा व नित्य साठ हजार ब्राह्मणांना भोजन देणारा[2] वैदिक होता. पण तो जमीनीवर फुंकून पाउल टाकणारा जैन असला तरी किंवा यज्ञादिकांत पशुहिंसा करणारा वैदिक असला तरी त्याच्या हातून बौद्ध ग्रंथकार ह्मणतात तशीं अमानुष कृत्यें घडण्याचा फारसा संभव दिसत नाहीं.

---

१. History of Civilization in Ancient India, Vol. II, P. 3.

२. Bhilsa Topes.

अशोकानें बौद्धधर्माचा स्वीकार केल्यावर तर त्या धर्माचा उत्कर्ष घडवून आणण्याच्या कामीं त्यानें सर्वस्वी आपल्यास वाहून घेतलें होतें, असें उघड दिसतें. त्यानें उत्तरेस हिमालय व दक्षिणेस सिंहलद्वीप (सीलोन), पूर्वेस ब्रह्मदेश व पश्चिमेस सीरिया वगैरे ग्रीक राष्ट्रें, येथपर्यंत सर्वत्र धर्मोपदेशक पाठवून बौद्धधर्माचा प्रसार होण्याची व्यवस्था केली; आणि या देशांत ठिकठिकाणीं चैत्य, स्तूप, मंडप व विहार निर्माण करून लोकांना बौद्धधर्माचें स्वरूप कळावें याकरितां तेथे त्या धर्माचीं मुख्य मुख्य तत्वें अनेक शिलांवर, स्तंभांवर, व विहारांच्या भिंतीवर तत्कालीन प्रचलित भाषेंत कोरून ठेविलीं. अशा प्रकारचे धर्माज्ञा कोरलेले ८४,००० स्तूप त्यानें आपल्या राज्यांत उभारले होते अशी दंतकथा आहे. त्याचप्रमाणें त्यानें बौद्धधर्माच्या निरनिराळ्या मतांचें संशोधन करून त्या धर्माला स्थैर्य आणलें; बौद्ध भिक्षु व भिक्षुणी यांच्या राहण्यासाठीं अनेक मठ बांधविले; प्रवाशांच्या वाटेवर झाडें लावविलीं, विहिरी खणविल्या व त्यांच्या उतरण्यासाठीं ठिकठिकाणीं धर्मशाळा निर्माण केल्या; आणि एकंदर प्राणिमात्रांकरितां आपल्या राज्यांत सर्वत्र चिकित्सालयें (दवाखाने) स्थापित करून लोकांच्या अंतःकरणांत बौद्धधर्माविषयीं आदर उत्पन्न केला.

भरतखंडांत अशोक हाच पहिला चक्रवर्ती राजा झाला असें मानतात. पूर्वेकडे बंगाल व आसाम, दक्षिणेकडे गोदावरीचें तीर, पश्चिमेकडे काठ्यावाड व सिंधुनदीचें तीर, आणि उत्तरेकडे काश्मीर व हिमालय पर्वत, या त्याच्या राज्याच्या मर्यादा होत. शिवाय चोल, पांड्य, योन, काम्बोज, गांधार, पितिनिक, आंध्र, व्रज्रि, भोज, पुलिंद, ताम्रपर्णी, वगैरे देशांचे राजेहि त्याच्याशीं

मांडलिकाच्या नात्यानेंच वागत असत. अर्थात् भरतखंडाच्या जवळ जवळ तीन-चतुर्थांश भागावर त्याचें साम्राज्य पसरलें होतें असें इतिहासावरून दिसतें.[1]

अशोक ई. स. पू. २३२ त दिवंगत झाल्यावर त्याचा अंध मुलगा कुनाल उर्फ सुयश हा साम्राज्यपदावर आरूढ झाला. त्याच्या अमलदारींत साम्राज्याचे तुकडे पडून काश्मीर, कलिंग व आंध्र हे देश स्वतंत्र झाले; पण अवंतिदेश पाटलीपुत्राच्याच आधीन राहिला. कुनालानंतर त्याच्या दशरथ व संप्रति या दोन मुलांपैकीं दुसरा संप्रति हा सम्राट झाला, असें जैन ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. परंतु त्यांतला एक ग्रंथकार त्याची राजधानी पाटलीपुत्र होती असें म्हणतो तर दुसरा ह्मणतो उज्जन होती. आणि या दोन विधानांची एकवाक्यता करतां येत नसल्यामुळें व्हिन्सेन्ट ए. स्मिथ या इतिहासकारानें अशी कल्पना केली आहे कीं, अशोकानंतर साम्राज्याचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग होऊन त्यांपैकीं पूर्वभागावर दशरथ व पश्चिमभागावर संप्रति हे दोघे अनुक्रमें पाटलीपुत्र व उज्जन येथे राहून राज्य करीत असावेत. परंतु या कल्पनेला ऐतिहासिक आधार नाहीं, असेंहि त्याच ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. मौर्य-साम्राज्याच्या इतिहासांत ( हिंदी ) कुनालानंतर दशरथ व दशरथानंतर संप्रति उर्फ दुसरा चंद्रगुप्त हा पाटलीपुत्र येथील गादीवर बसला असें वर्णन आहे. सम्राट अशोक हा पक्का बौद्ध असल्यामुळें त्यानें आपल्या राज्यांत जसें बौद्धधर्माला उत्तेजन दिलें तसेंच संप्रति हा पक्का जैन असल्यामुळें त्यानें आपल्या अमलदारींत जैनधर्माला उत्तेजन दिलें. ह्मणून पहिला

१. वासुदेव गोविंद आपटेकृत 'अशोक' ( १८९९ ), पृ. ११२.

'बौद्ध' अशोक तर हा दुसरा 'जैन' अशोक असा त्याचा उल्लेख जैन ग्रंथांत केलेला आहे. संप्रतिनंतर शालिशुक, देववर्मा, शतधनुष व बृहद्रथ, हे चार मौर्यवंशीय राजे पाटलीपुत्र येथील गादीवर क्रमशः बसले; व तदनंतर शेवटल्या बृहद्रथाला मारून त्याचा सेनापति पुष्पमित्र यानें हें राजसिंहासन बळकावलें.

याप्रमाणें मौर्यांची सत्ता नष्ट करून त्यांच्या जागीं शुंगवंशाची स्थापना करणारा पुष्पमित्र किंवा पुष्यमित्र हा ई. स. पू. १८५त साम्राज्यपदारूढ झाला. त्यानें या साम्राज्याच्या पूर्वपरंपरेस अनुसरून आपला मुलगा अग्निमित्र याला अवंतिदेशाचा सुभेदार नेमलें. अग्निमित्रानें आपली राजधानी उज्जनींतून हलवून विदिशा (भेलसा) येथें नेली. त्यानें आपल्या अमलदारींत उज्जनीपेक्षां विदिशानगरीलाच अधिक गौरविलें होतें. तरी पण त्यामुळें उज्जन खालावली मात्र नाहीं. या राजवटींत, साम्राज्यावर दक्षिणेकडून स्वारी करणाऱ्या वैदर्भाधिपतीचा अग्निमित्रानें व उत्तरेकडून स्वारी करणारा ग्रीक राजा मिनांडर याचा अग्निमित्राचा मुलगा वसुमित्र यानें, पूर्ण पराभव केल्यावर सम्राट पुष्पमित्रानें 'अश्वमेध' यज्ञ केला. पतंजलीनें आपल्या व्याकरण महाभाष्यांत या यज्ञाचा उल्लेख केला आहे; व त्यावरून पतंजलि या यज्ञांत विद्यमान होता असें दिसतें. पुढें कालिदासानेंहि आपल्या 'मालविकाग्निमित्र' (मालविका-अग्निमित्र) नांवाच्या नाटकांत या यज्ञाचें वर्णन केलें आहे. या कारकिर्दीचा एक विशेष हा आहे कीं अशोकाच्या अमलदारींत बौद्धधर्म जो उत्कर्षाच्या शिखरावर पोंचला होता त्याला सम्राट पुष्पमित्रानें व मुख्यत्वें त्याचा मुलगा अग्निमित्र यानें बरेंच खालीं ओढलें.

शुंग हतबल झाल्यावर त्या वंशांतील देवभूमी किंवा देवभूती नांवाच्या सम्राटाचा शिरच्छेद करून त्याचा मंत्री वासुदेव या नांवाच्या काण्वानें किंवा काण्वायनानें त्याची पाटलीपुत्र येथील गादी हस्तगत केली; व पंजाबकडील मालवांनीं अवंतिदेशावर स्वारी करून तेथे आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

मालव हे पंजाबांतील रावी नदीच्या तिरीं राहणारे चंद्रवंशीय क्षत्रिय होते असें हरिवंशावरून दिसतें. ते फार शूर असत. भारतीय युद्धांत ते कौरवाच्या बाजूनें लढले. शिकंदराच्या चढाईच्या वेळेस मालव व त्यांचे शेजारी क्षुद्रक ( Malloi and Oxydrakai ) हे दोघे एकत्र झाल्यानंतर शिकंदर त्यांच्याशीं भिडला असता तर त्याला पुढें पाय ठेवणें कठिण झालें असतें. पण शिकंदरानें तसें होऊं दिलें नाहीं. त्यानें दोघांनाहि निरनिराळे गांठून त्यांना परास्त केलें. तरी पण मालवांनीं त्याला चांगलाच हात दाखविला व युद्धांत त्याला दोन वेळ आपल्या तीक्ष्ण शरांनीं घायाळहि केलें.

यवनांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांना कंटाळून की काय न कळे, हे मालव लोक पंजाब सोडून दक्षिणेकडे आले; व राजपूतान्यांतून मार्ग काढीत काढीत अवंतिदेशांत येऊन येथे त्यांनीं आपल्या राज्याची स्थापना केली. राजपूतान्यांत एका नगर नांवाच्या प्राचीन ठिकाणीं “ जय मालवाणं ” हा मायना ज्यांवर दोन ओळींत लिहिलेला आहे अशीं काहीं नाणीं सांपडलीं आहेत, तीं या मालवांचींच असून त्यांवरील अक्षरांच्या वळणावरून तीं ई. स. पूर्वीं पहिल्या शतकांतलीं आहेत असें निश्चित झालें आहे. तेव्हां

१. राव बहादुर चिं. वि. वैद्य यांचें ‘ मध्ययुगीन भारत ’ भा. १ पु. २ पृ. ३५८-५९ आणि भा. २ पृ. १०५ पहा.

ई. स. पूर्वीचें पहिलें शतक हा मालवांच्या अवंतिदेशांत येण्याचा काल होय. या देशाला मालव किंवा माळवा हें नांव त्यांनींच दिलें, किंवा त्यांच्या योगानें या देशानें तें नांव प्रचारांत आलें. या देशांत मालवांचें राज्य प्रस्थापित झाल्यानंतर त्यांचा पहिला राजा येथे कोण झाला तें सांगतां येत नाहीं. पण त्यासंबंधानें एक दंतकथा अशी ऐकण्यांत येते कीं, मालव कुलांतील सुप्रसिद्ध भर्तृहरी व विक्रम किंवा विक्रमादित्य, यांच्या बापाचें नांव गंधर्वसेन होतें. तो येथें पूर्वी राज्य करीत होता. त्याच्या नंतर त्याचा वडील मुलगा भर्तृहरी हा राजा झाला; परंतु पुढें त्याला प्रपंचाचा व त्याबरोबर राज्याचाहि वीट येऊन त्यानें राज्याचा त्याग केला व नाथपंथाची दीक्षा घेतली. शृंगार, नीति व वैराग्य हीं तीन शतकें ज्याच्या नांवावर प्रसिद्ध आहेत, तोच हा भर्तृहरी होय. त्यानें राज्य सोडल्यावर त्याचा धाकटा भाऊ विक्रमादित्य हा येथे राज्य करूं लागला.

भर्तृहरीसंबंधानें सांगवत नाहीं; पण मालववंशापैकीं विक्रमादित्य या नांवाचा राजा येथे ई. स. च्या पहिल्या शतकांत राज्य करीत होता ही गोष्ट निःसंदेह दिसते. हा राजा फार पराक्रमी होता. शकांची पहिली टोळी जेव्हां पंजाबांत शिरली व ते मथुरेपर्यंत पसरले, तेव्हां मुलतानजवळ कोरूरच्या युद्धांत त्यांचा पराभव करून त्यांना पंजाबांतून पिटाळून लावणारा हा विक्रमच होय; व म्हणूनच तो ‘ शकारी ’ म्हणवितो. त्यानें शकांचा पराभव केल्यामुळें पंजाबदेश ओघानेंच त्याच्या ताब्यांत आला; व नर्मदेपासून पंजाबच्या उत्तरसीमेपर्यंत त्याच्या राज्याचा विस्तार झाला. आणि याप्रमाणें या देशांत आपलें साम्राज्य

प्रस्थापित करून त्याचा स्मारक किंवा निदर्शक म्हणून ईसवी सना-पूर्वी ५७व्या वर्षी त्यानें आपला सुप्रसिद्ध **विक्रमसंवत्** चालू केला.

आरंभीं या संवताच्या कालगणनेला ‘ मालवगण स्थिति ’ म्हणत असत. वस्तुतः आपल्या एकछत्री साम्राज्याचा स्मारक म्हणून हा संवत् **विक्रमानें** चालू केला असतां त्याच्या नांवांत ‘ गण ’ हा लोकसत्तेचा निदर्शक शब्द कां वापरला जावा ? अशी शंका साहजिक येते. परंतु तिचें समाधान असें देतां येईल कीं, पूर्वी **पंजाबांत मालवांचें** राज्य लोकसत्ताकच होतें; व पुढें या देशांत **विक्रमानें** जरी आपलें एकछत्री साम्राज्य स्थापित केलें तरी त्यावेळपर्यंत लोकसमुदायांत पूर्वीच्या त्याच्या लोकसत्ताक राज्याची स्मृति जागृत असल्यामुळें त्यानें चालू केलेल्या संवताच्या कालगणनेला ‘ मालवगण स्थिति ’ हें नांव दिलें गेलें असावें. आणि नंतर जसजशी विक्रमाच्या एकछत्री राज्याची जाणीव दृढावत जाऊन पूर्वीच्या लोकसत्ताक राज्याची स्मृति बुजत गेली तसतशी या कालगणनेची **विक्रमसंवत्** ही संज्ञा प्रचारांत येत गेली असावी.

उज्जनीचें वैभव जें **प्रद्योताच्या** कालापासून एक एक कलेन सारखें वाढत येत होतें त्याला विक्रमादित्यानें पराकाष्ठेस पोंचविलें. त्यानें आपल्या कारकिर्दींत उज्जनीला प्रतिकुबेरनगरी करून ठविलें होतें. येथें श्रीमहाकालेश्वराचें मंदिर ज्या उंचवट्यावर आहे त्याच्या सभोंवार विक्रमादित्यानें भला भक्कम कोट बांधविला. त्या कोटाचा चोवीस खांबी मुख्य दरवाजा अद्याप विद्यमान आहे व त्यावरून त्या कोटाच्या भव्यपणाची चांगली कल्पना येते. त्यानें महाकालेश्वराच्या मंदिराचाहि विस्तार करून व त्याला

अनेक प्रकारच्या देणग्या देऊन त्याच्या शोभेंत व संपत्तींत बरीच भर घातली; आणि या त्याच्या कृतीचा गौरव करण्यासाठीं मंदिराच्या सभामंडपांत त्याचा सोन्याचा पुतळा बसविण्यांत आला होता. वस्तुगत्त्या त्याच्या कारकिर्दींत केवळ उज्जनीचाच नव्हे, तर अखिल भारतवर्षाचा परम उत्कर्ष झाला असें ह्मटलें तरी चालेल. त्याच्या राजवटींत विद्या, वित्त व विक्रम, या तिन्हीं वकारांची एकसमयावच्छेदेंकरून सारखी अभिवृद्धि चालली होती. कालिदासादि जगन्मान्य कवि याच वेळीं उदयास आले. विक्रमादित्याचें नांव ऐकिलें नाहीं असा मनुष्य भरतखंडांत विरळाच असेल. त्याची महती अनेक बाजूनें दाखवितां येते : तो शूर योद्धा होता, धर्मसंरक्षक होता, अत्युच्च रसिक होता, अत्यंत उदार होता, पराकाष्ठेचा परोपकारी होता आणि स्वतः विद्वान असून विद्वानांचा व गुणिजनांचा फार मोठा चाहता होता. हालाच्या प्राकृत गाथासप्तशतींत व सोमदेवभट्टकृत कथासरित्सागरांत या राजाचें चरित्र वर्णिलें आहे; व त्यावरून त्याच्या शौर्य-धैर्य-चातुर्यादि गुणांचा चांगला परिचय मिळतो. त्याखेरीज या राजाविषयीं अनेक चमत्कारिक व सुरस आख्यायिका रचल्या गेल्या आहेत; व त्या बहुतेक जरी काल्पनिक आहेत तरी भारतीय जनतेच्या अंतःकरणांत या राजाविषयीं वसत असलेलें प्रेम व आदर त्यांवरून चांगला व्यक्त होतो. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे शार्लमेन, आल्फ्रेड, हारूनलरशीद वगैरे थोर मानल्या गेलेल्या विदेशीय विभूतींच्या मालिकेंतच या भारतीय विक्रमादित्याचेंहि स्थान, मणि ह्मणून तरी, आहे.

हल्लींच्या ऐतिहासिक दृष्टीनें विक्रमादित्याच्या उक्त चरित्राकडे पाहणारांत दक्षिणोत्तर दिशांप्रमाणें परस्पर विरोधी दोन मतांचे इतिहासकार आढळतात. कोणीं असें ठांसून सांगतात कीं हिंदुस्थानांत अशा प्रकारचा कोणीं विक्रमादित्य कधींच उत्पन्न झाला नाहीं, तो नुसत्या कल्पनासृष्टींतील एक व्यक्ति आहे; तर दुसरे कोणीं त्याच्या अगदीं उलट, तितक्याच जोरानें व आग्रहानें ह्मणतात कीं तो एक भरतभूमीला ललामभूत झालेला व अत्यंत थोर असा ऐतिहासिक राजा होऊन गेला असून त्यानें या देशावर अनेक चिरस्मरणीय उपकार करून ठेविले आहेत. त्याखेरीज या दोन मतांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणारे असे कांहीं माध्यस्थ लोकहि आहेत; व त्यांच्या मतें विक्रम हें एक उपपद (पदवी) मात्र असून तें येथील अनेक राजांनीं धारण केलेलें आहे. परंतु जें उपपद ह्मणून धारण करण्यांत येथील अनेक राजांना अभिमान वाटावा अशा योग्यतेस 'विक्रम' शब्दाला चढविणारा आद्य विक्रम कोणता ? या प्रश्नाचें उत्तर हा उपपदसिद्धान्त पुढें करणारांनीं अद्याप गुलदस्तांत ठेविलें आहे. त्याचप्रमाणें, ईसवी सनाच्या सत्तावन वर्षें पूर्वींपासून माळव्यांत चालू असलेल्या संवताचा, मागाहून दुसऱ्या चंद्रगुप्तानें विक्रम हें आणखी एक नांव धारण केल्यावर, चंद्रगुप्ताच्या गौरवासाठीं त्याच्या त्या दुसऱ्या विक्रम या नांवाशीं संबंध जोडला गेला आहे, असें डॉक्टर फ्लीट या इतिहासज्ञाचें ह्मणणें आहे. परंतु माळव्यांत ईसवी सनापूर्वीं हा संवत ज्यानें चालू केला तो कोण ? हें मात्र फ्लीटसाहेब कांहीं सांगत नाहींत. तसेंच आपल्या नांवाशीं त्या संवताचा संबंध जोडून घेतांना तद्द्वारा आपल्या चंद्रगुप्त या स्थायी नांवाला अजरामर

करण्याचें सोडून विक्रम या व्यभिचारी नांवाला अजरामर करणें, हें चंद्रगुप्ताला कसें आवडलें ? चंद्रगुप्ताला आपला शक चालू करावयाचा होता तर आपल्या राज्यारोहणापासून किंवा आपल्या कारकिर्दीतील एखाद्या विशेष प्रसंगापासून त्याला तो नवीन चालू करतां आला असता. तसें करणें सोपें होतें व रीतीचेंहि होतें. पण तें न करतां जुन्या संवताशीं आपल्या नांवाचा संबंध जोडून त्यानें आपली कारकिर्द चारशें वर्षें मागें नेली ती कां ? आणि केवळ चंद्रगुप्ताच्या गौरवासाठीं दुसऱ्या कोणीं हा उपद्व्याप केला असल्यास तो त्याला कसा करतां आला ? व त्यापासून चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीच्या काळांत होणारा फेरबदल स्वतः चंद्रगुप्ताला व तत्कालीन जनतेला कसा मानवला ? याविषयींहि फ्लीटसाहेब कांहीं खुलासा करीत नाहींत.

विक्रमादित्याच्या उपलब्ध चरित्रांत अनेक त्रुट्या दिसतात ही गोष्ट यद्यपि खरी आहे. त्यांत अनेक असंभाव्य गोष्टींचें मिश्रण झालेलें आहे. उदाहरणार्थ, विक्रमादित्यानें हरसिद्धीच्या मंदिरांत 'चौदाशें वर्षें' तपश्चर्या केली हें ह्मणणें केव्हांहि खरें मानतां येत नाहीं. तशाच त्यांत अनेक अर्धवट खऱ्या गोष्टीहि मिसळल्या गेल्या आहेत. जसें, "धन्वंतरि क्षपणकामरसिंह शंकु, वेतालभट्ट घटखर्पर कालिदासाः। ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां, रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य"—ह्मणजे, (१) वैद्यराज **धन्वंतरी**, (२) फलज्योतिषवेत्ता **क्षपणक**, (३) नामलिंगानुशासन नामक कोशाचा कर्ता **अमरसिंह**, (४) स्थापत्यवेत्ता **शंकू**, (५) मंत्रविद्यानिपुण **वेतालभट्ट**, (६) गुप्तधन दाखविणारा दिव्यदृष्टि **घटखर्पर**, (७) कविकुलावतंस **कालिदास**, (८) सुप्रसिद्ध

ज्योतिषज्ञ **वराहमिहिर** आणि ( ९ ) वैयाकरण व पत्रकौमुदीकार **वररुचि**, हीं नऊ विद्वद्रत्नें विक्रमादित्याच्या सभेंत नेहमीं उपस्थित असत, असें कालिदासाच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या 'ज्योतिर्विदाभरण' नामक ग्रंथांत वर्णिलें आहे. परंतु हीं नऊ रत्नें निरनिराळ्या स्थळीं व निरनिराळ्या कालीं निर्माण झालेलीं आहेत, असें अलीकडच्या शोधाअंतीं ठरलें आहे. तेव्हां, हीं नवरत्नें आपली भरतभूमि पूर्वीं केव्हां तरी प्रसवली होती येवढाच त्या वर्णनांतला भाग खरा मानतां येतो. बाकी तीं नऊहि रत्नें एकसमयावच्छेदेंकरून विक्रमादित्याच्या पदरीं होतीं ही गोष्ट अर्थातच खरी ह्मणतां येत नाहीं. तथापि, त्याबरोबर, विक्रमादित्यानें अनेक राजांस पादाक्रांत केल्याचें व शकादिकांना येथून पिटाळून लावल्याचें कथासरित्सागरादि ग्रंथांत दिलेलें वर्णन, त्याच्या परोपकारद्योतक अनेक कृत्यांचें नाथलीलामृतकारांनीं केलेले उल्लेख व आजपर्यंत अनेक वर्षें येथील जनतेच्या आदरास पात्र झालेल्या तद्विषयक आख्यायिका, या इथून-तिथून सर्वच खोट्या कां व कशा मानावयाच्या ? अर्थात त्या तशा मानतां येणार नाहींत, हें उघड होय.

विक्रमादित्यानंतर त्याच्या दोन-तीन पिढ्यांनीं तरी उज्जनीस राज्य केलें असावें. तदनंतर पश्चिमेकडून येणाऱ्या शकांच्या दुसऱ्या टोळीनें त्यांतल्या शेवटच्या मालव राजाचा ई. स. ७८ त पराजय करून त्याच्या जागीं उज्जनीस आपल्या राज्याची स्थापना केली; व तेव्हांपासूनच या शक राजांनीं आपल्या 'शक' नांवाची कालगणनाहि चालू केली. विक्रमादित्याच्या साम्राज्यस्थापनेनंतर बरोबर १३५ वर्षांनीं

शककालाचा आरंभ होतो. इतिहाससंशोधक प. वा. राजवाडे यांच्या मतें हा ‘ शक ’ दक्षिणेंतील पैठणच्या शकसेन नांवाच्या शालिवाहन किंवा सातवाहन राजानें चालू केला असून रा. ब. चिंतामणराव विनायक वैद्य यांच्या मतें तो वर सांगितल्याप्रमाणें उज्जनयेथील पहिल्या शकराजाच्या राज्यारोहणापासून चालू झाला आहे. ‘ सिद्धांतशिरोमणि ’ नामक ग्रंथांत व इतरत्र या कालगणनेचा उल्लेख ‘ शकनृपाणां अब्द ’ किंवा ‘ शकाब्द ’ या नांवानें केलेला आहे; व त्यावरून तो उज्जनींतील शकराजांनींच चालू केला असावा असें वाटतें.

ई. सन १००च्या सुमारास उज्जन येथे शकवंशापैकीं चष्टन-क्षत्रप नांवाचा राजा राज्य करीत होता. टॉलेमीनें त्याचा व त्याची राजधानी उज्जन असल्याचा उल्लेख ( Tiastenses of Ozene ) आपल्या ग्रंथांत केला आहे. व्हिन्सेन्ट स्मिथ यानें या राजाचा काल ई. सन ८१ ते ११३ दिला आहे (पृष्ठ २११). हा राजा व तसेच या शक-क्षत्रप कुलांतील रुद्रदामन वगैरे अनेक राजे महाप्रतापी झाले. त्यांनीं आपल्या राज्याचा विस्तार गुजराथ-काठ्यावाडपर्यंत केला. या कालीं उज्जन ही गोमेद वगैरे रत्नें, तलम कापड, चिनी मातीचीं भांडीं, सुवासिक तेलें, अत्तरें व इतर सुवासिक पदार्थ, यांच्या व्यापाराविषयीं बरीच प्रसिद्धीस आलेली होती[२]. तेथून हा माल सूरत व भडोचद्वारा परदेशीं फार जात असे. तशीच

१. डॉक्टर सर रा. गो. भांडारकरकृत ‘ दक्षिणचा प्राचीन इतिहास (१८८४) पृष्ठ. २१; व व्ही. ए. स्मिथ यांचा प्राचीन भारतीय इतिहास (इंग्रजी) पृ. २१७-१८.

२. ग्वाल्हेर स्टेट ग्याझेटियर, पृष्ठ ३०३.

या राजांच्या कारकिर्दींत उज्जन ही सिद्धांतज्योतिषविद्येची केंद्र बनली. येथील शकवंश ही उत्तरेकडील शकांची शाखा असून त्यांचा यवनांशीं, म्हणजे ग्रीक लोकांशीं, संबंध असल्यामुळें त्यांनीं ग्रीक ज्योतिष येथे आणलें; आणि आर्यवैदिक ज्योतिषांत ग्रहांच्या चारांचें गणित व राशिचक्राची कल्पना, या दोन्हीं गोष्टी नव्हत्या त्या या शकांनीं आणलेल्या ग्रीक ज्योतिषावरून भारतीय ज्योतिषांत सामिल केल्या गेल्या. युगांची ४३२०००० ही कालमर्यादा याच राशिगणिताबरोबर येथें निश्चित झालेली आहे. आणि या ज्योतिषविषयक मूळ सिद्धांताची रचना उज्जन येथे झाली असल्यामुळें, उज्जन हें ज्योतिषाचें केंद्र, म्हणजे शून्य रेखांशाचें स्थान, मानलें गेलें असावें. सारांश, भारतीय ज्योतिषांत ग्रीक ज्योतिषाच्या मदतीनें जी ही क्रांती घडून आली ती या शकराजांच्या आमलदारींत घडली. या सर्व सिद्धांत ग्रंथांत गणित शकवर्षांवरच दिलेलें आहे.

उज्जन नगरी ही त्या कालीं जशी इतर विद्यांत व कलांत प्रसिद्ध होती, तसेंच तिला ज्योतिषविद्येंतहि या शकराजांनीं प्रसिद्धीस आणलें. वराहमिहिर यानें तेथे एक वेधशाळा बांधली किंवा त्याच्या देखरेखीखालीं बांधविली गेली अशी एक दंतकथा ऐकण्यांत येते, त्यांत जर कांहीं तथ्यांश असेल तर ती वेधशाळा बहुधा या शकांच्या अमलदारींत बांधली गेली असावी, असा आमचा तर्क आहे. परंतु हल्लीं त्या वेधशाळेचा तेथे कांहीं मागमूस शिल्लक नाहीं[1].

---

१. प्रस्तुत तेथे जी वेधशाळा आहे ती मूळची जयपूरचा राजा सवाई जयसिंग यानें बांधविली असून कांहीं वर्षांपूर्वीं तिचा जीर्णोद्धार कै० माधवराव महाराज शिंदे यांनीं केला आहे.

ई. स. ४००च्या सुमारास पाटलीपुत्र येथील वैश्य जातीच्या गुप्तवंशीय चंद्रगुप्त नांवाच्या सम्राटाने उज्जन येथील शकांचा पाडाव करून अवंतिदेश पुन्हा आपल्या साम्राज्यांत सामिल करून घेतला; व तेव्हांपासून त्या साम्राज्याचा कोणीं तरी सुभेदार तेथे पूर्वीप्रमाणे राहूं लागला. परंतु या साम्राज्यावर उत्तरेकडून हूणांचे हल्ले वारंवार होऊं लागल्यामुळें तें ई० स. ५००च्या सुमारास बहुतेक खिळखिळें झालें व पुढें ई. स. ६००च्या सुमारास लयासहि गेलें. आणि या त्याच्या पडत्या काळांत त्याचे अनेक सुभेदार स्वतंत्र झालें त्यांत उज्जनचा सुभेदार महासेन गुप्त यानेहि तेथे आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

महासेन गुप्ताने उज्जनीस चाळीस वर्षें राज्य केल्यावर त्याचा मुलगा देवगुप्त उज्जनचा राजा झाला. देवगुप्ताने कन्नोजचा मौखरी वंशांतील राजा गृहवर्मा याच्यावर स्वारी करून त्याला मारलें व त्याची बायको राज्यश्री हिला कैद करून कारागृहांत ठेविलें. राज्यश्री ही ठाणेश्वरचा राजा राज्यवर्धन याची बहीण होती. म्हणून त्याला ही वार्ता समजतांच त्याने मेहुण्याचा सूड उगवण्यासाठीं व बहिणीला कारागृहांतून सोडविण्यासाठीं देवगुप्तावर चढाई केली; आाणि त्याचा पूर्ण पराभव करून व त्याचा कोश, लढाऊ हत्ती, सैन्य, नोकर-चाकर, यांना आपल्या ताब्यांत घेऊन त्याच्या बायका-मुलांना कैद केलें. देवगुप्ताचें या युद्धांत काय झालें तें कळत नाहीं; पण तो बहुधा मारला गेला असावा, असें दिसतें.

देवगुप्ताचा पाडाव झालेला पाहतांच त्याच्या लोकांनी राज्यश्रीला कारागृहांतून काढून दूर रानांत सोडून दिलें; व देवगुप्ताच्या

मदतीस धांवून आलेल्या बंगालच्या राजानें राज्यवर्धनाला दगा करून मारलें. हा प्रकार राज्यवर्धनाचा भाऊ हर्षवर्धन याला कळतांक्षणीं तो ठाणेश्वराहून धांवून आला. त्यानें राज्यश्रीचा शोध लावून तिला कन्नोजच्या गादीवर बसविलें; आपण स्वतः कन्नोज येथें राहून तो बहिणीच्या वतीनें तेथील राज्यव्यवस्था पाहूं लागला; व देवगुप्ताचें राज्य, अर्थात् माळवा, त्यानें कन्नोजच्या साम्राज्यांत सामिल करून घेतला. तेव्हांपासून माळवा कन्नोज येथील राज्यश्रीच्या, ह्मणजे वस्तुतः हर्षाच्या, साम्राज्याचा सुभा झाला व त्यावर कन्नोजचे सुभेदार राज्य करूं लागले.

व्हेनत्संग नांवाचा चीनी प्रवासी याच सुमारास उज्जनीस आला होता. त्यानें, तेथे त्या वेळीं कोणीं ब्राह्मण राजा राज्य करीत होता असें आपल्या प्रवास-वृत्तांत लिहून ठेविलें आहे. परंतु तो कोणीं तरी कन्नोजचा ब्राह्मण सुभेदार असावा.[१] राज्यश्री व हर्ष दोघेहि बौद्ध होते, हें प्रसिद्धच आहे. तेव्हां त्यांच्या वेळीं उज्जनीसहि बौद्ध धर्माचें प्राबल्य असावेंसें वाटतें.

३. **बौद्धोत्तरकालीन अवंतिका.**—कन्नोज येथील हर्ष व तदुत्तर वर्मा राजांच्या साम्राज्याच्या शेवटपर्यंत माळवा कन्नोजचा सुभाच होता.[२] तदनंतर कन्नोज येथे प्रतिहारांचें साम्राज्य स्थापित झालें तेव्हां तो कांहीं काल प्रतिहार सम्राटांच्या ताब्यांत राहिला.[३]

१. चि. वि. वैद्य यांचे 'मध्ययुगीन भारत' भा. १ पु. १ पृ. २१ व भा. २ पृ. २०७.

२. वैद्यकृत मध्ययुगीन भारत, भा. १ पु. २, पृ. २७५.

३. वैद्यकृत मध्ययु. भा. भा. २ रा, परिशिष्ट ७, पृ. ३०-३३.

या वेळीं उज्जनीस **पाशुपताचार्य** नांवाचा एक अति विख्यात पंडित रहात असे. त्याच्या योगानें तेथे **पाशुपतमताचें**[1] बंड बरेंच माजलें होतें. या पंडिताचा व **श्रीमच्छंकराचार्य** यांचा तेथे वाद झाला; व त्यांत **पाशुपतमताचें** खंडन होऊन **शंकराचार्यांचा** जय झाला, असें **शांकरदिग्विजयांत** वर्णन आहे.

पुढें **कनोजच्या प्रतिहारांची** सत्ता मोडकळीस आलेली पाहून अबु येथील अग्निवंशीय क्षत्रिय **कृष्णराज** ( उपेंद्रराज ) **परमार** यानें उज्जन येथें **माळव्याच्या स्वतंत्र** राज्याची स्थापना केली. या राज्यस्थापनेचा काळ राव बहादुर वैद्य यांनीं आपल्या 'मध्ययुगीन भारतांत'[2] ई० स० ९१० हा दिला आहे. **धारच्या** प्राचीन इतिहासांत **कृष्णराजाच्या** राज्य स्थापनेचा काळ दिलेला नाहीं. पण स्वतः **कृष्णराज** आणि त्याच्या नंतर **वैरिसिंह** (१ला) व **सीयक** (१ला) हे दोन पुरुष ई० स० ८७५ पर्यंत तेथील राज्यावर होते, असें लिहिलें आहे; व त्यावरून **कृष्णराजाच्या** राज्यस्थापनेचा काळ ई० स० ९१० च्या बराच मागें जातो. त्याचप्रमाणें **कृष्णराज परमारानें** आपली सत्ता **माळव्यावर** ई० स० ९१० च्या सुमारास जरी प्रस्थापित केली होती

---

१. शैवसंप्रदायाचे **आगम व पाशुपत** असे दोन भेद आहेत. शास्त्रानुसारी शैवसिद्धान्तादि शैवमतांचा आगमांत समावेश होतो; व मद्यमांसादिकांचें सेवन करणारे कापालिक वगैरेंच्या मतांची पाशुपतांत गणना करतात. वर सांगितलेला पाशुपताचार्य कापालिक होता, असें शांकरदिग्विजयावरून दिसतें.

२. मध्ययु. भा. भा. २ रा, परिशिष्ट ७, पृ. ३३.

तरी तो ई० स० ९४६ पर्यंत माळव्यांत स्वतंत्र झाला नव्हता. कारण तोंपर्यंत उज्जन येथे कनोजच्या प्रतिहारांचे सुभेदार रहात असत. अर्थात् ई० स० ९४६ पर्यंत उज्जनीसहित माळवा कनोजच्या प्रतिहार सम्राटांच्याच अमलाखालीं होता, असें रा. ब. वैद्यांचें ह्मणणें असून, धारच्या प्राचीन इतिहासाचे कर्ते शि. का. ओक ह्मणतात, उज्जन येथे ई० स० ८७५ पासून ९१४ पर्यंत वाक्पतिराज (१ला अजयराज) व नंतर ९४१ पर्यंत वैरिसिंह (२रा) हे राजे राज्य करीत होते. तशीच, परमारांची राजधानी उज्जनीहून धारेस केव्हां गेली ? या संबंधानेंहि या इतिहासांत, ' यानेंच ( वैरिसिंह २ रा, ई० स० ९१४-४१ ) प्रथमतः आपल्या तरवारीचे जोरावर धारानगरीचें स्वामित्व संपादन केलें व येथे (धारेस) आपली राजधानी कायम केली ' अशी माहिती एका ठिकाणीं ( पृ. १८ ) दिली असून दुसऱ्या ठिकाणीं (पृ. ३१) 'भोजदेवाचें राज्यारोहण ( ई० स० १०१० ) झाल्यावर लवकरच त्यानें उज्जयिनी ऐवजीं धारानगरी ही आपली राजधानी केली ' असें लिहिलें आहे.

दुसऱ्या वैरिसिंहानंतर त्याचा मुलगा सीयक ( २ रा ) उर्फ हर्षदेव हा ई० स. ९४१ त गादीवर बसला. त्यानें कित्येक राजांवर स्वाऱ्या करून जय मिळविले. दक्षिणेंतील मान्यखेट ( मालखेड ) येथील राष्ट्रकूटवंशीय राजा खोट्टिगदेव याचा त्याने पराभव केला. या स्वारींत त्याला संपत्तिहि बरीच मिळाली. परंतु हा राजा जसा भोगी होता तसाच त्यागीहि पण होता; आणि त्याचा आजा वाक्पतिराज ( १ ला ) याने आपल्या धार्मिक परंपरेस अनुसरून उतारवयांत वानप्रस्थाश्रम स्वीकारल्याचें व

१. मध्ययु. भा. भा. २ रा, परिशिष्ट ७ पृ. ३३.

आपली पत्नी कमला देवी हिच्यासकट कुरुक्षेत्रांत जाऊन राहिल्याचें उदाहरण त्याच्या डोळ्यांपुढें होतें. यामुळें ३०।३२ वर्षे राज्योपभोग घेतल्यानंतर त्याने आजाचा कित्ता गिरविला. त्याने राज्य मुलाच्या स्वाधीन केलें व तो तपश्चर्येसाठीं वनांत निघून गेला.

हर्षदेवानें अरण्यवास स्वीकारल्यावर त्याचा मुलगा मुंजदेव (वाक्पतिराज २ रा) हा ई. स. ९७३ त गादीवर बसला. हा राजा फार पराक्रमी होता. यानें कर्नाटक, गुजराथ, केरळ, वगैरे देशांच्या राजांवर स्वाऱ्या करून जय संपादन केले व आपल्या राज्याचा बराच विस्तार केला. दक्षिणेंतील कल्याणपूरचा चालुक्य-वंशीय राजा तैलपदेव (२रा) याच्यावर मुंजदेवानें अनेक स्वाऱ्या केल्या. ई० स० ९७५ च्या स्वारींत उभयतांचें वर्धानदीवर निकराचें युद्ध झालें; आणि त्यांत तैलपदेवाचा पराभव होऊन मुंजदेवानें त्याला कैद करून उज्जनीस आणलें व नंतर सोडून दिलें. परंतु हा अपमान तैलपाला सहन न झाल्यामुळें काहीं कालानंतर, ई. स. ९९५ च्या सुमारास, तैलपदेवानें मुंजदेवावर स्वारी केली; व या वेळीहि जरी तैलपदेव पराभूतच झाला, तरी पण मुंजदेव हा त्याचा पाठलाग करीत करीत त्याच्या राज्यांत घुसला तेव्हां तैलपानें उलटून त्याला कैद केलें. आणि काहीं दिवस कैद ठेविल्यानंतर मुंजदेव निसटण्याच्या खटपटींत आहे, असें पाहून तैलपानें त्याचा शिरच्छेद करविला.

मुंजराजा हा जसा शूर व युद्धकला-निपुण होता तसाच तो संस्कृत पंडित, कवि व ग्रंथकारहि होता. शिवाय तो गुणज्ञ

१. शि. का. ओककृत 'धार संस्थानचा प्राचीन इतिहास पृ. १८-१९.

व रसिक असल्यामुळें त्यानें अनेक पंडितांना आश्रय दिला होता. मुंजराजाच्या हयातींत उज्जयिनी ही जरी त्याची मुख्य राजधानी होती तरी तो वनश्रीचा भोक्ता असल्यामुळें केव्हां केव्हां धारेसहि जाऊन रहात असे. निसर्गसुंदर अशा या धारानगरींत त्यानें अनेक भव्य प्रासाद व मोठमोठीं मंदिरें बांधविलीं व तिच्या भोवतीं अनेक जलाशयें तयार करवून तिच्या सौंदर्यांत भर घातली. त्याखेरीज, महेश्वर व ओंकारेश्वर येथील नर्मदेचे घाट व त्यांवरील मंदिरें, धरमपुरी येथील कुब्जासंगमावरचा घाट, उज्जन येथे पिशाचमोचन तीर्थावरील घाट व त्यावरील पिशाचेश्वराचें मंदिर मुंजराजानेंच बांधविलेलें आहे.

मुंजदेवानंतर ई. स. ९९७ त त्याचा धाकटा भाऊ सिंधुराज गादीवर बसला. हा राजाहि शूर व विद्वानांचा चाहता होता. मुंजदेवाच्या सर्व आश्रित पंडितांना यानेंहि आपल्या पदरीं बाळगलें. आसपासच्या राजांशीं त्याच्या नेहमीं झटापटी होत असत. हूण व मुसलमान यांच्याशींहि त्याच्या अनेक लढाया झाल्या. हा हूण बहुधा महमूद गजनवी असावा.[1] याच्या कारकिर्दींत परमारांचें राज्य दक्षिणेंत केरळ, कोंकण, वगैरे पर्यंत पसरलें व उत्तर-पश्चिमेकडीलहि बराच मुलुख त्यानें आपल्या राज्यांत सामिल करून घेतला.

सिंधुराजानंतर त्याचा मुलगा भोजदेव हा ई. स. १०१० त गादीवर बसला. या राजाच्या राज्यारोहणानंतर लवकरच त्यानें आपली राजधानी, बहुधा सुरक्षितपणाच्या दृष्टीनें, उज्जन येथून हलवून धारेस नेली. तो शूर व महत्वाकांक्षी असल्यामुळें, त्रिपुरी ( हल्लींचें जबलपुराजवळील तेऊर ) येथील हैहय उर्फ चेदी किंवा कलचुरी राजे

1. धार संस्थानचा प्राचीन इतिहास, पृ. २६.

व गुजराथेंतील अनाहिलवाडपट्टण ( हल्लींचें कडीपाटण ) येथील चालुक्य राजे, यांच्याशीं युद्ध करण्यांत प्रायः गुंतलेला असे. त्यानें आपल्या चुलत्याच्या, मुंजदेवाच्या, वधाचा सूड उगवण्यासाठीं कल्याणपूरच्या चालुक्यावर स्वारी केली. या वेळीं कल्याणपूरच्या गादीवर चालुक्यवंशीय पांचवा विक्रमादित्य हा राजा होता. तो या युद्धांत परास्त झाला व कैद होऊन मारला गेला.[1] तदनंतर कल्याण-पूरच्या गादीवर बसलेले जयसिंह व सोमेश्वर यांच्याशींहि भोजदेवाचीं अनेक युद्धें झालीं; पण पुढें लवकरच या दोन कुळांत सख्य नांदूं लागलें. महमूद गजनवी हा, सोमनाथ येथील लूट घेऊन परततांना, आपल्यास अडविण्याची 'परमारदेव' तयारी करीत आहे, असें ऐकून माळव्याकडे न वळतां परस्पर मुलतानच्या वाळवंटांतून निघून गेला, असा 'तबकात्-इ-अकबरींत' उल्लेख आहे. त्यांतला 'परमारदेव' हा भोजदेवच असावा.[2] पुढें ई० स० १०५५ च्या सुमारास अनहिलवाडपट्टण येथील भीमदेव, त्रिपुरी येथील कर्णदेव व कर्नाटकचा राजा, या त्रिवर्गांनीं मिळून धारेवर स्वारी केली. या स्वारींत भोजदेवाचा पराभव झाला व नंतर लवकरच तो मरण पावला.[3] व्हिन्सेन्ट स्मिथ यानें भोजाच्या मृत्यूचा काल ई० स. १०६० दिला आहे.

---

१. धार संस्थानचा प्राचीन इतिहास, पृ. ३२; पण मध्ययुगीन भारत, भा. ३, पृ. २४८ वर ही गोष्ट असंभवनीय असल्याचें वैद्य लिहितात.

२. मध्ययु. भारत, भा. ३, पृ. २४३.

३. रा. ब. वैद्यांच्या मतें भोजदेवाचा अंत अशा आपत्तींत झाला नाहीं; तो सुखानें राज्य करीत असतां शान्तपणें मरण

भोजदेव हा परमारवंशांत प्रतिविक्रमादित्य होऊन गेला. मालववंशांतील विक्रमादित्याशीं त्याचें अनेक बाबतींत साम्य दिसतें. तो स्वतः विद्वान, विद्वज्जनांचा चाहता व मनाचा अत्यंत उदार होता. त्यानें ज्योतिषशास्त्र, वैद्यशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांवर ग्रंथ लिहिले आहेत. अलंकारशास्त्रावरील सरस्वतीकण्ठाभरण व पातंजल योगसूत्रावरील राजमार्तंडा नांवाची वृत्ति, हे त्याचे ग्रंथ विद्वन्मान्य आहेत. संस्कृत भाषेंतील उच्च कोटीच्या ग्रंथांच्या अध्ययन-अध्यापनासाठीं त्याने धार येथे एक मोठी पाठशाळा स्थापित केली होती. त्याच्या लोकोपयोगी अनेक प्रकारच्या अनेक कृतींनी भरतखंडाला आसेतु-हिमालय व्यापलें आहे. ठिकठिकाणीं तीर्थावर घाट, धर्मशाळा, देवालयें, सरोवरें, विहिरी, वगैरे या राजाने किती तरी बांधविल्या आहेत ! केदारेश्वर, रामेश्वर, सोमनाथ, या ज्योतिर्लिंगांचीं मंदिरें भोजदेवाने बांधविलीं; उज्जन येथील श्रीमहाकालेश्वराच्या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार त्यानें केला; काश्मीरदेशांतील 'पापसूदन' नावांचें तीर्थ त्यानें चौफेर पक्कें बांधविलें; आणि भोपाळ येथील पूर्वीचा 'भोजसर' नांवाचा तलाव—ज्यांत हल्लीं त्या राज्यांतील 'ताल' नांवाचा परगणा वसला आहे तो—भोजदेवानें बांधविला. तसेंच 'भोजशकट' नांवाचें शहर–ज्याला पुढें हुषंगशाह घोरी यानें आपलें नांव दिल्यामुळें हल्लीं हुषंगाबाद म्हणतात तें–

पावला; आणि ही धारेवरील स्वारी त्याच्या मृत्युनंतर झाली असून ती त्रिपुरीचा कर्णदेव व कर्नाटकचा राजा या दोघांनीं मिळून केली, त्यांत भीमदेव सामिल नव्हता. ( मध्य यु. भा., भा, ३ रा, पृ. २४८-५१ ).

भोजदेवाने वसविलेलें आहे. त्याची राज्यव्यवस्थाहि नमूनेदार होती. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, विद्या, वित्त, व विक्रम, यांचा त्रिवेणीसंगम जसा पूर्वी विक्रमादित्याने उज्जनीस घडवून आणला होता तसाच तो भोजदेवाने हजार वर्षानंतर धारेस घडवून आणला, व तद्द्वारा, विक्रमादित्यापेक्षांहि कांकणभर अधिक लौकिक संपादन केला.

भोजदेवाच्या काळांत तेथे बौद्धधर्म बहुतेक नामशेष झाला; पण जैनधर्माची व विशेषतः त्यांतल्या श्वेताम्बर पंथाची अभिवृध्दि झाली. पुढच्या मुसलमानी अमलदारींत तर त्याचा प्रसार धारेकडे बराच झाला. माडवगढच्या कांहीं बादशाहांचे मंत्री जैन होते. त्यांतल्या गदासा भैसासाच्या वाड्याचा अवशेष व दुसऱ्या एका जैन मंत्र्याने बाधविलेलें सूर्यकुंड तेथे अद्याप आहे.

भोजदेवानंतर माळव्याच्या राज्यसिंहासनावर ई. स. १०५५त जयसिंह व त्याच्या नंतर ई. स. १०५९ त उदयादित्य बसला. श्रीमहाकालेश्वराच्या मंदिराच्या मागल्या बाजूस, एका मंदिरवजा लहानशा घुंमटीच्या भिंतींत, एक शिलोत्कीर्ण धातुप्रत्ययमाला-रूप नागबंध लागला आहे. त्यावर दिलेल्या दोन श्लोकांत उदयादित्य व नरवर्म या पितापुत्रांचीं नांवें आढळतात. त्याचीच एक प्रत धार येथील पूर्वीच्या भोजशाळेंत व एक प्रत खरगोणजवळ ऊन येथे विद्यमान आहे. त्यांवरून या तिन्हीं ठिकाणीं या राजांनीं संस्कृत पाठशाला स्थापिल्या होत्या असें दिसतें. उदयादित्याच्या अंगींहि विद्येची अभिरुचि व गुणज्ञता, हे आनुवंशिक गुण होते व त्यानें आपल्या मुलांना चांगलें पंडित बनविलें होतें असें ह्मणतात. भेलशाजवळ उदैपूर नांवाचा एक गांव आहे तो

या उदयादित्यानें वसविला असून तेथे त्यानें एक भव्य शिवालय बांधविलेलें आहे. त्याचें शिखर बरेंच उंच असून त्यावरील कोरीव काम फार प्रेक्षणीय आहे. उदैपूरप्रशस्ति या नांवाचा शिलालेख व तसेच परमारकालीन आणखी कांहीं शिलालेख या मंदिरांत विद्यमान आहेत. या राजापासून पुढें परमार वंशाला उतरती कळा लागली.

उदयादित्यानंतर त्याचा मुलगा लक्ष्मदेव ई. स. १०८६ त राजा झाला. हा राजा शूर योद्धा व प्रसिद्ध विद्वान होता; त्यानें अंग, चोल, पांड्य व चेदी, या राजांवर स्वाऱ्या करून जय मिळविले; सिंहलद्वीपावर स्वारी केली; आणि वंक्षु ( आक्सस ) नदीवरील तुरुष्क व हिमालयांतील कीर यांचा पराभव केला; असें एका शिलालेखांत अतिशयोक्तीचें वर्णन आहे.

त्याच्या नंतर त्याचा धाकटा भाऊ नरवर्मदेव ई. स. ११०४त गादीवर बसला. त्याची कारकिर्द चांगली भरभराटीची झाली. त्यानें गौड व गुजराथच्या राजांवर स्वाऱ्या करून जय मिळविले. तो चांगला संस्कृतज्ञ असून कांहीं प्रशस्त्यांचा कर्ता असल्याबद्दल त्याची ख्याति आहे. भोज, उदयादित्य व तसाच हा नरवर्मदेव, स्वतः शिवभक्त असूनहि जैनधर्मीयांशीं फार सहिष्णुतेनें वागत असे.

नरवर्मदेवानंतर ई. स. ११३३ त यशोवर्मदेव गादीवर बसला. त्यानें वेळोवेळीं गुजराथेवर स्वाऱ्या केल्या; परंतु शेवटीं गुजराथचा राजा सिद्धराज जयसिंह यानें त्याचा पूर्ण पराभव करून त्याला कैद केलें व माळव्याचें राज्य आपल्या गुजराथच्या राज्याला जोडलें. तदनंतर कांहीं काल माळवा गुजराथच्या

ताब्यांत राहिला. पुढें अजमेरच्या चौहाण राजाच्या मदतीनें यशोवर्मदेव कैदेंतून सुटला व त्याला माळव्याचें राज्यहि परत मिळालें. परंतु त्याच्यानंतर त्याच्या दोन मुलांत तंटे होऊन राज्याचे दोन विभाग झाले.

धारेकडील भागावर ई. स. ११४४ पासून १२१० पर्यंत अजयवर्म, विंध्यवर्म व सुभटवर्म या तीन राजांनीं क्रमशः राज्य केल्यावर अर्जुनवर्मदेव गादीवर बसला. त्याने गुजराथवर स्वारी करून तेथील राजा जयसिंह याचा पराभव केला. हा राजा विद्वान व गायनकलानिपुण होता. अमरुशतकावर रसिक-संजीवनी नांवाची टीका या राजानें केली अशी प्रसिद्धि आहे.

अर्जुनवर्मदेवाला पुत्रसंतान नसल्यामुळें त्याच्या पश्चात् माळव्याचें राज्य पुन्हा एकवटलें; व त्यावर भेलशाकडील भागावर राज्य करणारा देवपालदेव ई. स. १२१६ त राज्य करूं लागला. याच्या अमलदारींत, ई. स. १२३५ त, दिल्लीचा गुलामवंशीय बादशाहा शमसुद्दीन अल्तमश यानें उज्जनीवर स्वारी करून तें शहर लुटलें; श्रीमहाकालेश्वराचें मंदिर पाडून त्यांतली सर्व संपत्ति हरण केली; तेथील जुने राजवाडे व इतर प्रेक्षणीय स्थळें उध्वस्त करून टाकलीं; आणि महाकालेश्वराची सुवर्ण प्रतिमा, विक्रमादित्याचा सोन्याचा पुतळा व इतर अनेक देवांच्या धातुमूर्ति घेऊन तो दिल्लीस निघून गेला. जातां जातां त्यानें महाकालेश्वराच्या मंदिराच्या जागीं मशीद बांधली जाण्याची व्यवस्था केली व त्याप्रमाणें तेथे एक मशीद बांधलीहि गेली. ही मशीद कोटितीर्थाच्या कांठीं असल्यामुळें तिला " हौजवाली मशीद " ह्मणत असत. यानंतरहि माळव्यावर मुसलमानांचे हल्ले सारखे

चालूच होते; परंतु तेथे त्यांची सत्ता मात्र ई. स. १२९० पर्यंत कायम झाली नाहीं.

## २. अर्वाचीन इतिहास.

१. **यवनकालीन अवंतिका**—ई. स. १२९१ त दिल्लीचा बादशाहा जलालुद्दीन फीरोजशाह खिलजी याने उज्जन शहरावर कबजा करतांना तें पुन्हा लुटलें व तेथील अनेक पुरातन देवस्थानांचा विध्वंस केला. त्यानंतर दोन वर्षांनीं ह्मणजे ई. स. १२९३ त त्यानें पुन्हा माळव्यांत बरीच लूटमार केली व त्याच सुमारास त्याचा पुतण्या अलाउद्दीन यानें तर दक्षिणेच्या स्वारीवर जातांना माळव्यांत चांगलाच धुमाकूळ घातला. या मुसलमानांच्या हल्ल्यांत उज्जनीचा असा नाश झाला कीं "जें पूर्वीं स्वर्ग होतें तें हल्लीं नरक झालें आहे" असें त्या काळांतील उज्जनीविषयीं एका तिऱ्हाइत गृहस्थानें खेदोद्गार काढले आहेत[1].

मुसलमानी सत्तेच्या वाढीबरोबर, तेथील उत्तम उत्तम मंदिरें पाडणें, हिंदु इमारती जमीनदोस्त करणें, त्यांच्या जागीं त्यांच्याच दगड-विटांनीं मशीदी, दर्गे व कबरस्थानें उभारणें, लूटमार करणें, हिंदुलोकांना जबरदस्ती किंवा फुसलावून मुसलमानी धर्माची दीक्षा देणें, अशा प्रकारच्या आगळिकींचेंहि मान वाढत गेल्यामुळें, या नगरीचें वैभव व माहात्म्य तर लोपलेंच; पण त्याशिवाय तेथील राजकीय परिस्थिति जुलमी, अशाश्वत व डळमळित झाल्या कारणानें वस्तीची रचना बेडौल होऊन तिचें सौंदर्यहि नष्ट झालें.

---

१. प्र० १ लें, पृष्ठ ७ वरील टीप पहा.

ई. स. १३२२ पासून दिल्लीच्या तुघलक घराण्यांतील बादशाहांकडून माळव्यावर सुभेदारांच्या नेमणुकी होऊं लागल्या. ई. स. १३८७ त दिलावरखान घोरी याची तेथील सुभेदारीवर नेमणुक झाली. हा दिल्लीचा पहिला सुलतान शहाबुद्दीन घोरी याच्या वंशांतला होता. उज्जन येथे रुद्रसागराच्या किनाऱ्यावरील 'आमखास' नांवाचा महाल[1], बिनानींवेची मशीद व उज्जन शहराभोंवतालचा कोट, दिलावरखान यानें बांधविला, असें एका उर्दू इतिहासकाराचें ह्मणणें आहे. पण तें कितपत विश्वसनीय आहे हें सांगतां येत नाहीं. ई. स. १३९८-९९ त तैमूरलंग यानें दिल्लीवर स्वारी केल्यावर तेथील स्थिति फारच बिघडली, तेव्हां हा संधि साधून दिलावरखान याने ई. स. १४०१ त आपण माळव्याचा स्वतंत्र सुलतान झाल्याचें जाहिर केलें.

दिलावरखानानंतर त्याचा मुलगा अलफखां हा हुषंगशाह घोरी हें नांव धारण करून ई. स. १४०५ त माळव्याचा सुलतान झाला. पण तो तख्तनशीन झाला नाहीं तोंच गुजराथच्या मुजफ्फरशाहाने त्याच्यावर स्वारी करून त्याला पदच्युत केलें. तथापि त्यानें पुढें मुजफ्फरशाहाशीं स्नेह करून ई. स. १४०८ त आपलें राज्य परत मिळविलें. या सुलतानानें गुजराथेवर स्वारी केली पण त्यांत त्याला यश आलें नाहीं; आणि पुढें त्यानें मध्यप्रांतांतील बेतुलजवळच्या खेरल्याच्या राजावरहि स्वारी केली, पण तो राजा महाराष्ट्रांतील बाहमनी सुलतान अहेमदशाह याचा मांडलिक असल्यामुळें त्यानें ई. स. १४२८ त हुषंगचा पराभव

---

१. हा महाल अगदीं मोडकळीस आल्यामुळें हल्लीं तो तेथील म्युनिसिपालिटीनें पाडून टाकला आहे.

केला. हुषंगनेंच आपली राजधानी धारेहून हलवून मांडवगढ येथे नेली.

हुषंगशाहानंतर ई. स. १४३२ त त्याचा मुलगा गज्नीखां हा महंमद घोरी हें नांव धारण करून माळव्याचा सुलतान झाला. पण तो दारूच्या व्यसनाच्या आधीन असल्यामुळें त्याचा मेव्हणा ( बहिणीचा नवरा ) व वजीर महमूद खिलजी यानें त्याला विष देऊन मारलें; व ई. स. १४३५ त तो स्वतः सुलतान झाला. महमूद हा शूर, राजकारणकुशल व चतुर होता. त्यानें आपल्या राज्याची अंतर्व्यवस्था चांगली केली व इतर राजांवर स्वाऱ्याहि बऱ्याच केल्या. गुजराथेवर स्वारी करून तेथील त्या वेळचा सुलतान कुतुबशाह याचा त्यानें पराभव केला.

चितोडचा राणा कुंभा याच्याशीं त्याच्या बऱ्याच चकमकी झाल्या; पण त्यांत तो शेवटी ई० सन १४४० त हारला; व कुंभा राण्याने त्याला कैद केलें. चितोडच्या किल्ल्यांत राणा कुंभा याने विजयस्तंभ उभारला आहे तो याच विजयाचें स्मारक होय. पुढें सहा महिन्यांनी राणा कुंभा यास खंडणी देण्याचें कबूल करून महमूदाने आपली सुटका करून घेतली; व नंतर त्याने अनेक वेळा चितोडावर हल्ले केले. परंतु त्यांचा विशेष असा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांत त्याला लहान-सहान जय मिळाले व त्यांच्या स्मरणार्थ महमूदानेहि मांडव येथे एक ‘ फतेमिनार ’ ( विजयस्तंभ ) बांधविली. पुढें ई. स. १४५१ त त्यानें गुजराथेवर स्वारी केली; पण त्यांतहि त्याला यश आले नाहीं.

महमूद नंतर त्याचा मुलगा गयासुद्दीन ई, स. १४६९ त तख्तनशीन झाला. त्याने आपला मुलगा नासिरूद्दीन यालाच

आपला मुख्य वजीर नेमलें होतें; व राज्यकारभारावर तो स्वतः चांगलें लक्ष ठेवीत असे. त्याला नासिरुद्दीन यानें, अर्थात् बापाला मुलानें, विष देऊन मारलें अशी समजूत आहे.

त्याच्या नंतर ई. स. १५०१ त नासिरुद्दीन तख्तनशीन झाला. तो फार क्रूर, दुर्व्यसनी व विषयी असून शिवाय बापाला विष घालून मारल्याच्या दुर्लौकिकामुळें, लोकमत त्याच्या विषयीं फार वाईट झालें होतें. त्यानें भैरवगढच्या उत्तरेस क्षिप्रानदींत 'कालियादेह' नांवाचा जलप्रासाद बांधविला व प्रायः तेथेच तो रहात असे; आणि शेवटीं एके दिवशीं दारूच्या नशांत धुंद असतां तो त्या महालाच्याच पुढच्या एका कुंडांत पडून मेला असें ह्मणतात.

नासिरुद्दीननंतर ई. स. १५११ त त्याचा दुसरा मुलगा आजम हुमायून हा महमूद (२ रा) खिलजी हें नांव धारण करून तख्तनशीन झाला. त्यानें आपले पूर्वींचे सर्व मुसलमान कामदार काढून टाकले; आणि त्याच्या तख्तनशीनीच्या वेळीं गादीविषयीं उपस्थित झालेल्या तंट्यांत ज्या एका मेदिनीराय नांवाच्या रजपूतानें त्याला मदत करून गादी मिळवून दिली, त्याला त्यानें मुख्य वजीर नेमिलें. परंतु पुढें मेदिनीरायवरहि त्याचा रोष होऊन त्याला काढण्यासाठीं महमूदशाहानें गुजराथेच्या मुजफ्फरशाहाची मदत मागितली. मुजफ्फरशाहानें येऊन मेदिनीरायाच्या सर्व लोकांस हांकून लावलें. मेदनीराय तेथून पळाला तो चितोड येथे संगराण्याच्या आश्रयास जाऊन राहिला; व तेथून त्यानें संगराण्याच्या सहायानें मांडवावर चाल केली. या युद्धांत रजपूतांनीं महमूदशाह यास घायाळ करून पकडलें व कैद करून चितोड येथे नेलें. परंतु तेथे संगराण्यानें महमूदशाहाच्या सर्व जखमा काळजीपूर्वक बऱ्या केल्या व

उदार बुद्धीनें त्याला सर्व इतमामासह परत मांडवगढास पोंचतें केलें. पुढें संगराणा वारल्यावर या महमूदशाहानें चितोडच्या गादीविरुद्ध उठून उपकाराची फेड अपकारानें केली. तदनंतर गुजराथेचा सुलतान मुजफ्फरशाह ( २रा ) वारल्यावर तेथे बहादुरशाहाच्या विरुद्ध ज्या खटपटी झाल्या त्यांत महमूदशाहाचें अंग असल्यामुळें बहादुरशाह यानें मांडवावर स्वारी केली व महमूद शाहाला बायकामुलांसह पकडून कैद केलें; आणि मांडवगढचें राज्य खालसा करून तें आपल्या राज्यास जोडून दिलें. याप्रमाणें माळव्याच्या स्वतंत्र मुसलमानी राज्याचा शेवट झाला. आणि गुजराथेंत कैद असतां महमूद तेथून पळून जाण्याच्या खटपटी करीत होता त्या बहादुरशाहाच्या लक्षांत आल्यावर त्यानें ई. स. १५२६ त दोहद मुक्कामीं त्याचा शिरच्छेद केला.

तदनंतर ई. स. १५३५ त दिल्लीचा मोगल बादशाह हुमायून यानें बहादुरशाहावर स्वारी करून त्याला माळव्यांतून पिटाळून लावलें. पण हुमायूननें माळव्याकडे पाठ फिरविली नाहीं तोंच चंदेरी प्रांतांतील जाहगीरदार मालूखान कादिर यानें माळव्यावर हल्ला चढवून तेथे आपला अमल बसविला. पुढें दिल्लीस शेरखान सूर यानें बंड करून तो दिल्लीचा बादशाह झाला तेव्हां त्यानें ई. स. १५४३ त माळव्यावर स्वारी करून माळवा परत आपल्या कबज्यांत घेतला; व त्यावर सरदार सुजावलखान यास सुभेदार नेमलें. हा सुभेदार उज्जनीसच रहात असे. त्याची कारकिर्द शांततेची व प्रजेला सुखावह झाली. माळव्यांतील सुजालपूर नांवाचें गांव त्यानेंच वसविलेलें आहे.

सुजावलखां ई. स. १५५४ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा बाजबहादुर यानें लागलेंच आपण माळव्याचे स्वतंत्र सुलतान झाल्याचें जाहिर करून आपली राजधानी मांडवगढास नेली. त्यानें मुलुख सर करण्याचे काहीं प्रयत्न केले, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्यानें उज्जनीच्या नगरकोटाची बरीच डागडूजी केली असें सांगतात. बाजबहादुर यानेंच हा कोट बांधविला असें सर जॉन मालकम यानें लिहिलें आहे; पण तें खरें नव्हे. हा सुलतान फार विलासी व गायनलोलुप होता. त्यानें एका रूपमती नांवाच्या सुस्वरूप व गायनपटु पण्यांगनेशीं (कोणीं ह्मणतात रजपूत कन्येशीं) विवाह केला होता व तो तिच्याच नादीं असे. ही गोष्ट दिल्लीचा बादशाह अकबर यास कळल्यावर त्यानें ई. स. १५६२ त माळव्यावर स्वारी करून मांडवगढ काबिज केलें. बाजबहादुर पळून गेला; व त्याची बेगम रूपमती हिनें विष प्राशन करून प्राणत्याग केला.

अकबराच्या ताब्यांत माळवा गेल्यावर तो मोगल राज्याचा एक सुभा बनला व त्यावरील सुभेदार उज्जनीस राहूं लागला. ई. सन १५६४ च्या पावसाळ्यांत काहीं दिवस अकबर स्वतःहि उज्जनीस येऊन राहिला होता[1].

बाजबहादुर ई. स. १५६२ च्या युद्धांतून पळाला तो आठ नऊ वर्षे निरनिराळ्या रजपूत राजांच्या आश्रयास राहून शेवटीं ई. स. १५७०-७१ त अकबराच्या दरबारांत हाजर झाला. अकबरानें त्याला प्रथम एक हजार व नंतर दोन हजार घोड्यांची मनसबदारी दिली; व ती घेऊन तो शेवटपर्यंत अकबराच्या

---

१. व्हि. ए. स्मिथकृत 'अकबर' (इंग्रजी) पृ. ७३.

आश्रयास होता. त्याची बेगम रूपमती हिची कबर उज्जनीस एका तळ्यांत असून तेथेंच जवळ बाजबहादुरचीहि कबर आहे असें ह्मणतात.[1]

अकबरानंतर शाही तख्तावर जहांगीर बसला. तो दक्षिणेंतून परत आग्ऱ्यास सपरिवार जात असतां ई. स. १६१८ त दोहद मुक्कामीं औरंगजेब याचा जन्म झाला तेव्हां त्याचा जन्मोत्सव जहांगीर यानें उज्जनीस केला. तेथे तन्निमित्त एक मोठा दरबार भरला होता.[2] जहांगीर गादीवर बसला त्याच्या पूर्वीपासून उज्जन येथे जद्रूप किंवा यद्रूप नांवाचा एक साधु रहात असे. तो एक लहानशा गुहेंत नेहमी नग्न पडलेला असे. अकबर दक्षिणेहून परत येतांना या साधूच्या दर्शनास गेला होता. तसाच जहांगीर येथे आला तेव्हां तोहि त्याच्या दर्शनासाठीं पाव मैल पांयानें चालत गेला; व ३।४ तासपर्यंत त्याच्याशीं बोलत बसला होता.[3]

अकबराच्या ताब्यांत माळवा गेल्यापासून उज्जनीस दिल्लीचा कोणीं तरी सुभेदार नेहमीच रहात असे. ई. स. १७२०-२२ च्या सुमारास महंमदशाहानें जयपूरचा राजा सवाई जयसिंग याला माळव्याच्या सुभेदारीवर पाठविलें. जयसिंगानें उज्जनीच्या दक्षिणेस जयसिंगपुरा या नांवाचें एक खेडें वसवून तें उज्जन शहराला जोडून दिलें, तेव्हांपासून तो पुरा उज्जन शहराचाच एक भाग

१. व्हि. ए. स्मिथकृत 'अकबर' ( इंग्रजी ), पृ. ५९ व ३६२ पहा. येथे क्षीरसागराच्या आग्नेय कोणांत दोन जुन्या कबरा आहेत, त्यांना अनुलक्षून हा उल्लेख केला गेला असावा असें वाटतें.

२. बेनीप्रसादकृत जहांगीरचा इतिहास ( इंग्रजी ), पृ. २९५.

३. बेनीप्रसादकृत जहांगीरचा इतिहास ( इंग्रजी ), पृ. २७६-७७.


मानला जातो. या खेड्याच्या दक्षिणेस त्यानें एक वेधशाळा बांधविली. मध्यंतरी ती अगदीं मोडकळीस आली होती; पण कांहीं दिवसांपूर्वीं कै. माधवराव महाराज शिंदे यांनीं तिचा जीर्णोद्धार केल्यामुळें हल्लीं ती चांगल्या स्थितींत आहे.

जयसिंग उज्जन येथून गेल्यानंतर तेथे मोगलांचे दुसरे सुभेदार आले. पण या कालांत माळव्यावर मराठ्यांचे हल्ल्यावर हल्ले सारखे चालू झाले व त्यांत मोगलांच्या दयाबहादुर नांवाच्या सुभेदारास राणोजीराव शिंद्यानें माळव्यांतून पिटाळून लावलें. या वेळींहि दिल्लीच्या तख्तावर महंमदशाह हाच बादशाह होता. त्यानें जयसिंगाची पुन्हा माळव्याच्या सुभेदारीवर योजना केली. परंतु मराठ्यांना तोंड देण्याचें सामर्थ्य या वेळीं मोगलांच्या अंगीं राहिलें नव्हतें. तेव्हां त्यांच्या (मराठ्यांच्या) लाटीला माळव्यांतच थोपवून न धरलें तर कदाचित् ती दिल्लीवरहि येऊन आदळेल, असें पाहून माळवा पेशव्यांना देऊन टाकण्याचा सल्ला जयसिंगानें महंमदशाह यास दिला. आणि त्याप्रमाणें ई. स. १७३२ त त्यानें माळवा मराठ्यांच्या हवालीं केला; व पेशव्यांनीं त्याला आपल्या राज्यांत सामिल करून घेतलें. हा अर्थातच माळव्यांतील मुसलमानी अमलाचा शेवट होय.

**२. पुन्हा हिंदुकालीन अवंतिका**—याप्रमाणें माळवा पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं त्याच सालीं, शिंदे, होळकर व पंवार या तिघा सरदारांत, त्यांच्या फौजेच्या खर्चासाठीं, माळव्याची वांटणी करून दिली. या वाटणींत राणोजीराव शिंद्यांना उज्जनीसहित साडेचौसष्ट लक्षांचा मुलुख मिळाला; व त्यांत उज्जन शहर हें इतिहासप्रसिद्ध व सोयीचें म्हणून तेंच त्यांनीं आपल्या राहण्याचें मुख्य ठिकाण केलें.

राणोजीराव शिंदे हे आपल्या अंगच्या शौर्य-साहसादि गुणांमुळे पेशव्यांच्या पदरीं बारगीरीपासून सरदारीपर्यंत वाढलेले होते. पेशवाईचे आधारस्तंभ मानले जाणारे असे जे शूर सरदार त्या वेळीं पेशव्यांच्या पदरीं होते त्यांत राणोजीरावांची गणना केली जात असे. नर्मदा व चम्बल या दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशावर पेशव्यांची सत्ता प्रस्थापित करण्याच्या कामीं मुख्यत्वेंकरून ते व मल्हारराव होळकर या दोन सरदारांची योजना झालेली होती; व त्या कार्यासाठीं राणोजीरावांना नेहमी मोहिमेवर रहावें लागे. ह्मणून फक्त फौजेची व्यवस्था तेवढी आपल्याकडे ठेवून तिच्या खर्चासाठीं मिळालेल्या मुलुखाची एकंदर सर्व व्यवस्था त्यांनीं आपले दिवाण रामचंद्र मल्हार सुखटणकर उर्फ रामचंद्रबाबा शेणवी यांच्याकडे सोंपविली; व ते ती उज्जनीस राहून करीत असत.

पूर्वींच्या अमलदारींतील अनिश्चितपणा व जुलुम बरेच दिवस सोसावा लागल्यामुळें सर्वत्र अस्वस्थता व अनवस्था पसरली होती ती नाहींशी करून लोकांच्या नित्य-नैमित्तिक व्यवहारांत सुरळितपणा आणण्याचें अवघड काम रामचंद्रबाबांना अगोदर करावें लागलें. परंतु स्वभावतः त्यांच्या मनाचा कल धर्माकडे विशेष असल्यामुळें मुसलमानांनीं या क्षेत्राची महति नष्ट करून टाकण्याची जी पराकाष्ठा केली होती तिच्याकडेहि त्यांचें लक्ष गेलें; आणि त्यांतल्या त्यांत वेळ काढून व पैशाची संगति लावून घेऊन, इतर आवश्यक कामाबरोबरच, उज्जनीची धार्मिक बाजू सुव्यवस्थित करण्याचें कामहि त्यांनीं मोठ्या कळकळीनें हातीं घेतलें. त्यांनीं, श्रीमहाकालेश्वराचें हल्लीं विद्यमान असलेलें भव्य मंदिर बांधविलें; अल्तमश यानें पूर्वींचें मंदिर पाडल्यावर त्यांतील शिवलिंग जवळच्या कोटितीर्थांत



कै० राणोजीराव शिंदे यांची छत्री.

लोटून दिलें होतें तें बाहेर काढून त्याची या नव्या मंदिरांत यथाविधि पुनस्थापना केली; उज्जन शहरांतील व भोंवतालच्या पंचक्रोशींतील उच्छिन्न व उध्वस्त झालेल्या देवस्थानांपैकीं शंभरावर देवतांची पुनस्थापना व त्यांच्या मंदिरांचे जीर्णोद्धार केले; आणि क्षिप्रानदीच्या तीरावरील प्रशस्त रामघाट व नृसिंहतीर्थावरील घाट असे दोन घाट नवीन बांधविले. मिळून एकंदरींत मुसलमानीं धामधूमीमुळें ओढवलेलें उज्जनीचें नष्टचर्य घालवून तिला ऊर्जितावस्था आणण्याच्या कामीं परिस्थितिवशात् स्वतः राणोजीरावांना जरी लक्ष पुरवितां आलें नाहीं तरी त्या कार्याचा आरंभ याप्रमाणें त्यांचें ठाणें येथें बसतांच झाला.

राणोजीराव ई. स. १७४५ च्या जुलई महिन्यांत सुजालपुराजवळ मिरजापूर नांवाच्या गांवीं वारले.[१] त्यांना पहिल्या कुटुंबाच्या पोटीं झालेले जयाजीराव उर्फ जयाप्पा, दत्ताजीराव व जोतीबा आणि दुसऱ्या कुटुंबाच्या पोटीं झालेले महादजीराव व तुकोजीराव, मिळून पांच पुत्र होते. त्यांपैकीं वडील जयाप्पा यांना त्यांची सरदारी मिळाली. जयाप्पांनीं उत्तर हिंदुस्थानांत व मारवाडांत अनेक स्वाऱ्या केल्या; पण शेवटीं जोधपूरच्या विजयसिंगाला त्यांनीं नागोरच्या किल्ल्यांत कोंडलें असतां तेथे ते दग्यानें मारले गेले.

राणोजीरावांचा देहांत झाला त्या जागीं जयाप्पांनीं त्यांची एक लहानशी छत्री बांधविली असून तिच्या जवळ 'राणाखेडा' या नांवाचा गांव वसविला आहे. शिवाय त्यांची एक मोठी छत्री जयाप्पांनीं उज्जनीस क्षिप्रातीरींहि बांधविलेली आहे. या छत्रीच्या पुढचा जो क्षिप्रेचा विस्तीर्ण घाट आहे त्याला 'छत्रीघाट' ह्मणतात;

१. सरदार फाळके यांनीं प्रसिद्ध केलेलीं 'शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें,' भा. १, पृ. ३५, लेखांक ३७.

व त्याच्या या नांवावरून तो घाटहि बहुधा जयाप्पांनींच छत्री-बरोबर बांधविलेला असावा असें वाटतें.

जयाप्पानंतर सरदारीचीं वस्त्रें त्यांचे पुत्र जनकोजीराव यांस मिळालीं. ते या वेळीं अल्पवयीच होते, पण कुलदीपक होते. तत्कालीन परिस्थितीस अनुसरून ते आपल्या चुलत्यांसह नेहमीं कोठे ना कोठे युद्धांत गुंतलेले असत. करनाटकापासून दिल्लीपर्यंत त्यांनीं अनेक स्वाऱ्या केल्या व शेवटीं पानीपतच्या घोर संग्रामांत अभिमन्युसारखा पराक्रम गाजवून देह ठेविला.

राणोजीरावांच्या पांच पुत्रांपैकीं जयाप्पा वर सांगितल्या-प्रमाणें नागोर येथे मारले गेले, दत्ताजीराव अहेमदशाह अबदालीचा सरदार कुतुबखान याच्याशीं लढत असतां पडले, जोतीबा यानीं कुंभेरीच्या वेढ्यांत देह ठेविला व तुकोजीराव हे जनकोजीरावा-बरोबर पानीपत येथे कामास आले. मिळून राणोजीरावांचे चार पुत्र व एक पौत्र असे पांच वीर देशकार्यास बळीं पडल्यावर त्यांनीं संपादन केलेली सरदारी, खरें ह्मटलें ह्मणजे, त्यांच्या वंशांत एकटे उरलेले व पानीपतच्या लढाईतून घायाळ होऊन परत आलेले त्यांचे औरस पुत्र महादजीराव यांच्याकडे ओघानेंच, व हक्कानेंहि, यावयाची; परंतु पेशव्यांच्या दरबारांत त्या संबंधानें अनेक शंकाकुशंका

१. महादजी हे राणोजीरावांचे 'दासीपुत्र' आहेत, तेव्हां ते शिंद्यांच्या सरदारीचे वारस कसे होऊं शकतात? ही त्यांतली एक मुख्य शंका किंवा कुशंका होय. परंतु हा त्यांच्या दासीपुत्रत्वाचा प्रवाद खोटा, निवळ द्वेषमूलक असावा असें वाटतें. कारण दतियाच्या लढाईत राणोजीरावांच्या शौर्याकडे पाहून तेथील राजकन्या त्यांच्याकडे त्यांच्याशीं विवाह करावा या उद्देशानें स्वतः होऊन चालून आली, राणोजी-रावांनीं तिचें गांधर्वविधीनें पाणिग्रहण केलें, आणि तिच्यापोटीं त्यांना महादजी व तुकोजी हे दोन पुत्र झाले,

उपस्थित होऊन वाद माजला ! व महत् प्रयासानें शेवटीं ती त्यांच्या पदरीं पडली !!

---

असा एक लेख 'मराठी शालापत्रक' कारांनीं (पु. २, अं. ४, पृ. १२५।२६) प्रसिद्ध केला असून 'महादजीची आई रजपूत जातीची होती' एवढ्या अंशापुरती त्याला ग्रांट डफ यांच्या बखरीनें पुष्टीहि दिलेली आहे. शिवाय दतिया-सारख्या राजघराण्यांतील रजपूत कन्येचा, व तसाच राणोजीरावांचाहि, समाजांतील दर्जा आणि तत्कालीन रजपूत स्त्रियांच्या दांपत्य विषयक कल्पनांची भूमिका लक्षांत घेऊन सरळ विचार केला असतां देखील या उभयतांच्या गांधर्व विवाहसंबंधी शालापत्रकांतील लेखच ग्राह्य मानावा लागतो. निदान त्याच्या विरुद्ध सबळ पुरावा मिळेपर्यंत तरी त्यालाच ग्राह्य मानणें हा न्याय होय. तेव्हां—अर्थात् वस्तुस्थिति जर तशी असेल तर—महादजी 'दासीपुत्र' कसे? राणोजीरावांचा हा विवाह जात-गंगेला साक्षी ठेवून वाजत-गाजत झालेला नसणें साहजिकच आहे. पण नुसता तो तसा उघड झाला नाहीं, एवढ्याच कारणासाठीं, क्षत्रियांना विहित अशा मार्गानें राणोजीरावाशीं विवाहबद्ध झालेल्या त्या रजपूत कन्येला त्यांचीं 'दासी' कसें मानतां येतें? अर्थात् मानतां येत नाहीं. एवंच केवळ महादजीचा सरदारीवरील वारसा धुडकून लावण्यासाठीं लोकमत व विशेषतः पेशव्यांचें मत 'येन केन प्रकारेण' महादजीला प्रतिकूल असें बनविण्याच्या उद्देशानें, कोणीं तरी त्यांच्या शत्रूंनें, राणोजीरावांच्या त्या विवाहाच्या अप्रसिद्धपणाचा फायदा घेऊन ही महादजीच्या दासीपुत्रत्वाची कंडी पिकवून देण्याची युक्ति योजिलेली दिसते.

१. विविधज्ञानविस्तार, पु. ११, पृ. ८० व नातुकृत महादजीचें चरित्र पृ० ८८.

सरदारीचीं वस्त्रें घेऊन उज्जनीस येतांना महादजी उर्फ पाटिलबाबा यांनी आपले सहायकर्ते जिवबादादा यांनाहि बरोबर आणलें, पाटिलबाबा व जिवबादादा हे दोघेहि सारखेच शूर लढवय्ये, खोल राजकारणी व पहिल्या प्रतीचे मुत्सद्दी होते; व त्या त्यांच्या समानशीलत्वामुळें उभयतांचें सख्यहि पण चांगलें जमलें होतें. ते उज्जनीस आल्यावर पाटिलबाबांनीं जिवबादादांना आपल्या फौजेचे बक्षी (सेनापति) नेमले व त्यांच्याचकडे मुल्की वगैरे इतर सर्व खात्यांचीहि देखरेख सोंपविली. जनकोजीराव वारल्यापासून त्यांच्या मुलखाचा कोणीं धनी-धोरीच नसल्यामुळें चहूंकडे अव्यवस्था माजली होती. यास्तव अगोद र त्यांनीं आपल्या मुलखाचे प्रांत, जिल्हा, परगणा, असे विभाग व पोटविभाग पाडून व त्यांवर योग्य अधिकारी नेमून सर्वत्र स्थिरस्थावर केलें; खंडण्या व शेतसारा येणें होता तो युक्तिप्रयुक्तीनें वसूल करून खजाना भरला; आणि न्यायमनसूबा सर्वत्र पंचांमार्फत होण्याची पद्धत चालू केली.

पाटिलबाबांच्या अमलदारीचा काल ह्मणजे वस्तुगत्य मराठे, रजपूत, शिख, मुसलमान व इंग्रज, यांच्या संघर्षणाचा काल होय. त्यांत पाटिलबाबा व त्यांचे सेनापति या दोघांनीं मिळून उत्तरेस पटियाल्यापासून दक्षिणेस मैसूरपर्यंतच्या प्रदेशांत व तशाच मारवाड, मेवाड, वगैरे प्रांतांत अनेक स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून मोगल, रोहिले, रजपूत, जाट, शिख, यांची लढाईची रग पुरती जिरविली; उदयपूर, जयपूर, वगैरे प्रांतांच्या बहुतेक सर्व रजपूत राजांना आपल्या अंकित करून त्यांच्यापासून खंडण्या घेण्याचें ठरविलें; इंग्रजांशीं लढून त्यांच्यावर वचक बसविला; त्यांच्याकडून शाहआलम यास आणून व त्याला दिल्लीच्या

तख्तावर स्थापित करून त्याच्याकडून आपल्यास **महाराजाधिराज** ह्मणवून घेतलें; आणि **आग्रा, मथुरा, ग्वाल्हेर,** वगैरे ठिकाणें व त्यांच्या खालचा प्रदेश हस्तगत करून व तो आपल्या राज्यास जोडून आपल्या मुलखाची उत्तरसीमा **यमुनानदीच्या** दक्षिण तीरास नेऊन भिडविली. भरतखंडांतलें त्या वेळचें कोणतेंहि युद्ध, कोणतीहि राजकीय सल्लामसलत किंवा कसल्याहि संधिविग्रहाची वाटाघाट, पाहिली तरी त्यांत बहुतेक सर्वत्र पाटिलबाबांच्याच तरवारीला यश, त्यांच्या विचारांनाच अग्रस्थान, व त्यांच्याच शब्दाला प्राधान्य, मिळालेलें दिसतें; आणि त्यावरून **पाटिलबाबांनीं** आपल्या तरवारीच्यांव कर्तबगारीच्या बळावर भरतखंडांत चहूंकडे आपला दरारा बसवून उत्तर व पश्चिम हिंदुस्थानांत आपल्यास डोईजड असा कोणीहि शत्रु शिल्लक ठेविला नव्हता, असें साहजिक अनुमान होतें.

अशा वेळीं **पाटिलबाबांनीं** आपल्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली असती तर त्यांचा हात धरणारा निदान पेशवाईंत तरी कोणीं नव्हता; परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. वस्तुगत्या ते जरीं या वेळीं राजेच झालेले होते, नुसते सरदार राहिले नव्हते. तरी पण पेशव्यांशीं त्यांनीं आपली वागणूक शेवटपर्यंत त्यांच्या (पेशव्यांच्या) पदरच्या सरदारीचीच ठेविली.

ई. स. १७६१ पासून १७९१ पर्यंत वर सांगितल्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व कामगिरी अटोपून त्यांनीं दिल्लीपती-

१. 'उम्दतुलउमरा, महाराजाधिराज, फर्जंद आलीजाह बहादुर, मदारुलमहाम' ही दिल्लीपतीकडून **पाटिलबाबांना** मिळालेली पदवी होय.

कडून पेशव्यांकरितां मिळविलेली वकील-मुतलकीची (वजीरीची) सनद, बादशाहाच्या राज्यांत गोवधाच्या मनाईची सनद आणि हत्ती, घोडे, मोर्तब, मोर्चेलें, ढाल, तरवार, नालखी, पालखी, माहीमरातब, वगैरे सरंजाम, पेशव्यांना स्वत: समर्पण करण्यासाठीं ई. स. १७९२ त **पाटिलबाबा** मोठ्या लवाजम्म्यानिशीं उज्जनीहून पुण्यास गेले; आणि आपल्या लश्करांत दरबार भरवून तो सर्व बहुमान पेशव्यांना समर्पण केल्यानंतर दोन वर्षे ते तेथेंच होते. या अवसरांत त्यांनीं **माधवराव** साहेब पेशव्यांना पूर्ण वश करून घेतलें व **नाना** फडनीसालाहि आपल्या मुत्सद्दिपणाची थोडी चुणुक दाखविली. परंतु याप्रमाणें एक एक कार्यभाग साधून घेत असतां ते तेथे आजारी पडले व ता: १२ फेब्रुवारी सन १७९४ रोजीं वानवडी येथें स्वर्गवासी झाले.

---

१. **पाटिलबाबा** संगमावर आले असें ऐकतांच **सवाई** माधवराव साहेब पेशवे त्यांना सामोरे गेले तेव्हां त्यांच्या मुजऱ्यासाठीं **पाटिलबाबांनीं** आपल्या बरोबरचें सैन्य दोन कोसपर्यंत दुतर्फा उभें केलें होतें. त्यांतले शिलेदार, हुजरात, वगैरे घोडेस्वारांच्या डोक्यावर मंदील, आंगांत झगे व त्यावर शालजोड्या, हातांत शालनाम्याचे रुमाल, पायांत किनखापी विजारी, कानांत चौकडे, गळ्यांत कंठ्या व हातांत सोन्याचीं सलकडीं, अशा प्रकारचा फौजेचा थाट पाहून पेशव्यांना फार आनंद झाला; आणि त्या विजयी सैन्याचे मुजरे घेत घेत त्यांची स्वारी संगमावर दाखल झाल्यावर जेव्हां बाराशें तोफांची एकदम सलामी झडली तेव्हां तर **माधवराव** साहेब फारच प्रसन्न झाले—पेशव्यांची बखर, पृ. १२८।१२९.

उज्जन हें शिंद्यांच्या राहण्याचें मुख्य ठिकाण, किंबहुना आतां त्यांची राजधानी ह्मटलें तरी चालेल. परंतु राणोजीराव जयाप्पा, जनकोजीराव व पाटिलबाबा, यांपैकीं कोणींहि तेथे राहिल्याचें कोठें काहीं चिन्ह दिसत नाहीं. अधिक काय पण तेथे त्यांच्या राहण्याचा एखादा वाडासुद्धां नाहीं. ते नेहमी स्वाऱ्यांवर फिरते असत; व मधून मधून उज्जनीस येत तेव्हां तेथे ते आपल्या फौजेच्या छावणींतच रहात असावेत. पाटिलबाबांच्या कारकिर्दींत त्यांच्या बुंदेलखंडांतील मुलुखाला गिराशांचा उपद्रव होऊं लागला तेव्हां त्यांनीं ग्वाल्हेरीस आपली राजधानी कायम करण्याचा बेत केला होता; पण बहुधा खर्चाच्या अडचणीमुळें, तो सिद्धीस गेला नाहीं. तरी पण गिराशांच्या बंदोबस्तासाठीं ते उज्जनीप्रमाणें केव्हां केव्हां ग्वाल्हेरीसहि आपल्या फौजेची छावणी करून राहूं लागले. हल्लीं ग्वाल्हेरीच्या दक्षिणेस लश्कर या नांवाचें जें शहर वसलें आहे, तीच त्यांच्या छावणीची जागा होय. लश्करच्या वस्तीची रचनाहि फौजेंतील निरनिराळ्या सरदारांनी आपआपल्या आश्रित लोकांसह निरनिराळ्या पोट छावण्या करून राहण्यासारखीच आहे. तस्मात् लश्कर हें त्याचें अन्वर्थक नांव होय. पुढें सोहिरोबानाथ, आंबिये यांच्या उपदेशानें पाटिलबाबांच्या मनाचा कल श्रीकृष्णाच्या भक्तीकडे विशेषंकरून झुकला 'तेव्हां, किंवा त्यांना दिल्लीपतीचा कारभार पाहण्यासाठीं वारंवार दिल्लीस जावें-यावें लागे ह्मणून, ते मधून मधून मथुरेसहि छावणी करून रहात असत.

पाटिलबाबांच्या कारकिर्दींत उज्जनीची सुधारणा कसकशी व कितपत झाली हें निश्चित सांगतां येत नाहीं, परंतु त्या वेळीं

'या शहरांत चांगल्या चांगल्या अनेक इमारती दिसूं लागल्या होत्या व बाजारांत धान्य-धून्य, कापड-चोपड, भाजीपाला आणि सफरचंद, खरबुजें, द्राक्षें, डाळिंबें, नारिंगें, वगैरे फळफळावळ यांचीहि समृद्धि असे' असें त्या काळ (स. ई. १७८५) च्या उज्जनीचें वर्णन म्यालेट नांवाच्या एका युरोपियन प्रवाशाच्या रोजनिशींत आढळतें; व त्यावरून त्या वेळीं उज्जन बरीच सुधारली असून तिची भरभराटहि चांगली होती, असें दिसतें.

पाटिलबाबा वारल्यानंतर त्यांचे दत्तक पुत्र दौलतराव शिंदे यांना ई. स. १७९५ त सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. पुढें लागलीच खड्यांची लढाई उपस्थित होऊन त्यांत त्यांचे सेनापति जिवबादादा यांनीं जो पराक्रम गाजविला व विजय संपादन केला तो लक्षांत घेऊन लढाईनंतर निजामाकडून पेशव्यांना मिळालेल्या पासष्ट लक्षाच्या मुलुखांतून पंधरा लक्षाचा मुलुख पेशव्यांनीं दौलतराव शिंद्यांना दिला; व त्यामुळें शिंद्यांच्या राज्याची दक्षिणेकडील सीमा असीरगढ, बऱ्हाणपूर व अहेमदनगरपर्यंत पोंचली. नंतर जिवबादादा वारले; व त्यांचे चिरंजीव नारायणराव हे शिंद्यांच्या फौजेचे बक्षी (सेनापति) झाले. दौलतराव महाराज पुण्यास असतां त्यांच्या राज्याची एकंदर सर्व व्यवस्था बाळोबा तात्या दिवाण, नारायणराव बक्षी, लखबादादा लाड वगैरे अधिकारी उज्जनीस राहून करीत असत. मारवाड, मेवाड, बुंदेलखंड, येथील रजपूतांशीं त्यांच्या अनेक लढाया झाल्या व त्यांत त्यांना यशहि चांगलें आलें.

१. ग्वाल्हेर स्टेट ग्यॉझेटियर (१९०८), भा. १, पृ. २००।२०१.

परंतु तदनंतर दौलतराव महाराजांच्या दरबारांत त्यांचे श्वशुर सर्जेराव घाटगे यांचें वर्चस्व झालें. घाटगे हा अत्यंत दुष्ट मनुष्य होता. पाटिलबाबांच्या मागें त्यांच्या लक्ष्मीबाई वगैरे तीन स्त्रिया राहिल्या होत्या त्यांचा या घाटग्यानें अतिशय छळ केला, यामुळें फौजेंतील कित्येक सरदार बिथरले व त्यांनीं बायांचा पक्ष स्वीकारला. कित्येक चांगलीं चांगलीं माणसें नौकऱ्या सोडून निघून गेलीं. शिंदेशाहीचे अत्यंत अभिमानी व तसेच पराक्रमी बाळोबा-तात्या दिवाण, नारायणराव बक्षी, यशवंतराव वागळे, वगैरे अनेक शूर-वीरांचे घाटग्यानें अतिशय क्रूरपणानें खून केले. मिळून अशा प्रकारची राज्यांत झोटिंगपाछाई चालू होऊन सर्वत्र अव्यवस्था झाली; आपआपसांत रणें माजलीं; मल्हारराव होळकराशीं शिंद्यांची लढाई झाली त्यांत शिंद्यांना यश आलें नाहीं; व होळकरांनीं शिंद्यांची राजधानी, उज्जन, दोन वेळ लुटली. त्याचप्रमाणें त्यांच्या इंग्रजांशीं लढाया झाल्या त्यांतहि शिंद्यांना हार खावी लागली; आणि शेवटीं चम्बल नदीच्या उत्तरे-कडील सर्व मुलुख व तसाच अहेमदनगरचा किल्ला, भडोचचा किल्ला व त्यांच्या खालचे सर्व प्रांत जाऊन शिंदेशाहीच्या वैभवाला, दराऱ्याला व त्याबरोबर अर्थातच स्वातंत्र्यालाहि पुरता धक्का बसला.

दौलतराव महाराज पुण्याहून उज्जनीस येऊन राहिल्यावर तेथे त्यांनीं कोटांत श्रीमहाकालेश्वराच्या मंदिराजवळ आपल्या राहण्यासाठीं वाडा बांधविला तेव्हां तेथे शितोळे, सरनौबत, वगैरे सरदारांचेहि वाडे बांधले गेले. त्यांच्या जननी मैनाबाई साहेब यांनींहि तेथे पटणीबाजारांत एक सुंदर वाडा बांधवून बाजाराला शोभा आणली. उज्जन शहराच्या आग्नेयीस महाराजांनीं

एक बाजार वसवून त्याला **दौलतगंज** हें नांव दिलें; व हल्लीं ती धान्याची एक उतार पेठ बनली आहे. त्यांच्या अमलदारींत (ई. स. १८०४) 'हिंदुस्थान, ईराण, चीन व युरोप या देशांत उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या उत्तमोत्तम व मौल्यवान् वस्तु, उज्जनीच्या बाजारांत दिसूं लागल्या होत्या'[1];पण इतक्यांत महाराजांनीं ई. स. १८१० च्या सुमारास आपली राजधानी उज्जन येथून हलवून **लश्कर-ग्वाल्हेर** येथे नेली. यामुळें सुधारणेच्या मार्गांत उज्जन नगरी एक एक पाऊल पुढें टाकीत होती ती तेथेच थांबली, नव्हे, तिची काहींशी 'पीछेहट' झाली, असें ह्मटलें तरी चालेल.

दौलतराव महाराज ई. स. १८२७ त वारले तेव्हां त्यांचे दत्तक पुत्र जनकोजीराव (२ रे) महाराज गादीवर बसले. परंतु त्यांची एकंदर १५।१६ वर्षांची कारकिर्द **लश्कर-ग्वाल्हेर** येथे काहीं त्यांच्या बालपणांत आणि काहीं त्यांच्या व त्यांच्या कामदारांच्या आपआपसांतील कलहांतच संपली. उज्जनीच्या वांट्यास ती मुळींच आली नाहीं.

जनकोजी महाराज ई. स. १८४३ त वारल्यावर त्यांचे दत्तक पुत्र **जयाजीराव** (२ रे) महाराज गादीवर बसले. ते अल्पवयी असतां, **दादा** खासगीवाल्याच्या कारस्थानी स्वभावामुळें त्यांच्या फौजेची **छोंदा** येथे इंग्रजांशीं एक लहानशी चकमक झडली; व शेवटीं, **दादा** खासगीवाल्याला इंग्रजांच्या स्वाधीन केल्यावर, **महाराजांच्या** मातुश्री **ताराबाई** साहेब यांनीं **रामराव** फाळके यांच्या विद्यमानें इंग्रजांशीं जो तह केला त्यांत, युद्धापूर्वी शिंद्यांकडे तीस हजार फौज होती त्यापैकीं एकवीस

१. **ग्वाल्हेर** स्टेट ग्यॅझेटियर (१९०८), भा. १, पृ. ३०१.



कै० बायजाबाई साहेब शिंदे यांची छत्री.

हजार फौज कमी करून पुढें महाराजांनीं नऊच हजार फौज ठेवावी, असें ठरलें.

महाराज वयांत आल्यावर त्यांच्या कारकिर्दींत युद्धाचा प्रसंग मुळींच आला नाहीं, यामुळें राज्यांत सर्वत्र शांतता नांदूं लागली. मध्यंतरीं ई. स. १८५७ चें बंड उपस्थित झालें; पण त्यांत महाराजांनीं इंग्रजांना चांगली मदत केल्यामुळें बंड मोडल्यावर इंग्रजी इलाख्यांतील तीन लक्षांचा आणि अमझऱ्याच्या राजाचा दोन लक्षांचा, मिळून एकंदर पांच लक्षांचा मुलुख महाराजांना इंग्रजांकडून मिळाला.

या महाराजांच्या कारकिर्दींत दौलतराव महाराजांच्या राणी बायजाबाई साहेब काहीं काल उज्जनीस येऊन राहिल्या होत्या. त्यांनीं पटणीबाजार व सब्जीमंडी या दोन बाजार पेठांच्या मध्यभागीं श्रीगोपाळकृष्णाचें एक सुंदर मंदिर बांधविलें. या मंदिराच्या योगानें शहरांतील भरवस्तीच्या भागाला बरीच शोभा आली. तशीच त्यांनीं क्षिप्रातीरीं आपली एक लहानशी छत्री बांधवून घाटाच्या शोभेंतहि भर घातली.

जयाजीराव महाराजानंतर त्यांचे पुत्र माधवराव महाराज ई. स. १८८६ त गादीवर बसले. त्या वेळीं ते अल्पवयी असल्यामुळें राज्यकारभार कौन्सिल ऑफ रीजेन्सी पहात असे. पुढें ई. स. १८९७ त महाराजांनीं राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतल्यावर एकंदर राज्याची सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याचें काम त्यांनीं मोठ्या झपाट्यानें सुरू केलें. त्यांत उज्जन शहराची बरीच सुधारणा झाली. तेथे राजा जयसिंगानें बांधविलेल्या वेधशाळेचा जीर्णोद्धार, शहराच्या सर्व भागांत पसरलेल्या पक्क्या

सडका, शहरभर विजेच्या दिव्यांची रोशनी, दौलतगंजाच्या उत्तरेस त्याला जोडून केलेली माधवगंजाची नवी व सुव्यवस्थित रचना, मदारदरवाजापासून देवासदरवाजापर्यंतची नवी वस्ति, देवासदरवाजाबाहेर पब्लिक पार्क, माधव क्लब, युरोपियन पद्धतीचें हॉटेल आणि सर्व प्रकारच्या व सर्व वर्गांच्या हिंदुलोकांना उतरण्यास सोयीची अशी, महाराजांच्या मातुश्री जीजामहाराज यांनीं आपल्या खासगी खर्चानें बांधविलेली, सर्वांगसुंदर नवी धर्मशाळा, या सर्व त्यांच्याच कारकिर्दींत झालेल्या सुधारणा असून त्यांत अत्यंत महत्वाची, फार लोकोपयोगी, अशी सुधारणा झटली ह्मणजे, शहरांत सर्वत्र, त्याच्या कोन्या-कोपऱ्यांतसुद्धां, झालेला शुद्ध व स्वच्छ पाण्याचा पुरवठा ही होय. कारण उज्जनीच्या पश्चिमेस शहराला लागून वाहणारी क्षिप्रानदी ही प्रायः सर्वत्रच, व विशेषतः या शहराखालीं, फार संथ वहात असून बरीच उथळहि झालेली आहे. यामुळें, जात्या मधुर व आरोग्यकारक असें तिचें पाणीं काहीं वर्षांपूर्वीं शहरालगतच्या घाटांवर ग्रामस्थांच्या व यात्रेकरूंच्या उपसर्गानें उन्हाळ्यांत बरेंच घाण व भयंकर रोगजंतुंचें माहेरघर होऊन बसत असे. आणि तेंच पाणी लोकांना पिण्यासाठीं व खाण्याचे पदार्थ शिजविण्यासाठीं मिळत असल्याकारणानें शहरांत नेहमी कोणत्या ना कोणत्या रोगाची सांथ ही असावयाचीच, अशी स्थिति प्राप्त झाली होती. त्यांतून दर बारा वर्षांनीं तेथे सिंहस्थाचा फार मोठा मेळा भरतो व ते दिवस ऐन उन्हाळ्याचे असतात. तेव्हां अशा वेळीं हजारों बैरागी, गोसावी व इतर यात्रेकरू तेथे एकत्र झाले कीं कालऱ्याची सांथ आपली ठेवलेली. परंतु हल्लीं ती स्थिति बहुतेक पालटली आहे. महाराजांनीं

संवत १९६२ (ई. स. १९०६) त शहराच्या वरच्या बाजूस, दक्षिणेकडे, नदीच्या पात्रांत एक भली मोठी ग्यालरी[1] बांधवून व त्यांत झिरपून येणारें नदीचें भूमिगत शुद्ध पाणी पंपानें वर काढून नळांच्या द्वारा तें घरोघर पोंचविण्याची व्यवस्था केली. तेव्हां-पासून शहरांत सर्वत्र या शुद्ध व स्वच्छ पाण्याचा वापर होऊं लागला असून त्यामुळें तेथील हवा बरीच निवळली, रोगराईचें मान बरेंच उतरलें, आणि पाण्याच्या विपुळतेमुळें व सुलभतेमुळें शहरांत आतां ठिकठिकाणीं घराभोंवतीं लहान लहान बागबगीचे लावण्याकडे लोकांची प्रवृत्ति व्हावयास लागली असून त्या योगानें शहराची शोभाहि वाढत चालली आहे.

याप्रमाणें उज्जनीला माधवराव महाराजांनीं कायमचें ऋणी करून ठेविलें असल्यामुळें तेथील जनता तर त्यांचें कृतज्ञतापूर्वक चिरकाल स्मरण करीत राहीलच; पण केवळ तेवढ्या जनतेलाच नव्हे, शिंदेशाहींतील एकंदर सर्वच प्रजेला त्यांची कारकिर्द चांगली

---

१. ही ग्यालरी ३०० फुट लांब, ८ फुट रुंद व नदीच्या तळापासून खालीं १० फुट खोल आहे. शिवाय त्यांत नेहमीं पाण्याचा विपुळ पुरवठा होत जावा याकरितां तिच्या दोन्हीं बाजूस नदीच्या पात्रांत अनेक विहिरी खणून दोन-अडीच फुटाच्या नाळीनें, त्या सर्वांचा मुख्य ग्यालरीशीं संबंध जोडून दिला गेला आहे व त्यामुळें त्यांच्यासह ग्यालरीची एकंदर लांबी सुमारें ९०० फुट झाली आहे. हल्लीं या ग्यालरीवर एक पंप लावला असून त्याच्या साह्यानें पाण्याच्या खजान्यांत रोज १० लक्ष ग्यालन (१ ग्यालन = ५ शेर) पाणी सांठवितां येतें; आणि शहरांत त्याचा विपुळ पुरवठा होत असतो.

सुखकारक झाली. त्यांनीं राज्यकारभारांत प्रजेला हितावह अशा अनेक सुधारणा केल्या. आणि शेवटीं, आपल्या पश्चात् कोणीं आपलें स्मारक केल्यास तें, **ज्यापासून शेतकरी वर्गाचा उपयोग होईल अशा प्रकारचें करावें,** असें त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेविलें असून, त्यावरून त्यांच्या अंतःकरणांतील प्रजेच्या हिताची कळकळ चांगली व्यक्त होते.

इसवी सन १९२५ च्या एप्रिल महिन्यांत ते काहींसे आजारी असतांच इंग्लंडला जावयास निघाले; आणि प्रवासांत त्यांची प्रकृति अधिक बिघडून जूनच्या ५ व्या तारखेस पारिस येथें त्यांचें देहावसान झालें.

त्यांच्या नंतर त्यांचे चिरंजीव जयाजीराव महाराज ( २ रे ) गादीवर बसले. परंतु सांप्रत ते अल्पवयी असल्यामुळें त्यांच्या मातुश्री श्रीमती महाराणी चिनकूराजा साहेब रीजेन्ट ( राजप्रतिनिधी ) या नात्याने राज्याचा कारभार पहात असतात. शिवाय त्यांच्या मदतीसाठीं सरदार आपा साहेब शितोळे प्रभृति दहा मेम्बरांचे ( सदस्यांचें ) एक कौन्सिल ( मंडळ ) हि नेमलें गेलें आहे.

## सद्यः स्थिति.

**उद्योग-धंदे**—कांहीं वर्षांपूर्वीं उज्जनीस पटवेगिरीचें काम व सुतार काम सर्वोत्कृष्ट होत असे. या दोन्हीं कामाविषयीं उज्जनीची फार ख्याति होती. सर्व प्रकारच्या दागिन्यांची पटाई आणि त्यांच्या गोंड्यांची व बिरड्यांची बांधणी ही तेथल्यासारखी सुरेख व मजबूत इतरत्र होत नव्हती असें सांगतात. त्याचप्रमाणें

तेथील पूर्वींच्या सुतारांनीं केलल्या साध्या व नकशीदार, अशा दोन्हीं प्रकारच्या, लांकडी पेट्या, आरशाच्या चौकटी, देव्हारे, कलमदानें, वगैरे जिनसा, काहीं लोकांच्या संग्रहीं आहेत त्या फार प्रेक्षणीय आहेत. त्यांत दिसणारें हस्तकौशल्य व प्रमाणशीरपणा प्रशंसनीय आहे. काहीं जुन्या वाड्यांच्या खांबांवर व छतांवर त्या वेळचें लांकडी कोरीव काम आहे, त्याच्याकडे पहिलें असतां पूर्वींच्या कारागिरीचें कौतुक वाटतें. तसाच पूर्वीं तेथे कागद फार मोठ्या प्रमाणांत तयार होत असे. त्याला 'माळवी कागद' ह्मणत. जमा-खर्ची किर्द, खतावण्या, झडत्या व शेठ-सावकारांच्या दुकानांतील वह्या, यांत सर्वत्र तो माळवी कागदच वापरला जात असे. तो तयार करणारांची वस्तीहि तेथे बरीच होती. सोमवाऱ्या हाटांतून वडाच्या चौकीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस त्या लोकांचा एक पुराच वसलेला होता व त्याला 'कागदीपुरा' म्हणत असत. हल्लीं तो पुरा उजाड झाला आहे; पण कागद तयार करण्यासाठीं त्या काळीं बनलेले पक्के हौद तेथे अद्याप विद्यमान आहेत. हस्तिदंता-च्या, व मुख्यत्वें आबनूसी लांकडाच्या, फण्या व कंगवे तयार करण्याचा तेथील धंदाहि बराच प्राचीन आहे. हल्लींहि त्या धंद्याचे लोक तेथे आहेत; परंतु अलीकडे अल्प किंमतींत मिळणाऱ्या हाडें वगैरेच्या विदेशी कंगवे-फण्यांचा वापर या देशांत होऊं लागल्या-पासून त्यांच्या आबनूसी कंगवे-फण्यांना फारशी मागणी नसते. हाडांपेक्षां लांकुड बरें मानणारे लोकच तेवढे त्या वस्तु वापरतात, यामुळें हल्लीं तो धंदा रोडावला आहे. त्याहिपेक्षां अधिक प्राचीन असा तेथील धंदा ह्मटला ह्मणजे, रजया, जाजमें, पडदे, पलंगपोस, पातळें, धोतरें, उपरणें, रुमाल, यांवर वेलबुटी छापण्याचा

होय. हल्लींहि हा धंदा तेथे चांगला चालतो. या धंद्याचे लोक मुसलमान आहेत व त्यांना ‘छीपे’ म्हणतात. या छीप्यांची वस्ति उज्जनीजवळ भैरवगढास आहे. हल्लीं तेथे त्यांचीं सुमारे शंभर घरें, म्हणजे कुटुम्बें, आहेत; व तीं बऱ्या स्थितींत आहेत. पूर्वीं ते या कामीं ‘आलें’[1] नांवाच्या झाडांच्या मुळ्यांचा लाल पक्का देशी रंग व तसेच इतर देशी रंग वापरीत असत; परंतु विदेशी रंग त्यापेक्षां स्वस्त पडत असल्यामुळें हल्लीं ते विदेशी रंग वापरतात. हे विदेशीं रंग पूर्वींच्या देशी रंगासारखे पक्के, टिकाऊ, नाहींत. तरी पण ते वापरल्यानें माल दिसण्यांत चांगला सुबक दिसतो व किंमतींतहि स्वस्त पडतो, यामुळें त्याला मागणी चांगली असते. या मालाचीं दुकानें उज्जन येथील बाजारांत आहेत[2]. तसाच तेथे सबजीमंडींत चंदनी अत्तर व तेल काढण्याचा एक कारखाना आहे. त्यांत हा माल उत्तम प्रतीचा निघत असून त्याला मुंबई वगैरे कडील मागणीहि बरी असते. त्याखेरीज, उज्जन येथील मोगऱ्याच्या फुलांच्या हारांची फार प्रसिद्धि आहे. असा मोगऱ्याचा हार इतरत्र क्वचितच बनत असेल. हे हार भोपाळ, देवास, इंदूर, रतलाम, जावरा वगैरे आसपासच्या शहरांत तर नेहमी जातातच; पण केव्हां केव्हां ते मुंबईपर्यंतहि जात असतात. उज्जनीस या फुलांची

१. वर कागदीपुरा सांगितला त्याच्या जवळ ‘आलपुरा’ या नांवाची वस्ति होती तेथे हा रंग तयार करणारे लोक रहात असत. कागदीपुऱ्या सारखाच आलपुराहि हल्लीं उजाड झाला आहे.

२. या धंद्यांना सरकारांतून उत्तेजन मिळाल्यास, त्यांची भरभराट व बुडालेल्या अनेक धंद्यांचे पुनरुज्जीवन होण्याचा बराच संभव आहे.

लागवड करणारे व त्यांचे हार बनविण्याचा धंदा करणारे **माळी** लोक, यांची वस्ति बरीच आहे. देवास दरवाज्याजवळ **माळीपुरा** या नांवाचा त्यांचा एक मोहल्लाच वसलेला आहे. उज्जनी जवळ दक्षिणेस **नानाखेडा** नांवाच्या गावीं या **माळी** लोकांच्या जमिनी असून त्यांत ते प्राय: मोगऱ्याचीच लागवड करीत असतात.

अलीकडे **माळव्यांत** कापसाची लागवड बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यापासून कापसांतल्या सरक्या काढून त्याची रुई करणें, रुईच्या गांठी बांधणें, सूत काढणें, कापड विणणें, हे धंदेहि उज्जनीस चालू झाले असून हीं सर्व कामें यांत्रिक शक्तीनें करण्यासाठीं तेथे त्यांचे निरनिराळे कारखाने काढले गेले आहेत. त्यांत—

(१) **जिन**—सरक्या काढण्याचा कारखाना—हे कारखाने तेथे एकंदर आठ आहेत; व त्यांत सर्व मिळून दोनशें शहात्तर चरखे चालत असतात.

(२) **प्रेस**—रुईची गांठ बांधण्याचा कारखाना—हे कारखाने नऊ असून ते पावसाळ्याचे चार महिने खेरीजकरून बाकी आठ महिने चालतात; व त्यांत जवळ जवळ एक लक्ष गांठी बांधल्या जातात. प्रत्येक गांठ ४०० पौंडाची ह्मणजे पक्क्या पांच मणाची असते.

(३) **गिरण्या**—सूत काढण्याचा व कापड विणण्याचा कारखाना—उज्जनीस तीन गिरण्या उभारल्या गेल्या आहेत; पण त्यांपैकीं हल्लीं दोन चालू असून त्यांत ३० नंबर पावेतोंचें १५,००० रत्तल सूत व ५०।६० नंबर पावेतोंचें १८,००० रत्तल कापड दरसाल निघतें.

या दोन्हीं गिरण्यांतील सूत व कापड यांचा खप बहुतेक सर्व उज्जनीसच होतो. त्यांना बाहेरची मागणी फारशी नसते. रुईमात्र पांच लक्ष मणांवर बाहेर जाते.

त्याखेरीज रुईच्या गांठी बांधण्याचे हात प्रेस तेथे अनेक आहेत; व त्यांत दरवर्षी २७।२८ हजार मण रुईच्या गांठी बांधल्या जातात. तसेच सरक्या काढण्याचे हात चरखेहि तेथे बरेच चालतात व खादी वगैरे विणण्याचे काहीं हात मागहि पण चालू झाले आहेत.

**व्यापार**—प्राचीन काळीं उज्जन ही व्यापाराची मोठी पेठ होती. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांच्या द्वारा परदेशाशीं घडणाऱ्या भरतखंडाच्या व्यापाराचें केंद्र उज्जन होतें, असें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. या देशांतील हिरे-माणकें, रेशमी व सुती तलम कापड, वगैरे जिन्नस परदेशांत व परदेशांतील मोत्यें, सोने वगैरे जिन्नस या देशांत, उज्जनीच्या द्वारा जात-येत असत. भरतखंडाला 'सुवर्ण भूमि' ह्मणतात. पण तें येथे सुवर्ण उत्पन्न होतें म्हणून नव्हे; कारण येथे सोन्याच्या खाणी फारशा नाहींत. तर येथील सुपीक भूमींत उत्पन्न होणारा माल परदेशांत जाऊन त्याच्या मोबदला येथें येणारें तेथील सोने येथेंच रहात असे, म्हणून होय. परंतु तो मनु पुढें पालटला. तद्नंतर माळव्यांतील अफूच्या व्यापाराचें मुख्य केन्द्र उज्जन बनलें; आणि पुढें जेव्हां माळव्यांत एका नियमित परिमाणापेक्षां अधिक अफू पिकविण्यास प्रतिबंध झाला तेव्हां तेथील अफूची जागा कापसानें भरून काढली. हल्लीं उज्जन ही कापसाविषयीं एक नांवाजलेली मंडी (पेठ) आहे. तेथील रुईला बाहेरगांवची मागणी फार असते.

अमदाबाद व कानपूर येथे उज्जनीच्या मंडींतून दरवर्षी रुईच्या हजारो गांठीं जातात. मागणी जास्त असल्यामुळें इतर ठिकाणा-पेक्षां या मंडीत रुईची किंमतहि खंडीमागें दहा वीस रुपये जास्त मिळते; व या लालचीनें आसपासच्या धार, देवास, इंदूर वगैरे इलाख्यांतील व्यापारी आपली रुई विक्रीसाठीं या मंडींत पाठवितात व तेथून तिची विक्री होत असते.

उज्जन जशी कापसाची तशीच धान्याचीहि मोठी मंडी आहे. माळव्यांत सर्व प्रकारचें धान्य पिकतें; पण त्यांत गहूं, चणे, अळशी व ज्वार (जोंधळा) हीं पिकें मुख्य होत. या मंडींत मोठ्या प्रमाणावर व्यापार याच चार धान्यांचा व पांचवा कापसाचा चालतो. आणि उज्जन हें जी. आय. पी. व बी. बी. सी. आय. या दोन मोठ्या रेल्वेचें जंक्शन बनल्यामुळें तेथे व्यापाराची सोयहि उत्तम झाली आहे.

**शिक्षण संस्था**—लोकवस्तीच्या मानाने तेथे जी शिक्षणाची व्यवस्था केली गेली आहे ती बहुतेक पुरेशी आहे. तेथील माधव कॉलिजांत इंटरमीजियटपर्यंतचें शिक्षण दिलें जात असून त्यांत मिड्लपासून म्याट्रिकपर्यंतच्या क्लासांत २२५ आणि त्यावरच्या इंटरमीजियटच्या दोन्हीं क्लासांत ७५ मिळून एकंदर ३०० मुलें आहेत.

शिवाय मिड्लच्या खालच्या वर्गांचें शिक्षण देण्याच्या, सरकारी व सरकारी मदतीनें चालणाऱ्या, १९ मुलांच्या व १२ मुलींच्या शाळा असून त्यांत जवळ जवळ अडीच-हजार मुलें व एक हजार मुली इंग्रेजी, मराठी, हिंदी, गुजराथी व उर्दू शिकत असतात. मुलांच्या शाळांत त्यांच्या शारीर-शिक्षणाची सोयहि केली गेली आहे. त्याखेरीज शारीर-शिक्षणाच्या खासगी शाळा, ज्यांना

'अखाडे' ह्मणतात, ते तेथे अनेक असून त्यांतली 'युवराज-व्यायाम-शाळा' व 'गुरूचा अखाडा' या दोन संस्था विशेष उपयोगाच्या आहेत. त्यांत सुमारे १२५ मुलांना शारीर-शिक्षण चांगलें दिलें जातें. एक 'सर्व मंगल पाठशाळा' या नांवाची इन्टरमीजियटपर्यंत इंग्रेजी शिकविणारी खासगी शाळा तेथे असून त्यांत ३५० मुलें आहेत. तशीच तेथे एक सरकारी गायन शाळाहि आहे व त्यांत ५० मुलें आहेत.

शिवाय, बनारसच्या 'उत्तमा' परीक्षेपर्यंत शिकविणारी एक संस्कृत विद्येची शाळा, एक प्राचीन ज्योतिषविद्येची शाळा आणि ऋग्वेदीय व यजुर्वेदीय ब्रह्मकर्म शिकविणारी एक वेदशाळा, अशा तीन शाळा तेथे आणखीं असून त्यांत सुमारे दीडशें मुलें आहेत.

**रुग्णालयें**—हल्लीं तेथे 'सिव्हिल हॉस्पिटल' या नांवाचें एक बरेंच मोठें सरकारी रुग्णालय विद्यमान आहे. त्यांत विशेष व्याधिग्रस्त अशा साठ रोग्यांना उपचारासाठीं ठेवण्याची सोय असून ३५० पासून ४०० पर्यंत सामान्य रोगी, ज्यांना 'आउट पेशेन्ट' ह्मणतात, त्यांना नित्य औषधोपचार मिळतो. परंतु शहराची वाढती लोकसंख्या व चिकित्साशास्त्रांतले वाढते शोध, यांना हें हॉस्पिटल अपुरें पडत असल्यामुळें, त्यांत शंभर रोग्यांना ठेवतां येईल इतकें त्याला वाढविण्याची व अधिक कार्यक्षम करण्याची तजवीज चालू असून त्यासाठीं इमारत बांधून तयार झाल्यावर त्यांत 'क्ष' किरण, रसायनप्रयोगशाला, व शस्त्रक्रियेची सर्व साधन सामग्री, ठेविली जावयाची आहे.

याशिवाय, औषधोपचारापुरती या रुग्णालयाची एक शाखा, अर्थात् औषधालय (डिस्पेन्सरी) शहराच्या मध्यभागीं ठेविलें

असून त्यांतून नित्य सुमारे २०० रोग्यांना (आउट-पेशेन्ट्स यांना) औषधें दिलीं जातात. तसेंच, क्यानेडियन मिशनकडून धर्मार्थ चाललेलें एक व बिनोदमिलनें चालविलेलें एक अशीं दोन औषधालयें तेथे आणखीं असून त्यांतून जवळ जवळ ३०० रोग्यांना रोज औषधें दिलीं जात असतात.

तेथील स्थानिक मंडळानें ( म्युनिसिपालिटीनें)हि दोन औषधालयें चालविलीं आहेत. त्यांपैकीं एकांत आयुर्वेदिक पद्धतीनें व दुसऱ्यांत यूनानी पद्धतीनें नित्य सुमारे शें-सवाशें रोग्यांचा औषधोपचार होतो

कै. सख्याराजा साहेब (जीजामहाराज—माधवराव महाराजांची मातुश्री) यांच्या स्मरणार्थ तेथे 'श्रीसख्याराजा मॅटरानिटी होम' या नांवाचें एक सूतिकागृह सरकारांतून उघडलें असून त्यांत १५ बाळंतिणी ठेवण्याची सोय केली गेली आहे. प्रसूतिसंबंधी सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व औषधोपचार तेथे होतात. दुसरें एक सूतिकागृह तेथे कार्तिक चौकांत 'श्रीजीजामहाराज बालरक्षक सभेनें' चालविलें असून त्यांत ६ बाळंतिणींची सोय केली गेली आहे.

तसेंच, उज्जन शहरांपासून पांच मैलांवर पूर्वेकडे एक सरकारी 'गलितकुष्टालय' ( लेपर-एसायलम् ) उघडलें असून त्यांत ३६ महारोगी ठेवण्याची सोय केली गेली आहे; व त्यांच्या औषधोपचारासाठीं तेथे एक डाक्टरहि ठेविलेला आहे.

याखेरीज, तेथील सुप्रसिद्ध पंडित दुर्गाशंकरजी नागर यांनीं ८-१० वर्षांपासून 'श्रीभर्तृहरि आश्रम' या नांवाची एक संस्था काढली आहे; आणि त्यांत, मानस-चिकित्सा (Psycho-Therapy)

पद्धतीने व वर्णचिकित्सा (Chromopathy) पद्धतीने निद्रानाश, उन्माद, मज्जातंतूची क्षीणता वगैरे अनेक प्रकारच्या मज्जातंतुप्रदेश (Nervous System) संबंधी व तज्जनित आधि-व्याधींचे उपचार होत असतात. 'कल्पवृक्ष' या नांवाचें याच विषयाचें एक मासिक-हि या आश्रमांतून निघत असतें. हा आश्रम क्षीरसागराजवळ आहे.

**स्थानिक मंडळ** (म्युनिसिपालिटी)—ई. सं. १८८९ त उज्जनीस या मंडळाची स्थापना झाली असून त्यांत एक प्रेसिडेन्ट (अध्यक्ष) व वीस मेम्बर (सदस्य) असतात. प्रेसिडेन्ट असतो प्रजेपैकींच, पण त्याची नेमणूक सरकारांतून होते; आणि मेम्बरांत १५ प्रजेनें निवडून दिलेले, ३ सरकारांनीं ( प्रजेपैकीं ) नेमलेले, आणि एक सिविल हॉस्पिटलचा मुख्य डाक्टर व एक डिस्ट्रिक्ट एंजीनियर असे दोन अधिकारपरत्वें मेम्बर मानले जाणारे, मिळून वीस अधिकारी असतात.

या संस्थेच्या खर्चाकरितां दरवर्षी ६२,५०० रुपये सरकारांतून मिळतात; टर्मिनल टेक्स (उज्जनीस येणारा-जाणारावरील कर) चे १४,५०० रुपये रेल्वेच्या मार्फत वसूल होतात; व घरपट्टी वगैरे इतर करांचे ६३,००० रुपये येतात. मिळून या संस्थेचें एकंदर वार्षिक उत्पन्न १,४०,००० रुपये असून खर्च १,३५,००० चा आहे.

**सरकारी अधिकारी**—उज्जन जिल्ह्याचा सुभा हा तेथील मुख्य सरकारी अमलदार होय. सर्व शासनाधिकार त्याच्या कडे आहेत. माळवाप्रांताच्या न्याय, जमाबंदी, शेतकी, सायर, वगैरे खात्यांचे अधिकारीहि उज्जनीसच राहतात. तसाच

प्रसंग विशेषीं उज्जनीच्या बंदोबस्ताकरितां घोडे स्वारांच्या एक रजिमेन्टसह एक फौजी कमांडिग ऑफिसर तेथे असतो.

**पोस्ट व टेलिग्राफ**—पोस्टाची व्यवस्था तेथे दोन प्रकारची आहे : एक इम्पीरियल पोस्ट व दुसरें ग्वाल्हेर दरबारचें पोस्ट. इम्पीरियल पोस्ट ऑफिस देवास दरवाजाबाहेर पार्कजवळ असून त्यालाच तार ऑफिसाहि जोडलेलें आहे. ग्वाल्हेर दरबारचें सेंट्रल पोस्ट ऑफिस शहराच्या मध्य वस्तींत श्रीगोपाळमंदिराजवळ असून त्याचीं चार पोट ऑफिसें शहराच्या इतर भागांत ठेविलेलीं आहेत. या दोन्हीं पोस्टांचीं तिकिटें निरनिराळया दोन प्रकारचीं आहेत; व ज्या पोस्टाचें तिकिट पत्रावर वापरलें असेल त्याच पोस्ट ऑफिसांत तें पत्र टाकावें लागतें. त्यांत चूक झाल्यास तिकिट फुकट जाऊन पत्र 'नाटपेड' होत असतें. शहरांतील मनीऑर्डर, पार्सल, वगैरे पोस्टासंबंधी सर्व व्यवहार ग्वाल्हेर दरबारच्या पोस्टांत करणें सोयीचें असतें.

**सार्वजनिक उत्सव**—उज्जनीस असे उत्सव चार होतात.—

(१) **श्रीगंगादशहरा**—हा उत्सव ज्येष्ठ शुद्ध १ पासून १० पावेतों दहा दिवस, एक पिशाच मोचन तीर्थावर (शुकलजी कडून ), दुसरा रामघाटावर (कोकणस्थ मंडळीकडून), तिसरा उदासीच्या मठाखालीं व चवथा गंधवती तीर्थावर ( देशस्थ मंडळीकडून ) या प्रमाणे चार ठिकाणीं होतो; आणि नित्य रात्रीं कीर्तन, मंत्रजागर व शेवटीं ब्रांम्हणभोजन, हा त्यांचा कार्यक्रम होय.

(२) **श्रीगणपति उत्सव**—हा उत्सव भाद्रपद शुद्ध ४ पासून अनंत १४ पर्यंत होत असतो. सार्वजनिक गपणतीचा उत्सव गोपाळमंदिरांत होतो. इतर ठिकाणचे उत्सव निरनिराळया

मोहल्यांत होतात. नित्य कथा, प्रवचन, व्याख्यान, भजन, हा सामान्यतः सर्व ठिकाणच्या उत्सवांचा कार्यक्रम असतो; आणि शेवटच्या दिवशीं श्रीगजाननाला मिरवत क्षिप्रातीरावर नेऊन तेथे त्यांचें विसर्जन होत असतें.

(३) **शिवरात्रि महोत्सव**—हा उत्सव माघवद्य ६ पासून १४ पर्यंत **श्रीमहाकालेश्वराच्या** मंदिरांत होतो; आणि त्यांत नऊ दिवस रोज, देवाला लघुरुद्राचा अभिषेक, निरनिराळ्या प्रकारचा पोशाख व नव्या नव्या प्रकारची देवाची झांकी, सायंकाळीं कीर्तन व दोन प्रहरीं ४०-५० पात्रांचें ब्राह्मणभोजन, आणि शिवरात्रीच्या मध्यरात्रीं श्रीमहाकालेश्वराची महापूजा होत असते.

(४) **ताजिये**—हा मुसलमानी उत्सव (!) **मोहोरम** महिन्याच्या तारीख १ ते १० पर्यंत दहा दिवस होतो. या उत्सवासाठीं मुद्दाम तयार केलेल्या जागेंत[1], रस्त्याच्या बाजूस उभारलेल्या मंडपांत किंवा दुकानांतल्या वा घरांतल्या एखाद्या प्रशस्त जागीं, इमामहुसेनाच्या रोजाची[2], त्याच्या ‘ दुलदुल[3] ’ नांवाच्या घोड्याची, किंवा **महंमद पैगंबराच्या** ‘ बुराक[4] ’ नांवाच्या वाहनाची, प्रतिमा,

१. या जागेला **इमामवाडा** म्हणतात.

२. कबरेवर उभारलेलें मंदिर.

३. हा घोडा मनुष्यासारखा बोलत असे आणि इमामहुसेन युद्धांत मारले गेल्यानंतर या घोड्यानें त्यांच्या पत्नीस रणक्षेत्रांतून काढून सुरक्षित जागीं पोंचाविलें व परत रणांगणावर येऊन प्राणत्याग केला असें सांगतात.

४. तोंड मनुष्याचें व शरीर पक्ष्याचें अशा प्रकारच्या ज्या प्राणि-विशेषावर स्वार होऊन **महम्मद पैगंबर** ईश्वराच्या 'मैराज'-साठीं—साक्षात्कारासाठीं—स्वर्गास गेले, तो प्राणि.

अथवा त्या तिन्हींच्या प्रतिमा, मांडून त्यांची झांकी करणें किंवा त्या जागीं रोशनी करणें; फकीरी[1] घेऊन व्रतस्थ राहणें; स्थापित (मांडलेल्या) प्रतिमावर दरूद[2] पढणें, फातेहा[3] देणें व खैरात (दानधर्म) करणें; नऊ तारखेपर्यंत प्रतिमेपुढें किंवा अन्यत्र मजालिस करून—वक्ते व श्रोते मिळवून—नित्य मर्सिये-ख्वाँनी करणें; रोज प्रतिमेपुढें पटा-लकडी, गत्काफरी, वगैरे मर्दानी खेळ खेळणें; इमामहुसेन यांनीं धर्मासाठीं केलेल्या युद्धांत कित्येक तत्पक्षीय योद्धे पिण्यास पाणी न मिळाल्या-मुळें तृषेनें व्याकुळ होऊन गतःप्राण झाले, त्या मृतात्म्यांच्या शांति-साठीं—त्यांच्या तृषाजनित तापोपशमनार्थ—सबील मांडून, ह्मणजे पाणपोई ठेवून, लोकांना पाणी व सरबत पाजणें; नवव्या तारखेस रात्रीं त्या युद्धांतल्या शेवटच्या—इमामहुसेन मारले गेले, कत्तल झाले, त्या—प्रसंगाचा रणांगणांतील देखावा दाखविण्यासाठीं

१. युद्धांत इमामहुसेन यांचें रक्त सांडल्याचें चिन्ह म्हणून लाल रंगाचे कपडे व त्यांचा वडील भाऊ हसन याला शत्रूनें विष देऊन मारलें त्याचें चिन्ह म्हणून हिरव्या रंगाचे कपडे आंगांत घालणें, पंचरंगी नाडे गळ्यांत अडकविणें आणि रांगोळीसारखा पांढरा अबीर नांवाचा पदार्थ तोंडाला फांसणें, या प्रकाराला फकीरी म्हणतात.

२. मृतात्म्यांसाठीं कुराणांतील शांतिसूक्तांचें पठण.

३. मृतात्म्यांच्या उद्देशानें रोजा वगैरेच्या प्रतिमांना खाण्या-पिण्याचें पदार्थ निवेदन करणें.

४. इमाम हुसेनाच्या मर्दुमकीचीं वर्णनें, ते व त्यांचे आप्त-इष्ट-मित्र युद्धांत 'शहीद' झाल्याचीं, म्हणजे मारले गेल्याचीं वर्णन किंवा शत्रूच्या नीचपणाचे निदर्शक कथाभाग, यांचें संकीर्तन.

रोजा वगैरेच्या प्रतिमांना घेऊन मृतांविषयीं दुःखोद्गार काढीत गावांत हिंडणें; आणि दहाव्या तारखेस त्या प्रतिमांना मिरवत गांवाबाहेर क्षिप्रेच्या कांठीं नेऊन व तो 'करबला'[1] समजून तेथे त्यांचें विसर्जन करणें; हा या उत्सवाचा कार्यक्रम होय. ताजियाचा शेवटला विसर्जन-विधि उज्जनीस दहाव्या तारखेच्या रात्रीं—

१. जेथे इमामहुसेन यांचें शत्रूशीं युद्ध होऊन ते मारले गेले व ज्या जागीं त्यांची कबर आहे त्या प्रदेशाला करबला म्हणतात.

२. दिल्लीचा हुमायूं बादशाह याच्या कारकिर्दीपासून भरतखंडांत हा उत्सव चालू झाला आहे. त्याच्या संबंधानें एक दंतकथा अशी ऐकण्यांत येते कीं, हुमायूंच्या मनाचा कल धर्माकडे फार असल्यामुळें, तो दरवर्षीं इमामहुसेन यांच्या कबरेच्या ज्यारतीसाठीं (दर्शनासाठीं) करबल्यास जात असे. पण या त्याच्या जाण्या-येण्यानें तो वर्षांतून कित्येक दिवस राज्यांत गैरहाजर राहूं लागला व त्यामुळें राज्यांत अव्यवस्था माजली. तेव्हां इमामहुसेनानें त्याला असा दृष्टांत दिला कीं, इतःपर तूं करबल्यास न येतां माझ्या रोजाची एक प्रतिमा करवून ती आपल्यापाशीं ठेव, म्हणजे मीच दरवर्षी मोहोरम महिन्यांत तेथे येऊन तारीख १ ते १० पर्यंत त्या प्रतिमेंत वास करीत जाईन व तेथेच तूं माझी ज्यारत करीत जा. त्याप्रमाणें हुमायूंनें इमामहुसेनाच्या रोजाची एक रत्नजडित प्रतिमा तयार करविली; आणि तिच्यासाठीं एक इमामबाडा बांधवून त्यांत तो दरवर्षी मोहोरमच्या पहिल्या दहा दिवसांत ती प्रतिमा ठेवून व तेथे रोशनी वगैरे करून तिची ज्यारत करूं लागला. पुढें कांहीं दिवसांनी लोकांनाहि त्याचें अनुकरण करावें सें वाटलें. पण रोजाची प्रतिमा करण्यासाठीं सर्वांपाशीं रत्नें कोठलीं ? म्हणून रत्नांच्या अभावीं बांसाच्या काड्यांची प्रतिमा करून व तिला रंगी-बेरंगी

मुसलमानी गणनेप्रमाणें अकराव्या तारखेच्या रात्रीं—करतात. अन्यत्र, कोठे तो दहाव्या तारखेस प्रातःकाळीं तर कोठे सायंकाळीं होत असतो.

उज्जन येथील ताजिये, ह्मणजे इमामहुसेनाच्या रोजाच्या प्रतिमा आकारांत फारशा मोठ्या नसतात; पण त्यांवरील अभ्रकाच्या जाळीचें काम फार कुशलतेचें व प्रेक्षणीय असतें. ताजियापुढें खेळण्यांत येणारे दांडपट्टा वगैरेचे मर्दानी खेळहि पाहण्याजोगे व स्फूर्तिदायक असतात. तशीच दहाव्या तारखेस तेथे जी ताजियांची मिरवणूक निघते तीहि फार सुव्यवस्थित व प्रेक्षणीय असते. उज्जन येथील ताजियांच्या उत्सवांत ज्या दुलदुलच्या प्रतिमा करतात त्यांत दोन प्रतिमा फार मोठ्या असतात; आणि त्यांपैकीं एकाला 'छोटा घोडा' व दुसऱ्याला 'बडा घोडा' म्हणतात. तेथील ताजियेदारींत बड्या घोड्याचें प्राधान्य आहे.

**मेळे**—तिथि-पर्वणीच्या निमित्तानें उज्जनीस लहान-मोठे मेळे (जत्रा) अनेक भरतात. त्यांत (१) गणगौरीचा मेळा, चैत्र शुद्ध ३ च्या दिवशीं सांयकालीं क्षिप्रातटीं; (२) वैशाखी स्नानाचा

वर्खांनीं शृंगारून ते आपला मोहोरम साजरा करूं लागले. अर्थात् तेव्हांपासून ही ताजियेदारीची प्रथा येथे चालू झाली.

कोणीं या कथेचा संबंध हुमायूंशीं न जोडतां महंमद तुघलकशीं जोडतात; व त्याला दृष्टांत होण्याचीं कारणेंहि निराळीं सांगतात. परंतु यांतल्यां कोणत्याहि कारणानें कोणींहि या प्रथेचा प्रवर्तक झाला असला तरी, ती पांच-सहाशें वर्षांपासून येथे चालू झाली आहे, तत्पूर्वी नव्हती, असें त्या वरून दिसतें.

मेळा, वैशाख शुद्ध १५ च्या दिवशीं, प्रातःकाळीं क्षिप्रातिरीं; (३) फूलडोलाचा मेळा, भाद्रपद शुद्ध ११ च्या दिवशीं, पुरुषोत्तम-सागरावर; (४) कार्तिकीचा मेळा, कार्तिक शुद्ध १५ च्या दिवशीं, क्षिप्रातिरीं; (५) महाशिवरात्रीचा मेळा, माघ कृष्ण १३ च्या दिवशीं, श्रीमहाकालेश्वराच्या मंदिरांत; (६) निशाणाचा मेळा, फाल्गुन वद्य ५ च्या दिवशीं, क्षिप्रातटीं; आणि (७) सिंहस्थाचा मेळा, सिंहराशींत गुरू असतां जो वैशाख मास येईल त्या वैशाख शुद्ध १५ च्या दिवशीं, क्षिप्रातिरीं; हे सात मेळे विशेष प्रसिद्ध आहेत.

या सात मेळ्यांपैकीं पहिले सहा मेळे वार्षिक असून शेवटला **सिंहस्थाचा मे**ळा प्रति बारा वर्षांनीं भरणारा आहे. गुरू मेषादि बारा राशींपैकीं प्रत्येक राशीस दर बारा वर्षांनीं येतो व नंतर बारा-साडेबारा महिनेपर्यंत त्या राशीस राहतो. त्याप्रमाणें तो सिंहराशींत असतां उज्जन येथे वैशाख शुद्ध १५ स क्षिप्रानदीच्या स्नानवंदनाचें विशेष माहात्म्य मानलें गेलें आहे. म्हणून दर बारा वर्षांनीं तसा योग आला म्हणजे वैशाखी १५ च्या स्नानासाठीं बैरागी, गोसावी, वगैरे सर्व पंथांचे साधु-संत-महंत व इतर लक्षावधि लोक तेथे एकत्र होतात; व त्या त्यांच्या जमावाला **सिंहस्थाचा मेळा** म्हणतात.

या मेळ्यासंबंधानें एका वृद्ध गृहस्थाच्या घरच्या जुन्या बाडांत "ईज्ये मेषादि याते प्रथम······गंडकी काशिकास्यात् । कावेरी चैव गौतम्यथ निज गादिता कृष्ण तुंगा विशाला ॥ कोदंडाख्यं च कुंडं तदनुमलप्रभा कुंभकोणे तथास्यात । मीने मानस्सरोजे

भवतु सुरनदी यत्र याते नमस्ते ” असा एक श्लोक सांपडला असून तो कोठला, कोणत्या ग्रंथांतला, याविषयीं तेथे खुलासा केला नसल्यानें तो कितपत विश्वसनीय आहे, हें सांगतां येत नाहीं. परंतु गुरू मेषराशींत असतां ······[1]··· वृषभराशींत असतां गंडकी नदींत (नेपाळच्या तराईत), मिथुनराशींत असतां काशीक्षेत्रीं, कर्कराशींत असतां कावेरी नदींत, सिंहराशींत असतां गोदावरींत, कन्याराशींत असतां कृष्णा नदींत, तूळराशींत असतां तुंगभद्रत, वृश्चिकराशींत असतां विशालाक्षेत्रीं (उज्जयिनीस) क्षिप्रानदींत; धनराशींत असतां अयोध्येस धनुष्यकुंडांत, मकरराशींत असतां मलप्रभेंत, कुंभराशींत असतां कुंभकोण येथे, व मीनराशींत असतां मानस सरोवरांत, गंगानदीचा निवास असतो, असें जें त्यांत निरूपण केलें आहे, त्यावरून त्याचा संबंध निरनिराळ्या ठिकाणीं भरणाऱ्या या द्वादशवार्षिक मेळ्यांशीं दिसतो. आणि त्याप्रमाणें, गुरू सिंहराशींत असतां गोदातिरीं व तो कन्याराशींत असतां कृष्णातिरीं, स्नानासाठीं मेळा भरण्याची वहिवाट हल्ली चालूहि आहे. तेव्हां उज्जनीसाहि बहुधा वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें, गुरू वृश्चिकराशींत असतां क्षिप्रेच्या स्नानासाठीं पूर्वी मेळा भरत असावा असें वाटतें. आणि पुढें उज्जन क्षेत्रांत वैशाखी १५ च्या दिवशीं क्षिप्रेच्या स्नानाचें माहात्म्य विशेष असल्यामुळें, सिंहस्थ गुरूंत गोदावरीच्या स्नानासाठीं नाशिक येथे एकत्र होणाऱ्या साधु-संतांनीं, जवळच्या जवळ उज्जनीस त्या दिवशीं (वैशाखी १५) क्षिप्रेचें स्नानहि पदरीं पाडून घेण्याची प्रथा चालू केली असावी;

१. या जागेचीं अक्षरें, श्लोकाचा कागद जीर्ण झाल्यामुळें बहुतेक नाहींशीं झालीं आहेत. तीं वाचतां येत नाहींत.

व त्या कार्यासाठीं उत्तरोत्तर तेथे अधिकाधिक लोक येऊं लागल्यावर नाशिक व उज्जन दोन्हीं ठिकाणीं सिंहस्थाचे मेळे चालू होऊन, उज्जनी येथील सिंहस्थाच्या मेळयाच्या पोटीं तिचा पूर्वींचा वृश्चिकस्थाचा मेळा लुप्त झाला असावा, असें अनुमान होतें.

भरतखंडांत बारा राशींचे हे बारा मेळे केव्हांपासून चालू झाले? त्यांपैकीं कृष्णा, गोदा व क्षिप्रा, या तीन नद्यांवरील तीनच मेळे चालू राहून बाकीचे केव्हां कसे बंद पडले? हें आज नेमकें असें काहीं सांगतां येत नाहीं. पण हे मेळे ज्याअर्थीं राशिपरत्वें भरणारे आहेत त्याअर्थीं ते, भारतीय ज्योतिषांत राशिचक्राचा समावेश झाल्यानंतरचे, ह्मणजे दीड-दोन हजार वर्षांच्या आंतलेच, असले पाहिजेत हें उघड होय.

परंतु हे मेळे जरी दीड-दोन हजार वर्षांच्या आंतले असले तरी ते भरविण्याची कल्पना काहीं इतकी अलीकडची नाहीं. ती फार जुनी आहे. तिचें मूळ वैदिक काळांत दिसतें. त्या काळीं देशदेशान्तरावरील अनेक विद्वान वेळेवेळीं कोठे तरी एकत्र होत असत; तेथे त्यांच्या सभांचीं अधिवेशनें कित्येक महिनेपर्यंत सतत सारखीं चालू रहात असत; आणि तत्त्वज्ञानविषयक विचारांचा विनिमय व सनातन धर्माची चर्चा, हे त्यांच्या त्या सभा भरविल्या जाण्याचे मुख्य उद्देश असल्यामुळें त्या सभांना 'ब्रम्हसत्र' किंवा 'सरस्वतिसत्र' ही संज्ञा दिली जात असे. बृहदारण्यक, आश्वलायन श्रौतसूत्र, वगैरे तत्कालीन ग्रंथांत या सत्रांचा उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतो. तेव्हां पुढें कालानुसार त्यांचें स्वरूप पालटत पालटत त्यांना या मेळयांचें स्वरूप प्राप्त

झालें असावें, किंवा प्रतिकूल परिस्थितिवशात् तीं सत्रें बंद पडल्या-नंतर काहीं कालान कोणीं सार्वभौम राजानें आपल्या पूर्वपरंपेरस स्मरून या मेळयांच्या रूपानें त्यांचें पुनरुज्जीवन केलें असावें असें अनुमान करितां येतें. कारण हल्लीं त्या सभांना मेळयांचें स्वरूप जरी प्राप्त झालें आहे, तरी त्यांत कोठे कोठे तात्त्विक व धार्मिक चर्चेच्या रूपानें थोडा-बहुत सरस्वतिसत्राचाहि परिचय मिळतो; व तोच वरील अनुमानाचा उपोद्बलक होय.

बौद्धकालीं धर्मचर्चेसाठीं तद्धर्मीय अनेक विद्वान प्रतिवर्षी एकत्र होऊन त्यांच्या महासभांचीं जीं अधिवेशनें होत असत, त्यांवरून पुढें या मेळयांची कल्पना सनातनधर्मीयांनीं उचलली, असेंहि कोणीं म्हणतात. पण बौद्धांच्या त्या महासभांचें मूळ तत्पूर्वींच्या सरस्वतिसत्रांत नव्हतें असें काहीं सिद्ध करून दाखवितां येईलसें वाटत नाहीं. आमच्या मतें त्या महासभांचीं कल्पनाहि पूर्वींच्या सरस्वतिसत्रांतूनच निघालेली असली पाहिजे. आणि हें जर खरें असेल तर या मेळयांच्या उत्पत्तीचें श्रेय बौद्धांना जरीं दिलें तरी परंपरया त्यांचें मूळ सनातन धर्मीयांनीं तत्पूर्वी चालविलेल्या सरस्वतिसत्रांतच दिसतें, हें निराळे सांगावयास नकोच.

हल्लीं साधु-संतांचे जेवढें म्हणून संप्रदाय, पंथ व पोटपंथ, भरतखंडांत विद्यमान आहेत, त्यांपैकीं बहुतेक सर्व या मेळयांत भाग घेत असतात, असें वर सांगितलेंच आहे. ते संप्रदाय, पंथ व पोटपंथ हे:—

१. बैरागी —(१) रामानुजपंथी—रामजी के दिगम्बर-निर्मोही--निर्वाणी--संतोखी--निरालम्बी--विष्णुस्वामी--टाटंबरी;

(२) निंबार्कपंथी–निरुत्तम–निर्मोही मालाधारी–राधावल्लभी–हर-ब्यासी निर्वाणी–शामजी के दिगंबर–झाडिया निर्मोही–संतोखी हब्यासी; (३) रामसनेही पंथी; (४) दादुपंथी; (५) कबीरपंथी; (६) निरंजनी; (७) स्वामिनारायण पंथी.

२. गोसावी—गिरी-पुरी-भारती–पर्वत–बेन–अरण्य–सागर-जती-जोत-सवाई-निरंजनी-निर्वाणी-जूने--अटल–अभान-सरस्वती-दादूपंथी-कबीरपंथी-गरीबदासजी के परमहंस.

३. उदासी—(१) दसमीन उदासी-बलुदसमसाहेबी-अल-मस्तसाहेबी--फूलसाहेबी—गोबिंदसाहेबी--भगतभगवानजीसाहेबी-मियासाहेबी—अजीतमलसाहेबी—सोंडीसाहेबी--बेदीसाहेबी--सघे साहेबी; (२) नानकपंथी उदासी; (३) निर्मले; (४) नानकपंथी निर्मले; (५) निर्मले परमहंस; (६) नानकशाई दंडेवाले.

४. नाथसंप्रदायी—यादनाथ–उदेनाथ–संतोखनाथ–सत्य-नाथ ब्रह्म–अचल अचंबेनाथ–गजबेली गजकथकनाथ–ग्यानपात सिद्ध चौधरीनाथ–घटपिंड श्रीशंभुजती गुरू गोरखनाथ–मायारूप मच्छंदरनाथ–सप्तनाथ ब्रह्म का जोगी–रामजी का जोगी–बेराग का जोगी–मस्तनाथ का जोगी–रावळ जोगी–कानीपाव का जोगी–हंडी भगडनाथ का जोगी–अखेनाथ का जोगी–डोंगरनाथ का जोगी–बीरनाथ का जोगी–निर्गुणनाथ का जोगी–तोतानाथ का जोगी.

५. अघोरी—ओघड—गूदड—सूखड--रूखड–सरभंग–हर-नामगिर लगड अघोरी ( अबू )–भैरागिर ( चित्रकोट ).

यांत अधिक भरणा बैराग्यांचा असतो; गोसावी व उदासी त्यां पेक्षां कमी असतात; आणि नाथपंथी व अघोरी फार थोडे असतात. प्रत्येक पोट-पंथाची एक एक याप्रमाणें सर्व पंथांच्या निरनिराळ्या अनेक जमाती असतात, व त्यांना 'अखाडे' म्हणतात. प्रत्येक अखाड्याचें एक एक निशाण असतें. हीं निशाण प्रायः रेशमी कापडाचीं असून त्यांत कित्येक भरजरीचीं व फार मौल्यवान् असतात. हे सर्व अखाडे उतरण्याच्या जागा नियमित आहेत: बैराग्यांचीं अनेक मंदिरें अंकपाद येथें पक्की बांधलेलीं आहेत त्यांत व त्यांच्या आसपास मैदानांत बैरागी लोक उतरतात; क्षिप्रा नदीच्या परतीरावर 'दत्ताचा अखाडा' या नांवाचा गोसाव्यांचा मठ आहे त्यांत व त्याच्या जवळच्या मैदानांत गोसावी उतरतात; गंधवती तीर्थावर उदाशांचा भव्य मठ आहे त्यांत व त्याच्या मागल्या बाजूस मैदानांत उदासी उतरतात; नाथसंप्रदायी लोक भर्तृहरीच्या गुफेवर उतरतात; अघोरी लोकांची बहुधा जमात नसते, ते एक-एकटे असतात, व ते दत्ताच्या अखाड्याजवळ ओघड-टेकडीवर, रणजीत हनुमानाजवळ व स्मशानांत उतरतात; आणि दादूपंथी-कबीरपंथी बैरागी व गोसावी राणेखांभाईच्या बागेंत, निर्मळे मुल्लांमदारीच्या बागेंत व परमहंस हनुमान बागेंत उतरत असतात.

बैरागी भक्तिमार्गी आहेत. त्यांच्या अखाड्यांत पूजाअर्चा, नामस्मरण, भजन, कथा-पुराण, हें नेहमीं चाललेलें असतें. पंचाग्निसाधन, अणकुचीदार खिळ्यांच्या आसनावर निजणें-बसणें, एका पांयावर किंवा दोन्हीं पांयांवर अष्टौप्रहर उभे राहणें, एक हात सदासर्वकाळ ध्वजेसारखा उंच केलेला ठेवणें, असले तितिक्षेचे किंवा तपाचे चमत्कारिक प्रकारहि त्यांच्यांत आढळतात; पण

विशेषतः त्यांचा कल भक्तीकडे असतो व त्यांच्यांत रामकृष्णादिकांचे प्रेमळ भक्त अनेक दृष्टोत्पत्तीस येतात. गोसावी व निर्मळे यांचा ओढा तत्त्वज्ञानाकडे अधिक असतो. विशेषतः निर्मळे परमहंस हे नेहेमी तत्त्वचिंतनांतच रंगलेले असतात. आणि थोड्याबहुत अंशानें ज्ञानार्जनाकडे प्रवृत्ति जरी सर्व सांप्रदायिकांत दिसते, तरी पण उत्तम विद्वान व उत्तम वक्ते प्रायः परमहंस मंडळींतच अधिक सांपडतात. तदितर उदासी पंथांत तपाचरणाचें प्राधान्य दिसतें. नाथसंप्रदायी मंडळी योगसाधनाकडे व मुख्यत्वें हठयोगाकडे वळलेली असते. अघोरी सांप्रदायाचा विलक्षण वेष व तसेंच विलक्षण आचरण यांवरून वाममार्गी मंत्रविद्या हें त्यांचें अंतिमसाध्य असावेंसें वाटतें.

या सर्व संप्रदायांचे व सर्व पंथांचे मिळून एकंदर चाळीस-पन्नास हजारावर लोक या मेळ्यांत एकत्र होतात. ग्वाल्हेर दरबारची, त्यांच्या अमलदारांची व तशीच सर्व नागरिकांची त्यांना सक्रिय सहानुभूति असल्यामुळें या संत-महंतांच्या सुख-सोयीसाठीं सर्व सरकारी अमलदार, कामगार व नागरिक मनोभावानें झटत असतात. निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं दिलेल्या तळांवर सर्वत्र अवश्यकतेनुसार लहान-मोठे बाजार लागलेले असतात; त्यांच्याकडे जाणाऱ्या रस्त्यांची व त्यांच्या तळांची झाड-लोट, त्यांवर सर्वत्र विजेचे दिवे, व सर्व ठिकाणीं उत्तम पाण्याचा विपुळ पुरवठा, ही व्यवस्था, ग्वाल्हेर दरबारांनीं नेमलेल्या 'मेळा-ऑफिसर' नांवाच्या अमलदाराच्या देखरेखी खालीं निरनिराळ्या खात्याकडून होत असते; पोलिसचा बन्दोबस्त चांगला असतो; ठिकठिकाणीं औषधालयें व डांकखाने ( पोस्ट-

ऑफिसें ) उघडलेले असतात; आणि ग्वाल्हेर दरबाराकडून, शेट-सावकारांकडून व इतर धनिकांकडून या पाहुण्यांसाठीं जागजागीं सदावर्तें व अन्नसत्रें चालू केली जात असून, शिवाय, त्यांच्या निरनिरळया जमातींना गांवांत सारख्या मेजवान्याहि दिल्या जात असतात.

वैशाख शुद्ध १५ हा या मेळ्याचा मुख्य दिवस होय. त्या दिवशीं बैरागी मंडळीचीं सुमारे चारशें निशाणें आणि गोसावी, उदासी यांचीं साठ-पासष्ट निशाणें, मिळून एकंदर साडेचार-पावणे-पांचशें निशाणांच्या स्नानाचा विधि व त्यांच्या बरोबरच्या चाळीस-पन्नास हजार साधु-संतांचीं स्नानें, क्षिप्रा नदीवर व्हावयाचीं असतात. या पाहुण्यांच्या गर्दींत इतर लोकांना पोर्णिमेच्या दिवशीं नदीवर स्नान करण्यास सवड मिळत नाहीं. ह्मणून ते आदल्या दिवशीं, चतुर्दशीलाच, किंवा साधल्यास पौर्णिमेला सूर्योदयाच्या पूर्वी, नदीवर स्नानें करून घेतात व पौर्णिमेच्या दिवशीं दिवसभर नदी पाहण्यांसाठीं मोकळी सोडलेली असते. या दिवशीं प्रातः काळीं सर्व संत-महंत आपआपल्या स्थानांवरून हलतात; आणि आपआपलीं निशाणें फडकावीत, वाजत-गाजत, व सरकारी लवाजम्यानिशीं मोठ्या समारंभानें मिरवीत, क्षिप्रातिरीं यतात. या एकंदर मिरवणुकींत, चाळीस-पन्नास हजार साधु-संत आणि पांच-सहा लक्ष बाहेरगांवाहून मेळा पाहण्यासाठीं आलेले लोक, मिळून सहा-सात लक्ष लोकांचा जमाव असतो. प्रत्येक अखाड्यानें आपआपल्या स्थानापासून क्षिप्रातिरीं येण्याचे व स्नानानंतर तेथून आपआपल्या स्थानीं परत जाण्याचे मार्ग पूर्वींपासून वहिवाटीनें ठरलेले आहेत. त्याचप्रमाणे या मिरवणुकीचा

क्रम, ह्मणजे तींत कोणत्या अखाड्यानें सर्वांच्या पुढें रहावें, व त्याच्या मागून, एका पुढें एक अशा रीतीनें, कोण कोणते अखाडे असावेत, याविषयीं व तसेंच कोणत्या अखाड्यानें कोणत्या घाटावर स्नान करावें या विषयींहि सर्वानुमतें नियम ठरविण्यांत आले आहेत. त्याप्रमाणें हे सर्व अखाडे क्रमशः नदीतीरावर येतात व आपआपल्या घाटावर स्नान करून ठरलेल्या मार्गानें स्वस्थानीं परत जात असतात. वस्तुगत्या ही मिरवणूक अखाड्यांतील लोकांची किंवा त्यांच्या महंतांची नसून त्यांच्या निशाणांची आहे. त्यांत प्राधान्य निशाणांचें असतें. तसेंच नदीवर स्नानहि मुख्यत्वेंकरून निशाणांचेंच व्हावयाचें असतें. वाद्यांच्या गजरांत निशाणांचीं खालचीं टोंकें तीर्थांत बुडवून काढणें हा निशाणांना स्नान घालण्याचा विधि होय. तो अटोपल्यावर निशाणें घाटांवर आणून उभीं करण्यांत येतात. नंतर त्यांच्या बरोबरची संत मंडळी स्नान करते. तदनंतर निशाणांची पूजा व त्यांचें वंदन होतें; आणि तें झाल्यावर निशाणें तशाच समारंभानें मिरवत मिरवत व वाजत-गाजत स्वस्थानीं परत जात असतात.

निरनिराळ्या प्रकारच्या व निरनिराळ्या मतांच्या लोकांची ही असली प्रचंड मिरवणुक ! पण ती पूर्ण सुव्यवस्थित रीतीनें, बिनबोभाट, शेवटास जात असते. दरबारांनीं आंखून दिलेला तिचा रेखीव कार्यक्रम व तो अक्षरशः अमलांत आणण्याच्या कामीं दृष्टोत्पत्तीस येणारी अधिकारी वर्गाची दक्षता, हीं दोन्हीं अत्यंत प्रशंसनीय होत. त्यांच्या योगाने जात्याच प्रेक्षणीय अशा या मिरवणुकीला आणखी सुव्यवस्थेची जोड मिळून ती विशेष प्रेक्षणीय होत असते.

ही मिरवणूक संपून सर्व अखाड्यांचीं निशाणें आपआपल्या जागीं विराजमान झालीं की मेळ्याचा कार्यक्रम संपला. तदनंतर ग्वाल्हेर दरबारकडून नगदी दक्षिणा, महावस्त्रें, वगैरेंनीं साधु-संतांची यथायोग्य संभावना होते; आणि अशा रीतीनें सत्कारपूर्वक त्यांची बोळवण झाल्यावर क्षेत्रनाथाचा निरोप घेऊन ही पाहुणे मंडळी राज्याचें, राजाचें व जनतेचें अभीष्ट चिंतन करीत करीत आपआपल्या मार्गास लागत असते.

# प्रकरण तिसरें.

## क्षेत्रमाहात्म्य व तीर्थयात्रा.

स्कंदपुराणांतर्गत अवंतिखंडाच्या क्षेत्रमाहात्म्य नामक प्रकरणांत अवंतिकेचीं कुशस्थली, कनकशृंगा, अमरावती, उज्जयिनी, वगैरे एकंदर आठ नांवें सांगितलीं आहेत त्यांत तिच अवंती हेंहि एक नांव दिलेलें आहे; आणि संस्कृत भाषेंतील रक्षणार्थी 'अव' धातुपासून सिद्ध होणाऱ्या 'अवंती' शब्दाच्या अर्थास अनुसरून "देवतीर्थौषधीबीजं भूतानां चैव पालनम् । कल्पे कल्पे च यस्यां वै तेनावंतीपुरी स्मृता"—म्हणजे 'प्रत्येक कल्पाच्या अंतीं देव, तीर्थ व औषधी, यांचीं बीजें आणि जीवांचा कर्माशय यांचें या ठिकाणीं संरक्षण होत असतें ह्मणून या नगरीला अवंतीपुरी म्हणतात' अशी तिच्या त्या नांवाची उपपत्ति, किंवा तिला अवंती हें नांव प्राप्त होण्याचा हेतु दाखविला आहे ( अ. ४२ श्लो. ४१, ४२ ). शिवाय सृष्टीचा महाप्रलय झाला असतां पुन्हा कल्पारंभ होईपर्यंत या क्षेत्रांतील महालयेश्वर नामक शिवलिंगांत एकंदर चराचर सृष्टि बीजरूपानें रहात असते, असें अवंतिखंडांतील लिंगमाहात्म्यांतहि ( अ. २४ ) वर्णन आलें आहे. आणि सांख्य, योग व वेदान्त या सांख्यत्रयींत प्रधान संज्ञित मूळप्रकृतीच्या महत् किंवा महद्ब्रह्म नामक प्रथम शुद्ध सात्विक कार्यविशेषांत कल्पांतीं सर्व सृष्टपदार्थ बीजरूपानें



चोवीस खांबी दरवाजा.


राहतात, असा जो सिद्धांत प्रतिपादिला आहे त्याच्याशीं वरील पौराणिक वचनांचा मेळ घालून पाहिलें असतां पुराणकारांनीं अवंतीपुरीला त्या **महद्ब्रह्म** संज्ञित मूर्तामूर्त तत्त्वाचें मूर्तरूप किंवा त्याचें प्रतीक मानलें आहे असें दिसतें.

त्याच प्रमाणे या नगरीला 'क्षेत्र' ही संज्ञा प्राप्त होण्याची परंपरा अशी सांगतात कीं "**ममयोनिर्महद्ब्रह्म** तस्मिन्गर्भं दधाम्यहम्। संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत" या गीता (१४।३) वचनाप्रमाणें, **महद्ब्रह्म** हें भूतमात्रांचें **उत्पत्तिस्थान** म्हणजे **मातृस्थान** असून तें आपल्या स्वभावसिद्ध परम पावित्र्यामुळें जीवांच्या अखिल पातकांचा निःशेष निरास करीत असतें, म्हणून "क्षीयते पातकं यत्र तेनेदं क्षेत्रमुच्यते" या क्षेत्रलक्षणाप्रमाणें त्याला 'क्षेत्र' म्हणतात. आणि केवळ तच नव्हे, त्यापासून पुढें उत्पन्न होणारीं सर्व भौतिक मातृस्थानेंसुद्धा, वैदिक-व्यवहार-दृष्ट्या, तशींच पवित्र मानलीं जातात व 'क्षेत्र' म्हणवतात. "शयनादुत्थिता नारी शुचिस्यादशुचिः पुमान्" ही वृद्धशातातपाची उक्ति[1] त्यांच्या स्वभावसिद्ध पावित्र्याचीच निदर्शक असून आपला **गर्भाधान**-संस्कार हा 'क्षेत्रसंस्कार' ह्मणवतो, यावरून त्यांची 'क्षेत्र' ही संज्ञाहि पण सुप्रसिद्धच आहे. एवंच, मूळची **क्षेत्र** ही संज्ञा स्वभावतः परम पवित्र व सर्व पातकांचा क्षय करणाऱ्या **मातृस्थानाची** असून, आकारादि गुणधर्मांत तत्सदृश अशा **अवंत्यादि** ज्या ज्या पुण्यभूमीं आहेत त्या सर्वांना ती प्राप्त झाली आहे.

---

१. निर्णयसिंधु, परि० ३ पूर्वार्ध, गर्भाधान प्रकरण पहा.

पुराणकारांच्या मतें, बाजूस दिलेली मध्यबिंदुसहित चतुष्कोण आकृति हा **मातृस्थानाचा** आकार असून, अवंत्यादि सर्व क्षेत्रेंहि



त्याच आकाराचीं आहेत. बाजूच्या आकृतींतील चार कोण हीं क्षेत्राचीं चार **द्वारें** म्हणवतात, व तीं क्षेत्ररक्षक देवतांचीं–**द्वारपालांचीं**–स्थानें होत; आणि त्यांतला मध्यबिंदु हा क्षेत्राचा **नाभि** म्हणवतो, व तें **क्षेत्रनाथाचें** स्थान होय.

**अवंतिक्षेत्राच्या** मध्यबिंदुपासून एक एक योजन (४।४ कोस) अंतरावर तिचीं **पूर्व**, दक्षिण, **पश्चिम** व **उत्तर**, हीं चार द्वारें असून त्यांवर अनुक्रमें, **पिंगलेश्वर**, **कायावरोहणेश्वर**, **बिल्वेश्वर** व **दर्दुरेश्वर**, या चार द्वारपालांची स्थापना झाली आहे;[1] आणि त्याच्या नाभिस्थानीं **क्षेत्राधिपति श्रीमहाकालेश्वर** विराजमान आहेत.

**भरतखंडांतील** सर्व क्षेत्रांत **अवंतिका** ही 'जवा आगळी' आहे—म्हणजे तिचें माहात्म्य त्या सर्वांपेक्षां जवभर अधिक आहे—असें मानलें गेलें आहे; व तें सकारण आहे. आम्हां भारतीयांच्या धार्मिक भावनेप्रमाणें सबंध **भरतखंड** हें एक **महाक्षेत्र** असून, पूर्वेस **पुरी**, दक्षिणेस **रामेश्वर**, पश्चिमेस **द्वारका** व

१. कोणी म्हणतात हें क्षेत्र १०० मैलांचें असून त्याच्या पूर्वादि चार द्वारांवर अनुक्रमे **देवास**, **धार**, **बडनगर**, व **साजापूर**-जवळच्या एका गांवीं, विद्यमान असलेल्या चार देवींची स्थापना **विक्रमादित्यानें**, या क्षेत्राच्या रक्षणार्थ, केली आहे-परंतु ही दंतकथा निर्मूल दिसते. तिला कोणत्याहि लेखाचा आधार आढळला नाहीं.

उत्तरेस **बदरिकाश्रम,** हीं त्याचीं चार **द्वारें** होत. याच चार द्वारांना **चार धामहि** ह्मणतात. आणि "आज्ञाचक्रं स्मृता काशी या बाला श्रुतिमूर्धनी। स्वाधिष्ठानं स्मृता कांची मणिपूरमवंतिका" या वाराहवचना (९।१३) प्रमाणें, अवंतिका नगरी हें या महाक्षेत्राचें **मणिपूरचक्र,** अर्थात् त्याचा **नाभिदेश** होय. त्याच्या पूर्वादि चार द्वारांवरील अनुक्रमे **जगन्नाथ, रामेश्वर, द्वारकाधीश** व **केदारेश्वर** हे या क्षेत्राचे द्वारपाल मानले जातात; व "नाभिदेशे महाकालस्तन्नाम्ना तत्र वै हर:" या वराहपुराणांतील वचना (९।२४) प्रमाणें, त्याच्या नाभिदेशस्थ **महाकालवनांत,** अर्थात् **अवंतिक्षेत्रांत,** विद्यमान असलेलें त्याच नांवाचें, ह्मणजे **श्रीमहाकालेश्वर** या नांवाचें, शिवलिंग ही या **महाक्षेत्राची** अधिष्ठात्री देवता होय. यात्रेच्या सर्व साधारण नियमाप्रमाणें, या महाक्षेत्राच्या यात्रेचा—चार धाम यात्रेचा—आरंभ **अवंतिक्षेत्राधिपति श्रीमहाकालेश्वराच्या** दर्शनापासून होतो; आणि तेथून **रामेश्वर, द्वारका, बदरिकाश्रम, जगन्नाथपुरी** व पुन्हा **रामेश्वर,** याप्रमाणें क्षेत्रनाथ **श्रीमहाकालेश्वर** यांना सव्य प्रदक्षिणा करून व परत अवंतिक्षेत्रीं येऊन त्यांच (क्षेत्रनाथांचें) दर्शन घेतलें असतां तिची परिसमाप्ति होत असते. एवंच याप्रमाणें येथील एकंदर क्षेत्रमालिकेंत **अवंतिकेला** मेरुस्थान प्राप्त झालें आहे, ह्मणून ती 'जवा आगळी' अर्थात् सर्व श्रेष्ठ, मानली जात असते.

त्याच प्रमाणें येथे प्राचीन कालापासून "अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका। पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिका:" या श्लोकांत परिगणित केलेल्या अयोध्यादि सात पुरी मनुष्याला जनन-मरण-परंपरेंतून सोडविणाऱ्या आहेत, अशी प्रसिध्दि आहे. परंत या सात पुरींतहि **अवंतिकाच** श्रेष्ठ होय.

कारण " स्मशानमूखरं क्षेत्रं पीठं तु वनमेव च । पंचैकत्र न लभ्यंते महाकालवनादृते " (क्षेत्रमा. १।३२) याप्रमाणें—

(१) **स्मशान**—"यस्मादिष्टं हि भूतानां स्मशानमति वल्लभम्"- ह्मणजे, भूतमात्रांना इष्ट असलेला जो मोक्ष त्याचें द्वार ह्मणून शंकराला अतिप्रिय असणारें स्थान;

(२) **ऊखर**—"मृता पुनर्न जायंते तेनेदमूखरं स्मृतम्" ह्मणजे, ज्या स्थानीं मरण आलें असतां पुन्हा जन्म प्राप्त होत नाहीं तें स्थान;

(३) **क्षेत्र**—" क्षीयते पातकं यत्र तेनेदं क्षेत्र मुच्यते"—ह्मणजे जेथे सर्व पातकांचा क्षय होतो तें स्थान;

(४) **पीठ**—"यस्मात्स्थानं च मातृणां पीठं ते नैव कथ्यते"— ह्मणजे माता किंवा मातृकासंज्ञित देवीचें स्थान; आणि —

(५) **वन**—"महाकालवनं यच्च तथा चैवाविमुक्तकम्"— ह्मणजे, जीवाला मुक्ति देणारी जशी काशी तसेंच मुक्तिप्रद जें महाकालवन तें.

मिळून मोक्षप्राप्तीस साधनीभूत होणारीं हीं पांच प्रकारचीं स्थलें एकट्या **महाकालवनांत**—**अवंतीक्षेत्रांत**—मात्र एकवटलेला आहेत. तद्दितर कोठेहि तीं एकत्र नाहींत, व हाच या नगरीचा विशेष असल्यामुळें तिला वर सांगितलेल्या सात पुरींत सर्वश्रेष्ठ मानावें लागतें.

याखेरीज, " वागक्षरं प्रथमजा ऋतस्य वेदानां माताऽमृतस्य नाभिः । सा नो जुषाणोपयज्ञमागात् अवंती देवी सुहवा मे अस्तु"— ह्मणजे, स्वरूपतः अविनश्वर, यज्ञाची प्रथम उत्पादयित्री, वेदांची जननी व देवत्वाच्या प्राप्तीस कारणीभूत होणारी, अशी जी वाग्देवी

ती प्रसन्नतापूर्वक आमच्या यज्ञांत प्राप्त होवो; आणि ती देवी आह्मां सर्वांचें रक्षण करीत होत्साती माझ्या आव्हानास सुकर होवो[1]— असा वाग्देवीच्या स्तुतिपर एक मंत्र कृष्णयजुर्वेदान्तर्गत तैत्तिरीय ब्राह्मणांत ( कां. २ प्रपा. ८ अनु. ८ ) दिला असून त्यांत अविनश्वरत्व, रक्षणकर्तृत्व व देवत्वाच्या प्राप्तीचें कारणत्व, असे जे वाग्देवीचे तीन विशेष दाखविले आहेत; तेच तीन विशेष अवंतीपुरीच्या, वर दिलेल्या स्कंदपुराणोक्त लक्षणांत दाखविले गेले आहेत. यावरून, मनुष्यशरीररूपी क्षेत्राच्या नाभिस्थानीं विद्यमान असणाऱ्या वाग्देवीशीं भरतखंडरूपी क्षेत्राच्या नाभिदेशांत विद्यमान असणाऱ्या अवंतीपुरीचा पुराणकारांनीं अभेदान्वय केलेला दिसतो.

असो; तर एकंदरींत, भरतखंडांत क्षेत्र या संज्ञेसपात्र झालेल्या पुण्यनगरी यद्यपि अनेक आहेत, तथापि मूळच्या मातृस्थानरूपी क्षेत्राच्या प्रतीकरूप अशी ही अवंतीपुरी, जशी भूतमात्रांच्या कर्माशयाच्या संरक्षणपूर्वक संसाराच्या प्रवृत्तीस तशीच त्यांच्या सर्व पातकांच्या क्षयपूर्वक संसाराच्या निवृत्तीसहि कारणीभूत होत

१. येथं वाक्सैवाक्षरं अविनश्वरं परमात्मस्वरूपं ततउत्पन्नत्वात् । सा चर्तस्य यज्ञस्य प्रथमजा प्रथममुत्पादयित्री । मन्त्रैर्हि कर्म्माण्युत्पाद्यन्ते अतएवाथर्वणिका आमनान्ति । तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यन् इति । सा चग्वेदादीनां माता तेषां वाग्विशेषरूपत्वात् । अमृतस्य नाभिरमृतत्वं हि देवत्वम् । वाचि नह्यते बध्यते मन्त्रपूर्वकानुष्ठानेन तत् प्राप्तिः। सा वाग्देवी जुशाणो प्रीतियुक्ता सति नोऽस्मदीयं यज्ञमुपागात्प्राप्नोतु । सा च देव्यवन्तीस्मान् रक्षन्ती मे मम सुहवेनाह्वातुं शक्यास्तु—सायणभाष्य.

असते. आणि असें दोन्हींकडे सृष्टिचक्र फिरविण्याचें सामर्थ्य या क्षेत्रांत एकवटलें आहे, ह्मणून तें इतर सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ, त्या सर्वांचा मुकुटमणी, होय.

अवंतिखंडांतील क्षेत्रमाहात्म्यांत (अ. ४० ते ४७) या नगरीचीं एकंदर आठ नांवें सांगितलीं असून तिला तीं प्राप्त होण्याचे हेतुहि दिले आहेत. तें हें:—

(१) **कनकशृंगा.**—महाकालवनांत श्रीमहाकालेश्वराच्या निवासार्थ विश्वकर्म्यानें ही नगरी निर्माण केली असून तिच्यांतील भव्य प्रासादांच्या सुवर्ण शिखरांवरून तिला **कनकशृंगा** हें नांव दिलें गेलें आहे.

(२) **कुशस्थली.**—येथे ब्रह्मदेवानें पसरलेल्या कुश (दर्भ) मुष्टीवर बसून विष्णूनें देव-दानवादिकांना राहण्याचीं स्थलें नेमून दिलीं, ह्मणून ही नगरी **कुशस्थली** ह्मणवते.

(३) **अवंती.**—या नगरीला **अवंती** ह्मणण्याचें कारण प्रकरणारंभीं दिलेंच आहे.

(४) **उज्जयिनी.**—येथे शंकरांनीं त्रिपुरासुरादि दैत्य उज्जित केले, ह्मणजे त्यांच्यावर जय मिळविला, ह्मणून या नगरीला **उज्जयिनी** ह्मणतात.

(५) **पद्मावती.**—समुद्रमंथनानंतर विश्रांतिसाठीं विष्णूनें पद्मे (लक्ष्मी) सहित या नगरींत निवास केला तेव्हांपासून तिचें **पद्मावती** हें नांव पडलें.

(६) **कुमुद्वती.**—येथे नाना प्रकारच्या कमलांनींयुक्त अशीं अनेक सरोवरें असल्यामुळें तिला **कुमुद्वती** ह्मणतात.

(७) **अमरावती.**—येथे देव, कल्पवृक्ष व कामधेनु यांचा निवास असून येथील नागरिकांच्या स्त्रिया अमरांगनासारख्या सुस्वरूप असल्यामुळें ही नगरी **अमरावती** ह्मणवते.

(८) **विशाला.**—महाकालवनांत भूतगण, देव, दानव, ऋषि, मुनि, राहूं लागले तेव्हां त्याला या विशाल नगरीचें स्वरूप प्राप्त होऊन ही नगरी **विशाला** म्हणवूं लागली.

याखेरीज प्रत्येक कल्पांत याच जागीं विद्यमान असणारी किंवा प्रादुर्भूत होणारी ह्मणून **प्रतिकल्पा** असेंहि या नगरीचें एक नांव ग्रंथांतरीं आढळतें; आणि अशा प्रकारचीं तिचीं हीं अनेक सार्थ नांवें तिच्या माहात्म्यावर चांगलाच प्रकाश पाडतात.

या क्षेत्रांत जेवढी भूमि आहे तेवढी सर्व **शिवलिंगमय** असून येथें जितकीं जलाशयें आहेत तितकीं सर्व **तीर्थें** आहेत, आणि त्यांपैकीं मुख्य मुख्य **देवतांची** व **तीर्थांची** यात्रा करण्यासदेखील तीनशें पासष्ट दिवस लागतात, असें या क्षेत्राचें अवंतिखंडांत वर्णन आहे. त्या मुख्य मुख्य **देवता, तीर्थें** व **यात्रा** ह्यांः[1]—

---

१. यांपैकीं कित्येक देवस्थानें व तीर्थें कालगतीमुळें सांप्रत लुप्त झालीं असून त्यांचीं नुसतीं नांवें तेवढीं शिल्लक राहिलीं आहेत. त्यांतलीं काहीं देवस्थानें व तीर्थें अमुक अमुक जागीं होतीं असें सांगण्यांत येत असतें; व तेथे जाऊन पाहिलें असतां कोठे कोठे त्यांच्या पूर्वकालीन अस्तित्वाचीं कांहीं चिन्हेंहि दिसतात, पण अनेक ठिकाणीं तीदेखील दिसत नाहीत. आणि कित्येकांचीं स्थलें तर कोणाला माहीतही पण नाहींत. यामुळें तीं अर्थातच या पुस्तकांत दाखवितां झालीं नाहींत.

१. देवता—(१) क्षेत्रनाथ, (२) ईश्वर, (३) गुह्यलिंगें, (४) रुद्र, (५) देवी, (६) माता, (७) भैरव, (८) आदित्य, (९) विष्णु, (१०) विनायक, (११) मारुति, (१२) नवग्रह.

२. तीर्थें—(१) नद्या, व त्यांवरील तीर्थ स्थलें, (२) सागर, (३) इतर तीर्थें.


३. यात्रा—(१) नित्ययात्रा, (२) महाकालयात्रा, (३) चतुर्दशयात्रा, (४) पंचेशानीयात्रा, (५) अष्टाविंशतितीर्थयात्रा, (६) सप्तसागरयात्रा, (७) विष्णुयात्रा, (८) नगरप्रदक्षिणा, (९) नरदीपयात्रा.

## १. देवता.

१. **क्षेत्रनाथ-श्रीमहाकालेश्वर**, हे या क्षेत्राच्या नाभिस्थानीं विराजमान आहेत, असें पूर्वी सांगितलेंच आहे.

२. **ईश्वर**—येथे अनादिसिद्ध अशीं चौऱ्यायशीं शिवलिंगें आहेत त्यांना सामान्यतः **ईश्वर** ह्मणतात. शिवाय, निरनिराळ्या दृष्टीनें, त्यांना **सिद्धलिंगें, योगलिंगें**, या संज्ञाहि दिल्या गेल्या आहेत; व कोठें कोठें त्यांचा **ज्योतिर्लिंगें** या नांवानेंहि उल्लेख आढळतो. गत चौऱ्यायशीं कल्पांत हीं चौऱ्यायशीं लिंगें निरनिराळ्या विशेष कार्यपरत्वें निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्धीस आलेलीं आहेत, असें अवंतिखडांतर्गत क्षेत्रमाहात्म्यावरून दिसतें[1]. त्यांतील लिंगमाहात्म्यांत अध्याय १ ते ८४ पर्यंत प्रत्येक

1. अ. ४८ श्लो. ४६-४७.



श्रीमहाकालेश्वराचें मंदिर.
( पूर्वेकडील भाग ).

अध्यायांत या चौऱ्यायशीं लिंगांपैकीं एक एक शिवलिंगाचें वर्णन केलें आहे; व येथेहि त्याच क्रमानें हीं शिवलिंगें पुढें दिलीं आहेत. त्यांच्या यात्रेचाहि पण हाच क्रम आहे, असें ह्मणतात. परंतु लिंग-माहात्म्यांत या सर्व शिवलिंगांचीं स्थानें मात्र सांगितलेलीं नाहींत. यास्तव ज्या ज्या शिवलिंगांचीं स्थानें त्यांत आढळलीं तीं त्या त्या लिंगाच्या नांवापुढें अगोदर देऊन पुढें कंसांत त्या त्या लिंगाचीं हल्लीं लोकप्रसिद्ध असलेलीं ठिकाणें दाखविलीं आहेत. त्याखेरीज, प्रत्येक शिवलिंग विशेष नांवानें प्रसिद्धीस येण्याच्या कारणाचाहि त्याच्या नांवापुढें थोडक्यांत उल्लेख केला आहे. तो असा:—

(१) **अगस्त्येश्वर**—पिशाचमोचनाच्या दक्षिणेस व वट-यक्षिणीच्या उत्तरेस ( जोगीपुऱ्यांत, हरसिद्धिदेवीच्या मंदिराच्या पश्चिमेस )—पूर्वी अगस्तिऋषींनीं इंद्रादि देवांच्या प्रार्थनेवरून हजारों ब्रह्मकुलोद्भव दानवांना आपल्या तपोबलानें जाळून भस्म केल्यामुळें त्यांना जें ब्रह्महत्येचें पातक लागलें, त्यांतून ते या शिवलिंगाच्या सेवनानें मुक्त झाले. तेव्हांपासून शंकराच्या आज्ञेनें या शिवलिंगाला हें नांव दिलें गेलें आहे.

(२) **गुहेश्वर**—पिशाचेश्वराच्या उत्तरेस एका प्राचीन गुहेंत (पिशाचेश्वराच्या दक्षिणेस क्षिप्रेच्या घाटाच्या एका बुरुजांत)—मंकणक नांवाच्या मुनीच्या तपाची वृद्धि हें या लिंगाच्या प्रसिद्धीचें कारण असून, गुहेंत त्याचा निवास असल्यामुळें त्याला गुहेश्वर ह्मणतात.

(३) **ढुंढेश्वर**—पिशाचेश्वराजवळ (रामशिडीखालीं)—या लिंगाच्या आराधनानें ढुंढनामक शिवगणाची इंद्राच्या शापापासून मुक्तता झाल्यामुळें त्याची या नांवानें प्रसिद्धि झाली.

(४) **डमरुकेश्वर**—(राम शिडीच्या वर )—शंकराच्या डमरूच्या नादानें हें शिवलिंग उत्थित झालें असल्यामुळें तें या नांवाने प्रसिद्धीस आलें आहे.

(५) **अनादिकल्पेश्वर**—महाकालेश्वराच्या दक्षिण भागीं ( वृद्धकालेश्वराच्या पश्चिमेस )—ब्रह्मा, विष्णु व महेश, यांपैकीं कोणालाहि या शिवलिंगाचा आदिअंत कळला नाहीं, ह्मणून त्याला अनादिकल्पेश्वर ह्मणतात.

(६) **स्वर्णज्वालेश्वर**—कर्कोटेश्वराच्या दक्षिणेस (रामशिडीच्या वर अनुक्रमांक ३ व ४ च्या मध्यभागीं)—ह्याच्या आराधनानें अग्निपुत्र सुवर्ण, ज्वालावृत्ततनु झाला, ह्मणजे विशेष कान्तियुक्त झाला, ह्मणून या लिंगाला हें नांव प्राप्त झालें आहे.

( ७ ) **त्रिविष्टपेश्वर**—कर्कोटेश्वराच्या पूर्वेस व महामायेच्या दक्षिणेस ( महाकालेश्वराच्या मंदिरांत एकादश रुद्र व द्वादश ज्योतिर्लिंगें यांच्या दक्षिणेस)—पूर्वीं वाराहकल्पांत त्रिविष्टप, ह्मणजे त्रैलोक्याधिपति सर्व देव, महाकालवनांत एकत्र झाले होते तेव्हां त्या सर्वांनीं मिळून या शिवलिंगाची स्थापना केली, ह्मणून तें त्रिविष्टपेश्वर ह्मणवतें.

( ८ ) **कपालेश्वर**—( ब्रह्मपुरींत, सोमेश्वर व इंद्रेश्वर यांच्या मध्यें )—पूर्वीं त्रेतायुगाच्या आरंभीं वैवस्वत कल्पांत येथे ब्राह्मणाचा यज्ञ चालला असतां, कापालिकाच्या वेषांत शंकरानीं येऊन यज्ञमंडपाबाहेर कपाल आपटलें, त्याच्या तुकड्यांखालीं हें शिवलिंग प्रगट झालें आहे. ह्मणून तें **कपालेश्वर** ह्मणवतें.

(९) **स्वर्गद्वारेश्वर**—( नलियाबाखळींत बेगमपुऱ्याच्या रस्त्यावर नाल्याच्या कांठीं विहिरीजवळ )—दक्षयज्ञाचा विध्वंस केल्यानंतर स्वर्गाच्या द्वारावर आपले गण बसवून शंकरांनीं यज्ञांत भाग घेणाऱ्या इंद्रादि देवतांचा स्वर्गांत जाण्याचा मार्ग रुद्ध केला. तेव्हां या शिवलिंगाच्या आराधनेनें त्यांना (इंद्रादि देवांना) स्वर्गाचें द्वार मोकळें झालें, ह्मणून त्याला **स्वर्गद्वारेश्वर** ह्मणतात.

(१०) **कर्कोटेश्वर**—( हरसिद्धीच्या मंदिराजवळ उत्तरेकडे )—याला **कर्कोटकेश्वर**हि ह्मणतात. या शिवलिंगाच्या आराधनेनें कर्कोटक नागाची मातृशापापासून मुक्ति झाली. तेव्हांपासून त्याला हें नांव प्राप्त झालें आहे.

(११) **सिद्धेश्वर**—( सिद्धवटाच्या पश्चिमेस, रामचंद्रजी शेटांच्या धर्मशाळेजवळ )—सनकादिकांना या लिंगाच्या आराधनेनें परमसिद्धीचा लाभ झाला, म्हणून त्याला **सिद्धेश्वर** म्हणतात (याच नांवाचा दुसरा **म**हादेव अनुक्रमांक ५९ वर आहे).

(१२) **लोकपालेश्वर**—( हरसिद्धि दरवाजाजवळ यागेश्वराच्या दक्षिणेस )—इंद्रादि लोकपालांचें दैत्यांपासून रक्षण करणारा म्हणून **लो**कपालेश्वर.

(१३) **कामेश्वर**–(गंधवती तीर्थावर)–याला **मनकामनेश्वर**हि म्हणतात. **काम**देवाला या लिंगाच्या आराधनेनें रुक्मिणीगर्भाच्या द्वारा पुन्हा शरीराची प्राप्ति झाली, म्हणून त्याला **का**मेश्वर म्हणतात.

(१४) **कुटुम्बेश्वर**—कामेश्वराच्या पूर्वेस (सिंहपुरींत)—हें शिवलिंग कुटुम्बाची, गोत्राची, वृद्धि करणारें आहे, म्हणून त्याला कुटुम्बेश्वर म्हणतात.

(१५) **इंद्रद्युम्नेश्वर**—कलकलेश्वराजवळ ( मोदीजीच्या वाड्याजवळ बोर्सीमातेच्या गल्लींत)—इंद्रद्युम्न नांवाच्या राजाला या देवाच्या आराधनेनें पुन्हा स्वर्गाची प्राप्ति झाली. म्हणून त्याला हें नांव दिलें गेलें आहे.

(१६) **ईशानेश्वर**—इंद्रद्युम्नेश्वराच्या मागें ( मोदीजीच्या विहिरीजवळ आग्नेयीस )—हें शिवलिंग उत्तमांगपदाचा लाभ करून देणारें म्हणून पूर्वीं ईशानकल्पांत ईशानेश्वर या नांवानें प्रसिद्धीस आलें. त्याच्या आराधनानें सर्व अभीष्टाची प्राप्ति होते.

(१७) **अप्सरेश्वर**—(मोदीजीच्या गल्लींत कलकलेश्वराच्या उत्तरेस )—इंद्राच्या शापानें मृत्युलोकीं पतन पावलेली रंभा नांवाची अप्सरा या लिंगाच्या आराधनेनें पुन्हा स्वर्गलोकीं गेली तेव्हांपासून हें शिवलिंग या नांवानें प्रसिद्ध झालें.

(१८) **कलकलेश्वर**—(मोदीजीच्या गल्लींत विहिरीजवळ उत्तरेकडे )—एका कालीं शिव व पार्वति यांचें भांडण जुंपून जो कलकलाट (कोलाहल) झाला त्यामुळें सर्व देव भयभीत झाले व पृथ्वी कांपूं लागली. त्या वेळीं या देवानें प्रादुर्भूत होऊन सर्वांना आश्वासित केलें. म्हणून त्याला हें नांव प्राप्त झालें आहे.

(१९) **नागचण्डेश्वर**—ईशानेश्वराच्या ईशान्येस (पटणी बाजारांत )—हा देव श्रीशंकराचा गणनायक असून त्याला हें नांव स्वतः शंकरांनीं दिलेलें आहे. शिव-निर्माल्याच्या उल्लंघनाचा महादोष या देवाच्या दर्शनानें जातो.

(२०) **प्रतिहारेश्वर**—( नागचण्डेश्वराजळ)—शिव-पार्वति एका कालीं एकांतांत असतां द्वारावर नंदिकेश्वराला प्रतिहार (द्वारपाळ) म्हणून बसविलें होतें; परंतु त्याच्या गफलतीमुळें

अग्नि आंत शिरला, म्हणून शंकरांनीं त्याला कैलासांतून हकलून दिलें. तेव्हां या देवाच्या आराधनानें नंदिकेश्वराला पुन्हा पूर्वाधिकाराची प्राप्ति झाली, म्हणून या देवाला हें नांव दिलें गेलें आहे.

(२१) **कुक्कुटेश्वर**—ज्वालेश्वराच्या पूर्वेस (गंधवती तीर्थावर)—कौशिक नांवाचा राजा ताम्रचूडाच्या शापानें रात्रीं कुक्कुट (कोंबडा) होत असे. तो या शिवलिंगाच्या दर्शनानें शापमुक्त झाला. तेव्हांपासून या देवाला हें नांव दिलें गेलें.

(२२) **कर्कटेश्वर**—(दाणी दरवाजाजवळ रामगलीसमोर)—पूर्वीं बृहत्कल्पांत कर्कट (खेंकडा) योनीस प्राप्त झालेल्या एका दुरात्म्याची त्या तिर्यग् योनीपासून या देवाच्या दर्शनानें सुटका झाली, म्हणून त्याला कर्कटेश्वर म्हणतात.

(२३) **मेघनादेश्वर**—प्रतिहारेश्वराच्या ईशान्येस ( सराफ्यांत नृसिंहमंदिराजवळ, कल्याणरायच्या गल्लींत)—द्वापर व कली यांच्या संधींत एकदां द्वादशवार्षिकी अनावृष्टि झाली असतां, इंद्रादि देवांच्या प्रार्थनेवरून या लिंगांतून मेघाच्या पंक्ति उत्पन्न होऊन त्यांच्या संघर्षणानें जो नाद झाला त्यावरून हा देव या नांवानें प्रसिध्दीस आला.

(२४) **महालयेश्वर**—(खत्रीवाड्यांत अंताजी दामोदराच्या गल्लींत)—महाप्रलय झाला असतां सर्व स्टष्टि बीजरूपानें या शिवलिंगांत राहते, म्हणून त्याला **महालयेश्वर** म्हणतात.

(२५) **मुक्तीश्वर**—(खत्रीवाड्यांत श्रीमाळयांच्या गल्लींत)—पूर्वीं राथंतर कल्पांत मुक्तिनामा ब्राम्हण या शिवलिंगाच्या दर्शनानें मुक्त झाला, म्हणून त्याला **मुक्तीश्वर** म्हणतात.

(२६) **सोमेश्वर**—मुक्तीश्वराच्या उत्तरभागीं (ब्रम्हपोळांत कपालेश्वराच्या दक्षिणेस)—वाराहकल्पांत दक्षशापानें अंतर्हित झालेली अग्निपुत्र सोम याची कान्ति, दीप्ति, वगैरे, त्याला या देवाच्या प्रसादानें पुन्हा प्राप्त झाली, म्हणून त्याला **सोमेश्वर** म्हणतात.

(२७) **अनरकेश्वर**—( मकोड्या आंब्याजवळ, गयाकोष्टा-लगत, अनरकतीर्थावर )—या शिवलिंगाचें आराधन मनुष्याची नरकयात्रा चुकविणारें आहे म्हणून त्याला **अनरकेश्वर** ह्मणतात.

(२८) **जटेश्वर**—अनरकेश्वराच्या उत्तरेस (गयाकोष्ठावर)—पूर्वीं राथंतरकल्पांत वीरधन्वा राजाचीं गोब्राह्मणवधादि जटीभूत पापें या शिवलिंगाच्या दर्शनानें नष्ट झालीं ह्मणून त्याला **जटेश्वर** ह्मणतात.

(२९) **रामेश्वर**—(सतीदरवाजाजवळच्या गल्लींत)—पूर्वीं त्रेतायुगांत जमदग्निपुत्र परशुराम याची मातृहत्या व क्षत्रियहत्या या शिवलिंगाच्या आराधनानें नष्ट झाल्यावर शंकराज्ञेनें हें शिवलिंग त्याच्या नांवानें प्रसिद्ध झालें.

(३०) **च्यवनेश्वर**—रामेश्वराच्या ईशान्येस ( अंकपाद दरवाजाजवळ पुरुषोत्तम सागरावर)—भृगुऋषीचा पुत्र च्यवन यानें भोगार्थ सोमाचा उपयोग केल्यामुळें इंद्राला क्षोभ आला तेव्हां त्याच्या वज्रघातापासून च्यवनाला या शिवलिंगानें वांचविलें, ह्मणून त्याला **च्यवनेश्वर** ह्मणतात.

(३१) **खण्डेश्वर**—(खिलचीपूर नांवाच्या गांवास लागून असलेलें मंदिर)—व्रत-दान-तपांत खंड पडल्यानें प्रसक्त होणाऱ्या

दोषांच्या निवृत्तिपूर्वक खंड व्रतादिकांची पूर्णता या देवाच्या आराधनानें होते म्हणून त्याला **खंडेश्वर** म्हणतात.

(३२) **पत्तनेश्वर**—(खिलचीपूर येथील आगर-सडकेच्या पुलाजवळ)—पूर्वी या शिवालिंगाच्या आसपास पत्तन म्हणजे नगर वसलें होतें व त्या पत्तनाचा अधिपति म्हणून त्याला **पत्तनेश्वर** म्हणतात.

(३३) **आनन्देश्वर**—(आलपुऱ्यांत आपारावाच्या गणपती-जवळ वडाखालीं)—राथंतरकल्पांत आनन्द नांवाच्या राजपुत्राला या देवाच्या आराधनानें अत्यंत दुर्लभ अशी सिद्धि प्राप्त झाली, तेव्हांपासून त्याची त्या राजपुत्राच्या नांवानें प्रसिद्धि झाली.

(३४) **कंथडेश्वर**—(भैरवगढास जहाजवाल्याच्या धर्मशाळे-समोर)—पूर्वी एका ब्राम्हणाच्या कंथेत शंकर प्रसादानें उत्पन्न झालेल्या पुत्राला आपण अल्पायुषी आहोंत असें समजल्यावर त्यानें या शिवलिंगाचें आराधन केलें, त्या योगानें तो पापकंथाविनिर्मुक्त होऊन चिरजीवी झाला, तेव्हांपासून हें लिंग या नांवानें प्रसिद्ध झालें.

(३५) **इंद्रेश्वर**—खण्डेश्वराच्या दक्षिणेस (ब्रम्हपोळ व आलपुरा यांच्या मध्यें कपालेश्वराच्या उत्तरेस लिंबाखालीं)—या शिवलिंगाच्या आराधनानें इंद्र हा वृत्रासुराला मारण्यास समर्थ झाला, म्हणून त्याला इंद्रेश्वर म्हणतात.

(३६) **मार्कंडेयेश्वर**—पत्तनेश्वराच्या पूर्वेस (अंकपाद येथे विष्णुसागरावर)—मृकंडऋषीला या शिवालिंगाच्या आराधनानें मार्कंडेय नांवाच्या अयोनिसंभव मुलाची प्राप्ति झाली, म्हणून या शिवलिंगाला **मार्कंडेयेश्वर** म्हणतात.

(३७) **शिवेश्वर**—मार्कंडेयेश्वराच्या उत्तरेस ( अंकपाद येथे राममंदिराखालीं बुरुजांत)—हा देव शंकराचा शिव नांवाचा गण असल्यामुळें त्याला **शिवेश्वर** म्हणतात.

(३८) **कुसुमेश्वर**—शिवेश्वराच्या उत्तरेस (अंकपाद येथे जनार्दन मंदिराखालीं बुरुजांत)—हा देव वीरक नांवाचा शंकराचा गण असून त्याला पुत्र म्हणून पार्वतीस अर्पण करतांना शंकरांनीं अनेक प्रकारच्या कुसुममालांनीं विभूषित केलें होतें, तेव्हांपासून त्याचें हें नांव प्रचारांत आलें.

(३९) **अक्रूरेश्वर**—(अंकपाद येथील मंदिरांच्या कोटाच्या दरवाजासमोर पश्चिमेकडे)—पूर्वी भृंगिरिटी नांवाचा शिवगण फार क्रूर असे. त्यानें पार्वतीच्या आज्ञेप्रमाणें महाकालवनांत राहून आपला क्रूरपणा साफ घालविला. तेव्हां शंकर-पार्वतीनीं त्याला लिंगत्व देऊन त्याची अक्रूरेश्वर या नांवानें येथे स्थापना केली.

(४०) **कुंडेश्वर**—( गोमतीकुंडावर व्यासाश्रमाजवळ )—कुंड नांवाचा शिवगण या लिंगाच्या आराधनानें पार्वतीच्या शापापासून मुक्त झाला, म्हणून त्याला **कुंडेश्वर** म्हणतात.

(४१) **लुम्पेश्वर**—क्षिप्रातटीं केशवार्क तीर्थाच्या पूर्वेस (भैरवगढ किल्ल्याच्या आग्नेयीस शेतांत पिंपळाखालीं)—पूर्वी लुम्पाधिप म्हणून प्रसिद्ध असलेला राजा या देवाच्या आराधनानें ब्रम्हशापापासून मुक्त होऊन त्याचे ब्रम्हहत्यादि दोष नष्ट झाले. म्हणून हें शिवलिंग **लुम्पेश्वर** म्हणवतें.

(४२) **गंगेश्वर**—क्षिप्रेच्या दक्षिणेस ( खगर्ता संगमावर )—या शिवालिंगाच्या आराधनानें गंगानदी समुद्रशापापासून मुक्त झाली, म्हणून त्याला **गंगेश्वर** म्हणतात.

(४३) **अंगारेश्वर**—गंगेश्वराच्या पूर्वेस (खगर्ता व क्षिप्रा यांच्या संगमाजवळ)—हा देव वक्रांग, लोहितवर्ण, रौद्र व अंगार-सदृश असल्यामुळें त्याला अंगारेश्वर म्हणतात. भूतमात्रांचें मंगल करणारा म्हणून तो **मंगलेश्वर**हि म्हणवतो. तो भूमिपुत्र असून शंकराच्या गात्रांपासून उत्पन्न झालेला मूर्तिमंत रजोगुण होय.

---

1. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकरकृत 'ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र' या पुस्तकांत पृ. १०५-६ वर, उज्जन येथील वरिमंगळ नांवाच्या एका ज्योतिष्यानें ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणीं देह समर्पिला व महाराजांनीं त्याला समाधि देऊन त्यावर शिवलिंगाची स्थापना केली, अशी आख्यायिका दिल्यानंतर 'तें स्थान मंगळेश्वर नांवानें प्रसिद्ध असून अद्याप उज्जयिनीच्या बाहेर संदीपनाच्या आश्रमाजवळ आहे' अशी चारित्रकार त्या समाधिविषयीं माहिती देत आहेत. यावरून या मंगळेश्वराच्या स्थानाला ते वीरमंगळाची समाधि म्हणत आहेत, असें दिसतें. कारण 'उज्जयिनीच्या बाहेर' व 'संदीपना (सांदीपनी) च्या आश्रमाजवळ' या मंगळेश्वराखेरीज दुसरा कोणताहि 'मंगळेश्वर नांवानें प्रसिद्ध' असलेला देव ऐकण्यांत येत नाहीं. तेव्हां ते वीरमंगळाची समाधि म्हणून याच स्थानाकडे बोट दाखवीत असले पाहिजेत. परंतु तसें असेल तर येथे रा. पांगारकरांची दिशाभूल झाली आहे, असें म्हणावें लागतें. कारण वीरमंगळाच्या समाधीची आख्यायिका उज्जनीस पुष्कळ लोकांच्या तोंडीं असून त्यांतले बहुतेक सर्व लोक, कार्तिक चौकांतील मारुतीच्या मंदिरावरून सिंहपुरीकडे जातांना रस्त्याच्या डाव्या बाजूस, कुटुम्बेश्वराच्या मंदिरासमोर ओट्यावर एका घुमटींत मंगळेश्वर नांवाचा एक महादेव आहे, तो वीरमंगळाची समाधि दाखवितात. दुसरे कांहीं लोक महाकालेश्वराच्या

(४४) **उत्तरेश्वर**—गंगेश्वराच्या दक्षिणेस ( अंगारेश्वराच्या दक्षिणेस, छत्रीजवळ, कंवठाच्या झाडाखालीं)—उत्तरदेशाधिकारी उत्तरनांवाच्या मेघानें आपल्यास यथाकालीं पर्जन्यवृष्टि करण्यांत सूर्य, शनि, वगैरे ग्रहांकडून अडथळा होऊं नये, म्हणून या देवाची आराधना केली होती, तेव्हांपासून त्याची उत्तरेश्वर ही संज्ञा प्रचारांत आली आहे.

(४५) **त्रिलोचनेश्वर**—(नामदारपुऱ्यांत लालचिंचेखालीं)—हें साक्षात् शंकराचें स्वरूप होय. हें शिवलिंग येथे विरजसांज्ञित पीठावर स्थित असून त्याच्या दर्शनमात्रें करून सर्व सिद्धि प्राप्त होतात.

(४६) **वीरेश्वर**—( दाणीदरवाजाजवळ, आष्टेवाल्यांच्या वाड्यासमोर वडाखालीं)—या शिवालिंगाच्या प्रसादानें वीर ना-

---

आवारांत उत्तर दरवाजांतून शिरतांना उजव्या हाताकडे ओट्यावर दोन वारकेसे महादेव आहेत, त्यांतल्या एकाचें नांव मंगळेश्वर असून त्या स्थलाला वीरमंगळाची समाधि म्हणतात. परंतु उज्जन शहराबाहेर सांदीपनीच्या आश्रमाजवळच्या मंगलतीर्थावरील सुप्रसिद्ध मंगलेश्वराला वीरमंगलाची समाधि तेथे कोणीहि म्हणत नाहींत. शिवाय स्कंदपुराणांतील अवंतिखंडांतर्गत लिंगमाहात्म्याच्या ४३व्या अध्यायांत या मंगलेश्वराचें सविस्तर वर्णन केलें असून ई० स० चें दहावें शतक हा स्कंदपुराणाचा काल दाखविण्यांत येत असतो; व तो खरा असल्यास हें मंगळेश्वराचें स्थान ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माच्या निदान दोन-तीनशें वर्षें तरी पूर्वीचें ठरतें हें निराळें सांगावयास नकोच. तेव्हां या स्थानाला ज्ञानेश्वरनिर्मित वीरमंगळाची समाधि कसें म्हणतां येतें ?

मक राजपुत्राला अखंडराज्यप्राप्ति झाल्यावरून त्याला त्या राजपुत्राचें नांव दिलें गेलें आहे.

(४७) **नूपुरेश्वर**—प्राचीनसरस्वतिनामक वाप्याकार तीर्थाच्या दक्षिणेस ( डाबरींत जहाजवाल्याच्या पिछाडीस )—नूपुरनामा शिवगण या देवाच्या आराधनानें कुबेरशापापासून मुक्त होऊन त्याला कामिकी सिद्धि प्राप्त झाली, तेव्हांपासून या देवाचें हें नांव प्रचारांत आलें.

(४८) **अभयेश्वर**—नूपुरेश्वराच्या दक्षिणेस ( दाणीदरवाजाच्या सडकेजवळ, गणपतिमंदिराच्या पश्चिमेस )—प्रथम कल्पाच्या शेवटीं ब्रह्मा व विष्णु या दोघांना अभय देणारें हें शिवलिंग त्यांच्या प्रार्थनेनुसार प्राणिमात्रांना अभय देत असतें, म्हणून त्याला अभयेश्वर ह्मणतात.

(४९) **पृथुकेश्वर**—अभयेश्वराच्या पश्चिमेस (केदारेश्वराजवळ, मंदिराच्या दारांत)—या लिंगाच्या आराधनानें पृथुराजाचीं स्त्रीवध, गोवध व ब्रह्मवध जनित पातकें नष्ट झाल्यापासून तें त्या राजाच्या नांवानें प्रसिद्ध झालें.

(५०) **स्थावरेश्वर**—पृथुकेश्वराच्या पश्चिमेस सतीदरवाजाजवळ सखरवाडीसमोर )—सूर्याला संज्ञानामक स्त्रीपासून झालेल्या पुत्रानें इंद्रादि देवांना त्रस्त केल्यामुळें, शंकरानीं त्याची गति स्थिर, मंद, केली, तेव्हा पासून त्याला स्थावर, शनैश्चर, हीं नांवें प्राप्त होऊन, शंकराज्ञेनें तो या लिंगांत स्थित झाला. ह्मणून तें **स्थावरेश्वर** ह्मणवतें.

(५१) **शूलेश्वर**—पृथुकेश्वराच्या पूर्वेस ( दाणीदरवाजाजवळ पुरबिया बाखळींत )—याला **हाटकेश्वर**हि ह्मणतात. आद्य-

कल्पारंभीं शंकरानीं अंधक दैत्याचा शूलानें निःपात केल्यावर दुष्ट संगानें कलुषित झालेलें शूलाचें मन या लिंगाच्या दर्शनानें शुद्ध झालें. ह्मणून तें शूलेश्वर ह्मणवतें.

(५२) **ओंकारेश्वर**—शूलेश्वराच्या पूर्वेस ( ढाबा, तेलीवाडा व खटीकवाडी, यांच्यामध्यें, रस्त्यावर )—प्राकृतकल्पाच्या आरंभीं शंकरांनीं उत्पन्न केलेल्या ओंकार नामक दिव्य पुरुषानें स्वशरीरापासून सर्व सृष्टि उत्पन्न केल्यावर तो या शिवलिंगांत लय पावला ह्मणून त्याला ओंकारेश्वर ह्मणतात.

(५३) **विश्वेश्वर**—शूलेश्वराच्या उत्तरेस (खटिकवाडींत)—पूर्वी विश्वेश नांवाच्या विदर्भाधिपतीने, आपल्या पूर्वजन्मीच्या सर्व पातकांचें निरसन करणाऱ्या, या शिवलिंगाची आराधना करून त्याच्या सन्निध देह ठेविला, तेव्हांपासून तें विश्वेश्वर या नांवानें प्रसिद्ध झालें.

(५४) **कंटेश्वर**—पृथुकेश्वराच्या दक्षिणेस (गडावर जाटाच्या विहिरीजवळ)—आद्यकल्पांत देवांना कंटकभूत झालेल्या अंधक संज्ञित राक्षसाचा या लिंगांतून निघालेल्या अग्नीनें नाश झाला. ह्मणून याला कंटेश्वर ह्मणतात.

(५५) **सिंहेश्वर**—कंटेश्वराजवळ ( गडावर स्थविर विनायकाजवळ, उत्तरेकडे ऊखरेश्वराच्या रस्त्यावर )—अंधकासुराच्या युद्धांत शंकराच्या सिंहनादापासून हें शिवलिंग उत्पन्न झालें ह्मणून त्याला सिंहेश्वर ह्मणतात.

(५६) **रेवंतेश्वर**—कंटेश्वराच्या पूर्वेस ( कार्तिकचौकांत घंटेश्वराच्या पूर्वेस )—पूर्वी इंद्रादि देवांच्या प्रार्थनेवरून सूर्यपुत्र

रेवंत याची स्थापना शंकरांनीं या लिंगाजवळ केली, ह्मणून त्याला रेवंतेश्वर ह्मणतात.

(५७) **घंटेश्वर**—रेवंतेश्वराच्या पूर्वेस ( कार्तिकचौकांत रेवंतेश्वराच्या पश्चिमेस)—घंट नांवाचा शिवगण या शिवलिंगाच्या आराधनानें शंकराच्या शापापासून मुक्त झाला, ह्मणून त्याला **घंटेश्वर** ह्मणतात.

(५८) **प्रयागेश्वर**—दुर्धरेश्वराच्या दक्षिणेस क्षिप्रातीरावर (मकर प्रयाग तीर्थावर)—पूर्वी प्रथमकल्पांत नारदाचें नष्ट झालेलें वेदशास्त्र-ज्ञान त्यांना या शिवलिंगाकडून, प्रयागाच्या प्रार्थनेनें प्राप्त झालें. ह्मणून त्याला **प्रयागेश्वर** ही संज्ञा दिली गेली आहे ( या नांवाचा दुसरा महादेव अनुक्रमांक ७१ वर आहे) .

(५९) **सिद्धेश्वर**—सौभाग्येश्वराच्या पूर्वेस ( खत्रीवाड्यांत पिंपळाखालीं )—राजा अश्वशिरा याला या शिवलिंगाच्या आराधनानें मोक्षसिद्धि प्राप्त होऊन तो या लिंगांत लय पावला. ह्मणून त्याला **सिद्धेश्वर** ह्मणतात. ( या नांवाचा पहिला महादेव अनुक्रमांक ११ वर दिला आहे. )

(६०) **मातंगेश्वर**—(सिद्धेश्वरा [५९] च्या पूर्वेस, पिंजारवाडींत)—ब्राम्हण स्त्रीच्या ठिकाणीं नापित वीर्यानें उत्पन्न झालेला मतंग नांवाचा चांडाल या शिवलिंगाच्या आराधनानें ब्राम्हणत्वास प्राप्त झाला, तेव्हांपासून हा देव **मातंगेश्वर** म्हणवतो.

(६१) **सौभाग्येश्वर**—मातंगेश्वराजवळ ( खत्रीवाड्यांत, काशीबा जामदाराच्या वाड्यांत )—प्रथम प्राकृतकल्पांत अश्ववाहन राजाची दुर्भगा स्त्री मदनमंजरी या शिवलिंगाच्या

आराधनानें सर्वसौभाग्यसंपन्न व पुत्रवती झाली. तेव्हांपासून या देवाला लोक **सौभाग्येश्वर** म्हणूं लागले.

(६२) **रूपेश्वर**—पशुपतेश्वराच्या पूर्वेस ( सिंहपुरींत जनार्दनजीच्या गल्लींत )—पूर्वी पाद्मकल्पांत पद्म नांवाचा राजा व त्याची स्त्री कण्वऋषीच्या शापानें कुरूप झालीं होतीं. तीं दोघे या शिवलिंगाच्या आराधनानें शापमुक्त होऊन त्यांना पुन्हां पूर्वीच्या उत्तम रूपाची प्राप्ति झाली. म्हणून त्याला रूपेश्वर म्हणतात.

(६३) **धनुःसाहस्रेश्वर**—रूपेश्वराच्या दक्षिणेस ( वृंदावनपुऱ्यांत पश्चिमेकडे, तिळभांडेश्वराच्या वाटेवर )—या शिवलिंगाच्या आराधनानें विदूरथ राजाला 'धनुःसाहस्र' नांवाच्या अमोघ धनुष्याची प्राप्ति झाली. म्हणून हें शिवलिंग या नांवानें प्रसिद्ध झालें.

(६४) **पशुपतीश्वर**—इंद्रेश्वराच्या दक्षिणेस (जानसापुऱ्यांत पश्चिमेकडे)—ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व मन, या इंद्रियग्रामाच्या चंचल स्वभावामुळें, देव-गंधर्व-मनुष्यादिकांत उत्पन्न होणाऱ्या पशुभावाचें निरसन या शिवलिंगाच्या दर्शनानें होतें, म्हणून त्याला पशुपतीश्वर म्हणतात.

(६५) **ब्रह्मेश्वर**—च्यवनेश्वराच्या उत्तरेस ( दाणीदरवाजाजवळ)—या शिवलिंगाच्या प्रसादानें ब्रह्मदेवाला पुलोमा नामक अजिंक्य दैत्याचा नाश करतां आला, म्हणून त्याला ब्रह्मेश्वर म्हणतात.

(६६) **जल्पेश्वर**—कुक्कटेश्वराच्या पश्चिमेस ( सोमतीर्थावर पिंपळाखालीं)—जल्पवादाचा प्रवर्तक जल्प नांवाचा राजा या

शिवलिंगाच्या आराधनानें त्यांत लयंगत होऊन मोक्षपदास गेला. म्हणून त्याला जल्पेश्वर म्हणतात.

(६७) **केदारेश्वर**—सोमेश्वराच्या पश्चिमेस क्षिप्रातटीं (सोनारघाटासमोर रेतींत)—स्वतः शंकर हे जसे हिमालयांत केदारेश्वरनामक शिवलिंगाच्या रूपानें वास करीत आहेत तसेच ते येथे महाकालवनांतहि तेंच नांव धारण करून या लिंगाच्या रूपानें वास करीत आहेत. अतएव जे हिमालयांतील केदारेश्वर तेच हे केदारेश्वर होत.

(६८) **पिशाचेश्वर**—ढुंढेश्वराच्या दक्षिणेस ( क्षिप्रातटीं रामघाटाजवळ सुंदर कुंडाव़र )—या शिवलिंगाच्या आराधनानें पिशाच योनींतून मुक्तता होते, म्हणून त्याला पिशाचेश्वर म्हणतात. हें शिवलिंग पिशाचमुक्तेश्वर या नांवानेंहि प्रसिध्द आहे.

(६९) **संगमेश्वर**—क्षिप्रा व नीलगंगा यांच्या संगमावर (जैरामदास-सनेहीराम यांच्या बगीचीच्या उत्तरेस)—हें शिवलिंग या दोन पुण्य नद्यांच्या संगमावर असल्यामुळें **संगमेश्वर** म्हणवतें. आणि तें शिरोवेदना [अर्धशिशी] व स्वजनवियोग यांचें निवारक असल्याविषयीं प्रसिध्दि आहे.

(७०) **दुर्ध्दरेश्वर**—ब्रह्मेश्वराच्या पश्चिमेस [गंधवती तीर्थावर कामेश्वराच्या दक्षिणेस]—याला कोणीं **दुर्ध्दर्षेश्वरा**हि म्हणतात. या शिवलिंगाच्या प्रसादानें दुर्ध्दर्ष नामक राजाची राक्षसांनीं हरण केलेली स्त्री त्याला पुन्हां प्राप्त झाली. त्यावरून त्याला हें नांव दिलें गेलें.

(७१) **प्रयागेश्वर**—या शिवलिंगाला कोणीं **यागेश्वरा**हि ह्मणतात. घंटेश्वराच्या पूर्वेस [हरसिध्दि दरवाजाजवळ लोकपाले-

श्वराच्या उत्तरेस ]--गंगानदीला शंतनुपासून झालेले सात पुत्र तिनें प्रवाहांत लोटून मारले. या पुत्रहत्येच्या निरसनार्थ गंगानदी या शिवलिंगाचें आराधन करीत असतां येथे तिला यमुना व सरस्वति या नद्या येऊन भेटल्या, म्हणून या देवाला **प्रयागेश्वर** ही संज्ञा प्राप्त झाली आहे. [याच नांवाचें एक शिवलिंग अनुक्रमांक ५८ वर आहे.]

(७२) **चंद्रादित्येश्वर**--महाकालेश्वराच्या उत्तरेस [ कोटि-तीर्थावर धर्मशाळेंत ]—शंबरासुराच्या युध्दांत दाणादाण झालेल्या इंद्रादि देवांपैकीं चंद्र व सूर्य या दोघांनीं या देवाचें आराधन करून त्याच्या प्रसादानें जय मिळाविला. त्यावरून या देवाला हें नांव प्राप्त झालें.

(७३) **करभेश्वर**--[भैरवगढास, कालभैरवासमोर टेकडीवर] —ब्राम्हणशापानें करभ [उंट] रूपास प्राप्त झालेला धर्मध्वज राजा या शिवलिंगाच्या दर्शनानें शापमुक्त होऊन स्वर्गास गेला. तेव्हांपासून या लिंगाला हें नांव दिलें गेलें.

(७४) **राजस्थलेश्वर**—[ भाक्षीपुऱ्यांत रणछोडरायच्या गल्लींत ]—पूर्वी विष्णुकल्पांत रिपुंजय राजाच्या प्रार्थनेंवरून स्वतः शंकर त्याच्या या स्थलाचें आधिपत्य स्वीकारून, या लिंगाच्या रूपानें येथे राहिले. म्हणून त्याला **राजस्थलेश्वर** म्हणतात.

(७५) **वडलेश्वर**—स्वर्गद्वारेश्वराच्या दक्षिणेस [ सिध्दवट व सिध्देश्वर यांच्या मध्यें]—कुबेरमित्र मणिभद्र याचा मुलगा वडल हा पित्याच्या शापानें व्याधिग्रस्त झाला असतां या

शिवलिंगाच्या आराधनानें शापमुक्त झाला. तेव्हांपासून या देवाला हें नांव प्राप्त झालें.

(७६) **अरुणेश्वर**--यात्रेश्वराच्या उत्तरेस [पिशाचेश्वराच्या समोर]—कश्यपाचा पुत्र अरुण हा या देवाची आराधना करीत असतां 'तूं सूर्याचें सारथ्य कर' असा या लिंगांतून शब्द निघाला व त्याप्रमाणें तो सूर्याचें सारथ्य करूं लागला, तेव्हांपासून या लिंगाला हें नांव प्राप्त झालें.

(७७) **पुष्पदंतेश्वर**—(सिंहपुरींत सोनार बाखळींत)—पुष्पदंत नामक शिवगण या देवाच्या आराधनानें शंकरशापापासून मुक्त झाला. ह्मणून त्याला पुष्पदंतेश्वर ह्मणतात.

(७८) **अविमुक्तेश्वर**—(सिंहपुरींत कुटुंबेश्वराजवळ पूर्वेस)—काशीक्षेत्रांत जसे विश्वेश्वर तसें येथे हें शिवलिंग दर्शनमात्रेंकरून मुक्ति देणारें आहे. ह्मणून त्याला अविमुक्तेश्वर ह्मणतात.

(७९) **हनुमत्केश्वर**—(गडावर स्थविरगणेशाच्या उत्तरेस टेकडीवर )—मारुतीच्या हनुवटीवर वज्राघात होऊन ते मूर्च्छित झाल्यावर त्यांचा पिता वायु यानें या देवाची आराधना केली. आणि तिच्या प्रभावानें जेव्हां मारुती शुद्धीवर आले, तेव्हांपासून त्यांना 'हनुमंत' व या लिंगाला 'हनुमत्केश्वर' या संज्ञा प्राप्त झाल्या.

(८०) **स्वप्नेश्वर**—( महाकालेश्वराजवळ )—शापवशात् राजा कल्माषपाद याला पडणारीं दुष्टस्वप्नें व तज्जिनत अरिष्ट या सर्वांची या शिवलिंगाच्या सेवनानें निवृत्ति झाली. ह्मणून हें लिंग स्वप्नेश्वर ह्मणवतें.

(८१) **पिंगलेश्वर**—पूर्वद्वारावर ( उज्जनीच्या पूर्वेस, पिंगला नदीच्या कांठीं, पिंगलेश्वर नांवाच्या गांवीं )—एका कान्यकुब्ज ब्राह्मण कुलांत जन्मास आलेल्या पिंगला नामक सुशील व सुचरित कन्येनें, मातृ-पितृ-वियोगामुळें दुःखित होऊन या पूर्वद्वारेशाचें सेवन केलें व त्यांत ती लय पावली. ह्मणून त्याला पिंगलेश्वर ह्मणतात.

(८२) **कायावरोहणेश्वर**—दक्षिणद्वारावर ( उज्जनीच्या दक्षिणेस, करणकोकलाखेडी या गांवीं )—दक्षयज्ञाचा विध्वंस होतांना वीरभद्रादि शिवगणांच्या हातून भग्नकाय झालेल्या देवादिकांना या शिवलिंगाच्या आराधनानें पुन्हां दिव्य देह प्राप्त झाले. ह्मणून हें शिवलिंग **कायावरोहणेश्वर** ह्मणवतें.

(८३) **बिल्वेश्वर**—पश्चिमद्वारावर ( उज्जनीच्या पश्चिमेस आमोद्या नांवाच्या गांवीं )—या शिवलिंगाच्या आराधनानें बिल्व नांवाचा राजा व कपिल यांचा वाद मिटून त्या दोघांचें सख्य झालें. ह्मणून त्याला बिल्वेश्वर ह्मणतात; व तो बिल्वकेश्वरहि ह्मणवतो.

(८४) **दर्दुरेश्वर**—उत्तरद्वारावर (उज्जनीच्या उत्तरेस जैथल नांवाच्या गावीं)—पूर्वीं गालव ऋषीच्या शापानें दर्दुर ( बेडुक ) योनीप्रत प्राप्त झालेला आयुराख्य भूपाळ या देवाच्या आराधनानें शापमुक्त होऊन शिवलोकीं गेला. ह्मणून हा देव दर्दुरेश्वर ह्मणवतो; व तो उत्तरद्वाराधिपति ह्मणून त्याला **उत्तरेश्वरहि** ह्मणतात[1].

---

१. अवंतिखंडावरून पाहतां, या क्षेत्राचीं चार द्वारें व त्यांवरील चार द्वारपाल यांपैकीं दक्षिणद्वारावरील द्वारपाल कायावरोहणेश्वर याचें स्थान मात्र बरोबर दिसत असून बाकीच्या तिन्हीं द्वारपालांचीं स्थानें काहींशीं बदललीं आहेत, असें

( उत्तरेश्वर या नांवाचें आणखी एक शिवलिंग आहे तें पूर्वी अनुक्रमांक ४४ वर दिलें आहे. )

---

वाटतें. कारण अवंतिखंडाप्रमाणें, पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर या द्वारांवरील शिवलिंगें हीं, या क्षेत्राच्या मध्यबिंदूवर विराजमान असलेल्या श्रीमहाकालेश्वराला स्पर्श करीत जाणाऱ्या, पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर स्वस्तिकाकार रेषांत— म्हणजे क्षेत्राच्या मध्यबिंदूवर समकोण करीत जाणाऱ्या पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर सरळ रेषांत—एक दुसऱ्याच्या अगदीं समोरासमोर असलीं पाहिजेत. परंतु पूर्व, पश्चिम व उत्तर या तीन द्वारांवरील शिवलिंगें तशीं नाहींत. पूर्व-पश्चिम रेषेवरील पूर्वेच्या द्वारपालाचें स्थान पिंगलानदीच्या उगमावर हरसोद्न या गावीं व पश्चिमेच्या द्वारपालाचें स्थान बडवाई किंवा खरेंट या गावीं असलें पाहिजे. परंतु तीं दोन्हीं शिवलिंगे अनुक्रमें पिंगलेश्वर व आमोद्या नांवांच्या गावीं गेलीं आहेत. त्याचप्रमाणें, दक्षिणोत्तर रेषेवरील उत्तरेचे द्वारपाल दर्दुरेश्वर पानबेहार येथे पाहिजेत ते जैथल या गावीं गेले आहेत.

पानबेहार येथें दर्दुरेश्वराच्या जागीं एक प्राचीन शिवलिंग हल्लींहि विद्यमान आहे, त्याला दुधेश्वर म्हणतात; आणि पानबेहार येथे व त्याच्या आसपासच्या गावीं ज्या गाई-म्हशी वीतात त्यांचें प्रथम काढलेलें दूध या दुधेश्वराला वाहून ग्रामस्थ लोक त्याचें तें नांव सार्थहि करीत असतात. परंतु वस्तुगत्या दुधेश्वर हा दर्दुरेश्वराचा अपभ्रंश असून खरा किंवा प्राचीन दर्दुरेश्वर हाच असावा असें वाटतें. आणि मुसलमानी अमलदारींत त्याचा विसर पडल्यावर उत्तर द्वारावरील द्वारपालाची पुनःस्थापना करतांना जैथल येथे हल्लींच्या दर्दुरेश्वराची स्थापना झाली असावी असें अनुमान होतें.

या चौऱ्यायशीं शिवलिंगांशिवाय आणखी कांहीं शिवलिंगांचा उल्लेख क्षेत्रमाहात्म्यांत केला आहे तीं, त्यांतील अध्यायाच्या अनुक्रमांकासहित, हीं:—

[ १ ] **हनुमत्केश्वर**[१]—[अ. २१] रुद्रसरोवरावर.

[ २ ] **कोटेश्वर**—[ अ. २२ ] श्रीमहाकालेश्वराच्या मंदिरांत, कोटितीर्थावर.

---

शेष राहिला त्यावर दूध वाहण्याचा परिपाठ, पण त्याचें मूळ या महादेवाच्या दुधेश्वर या अपभ्रष्ट नांवांत व ग्रामस्थांच्या भोळवट भाविकपणांतच असणार हें उघड होय.

आणि केवळ या तीन देवांचींच नव्हत, येथील अनेक देवांचीं स्थानें अशींच बदललेलीं दिसतात. उदाहरणार्थ, चौऱ्यायशीं महादेवांपैकीं दुसऱ्या गुहेश्वराचें स्थान लिंगमाहात्म्यांत **पिशाचेश्वरा** ( ६८ व्या ) च्या उत्तरेस एका गुहेंत सांगितलें आहे; पण हल्लीं हा देव पिशाचेश्वराच्या दक्षिणेस क्षिप्रेच्या घाटाच्या एका बुरुजांत असून पिशाचेश्वराच्या उत्तरेस त्याच्या गुहेचें नुस्तें चिन्हसुद्धां सांप्रत कोठें दिसत नाहीं. असो.

१. चौऱ्यायशीं महादेवांतला ७९ वा हनुमत्केश्वर निराळा व हा निराळा. पहिला मारुतीच्या मूर्च्छेचा निवारक झाल्यामुळें हनुमत्केश्वर हें नामाभिधान पावला असून तो गडावर आहे; आणि हें शिवलिंग मारुतीनें लंकेतून आणून त्याची स्थापना येथें रुद्रसागराच्या कांठीं केल्यामुळें त्याला हनुमत्केश्वर हें नांव दिलें गेलें आहे, असें लिंगमाहात्म्य अ. ७९ व क्षेत्रमाहात्म्य अ. २१ यांत दिलेल्या कथाभागावरून दिसतें.

[ ३ ] यमेश्वर—[ अ. २२ ].
[ ४ ] पैप्पलेश्वर—[ अ. २३ ].
[ ५ ] वैश्वानरेश्वर—[ अ. २३ ].
[ ६ ] गद्याणेश्वर—[ अ. २३ ].
[ ७ ] कालेश्वर—[ अ. २३ ].
[ ८ ] विधीश्वर—[ अ. २३ ].
[ ९ ] दुर्वासेश्वर—[ अ. २३ ].
[१०] कापिलेश्वर—[ अ. २३ ].
[११] वाल्मिकेश्वर—[ अ. २४ ].
[१२] जयेश्वर—[ अ. २८ ].
[१३] गोपेश्वर—[ अ. ३१ ].
[१४] सुधेश्वर—[ अ. ३१ ].
[१५] पुष्पकरंडेश्वर—[ अ. ३१ ].
[१६] पुण्येश्वर—[ अ. ३१ ].
[१७] यमधर्मेश्वर—[ अ. ५६ ].

याखेरीज, ज्यांचा क्षेत्र व लिंग माहात्म्यांत उल्लेख नाहीं; पण जीं प्राचीन कालापासून लोकप्रसिद्ध आहेत, तीं शिवलिंगें हीं :—

[ १ ] ऋणमुक्तेश्वर—ऋणमोचनतीर्थावर.
[ २ ] तिलभांडेश्वर—मकोड्या आंब्याच्या पश्चिमेस.
[ ३ ] कर्कराजेश्वर—कर्कराजतीर्थावर.
[ ४ ] वृद्धकालेश्वर—महाकालेश्वराच्या दक्षिणेस.

३. **गुह्यालिंगें**—क्षेत्रमाहात्म्य अध्याय २५ प्रमाणें,—( १ ) शुक्रेश्वर किंवा शुक्लेश्वर, ( २ ) भीमेश्वर, ( ३ ) गर्गेश्वर,

(४) **कामेश्वर**, (५) **चूडामणीश्वर** आणि (६) **चंडीश्वर**, हीं सहा **गुह्यलिंगें** होत. त्यांना **गुह्यस्थानें**हि म्हणतात. परंतु क्षेत्रमाहात्म्यांत त्यांचा स्थलनिर्देश केलेला नाहीं; व त्याविषयीं तोंडीं माहितीहि मिळाली नाहीं. नामसादृश्यावरून यांतले चवथे **कामेश्वर** व चौऱ्यायशीं लिंगांपैकीं तेरावे **कामेश्वर** हे दोन्हीं एक असावेत असें वाटतें. तसेच यांतले सहावे **चंडीश्वर** व चौऱ्यायशीं लिंगांपैकीं एकोणीसावे **नागचंडेश्वर** हेहि दोन्हीं एक दिसतात. कारण शिवनिर्माल्याच्या उल्लंघनजनित दोषांची निवृत्ति हें एकच दोन्हीं लिंगांच्या दर्शनाचें फल सांगितलें आहे. परंतु याविषयीं निश्चित असें काहीं सांगतां येत नाहीं.

४. **रुद्र**—हे अकरा आहेत. ते हेः—

[ १ ] **कपर्दी**—तिलभांडेश्वराजवळ.

[ २ ] **कपाली**—ब्रह्मपुरींत.

[ ३ ] **कलानाथ**—औखरघाटावर.

[ ४ ] **वृषासन**—महाकालेश्वराच्या मंदिरांत.

[ ५ ] **त्र्यंबक**—औखरघाटावर.

[ ६ ] **शूलपाणी**—महाकालेश्वराच्या मंदिरांत.


[ ७ ] **दिगंबर**—जाटाच्या विहिरीवर.

[ ८ ] **चीरवासा**—महाकालेश्वराच्या मंदिरांत.

[ ९ ] **गिरीश**—कालिकेच्या मंदिरांत.

[१०] **कामचारी**—नव्यापुऱ्यांत.

[११] **शर्व**—(याचें स्थान कळलें नाहीं.)



श्रीहरसिद्धिदेवीचें मंदिर.

याखेरीज श्रीमहाकालाच्या आवारांत मंदिराच्या डाव्या बाजूस, उत्तरेकडे, दक्षिणोत्तर लांब पडवींत अकरा शिवलिंगें स्थापित आहेत, तेहि **एकादशरुद्र** ह्मणवतात.

५. **देवी.**—या चोवीस आहेत:—

[ १ ] **महामाया**—चोवीसखांबी दरवाजा.[1]

[ २ ] **कपालमातृका**—सिंहपुरींत, रूपेश्वराच्या मंदिरांत.

[ ३ ] **अंबिका**—स्वर्गद्वारेश्वराजवळ.

[ ४ ] **अंबा**—नामदारपुऱ्यांत.

[ ५ ] **शीतला**—पातलवाडींत.

[ ६ ] **अंबालिका**—नामदारपुऱ्यांत.

[ ७ ] **अष्टसिद्धिदा** ( सिद्धेश्वरी )—अबदालपुऱ्यांत.

[ ८ ] **ब्राह्मणी**—नखासच्या तलावावर.

[ ९ ] **पार्वती**—नवनदीसंगमावर.

---

1. हा दरवाजा म्हणजे वस्तुत: महाकालेश्वराच्या मंदिरा भोंवतीं पूर्वी कोट होता त्याचें हें उत्तरेकडील महाद्वार होय. त्यावर देवीचें कांहीं चिन्ह नाहीं. परंतु अलीकडे त्याच्या पुढच्या बाजूस शेंदुर फांसला असून तीच महामाया असें दाखविण्यांत येत असतें; व महामायेला दिले जाणारे बली वगैरे पूजनार्चनाचे सर्व व्यवहार या दरवाजापुढेंच होत असतात. पूर्वी बहुधा या दरवाजाच्या जवळ-पास कोठें तरी महामायेचें मंदिर असावें व तें उध्वस्त झाल्यावर तिच्या जागीं या दरवाजालाच लोक महामाया मानू लागले असावेत, असें वाटतें.

[१०] **योगिनी**—यांना योगेश्वरीहि म्हणतात. त्या चौसष्ट एकत्र एका मंदिरांत आहेत. मंदिर नव्यापुरांत आहे.

[११] **कौमारी**—हरसिद्धीच्या मागें.

[१२] **भगवती**—सिंहपुरींत रूपेश्वराजवळ.

[१३] **कृत्तिका**—सिद्धवटाजवळ.

[१४] **चर्पटमातृका**—सिद्धेश्वराजवळ.

[१५] **वटमातृका**—सिद्धवटाजवळ.

[१६] **सरस्वती**—कार्तिकचौकांत.

[१७] **महालक्ष्मी**—नव्यापेठेंत.

[१८] **महाकाली**—गडावर.

[१९] **भद्रकाली**—सिंहपुरींत कुटुंबेश्वराजवळ.

[२०] **चामुंडा**—गडावर.

[२१] **वाराही**—नागादेवाच्या गल्लींत.

[२२] **ब्रह्मचारिणी**—अबदालपुऱ्यांत.

[२३] **वैष्णवी**—सिंहपुरींत.

[२४] **विंध्यवासिनी**—गडावर महाकालीच्या मंदिरासमोर, शेतांत.

६. **माता**—या आठ आहेत.—[१] **उमा**; [२] **चंडी**; [३] **ईश्वरी**; [४] **गौरी**; [५] **हरसिद्धि**; [६] **वटयाक्षिणी**; [७] **वीरभद्रा**; व [८] **ऐन्द्री**. यांपैकीं पांचव्या **हरसिद्धीचें** स्थानमात्र प्रसिद्ध आहे. तें जोगीपुऱ्यांत रुद्रसागराच्या कांठीं आहे. बाकीच्या सात देवींचीं स्थानें कळलीं नाहींत. यांतल्या आठव्या **ऐन्द्रीचा रौद्री** या नांवानेंहि उल्लेख आढळतो.

याखेरीज क्षेत्रमाहात्म्यांत **दुरितहारिणी** [ अ. ८, कलकलेश्वराजवळ]; **एकानंशा** [अ. १८, सिंहपुरींत]; **महादुर्गा** [अ. २३]; आणि **तैलमातृका** [अ. ३५]; या देवी आणखीहि सांगितल्या आहेत. परंतु त्यांपैकीं शेवटल्या दोन कोठे आहेत तें काहीं कळत नाहीं.

शिवाय ज्यांचा उल्लेख क्षेत्रमाहात्म्यांत आढळला नाहीं, अशा.–[ १ ] **शैलपुत्री**, [ २ ] **ब्रह्मचारिणी**, [ ३ ] **चंद्रघंटा**, [ ४ ] **कूष्मांडा**, [ ५ ] **स्कंदमात्रा**, [ ६ ] **कात्यायनी**, [७] **कालरात्री**, [८] **महागौरी**, व [९] **सिद्धिदात्री**, या नऊ दुर्गा[1] येथे प्रसिद्ध असून त्या अबदालपुऱ्यांत एका मंदिरांत एकत्र आहेत. तशीच **नगरकोटची राणी** या नांवाची एक देवी येथे बरीच प्रसिद्ध असून ती गोवर्धनसागरावर आहे.

७. **भैरव**—हे आठ आहेत :—

[१] **दंडपाणिभैरव**—देवप्रयागाजवळ.

[२] **विक्रान्तभैरव**—औखरेश्वराजवळ.

[३] **महाभैरव**—सिंहपुरींत.

[४] **सितासितभैरव** (क्षेत्रपाल)—सिंहपुरींत, कुटुंबेश्वराजवळ.

[५] **वटुकभैरव**—ब्रह्मपुरींत.

[६] **आनन्दभैरव**—मल्लिकार्जुनतीर्थावर.

---

१. प्रथमं शैलपुत्रीच द्वितीयं ब्रम्हचारिणी । तृतीयं चंद्रघंटेति कूष्मांडेति चतुर्थकम् ॥ पंचमं स्कंदमात्रेति षष्ठं कात्यायनीतिच । सप्तमं कालरात्री च महागौरीति अष्टमम् ॥ नवमं सिद्धिदात्रीच नवदुर्गा प्रकीर्तिता ॥

[७] **बालभैरव** [गोराभैरव]—गडावर, कुमार हनुमाना-
जवळ.

[८] **कालभैरव**—भैरवगढास, क्षिप्रेच्या उत्तरतीरावर.[2]

८. **आदित्य**—हे [ १ ] अरुण, [ २ ] सूर्य, [ ३ ] वेदांग, [४] भानु, [५] इंद्र, [६] रवि, [७] अंशुमान, [८] सुवर्णरेता, [९] अहस्कर्ता, [१०] मित्र, [११] विष्णु, व [ १२ ] सनातन, मिळून बारा आहेत, त्यांचीं स्थानें कळलीं नाहींत.

९. **विष्णु**—हे दहा आहेतः—

[ १ ] **वासुदेव**—ही प्रद्युम्न-अनिरुद्ध-संकर्षण-वासुदेव अशी चतुर्मुख मूर्ति गडावर कुमार मारुतीच्या मंदिरासमोर आहे.

[ २ ] **अनन्त**—अनन्तपेठेंत, क्षिप्रातीरीं.

[ ३ ] **हलधर**—अंकपाद क्षेत्रांत.

[ ४ ] **जनार्दन**— ,,

[ ५ ] **नारायण**—कपिलतीर्थावर.

[ ६ ] **हृषीकेश**—अंकपादक्षेत्रांत.

[ ७ ] **वराह**—पटेलबाखळींत.

[ ८ ] **धरणीधर**—नागतलाईवर.

[ ९ ] **वामन**—वामनकुंडावर.

[१०] **शेषशायी**—क्षीरसागरावर.

---

२. विशेष वर्णन प्र० ४ त पहा.

१०. **विनायक.**—हे सहा आहेत :—

[१] **मोदविनायक**—महाकालेश्वराच्या मंदिरांत, कोटितीर्थावर.

[२] **प्रमोदविनायक** [लड्डुकगणेश]—अगस्त्येश्वराजवळ.

[३] **सुमुखविनायक** [ स्थविराविनायक ]—गडावर.

[४] **दुर्मुखविनायक**—अंकपादाजवळ, खाकीच्या अखाड्याच्या मार्गे.

[५] **आविघ्नविनायक** [ विघ्ननाशक ]—अंकपादाजवळ, खाकीच्या अखाड्यासमोर.

[६] **विघ्नविनायक** [ विघ्नकर्ता-चिंतामणी गणपती ]—जवासा गावीं.

याखेरीज, क्षेत्रमाहात्म्यांत **महाविनायक** [ अ. ५२ ], **अष्टासिद्धीश्वर गणेश** [अ. ६३] व **गणेश्वर** [ अ. ७० ], या तीन विनायकांचा उल्लेख आणखी केला आहे. परंतु त्यांचीं स्थानें दिलेलीं नाहींत.

११. **मारुति**—चार आहेत :—

[१] **हनुमान**—हनुमान बागेंत.

[२] **ब्रह्मचारी**—सब्जीमंडींत.

[३] **कुमार**—गडावर.

[४] **वायुसुत**—नृसिंहतीर्थावर.

याखेरीज, नीलगंगेवर एक व ख्यातासंगमावर एक अशा दोन मारुतींचा उल्लेख क्षेत्रमाहात्म्यांत आणखी आढळतो.

१२. नवग्रहः—

[१] शंकरादित्य—शंकरवापीच्या मध्यभागीं [क्षेत्र-मा. अ. १५].

[२] सोमेश्वर—सोमतीर्थावर.

[३] मंगलेश्वर—(अंगारेश्वर, चौऱ्यायशींपैकीं ४३ वा) खगर्ता-क्षिप्रा-संगमाजवळ.

[४] बुधेश्वर—सोमतीर्थावर.

[५] बृहस्पतेश्वर--पिंजारवाडींत.

[६] शुक्रेश्वर—[स्थल कळलें नाहीं.]

[७] स्थावरेश्वर—[चौऱ्यायशींपैकीं ५० वा ] पृथुकेश्वराच्या पश्चिमेस.

[८] राहवेश्वर—पटेलबाखळींत.

[९] केत्वेश्वर—पटेलबाखळींत.

याखेरीज, क्षिप्रा व ख्याता यांच्या संगमावर नवग्रहांचीं लिंगें एका मंदिरांत एकत्र आहेत. तशींच, श्रीमहाकालेश्वराच्या आवारांत मंदिराच्या उजव्याबाजूस, दक्षिणेकडे, पूर्व-पश्चिम लांब ओट्यावर नवग्रहांचीं नऊ शिवलिंगें स्थापित आहेत.

## २ तीर्थें.

१. नद्या व त्यांवरील तीर्थस्थलें--या क्षेत्रांत [१] क्षिप्रा किंवा शिप्रा, [२] नीलगंगा, [३] गंधवती व [४] नवनदी, या चार नद्या मुख्य आहेत. त्यांपैकीं—

[१] क्षिप्रा—ही नदी उज्जन शहराच्या पश्चिम व उत्तर दिशांकडे वहात असून सांप्रत ही एकच नदी तेथे प्रवाहरूपानें विद्यमान असलेली दिसते.

[२] **नीलगंगा**–ही पूर्वी उज्जनीच्या दक्षिण बाजूनें, पूर्वेकडून पश्चिमेकडे वहात येऊन, **नृसिंहतीर्थाच्या** उत्तरेस, जैरामदास-सनेही-राम याच्या बगीची खालीं क्षिप्रेला भेटत होती असें सांगतात; व त्या बाजूस कोठे कोठे तिच्या प्रवाहाचें काहींसें चिन्हहि दिसतें. परंतु हल्लीं तिचा प्रवाह असा कोठेहि दिसत नाहीं. उज्जनीच्या आग्नेयीस, एक **नीलगंगा** नांवाचें कुंडमात्र विद्यमान आहे; व **नगरप्रदक्षिणें**त त्या कुंडावर नुसतें वंदन होत असतें.

[३] **गंधवती**–ही नदी पूर्वी क्षिरसागरांतून निघून आणि हल्लींच्या सराफ्यांतून व दाणीदरवाजांतून वहात जाऊन हलवायाच्या धर्मशाळेखालीं क्षिप्रेला भेटत असे. कोणीं ती कार्तिक चौकांतून व उदासी लोकांच्या अखाड्याच्या मागल्या बाजूनें वहात येऊन हलवायाच्या धर्मशाळेखालीं क्षिप्रेला भेटत होती, असेंहि सांगतात. तिच्या संगमाजवळ प्रवाहाचीं चिन्हें दोन्हीं बाजूस दिसतात; पण मधला सर्व प्रदेश मातीनें पुरला जाऊन त्यावर वस्ती झाल्यामुळें मध्यंतरीं तिचा प्रवाह कोठेही दिसत नाहीं[१].

[४] **नवनदी**–या नदीचा व क्षिप्रेचा संगम झाल्याचें जें स्थान दाखवितात त्याच्या वरच्या बाजूस कोठेहि तिच्या प्रवाहाचें काहीं चिन्ह दिसत नाहीं.

---

१. कोणीं, डाबरीपीठ्यांतून निघून आणि कोटाच्या पूर्व व दक्षिण दिशांकडून वहात जाऊन रुद्रसागरांत समाविष्ट होणाऱ्या **गंद्या** (म्हणजे घाण-पाण्याच्या) **नाल्याच्या** प्रवाहास गंधवती नदीचा प्रवाह म्हणतात. परंतु त्या नाल्याचा ज्या-अर्थी क्षिप्रेशीं संबंध घडत नाहीं त्याअर्थी त्याला क्षिप्रेंत समाविष्ट होणाऱ्या गंधवतीच्या स्थानीं मानतां येत नाहीं.

याखेरीज उज्जनीच्या पूर्वेकडून वहात येऊन अंगारेश्वरा [ ४३ वा ] च्या उत्तरेस क्षिप्रा नदीला भेटणारी **खगर्ता** व इंदुराकडून वहात येऊन उज्जनीच्या दक्षिणेस ३।४ मैलांवर क्षिप्रेला भेटलेली **ख्याता**, या दोन नद्यांचा उल्लेख क्षेत्र व लिंग माहात्म्यांत आणखीहि आढळतो. क्षिप्रा-ख्याता-संगमाला **त्रिवेणीसंगम** ह्मणतात; पण तेथे तिसऱ्या नदीचा प्रवाह दिसत नाहीं व ती नदी कोणती, ह्मणजे तिचें नांव काय, तेंहि कळत नाहीं. शिवाय, क्षेत्रमाहात्म्यांत **फल्गु** [ अ. ५७ ], **सरस्वति** [ अ. ५७ ] व **कौशिकी** [ अ. ६१ ] या तीन नद्यांचा उल्लेख आहे; पण त्यांच्या प्रवाहाचें चिन्ह कोठेंहि दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

क्षिप्रानदीच्या परतीरावर, म्हणजे पश्चिम व उत्तर तीरावर, कर्कराजाच्या मंदिरापासून कालियादेहाच्या महालापर्यंत, एकापुढें एक अशीं अठ्ठावीस स्थलें तीर्थरूप मानलीं गेलीं असून तेथे स्नान-दानादिकांचें विशेष माहात्म्य समजलें जातें. पुढें यात्राप्रकरणांत "अष्टाविंशति तीर्थयात्रा" किंवा 'अष्टतीर्थी' नामक यात्रेविषयीं लिहितांना या सर्व तीर्थांचीं नांवें दिलीं आहेत तीं पाहावीं.

२. **सागर**—हे सात आहेत :—

[ १ ] **रुद्रसागर** (शिवतडाग)—महाकालेश्वराचें मंदिर व हरसिद्धीचें मंदिर यांच्या मध्यें.

[ २ ] **पुष्करसागर**—नलियाबाखळेंत ( रंगबावडी ).

[ ३ ] **क्षीरसागर**—शहराच्या पूर्वेस डाबरीपीठ्याजवळ.

[ ४ ] **गोवर्धनसागर**—बुधवाऱ्या हाटांत.

[ ५ ] **रत्नाकरसागर**—उंडासानामक गावीं ( उंडाशाचा तलाव ).

[ ६ ] **विष्णुसागर** ( अंकपादतीर्थ )—जनार्दनजीच्या पूर्वेस कोटाबाहेर.

[ ७ ] **पुरुषोत्तमसागर**—अंकपाद दरवाजाजवळ (याला सोळासागरहि ह्मणतात).

३. **इतर तीर्थें**—वर सांगितलेलीं २८ तीर्थें व ७ सागर मिळून ३५ तीर्थांखेरीज आणखीहि अनेक तीर्थांचा उल्लेख क्षेत्रमाहात्म्यांत केला असून, तेथे केलेल्या स्नान-दान-श्राद्धादि क्रियांचीं फलेंहि त्यांत सांगितलीं आहेत. त्यांचीं, अध्यायाच्या अनुक्रमांकासहित नावें हीं:—

[ १ ] **कलहनाशनकुंड**—कलकलेश्वराजवळ ( अ. ८ ).

[ २ ] **अप्सरस्तीर्थ**—अप्सरेश्वराजवळ ( अ. ८ ).

[ ३ ] **मणिकर्णिकातीर्थ**—कलकलेश्वराजवळ (अ. ८).

[ ४ ] **महिषतीर्थ**—दुरितहारिणी देवीच्या दक्षिणेस ( अ. ९ ).

[ ५ ] **कुटुम्बेश्वरतीर्थ**—कुटुम्बेश्वराजवळ ( अ. १० ).

[ ६ ] **विद्याधरतीर्थ**—( अ. ११ ).

[ ७ ] **मर्कटेश्वरतीर्थ**—( अ. १२ ).

[ ८ ] **शीतलातीर्थ**—( अ. १२ ).

[ ९ ] **स्वर्गद्वारतीर्थ**—स्वर्गद्वारेश्वराजवळ (अ. १३).

[१०] **चतुःसमुद्रतीर्थ**( क्षार, क्षीर, दधि, इक्षु )—राजस्थलेश्वराजवळ (अ. १४).

[११] शंकरवापी—( अ. १५ ).

[१२] त्रिविष्टपतीर्थ—( अ. २० ).

[१३] पिशाचतीर्थ—( अ. २१ ).

[१४] कोटितीर्थ–श्रीमहाकालेश्वराच्या मंदिरांत, पश्चिम-बाजूस. (अ. २२-३४).

[१५] कपालमोचनतीर्थ—कपालेश्वराजवळ (अ. २३).

[१६] प्राणिशंवलतीर्थ—( अ. २३ ).

[१७] शंखोध्दारतीर्थ—अंकपाद येथे (अ. २७ ).

[१८] गोमतीकुंड—अंकपाद येथे,सांदीपनीच्या आश्रमाजवळ ( अ, २७ ).

[१९] करीकुंड—अंकपाद येथे (अ. २७-२८).

[२०] ब्रह्मसरोवर—( अ. २८ ).

[२१] यज्ञवापी—( अ. २८ ).

[२२] रूपकुंड—रूपेश्वराजवळ ( अ. २८ ).

[२३] अनंगकुंड—( अ. २८ ).

[२४] अजागंधतीर्थ—( अ. २८ ).

[२५] अनरकतीर्थ—अनरकेश्वराजवळ (अ. २९).

[२६] जटाशृंगतीर्थ—जटेश्वराजवळ ( अ, ३१ ).

[२७] इंद्रतीर्थ—( अ. ३१ ).

[२८] गोपतीर्थ—( अ. ३१ ).

[२९] चिपिटातीर्थ—( अ. ३१ ).

[३०] विजयतीर्थ—( अ. ३१ ).

[३१] रामतीर्थ—( अ. ३१ ).

[३२] सौभाग्यतीर्थ—( अ. ३१ ).

[३३] शंखावर्ततीर्थ—( अ. ३१ ).

[३४] सुधोदकतीर्थ—( अ. ३१ ).

[३५] किंपुनातीर्थ—( अ. ३१ ).

[३६] दुर्धर्षतीर्थ—( अ. ३१ ).

[३७] गोपींद्रतीर्थ—( अ. ३१ ).

[३८] गंगातीर्थ—( अ. ३१ ).

[३९] पुष्पकरंडतीर्थ—( अ ३१ ).

[४०] उत्तरेश्वरतीर्थ—( अ ३१ ).

[४१] भूतेश्वरतीर्थ—( अ. ३१ ).

[४२] घंटेश्वरतीर्थ—( अ. ३१ ).

[४३] पुण्येश्वरतीर्थ—( अ. ३१ ).

[४४] लुंपेश्वरतीर्थ—( अ. ३१ ).

[४५] कामोदकतीर्थ—( अ. ३१ ).

[४६] प्रयागतीर्थ—( अ. ३१ ).

[४७] स्वर्णक्षुरतीर्थ—( अ. ३५ ).

[४८] विष्णुवापी—( अ. ३५ ).

[४९] अंधकतीर्थ—( अ. ३६ ).

[५०] धूतपापतीर्थ—( अ. ३७ ).

[५१] कंटेश्वरतीर्थ—( अ ३७ ).

[५२] गयातीर्थ—( अ. ५२-५७ ).

[५३] दुग्धकुंड—( अ. ५४ ).

[५४] विमलोदतीर्थ--( अ. ५५ ).

[५५] ख्यातासंगम—( अ. ५६ ).

[५६] धर्मसरोवर—( अ. ५६ ).

[५७] च्यवनाश्रमतीर्थ--( अ. ५६ ).

[५८] षोडशपदीतीर्थ—( अ. ५७ ).

[५९] गोमतीकुंड--( अ. ६२ ).

[६०] कंथडेश्वरतीर्थ—( अ. ६३ ).

[६१] वामनकुंड—( अ. ६३ ).

[६२] उत्तरमानसतीर्थ—( अ. ६३ ).

[६३] वीरेश्वरतीर्थ—( अ. ६४ ).

[६४] नागतीर्थ—( अ. ६५ ).

[६५] अखंडतीर्थ—( अ. ६८ ).

[६६] रम्यसरस्तीर्थ—( अ. ७० ).

[६७] बिन्दुसरोवर--( अ. ७० )

याखेरीज, गंधवतीतीर्थाच्या दक्षिणेस [१] मल्लिकार्जुनतीर्थ व नीलगंगा येथे मावजीच्या बागेंत, [२] दक्षिणमानसतीर्थ, हीं दोन तीर्थें लोकप्रसिद्ध आहेत; पण त्यांचा उल्लेख क्षेत्र-माहात्म्यांत कोठे आढळला नाहीं.

## ३. यात्रा.

१. **नित्ययात्रा**—या यात्रेचा उल्लेख क्षेत्रमाहात्म्यांत आढळला नाहीं; परंतु ती लोकप्रसिद्धींत आहे. यात्रेकरू तर ती बहुतेक करतातच; पण कित्येक ग्रामस्थहि काहीं कालापूर्वी ती नियमानें करीत असत, व कदाचित् हल्लींहि करीत असावेत. तिचा क्रम असा:—

प्रतिहारं च नागं च महाकालमवंतिकाम् ।
हरसिद्धिमगस्त्यं च क्षिप्रामुक्त नमोस्तुते ॥ १ ॥

याप्रमाणें, प्रथम **क्षिप्रास्नाना**पासून तिचा आरंभ आणि नंतर क्रमानें **प्रतिहारेश्वर** व **नागचंडेश्वर** यांचें दर्शन; तेथून श्रीमहाकालेश्वराच्या मंदिरांत **कोटितीर्थाचें** वंदन व **कोटेश्वराच्या** दर्शनपूर्वक **महाकालेश्वराचें** दर्शन व **अवंतिदेवीचें** ( राममंदिरांत रामाच्या मागें ) दर्शन; नंतर **हरसिद्धि** व **अगस्त्येश्वर** यांचें दर्शन; आणि तेथून पुन्हा क्षिप्रा तटाकीं जाऊन **पिशाचमोचन-तीर्थाचें** वंदन व **पिशाचमुक्तेश्वराच्या** दर्शनांत तिची पूर्णता.

२. **चतुर्दशयात्रा** (क्षेत्रमा. अ. २० )–विशेषतः चतुर्दशीच्या दिवशीं, प्रथम **पिशाचमोचन** तीर्थावर स्नान व तिलदानपूर्वक ( १ ) **गुहेश्वराचें** दर्शन; नंतर **रुद्रसरोवरावर** स्नान करून ( २ ) **अगस्त्येश्वराचें** दर्शन; नंतर क्षिप्रास्नान करून (३) **ढुंढेश्वर**, ( ४ ) **डमरुकेश्वर**, (५) **अनादिकल्पेश्वर**, ( ६ ) **सिद्धेश्वर**, (७) **वीरभद्रादेवी**, व (८) **स्वर्णज्वालेश्वर** यांचें दर्शन; नंतर **त्रिविष्टप** तीर्थावर स्नान करून ( ९ ) **त्रिविष्टपेश्वराचें** सुवर्णानें पूजन; नंतर पुन्हा **त्रिविष्टप** तीर्थावर स्नानकरून (१०) **कर्कोटेश्वराचें** दर्शन, (११) **महामायेचें** दर्शन व (१२) **कपालेश्वराचें** पूजन;

आणि तदनंतर स्वर्गद्वार तीर्थावर स्नान करून (१३) **स्वर्गद्वारेश्वराचें** दर्शन व (१४) **भैरवाच्या** दर्शनानें यात्रेची पूर्णता.

३. **महाकाल यात्रा** ( क्षेत्रमा. अ. २३ )—आरंभीं रुद्र-सरोवरांत स्नान करून कोटितीर्थाच्या वंदनपूर्वक (१) **कोटेश्वराचें** दर्शन; नंतर (२) **श्रीमहाकालेश्वराचें** गंध-पुष्पादि उपचारांनीं पूजन; तेथून कपालमोचन तीर्थाचें स्नान, वित्तशाठ्यविवर्जित शंभर, पन्नास किंवा पंचवीस 'पल' आज्याचें दान व (३) **कपालेश्वराचें** दर्शन; नंतर क्रमशः (४) **कापिलेश्वर,** (५) **हनुमत्केश्वर,** (६) **पैप्पलेश्वर,** (७) **स्वप्नेश्वर,** (८) **ईशानेश्वर,** (९) **सोमेश्वर,** (१०) **वैश्वानरेश्वर,** (११) **लकुलीशरुद्र,** (१२) **गद्याणेश्वर,** (१३) **विघ्नविनायक,** (१४) **वृद्धकालेश्वर,** व (१५) **विघ्नविनाशक गणेश** यांचें दर्शन करून प्राणीशंबल नामक तीर्थाचें शंभर घट पाण्यानें स्नान; नंतर विघ्नविनाशक गणेशाचें उल्लंघन न करतां, ह्मणजे त्याच्या पुढें न जातां मागें परतून, (१६) **दंडपाणिभैरव,** (१७) **पुष्दंतेश्वर** व (१८) **गुहेश्वर,** यांचें क्रमशः दर्शन; नंतर पुन्हा **महाकालेश्वराचें** ( दुसऱ्या वेळेस ) दर्शन; तदनंतर समाहित चित्तानें (१९) **दुर्वासेश्वराचें** दर्शन व तेथेच, ह्मणजे दुर्वासेश्वराजवळच, श्वासावरोधन (पूरक) करून गौरी व महादुर्गा यांच्याजवळ गेल्यावर श्वासाचें विसर्जन, (रेचन); श्वास सोडल्यावर (२०) **गौरी** व (२१) **महादुर्गा** यांचें पूजन; तेथून पुढें (२२) **कालेश्वर** व (२३) **विधीश्वर** यांचें क्रमशः दर्शन करून विधीशापुढें आपलें नाम, स्थान व गोत्र, यांचें निवेदन; आणि शेवटीं पुन्हा ( तिसऱ्यांदां ) **महाकालेश्वराचें** दर्शन, पुनः पुनः नमस्कार व त्यांच्या प्रसादानें यात्रा सफल होण्याविषयीं

व संसारसागरांतून आपला उद्धार होण्याविषयीं प्रार्थना; हा या यात्रेचा क्रम, किंवा **श्रीमहाकालेश्वराच्या** ‘ प्रदक्षिणें’चा विधि होय.

या यात्रेंतील (१) **विघ्नविनाशक** गणपतीच्या पुढें न जातां मागें परतण्याचा विधि, (२) **यात्रेश्वर** महाकालाचें तीन वेळ दर्शन, आणि (३) यात्रेच्या शेवटीं ‘ या विधीनें महाकालाची प्रदक्षिणा करण्याचा’ उल्लेख, हे तीन विशेष लक्षांत घेतले असतां, ही यात्रा ह्मणजे वस्तुगत्या श्रीमहाकालाची **सोमसूत्री प्रदक्षिणा** आहे,,असें दिसतें.

४. **पंचेशानीयात्रा** (क्षेत्र मा. अ. २६ )—या क्षेत्राच्या पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर या चार द्वारांवरील चार द्वारपाल, अनुक्रमें, **पिंगलेश्वर, कायावरोहणेश्वर, बिल्वेश्वर,** व **दर्दुरेश्वर,** हे चार आणि पांचवे **यात्रेश्वर श्रीमहाकाल,** मिळून पांच देवांचीं दर्शनें व त्यांच्या स्थानांवर स्नानें-दानें वगैरे क्रियांचा या यात्रेंत समावेश होतो, म्हणून तिला **पंचेशानीयात्रा** म्हणतात. तिचे दोन पर्याय आहेत:—

(१) कृष्णचतुर्दशी किंवा अमावास्या या दिवशीं, या पांच देवांचीं दर्शनें, अनुलोम किंवा प्रतिलोम यांपैकीं कोणत्याहि क्रमानें घेऊन येणें; आणि दिवसभर उपोषण करून यात्रेश्वराच्या ध्यानांत तत्पर असणें, हा या यात्रेचा एक पर्याय असून तो बराच कष्टप्रद आहे.

(२) दुसरा सोपा पर्याय असा आहे कीं, कृष्णपक्षांतील एकादशीला प्रातःकालीं **रुद्रसरोवराचें** स्नान करून श्राध्द करावें;

नंतर श्रीमहाकालेश्वराचें व ईशानेश्वराचें दर्शन घेऊन पूर्वद्वारावरील पिंगलेश्वरास जावें; तेथे पुन्हा स्नान करून श्राध्द करावें व पिंगलेश्वराचें गंधपुष्पादि उपचारांनीं पूजन करून परत महाकालेश्वरास यावें; तेथे स्नान करून महाकालेश्वराचें पूजन करावें; आणि तेथून ईशानेश्वरास जाऊन तेथे नक्तभोजन करावें व तेथेच श्रीमहाकालेश्वराच्या ध्यानपूर्वक भूमीवर शयन करावें. त्याच प्रमाणें पुढें द्वादशी, त्रयोदशी व चतुर्दशीच्या दिवशीं प्रातःकालीं रुद्रसागराचें स्नान व श्राध्द, श्रीमहाकाल व ईशानेश्वर यांचें दर्शन, नंतर अनुक्रमें, दक्षिण, पश्चिम व उत्तर द्वारांवरील कायावरोहणेश्वर, बिल्वेश्वर व दर्दुरेश्वर यांच्या स्थानांवर गमन, तेथे स्नान, श्राध्द व पूजन, नंतर महाकालेश्वरास परत येऊन तेथे स्नान व पूजन, आणि तेथून ईशानेश्वरास जाऊन तेथे नक्तभोजन व भूमिशयन. याप्रमाणें चार दिवस चार द्वारांची यात्रा केल्यावर अमावास्येच्या दिवशीं प्रातःकालीं स्नान करून श्रीमहाकालेश्वराचें ध्यानावाहनादि प्रार्थनांत षोडषोपचार पूजन करून घरीं जावें व तेथे पांच ब्राम्हणांचें यथासांग पूजन करून त्यांच्यासह भोजन करावें.

या यात्रेंत, पूर्वद्वारावर रथदान, दक्षिणद्वारावर गजदान, पश्चिमद्वारावर अश्वदान, उत्तरद्वारावर वृषभदान, आणि श्रीमहाकालाजवळ सर्वोपस्कर संयुक्त धेनुदान, अशीं पांच दानें सांगितलीं आहेत; व तीं यात्रेच्या दिवशीं त्या त्या द्वारावर व अमावास्येच्या दिवशीं श्रीमहाकालाच्या मंदिरांत, यथाशक्ति करावयाचीं असतात.

## चालू परिपाठ.

परंतु सांप्रत ही यात्रा वर सांगितल्याप्रमाणें ग्रंथोक्त विधीनें बहुधा कोणीं करीत नाहीं. हल्लीं तिचे (१) **पंचक्रोशी** व (२) **चारद्वार**, असे दोन पर्याय निघाले असून चैत्र वद्य १० पासून वद्य १४ पर्यंत पांच दिवस त्यांच्या साठीं नियमित केले गेले आहेत.

## (१) पंचक्रोशी.

ही यात्रा करणारे लोक चैत्र वद्य १० च्या दिवशीं सायंकाळच्या सुमारास **श्रीनागचंडेश्वराचें दर्शन** घेऊन उज्जनीहून निघतात व पूर्वद्वारावर पोंचून तेथे रात्रीं मुक्काम करतात. दुसरे दिवशीं वद्य ११ ला तेथे स्नान, दान, श्राद्ध व पूर्वद्वाराधिपति **पिंगलेश्वराचें** पूजन करून तेथून निघतात आणि मध्यें एका ठिकाणीं भोजन उरकून सायंकाळीं दक्षिणद्वारावर जातात व तेथें रात्रीं मुक्काम करतात. तिसरे दिवशीं, वद्य १२ ला पूर्वद्वाराप्रमाणें दिवसां स्नान-दानादि विधि व दक्षिणद्वाराधिपति **कायावरोहणेश्वराचें** पूजन केल्यावर भोजनोत्तर रात्रौ पश्चिमद्वारावर पोंचून तेथे मुक्काम; चवथे दिवशीं, वद्य १३ ला, दिवसां तेथील स्नान-दानादि विधि व पश्चिमद्वाराधिपति **बिल्वेश्वराचें** पूजन केल्यानंतर भोजन करून उत्तर द्वारावर रात्रीं मुक्काम; आणि पांचवे दिवशीं, वद्य १४ ला तेथील स्नान-दान-श्राध्द **उत्तरेश्वराचें** पूजन-भोजन वगैरे सर्व कार्यें अटोपल्यावर पुन्हा पूर्वद्वारावर जाऊन **पिंगलेश्वराचें** दर्शन व तेथून उज्जनीस येऊन **नागचंडेश्वराचें** दर्शन, याप्रमाणें वद्य १४ च्या रात्रीं यात्रानाथ **नागचंडेश्वर** यांच्या दर्शनानें या यात्रेची परिसमाप्ति होत असते.

तदनंतर ज्यांना दुसऱ्या दिवशीं, वद्य ३० ला, **अष्टाविंशाति तीर्थयात्रेला** ( अष्टतीर्थीला ) जावयाचें नसेल, ते आपआपल्या घरीं जातात; आणि बाकीचे यात्रेकरू घरीं न जातां, क्षिप्रेच्या परतीरावर रेंतींत मुक्काम करून, वद्य ३० ला **अष्टाविंशाति तीर्थ यात्रेस** जात असतात.

## (२) चारद्वार.

**चारद्वाराच्या** यात्रेस जाणारे यात्रेकरू, चैत्र वद्य ११ ला सायंकाळीं संध्यादि नित्य कृत्य अटोपून व **नागचंडेश्वराचें** दर्शन घेऊन पूर्वद्वारावर जातात; आणि **पिंगलेश्वराचें** दर्शन करून सूर्योदयापूर्वीं उज्जनीस परत येतात व **नागचंडेश्वराचें** दर्शन घेऊन आपआपल्या घरीं जातात. आणि याचप्रमाणें पुढेंहि वद्य १२, १३ व १४ यापैकीं प्रत्येक दिवशीं, क्रमशः दक्षिण, पश्चिम व उत्तर, या एक एक **द्वारावर** जाऊन व तेथील **कायावरोहणेश्वर, बिल्वेश्वर** व **दर्दुरेश्वर** यांचें दर्शन करून, ते परत उज्जनीस आले व त्यांनीं **नागचंडेश्वराचें** दर्शन घेतलें कीं ही यात्रा संपूर्ण होते.

५. **अष्टाविंशाति तीर्थयात्रा**—क्षेत्रमहात्म्यांत या यात्रेचा उल्लेख नाहीं. त्यांत अनेक तीर्थें सांगितलीं आहेत; व निरनिराळ्या ठिकाणीं त्यांपैकीं प्रत्येक तीर्थावर केलेल्या स्नानदानादिकांचीं फळेंहि सांगितलीं आहेत. परंतु त्यांतलीं २८ तीर्थें निराळीं निवडून त्यांच्या यात्रेचा उल्लेख त्यांत कोठेंहि आढळला नाहीं. प्रचारांत मात्र ती आहे; व तिला **अष्टतीर्थी** म्हणतात. आणि नांव जरी तिचे "अष्टतीर्थी" ठेविलेलं आहे तरी त्यांत पुढें दिलेल्या

२८ तीर्थांचा समावेश केलेला असतो. यास्तव आम्हीं ती **अष्टाविंशति तीर्थयात्रा** या नांवाने पुढें देत आहोंत.

हीं सर्व तीर्थें क्षिप्रानदींत तिच्या परतीरावर आहेत. चैत्र वद्य ३० च्या दिवशीं रुद्रसागरांत स्नान करून या यात्रेचा आरंभ **कर्कराजतीर्था**पासून करतात. आणि पुढें सांगितल्याप्रमाणें क्रमशः एक एक तीर्थावर वंदन, स्नान, दान, श्राद्ध करीत करीत शेवटीं **ब्रह्मतीर्था**वर तिची पूर्णता होत असते.

[ १ ] **कर्कराज**–क्षिप्रेच्या मध्यभागीं उभे राहून आज्यसहित घृतपात्रदान.

[ २ ] **नरसिंह तीर्थ**–कृष्णाजिनदान.

[ ३ ] **नीलगंगासंगम तीर्थ**–वस्त्रदान.

[ ४ ] **पिशाचमोचन तीर्थ**–सवस्त्र गोदान व महादान.

[ ५ ] **गंधवती तीर्थ**–श्राद्ध व कांचनदान.

[ ६ ] **केदार तीर्थ**–गोमिथुन दान व कंबल-अजिन-वस्त्रदान.

[ ७ ] **चक्रतीर्थ**–शंख-चक्र-विमानदान.

[ ८ ] **सोमतीर्थ**–गृह-दास-दासीदान.

[ ९ ] **देवप्रयाग**–गूळ-धेनुदान.

[१०] **त्रिवेणी**–तिल-धेनुदान.

[११] **ऋणमोचनतीर्थ**–सुवर्णदान.

[१२] **योगतीर्थ** ( कपिलाश्रम )–जल-धेनुदान.

[१३] **घृतकुल्या तीर्थ**–घृत-धेनुदान.

[१४] **मधुकुल्या तीर्थ**–मधुदान.

[१५] **औखर तीर्थ**–फलमूलादिदान.
[१६] **नरादित्य तीर्थ**–रथदान.
[१७] **केशवादित्य तीर्थ**–अन्नदान.
[१८] **कालाग्नि तीर्थ**–पूर्णपात्रदान.
[१९] **द्वादशार्क तीर्थ**–अजादान.
[२०] **दशाश्वमेध तीर्थ**–श्वेताश्वदान.
[२१] **अंगारक तीर्थ**–गूळ-अन्न-रक्तवस्त्र-वृषभदान.
[२२] **खगर्तासंगम**–जलपात्रदान.
[२३] **शक्तिभेद तीर्थ**–कांस्यपात्रदान.
[२४] **पापमोचन तीर्थ** ( हंसतीर्थ )–छायापात्रदान.
[२५] **प्रेतशिला तीर्थ**–घट-छत्र-उपानहदान.
[२६] **नवनदीसंगम**–शकटदान.
[२७] **मंदाकिनी तीर्थ**–अन्नादिदान.
[२८] **ब्रह्मतीर्थ** ( पितामहतीर्थ )–पितामह श्राद्ध व पुस्तक-गो-भूमि-सुवर्ण-दान.

या प्रमाणें यात्रेची पूर्णता करून यात्रेकरू **मंगळेश्वरीं** येतात; आणि तेथून वाजत-गाजत **श्रीनागचंडेश्वराच्या** मंदिरांत पोंचून त्यांचें दर्शन घेतल्यावर आपआपल्या घरीं जातात व दुसऱ्या दिवशीं यथाशक्ति ब्राह्मण भोजन करतात.

६. **कुशस्थली प्रदक्षिणा** [ क्षेत्रमा. अ. २६ ]—या प्रदक्षिणेंत—

[ १ ] **पद्मावतीदेवीचें** कमलपुष्पांनीं पूजन.
[ २ ] **स्वर्णशृंगाटिकेचें** सुवर्णवर्ण पुष्पांनीं पूजन.
[ ३ ] **अवंतीदेवीचें** दर्शन.

[ ४ ] **अमरावतीदेवीचें** कमलपुष्पांनीं पूजन.
[ ५ ] **उज्जयिनीदेवीचें** दर्शन.
[ ६ ] **विशालादेवीचें** दर्शन.

याप्रमाणें सहा देवींचें दर्शन व पूजन सांगितलें आहे. परंतु त्यांचीं स्थानें हल्लीं कोठे आहेत किंवा पूर्वी कोठे होतीं, याविषयीं माहिती अद्याप मिळाली नाहीं. एक **अवंतीदेवीचें** स्थान **श्रीमहाकालेश्वराच्या** मंदिरांत कोटितीर्थावरील **राममंदिरांत** रामाच्या मूर्तीच्या मागल्या बाजूस आहे. पण ती **कुशस्थलीच्या** प्रदक्षिणेंतील अवंतीदेवी असूं शकत नाहीं. कारण या सहाहि देवी या नगरीच्या सीमेवरच कोठे तरी असल्या पाहिजेत.

हल्लीं ही यात्रा निराळ्या क्रमानें होत असते; व तिला—

## नगरप्रदक्षिणा

म्हणतात. कार्तिक शुद्ध ९ ( कूष्मांड-नवमी ) च्या दिवशीं **कर्कराजतीर्थावर** स्नान आणि तेथे **कर्केश्वर** महादेवाचें दर्शन व पंचरत्नसहित कूष्मांड दान; नंतर **नागतीर्थ** ( नागतलाई ) येथे स्नान व **नागेश्वराचें** दर्शन; नंतर ( गोणसा नांवाच्या गांवाच्या सीमेवर ) **लवांकुशाचें** दर्शन, **यमधर्मराजाचें** दर्शन, व **साडुमाता** नांवाच्या देवीचें दर्शन; नंतर ( कालियादेह येथे ) **ब्रह्मकुंडावर** किंवा **सूर्यकुंडावर** स्नान आणि पुरुषांनीं गोप्रदान व स्त्रियांनीं सौभाग्यदान; नंतर **खंडेश्वर** व **पत्तनेश्वर** यांचें दर्शन; नंतर **नीलगंगाकुंडावर** वंदन व मारुतीचें दर्शन; नंतर पुन्हा **कर्कराजतीर्थावर** स्नान व **कर्केश्वराचें** दर्शन; आणि शेवटीं **हरसिद्धिदेवीचें दर्शन** करून घरीं येणें; हा या यात्रेचा क्रम होय.

७. **सप्तसागरयात्रा**—ही यात्रा **पुरुषोत्तम** महिन्यांत(अधिक मासांत) करण्याचा परिपाठ आहे. क्षेत्रमाहात्म्यांत (अध्याय ६०) पुढें दिलेल्या सात सागरांपैकीं फक्त **पुरुषोत्तमसागरांत** पुरुषोत्तम महिन्यांत स्नान करण्याचें माहात्म्य वर्णिलें आहे. सातांहि सागरांत त्या महिन्यांत स्नान करण्याचा विधि सांगितलेला कोठे आढळला नाहीं. परंतु परिपाठ तसा पडला आहे:—

(१) **रुद्रसागर**—स्नान आणि वृषभ व लवणदान—**श्रीमहाकालेश्वर** व **हरसिद्धि** यांचें दर्शन.

[२] **पुष्करसागर**—स्नान—पुष्करराज नामक रत्न आणि चणे व गूळ यांचें दान.

[३] **क्षीरसागर**—स्नान—क्षीरपात्रदान—**श्रीशेषशायी नारायणाचें** दर्शन.

(४) **गोवर्धन सागर**—स्नान—गोधूम व गूळ यांचें दान—**मारुतीचें** दर्शन.

(५) **रत्नाकर सागर**—स्नान—पंचरत्नदान व सौभाग्यदान—**सप्तर्षींचें** दर्शन.

(६) **विष्णुसागर**—स्नान—विष्णूच्या सुवर्ण-प्रतिमेचें दान—**जनार्दनजींचें** दर्शन.

(७) **पुरुषोत्तम सागर** (सोळासागर)—स्नान-कांस्यपात्र दान, सूपदान व गोदान. हा या यात्रेचा क्रम होय. कोणीं अधिक मासभर प्रत्येक दिवशीं एक एक सागराचें व शेवटल्या दिवशीं सातांहि सागरांचें किंवा सर्व सागररूप अशा एकट्या **पुरुषोत्तमसागराचें स्नान** करीत असतात. आणि यात्रेनंतर यथाशक्ति ब्राह्मणभोजन करण्याचाहि परिपाठ आहे.


(८) **विष्णुयात्रा** ( क्षेत्रमा. अ. २७ )—हिला **क्षेत्रयात्रा**हि ह्मणतात. भगवान् **श्रीकृष्ण** येथे **सांदीपनी**च्या आश्रमांत विद्याभ्यासाकरितां रहात असतां, (१) **शंखोद्धार**, (२) **विश्वरूप**, (३) **गोविंद**, (४) **चक्रपाणी** व (५) **अंकपाद**, या पांच भूमि त्यांच्या पादनिक्षेपानें पुनीत झाल्या असल्यामुळें तीं **विष्णुक्षेत्रें** ह्मणवतात. त्यांची ही यात्रा होय. या पांच क्षेत्रांपैकीं (२) **विश्वरूप**, सिंहपुरींत, (४) **चक्रपाणी**, क्षिप्रेच्या उत्तरतीरावर व बाकीचीं तीन हल्लीं ज्याला **अंकपाद** ह्मणतात तेथे आहेत.

**मंदाकिनीतीर्थांत** स्नान करून **राम** व **जनार्दन** यांचें दर्शन; **शंखोद्धार तीर्थावर** स्नान करून **बलराम** व **केशव** यांचें दर्शन; **गोमतीकुंडांत** स्नान करून **गोविंदाचें** पूजन; नंतर **चक्रपाणी**, **शंखोद्धार**, **अंकपाद** व **विश्वरूप** येथील विष्णुमूर्तींचीं दर्शनें व **करीकुंडांत** स्नान; पुन्हा पूर्ववत् **बलदेव** व **केशव** यांचें दर्शन; **गोमतीकुंडांत** स्नान व **गोविंदाचें** पूजन; पुन्हा **बलदेवाचें** दर्शन व क्षिप्रास्नान करून **केशवाचें** पूजन; नंतर **अंकपाद** क्षेत्रांत रात्रीं शुचिर्भूतपणानें निवास; आणि दुसऱ्या दिवशीं पांच ब्राह्मणांसह अंकपाद येथेच भोजन; हा या यात्रेचा क्रम होय.

त्याचप्रमाणें, **शंखोद्धार** येथे गोप्रदान, **विश्वरूप** क्षेत्रांत हयदान, **गोविंद** क्षेत्रांत गजदान आणि **चक्रपाणी** क्षेत्रांत सर्वस्वदान, हीं या यात्रेंतील दानें असून शिवाय **अंकपाद** येथे द्वादशीच्या दिवशीं उपोषण करून क्षेत्रनाथाचें यथाविधि पूजन व श्राद्ध करणें, हें महत्पुण्यप्रद सांगितलें आहे.

(९) **नरदीपयात्रा** ( क्षेत्रमा. अ. ३६ )—ही सूर्याची रथयात्रा होय. ज्येष्ठ शु० २ च्या दिवशीं सूर्याची मूर्ति रथांत बसवून

कुशस्थलींतून त्याची मिरवणूक काढावी; व मिरवणुकींत रथ हातानें ओढीत न्यावा. हा रथ उत्तर दिशेकडून निघून केशवार्काच्या मंदिरावरून जात असतां व पुढें दक्षिणाभिमुख झाला असतां, त्यांतील सूर्याच्या मूर्तीचें दर्शन घ्यावें; आणि कुशस्थलींत सर्वत्र रथ हिंडून परत स्वस्थानीं आल्यावर रात्रीं रथ पूर्वाभिमुख उभा करून त्याच्या भोंवतीं किंवा देवाभोंवतीं वस्त्र गुंडाळून ठेवावें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मौनपूर्वक रथाच्या पूर्वद्वारावर जाऊन देवाला नमस्कार करावा; त्याच्या दक्षिणबाजूस जाऊन रथचक्राची पजा करावी व देवाला नमस्कार करावा; नंतर पश्चिमद्वारावर जाऊन सूर्यनारायणाचें पूजन व त्याला चामरवितानादि उपचारांचें निवेदन करावें; नंतर उत्तरेकडे जाऊन दुसऱ्या रथचक्राचें पूजन व सूर्याला वंदन करावें; आणि शेवटीं पुन्हा पूर्वद्वारावर जाऊन नारायणाला प्रणिपात करावा. रथाच्या पूर्वद्वारावर गोदान, दक्षिण-द्वारावर अश्वदान, पश्चिमद्वारावर गजदान व उत्तरद्वारावर रथदान केल्यावर देवाचें विसर्जन करावें. अशा प्रकारचा हा या यात्रेचा कार्यक्रम क्षेत्रमाहात्म्यांत सांगितला आहे. परंतु सांप्रत ही यात्रा बहुधा कोणीं करीत नाहीं, असें ऐकण्यांत येतें.



श्रीमहाकालेश्वराचें मंदिर.
( कोटितीर्थाकडील भाग ).

# प्रकरण चवथें.

## विशेष वर्णनीय देवस्थानें.

उज्जयिनी येथील काहीं सुप्रसिद्ध देवस्थानांविषयीं विशेष माहितीहि जिज्ञासुला पुरविणें इष्ट आहे. म्हणून ती आह्मीं येथे देत आहोंत :—

### १. श्रीमहाकालेश्वर.

क्रीडाकुंडाले तोरगेश्वर तनूकारादि रूढाम्बरा— ।
नुस्वारं कलयन्नकार रुचिराकार: कृपार्द्र: प्रभु: ॥
विष्णोर्विश्वतनोऽरवंति नगरीहृत्पुंडरीकेवस— ।
न्नोंकाराक्षरमूर्तिरस्य तु महाकालोन्तकालं सताम् ॥ १ ॥

—मंदिरांतील नागबंध.

भरतखंडांत श्रीशंकराचीं बारा ज्योतिर्लिंगें सुप्रसिद्ध आहेत[1], त्यांपैकीं **श्रीमहाकालेश्वर** हें एक **ज्योतिर्लिंग** होय. या शिव-

---

१. सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनं । उज्जयिन्यां महाकाल-मोंकार ममलेश्वरम् ॥ परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरं । सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमी तटे । हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ॥— (१) **सोमनाथ**, काठ्यावाडांत; (२) **मल्लिकार्जुन**, श्रीशैलावर, मोगलाईत; (३) **महाकालेश्वर**, माळव्यांत उज्जनीस; (४) **ओंकारेश्वर**, नर्मदातीरीं, एका बेटांत; (५) **वैज-**

लिंगाचा महिमा, महाभारतांतील वनपर्वांत, स्कंदपुराणांतील अवंतिखंडांत, मत्स्य व नृसिंह पुराणांत, आणि आधुनिक शिवलीलामृतांत, विस्तारपूर्वक वर्णिला आहे. सोमदेवभट्टकृत कथासरित्सागरांत, कालिदासकृत रघुवंश व मेघदूत या काव्यांत या ज्योतिर्लिंगाचा महाकाल, महाकाय, वगैरे नांवांनीं उल्लेख केलेला आहे. हिंदी विश्वकोशांत त्याचें अनंतकल्पेश्वर असें एक नांव दिलें आहे. आणि अलबेरूनी नांवाच्या अरबी व फरिष्ता नांवाच्या फारसी इतिहासकारांनींहि या शिवालयाचें बरेंच वर्णन कल आहे.

महाकालेश्वराचें मंदिर प्रथमारंभीं विश्वकर्म्यानें बांधलें; त्याचें सोन्याचें शिखर इतकें उंच होतें कीं त्यावरून अवंतिका नगरीला लोक स्वर्णशृंगा ह्मणत असत; असें त्याचें वर्णन अवंतिखंडांत केलें आहे. त्याचप्रमाणें, हें मंदिर फार मोठें व भव्य होतें; त्याचा विस्तीर्ण सभामंडप दगडी नकशीदार खांबांवर उभारलेला होता; सभामंडपाच्या महाद्वारावर एक मोठी थोरली घंटा सोन्याच्या सांखळीनें टांगलेली होती व तिच्यावर मोत्यांची झालर लोंबत असे; मंदिराच्या गाभाऱ्यांत व सभामंडपांत रत्नखचित दीपस्तंभ उभारलेले होते व त्यांवरील दिव्यांच्या योगानें

---

**नाथ**, परळी येथे महाराष्ट्रांत; ( ६ ) **भीमाशंकर**, भीमानदीच्या उगमावर; ( ७ ) **रामेश्वर**, सेतुबंध येथे, मदुरा जिल्ह्यांत, पांबन बेटांत; ( ८ ) **नागेश्वर**, औंढा येथे, महाराष्ट्रांत; ( ९ ) **विश्वेश्वर**, काशीक्षेत्रीं; (१०) **त्र्यंबकेश्वर**, गोदावरीनदीच्या उगमावर, नाशिकाजवळ; (११) **केदारेश्वर**, हिमालयावर; व (१२) **घृष्णेश्वर**, वेरूळ येथें.

सर्वत्र नेहमी लखलखाट झालेला असे; अशा प्रकारचींहि त्याच्या पूर्वकालीन वैभवाचीं वर्णनें इतरत्र आढळतात.

अलीकडच्या काळांत विक्रमादित्यानें महाकालेश्वराचें मंदिर बांधविलें होतें आणि तें बरेंच मोठें व भव्य असून त्याचें शिखरहि दुरून दिसत असे, असें सांगतात. या मंदिराच्या सभामंडपांत विक्रमादित्याची एक मोठी थोरली सुवर्णमयी प्रतिमा बसविली गेली होती, असा इतिहासांत दाखला सांपडतो. शिवाय, महाकालेश्वराच्या नित्यपूजेंत पवित्र गंगा-जलाचा अभिषेक होत असे; त्यांच्या पूजेचीं उपकरणं सोने-चांदीचीं व त्यांवर मौल्यवान् रत्नें जडलेलीं अशीं होतीं; देवाच्या मूर्तीवर नित्य व सणावारीं नानाविध रत्नांचे अनेक अलंकार घातले जात असत; असें या मंदिराच्या तत्कालीन वैभवाचें वर्णन अनेक ठिकाणीं आढळतें व तें विक्रमादित्याच्या लौकिकास साजेसेंहि दिसतें. तेव्हां, या राजानें आपल्या राज्याच्या व राजधानीच्या वैभवाला पराकाष्ठेस नेऊन पोंचविल्याच्या ज्या कथा प्रसिद्ध आहेत, त्यां-प्रमाणें उज्जनीची शोभा, सौंदर्य व ऐश्वर्य, यांची सर्व बाजूनें अभिवृद्धि करतांना, विक्रमादित्यानें हें मंदिर बांधवून व त्याला अनेक प्रकारच्या देणग्या देऊन महाकालेश्वराचें संस्थान आपल्या कारकिर्दींत धनकनकसंपन्न करून ठेविलें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

विक्रमादित्यानंतर हजार वर्षांनीं, ईसवी सनाच्या अकराव्या शतकांत, भोजराजानें या मंदिराचा जीर्णोद्धार केला त्या वेळीं

१. हें मंदिर भोजराजानें बांधविलें असा धारच्या प्राचीन इतिहासांत (पृ० ४०) व मध्ययुगीन भारतांत (भा. ३ रा, पृ० २५६)

त्यानें त्याचा बराच विस्तारहि केला असावा व त्याच्या कालांत तें आपल्या अलोट संपत्तिविषयींहि बरेंच प्रसिद्ध असावें असें दिसतें. कारण हें मंदिर श्रीसोमनाथाच्या मंदिरासारखें होतें व त्याच्या भोंवतीं शंभर गज उंचीचा (?) कोट होता, असें त्याचें वर्णन फरिष्ता यानें आपल्या ग्रंथांत केलें आहे, तें अर्थातच त्याच्या सुसंपन्नतेचें व भव्यपणाचें निदर्शक होय.

सोमनाथाच्या मंदिरांत सांठलेल्या संपत्तीनें जसें महमूद गजनवीचें लक्ष वेधलें तसें या मंदिरांत सांठलेल्या संपत्तीनें दिल्लीचा गुलामवंशीय सुल्तान शमसुद्दीन अल्तमश याचें लक्ष वेधलें. त्यानें ई. स. १२३५ त उज्जनीवर स्वारी केली. भोजदेवानें आपली राजधानी तेथून धारेस नेली तिच्या बरोबर तेथील लष्करी ठाणेंहि बहुतेक उठलेलेंच होतें. यामुळें अल्तमशचा शहरांत प्रवेश होण्यास फारसा अडथळा झाला नाहीं; पण तेथील देवालयांच्या रक्षणार्थ त्या वेळीं भोंवतालचे लहान-मोठे राजे-रजवाडे तेथे बरेच धावून आले होते, त्यांनीं व तेथील काहीं सैनिकांनीं मिळून महाकालेश्वराच्या मंदिराजवळ त्याला अडविलें. त्यांनीं मंदिराच्या तटाचा आश्रय घेऊन तीन दिवस निकराचें युद्ध केलें. पण शेवटीं अल्तमशच्या तोफांनीं मंदिराचा तट पाडला गेला व त्या सर्वांना हार खावी लागली. याप्रमाणें महाकालेश्वराच्या मंदिराचा मार्ग मोकळा होतांच अल्तमश मंदिरांत शिरला व थेट देवाच्या गाभाऱ्यांत जाऊन उभा राहिला. तेथें त्यानें महाकालेश्वराच्या लिंगावर आघात करून त्याचा एक

उल्लेख आहे, तो या राजानें केलेल्या जीर्णोद्धारास अनुलक्षून असावा असें वाटतें.

१. सरस्वती नामक हिंदी मासिक, भाग १५, संख्या ५.

लहानसा तुकडा पाडला. नंतर त्यानें महाकालाची सोन्याची चलमूर्ति व विक्रमादित्याचा सोन्याचा पुतळा, यांसह मंदिरांतील सर्व संपत्ति आपल्या ताब्यांत घेतली. आणि महाकालाचें लिंग मुळापासून खणून तें फेकून देण्याविषयीं व मंदिर पाडून त्या जागीं मशीद बांधण्याविषयीं आपल्या अधिकारी वर्गास ताकीद देऊन, मंदिरांतील लुटीसह तो दिल्लीस निघून गेला.

पुढें त्याच्या ताकीदीप्रमाणें महाकालाचें लिंग खणून काढलें गेलें; पण तें दुसरीकडे वाहून नेण्यासाठीं मंदिराच्या बाहेर, अर्थात् कोटितीर्थाच्या कांठीं, ठेविलें असतां तेथून गडगडून कोटितीर्थांत पडलें व त्याच्या तळाशीं पोंचलें. कोणीं ह्मणतात अल्तमशच्या माणसांनींच तें जवळच्या कोटितीर्थांत लोटून दिलें. भाविकांचें ह्मणणें महाकालेश्वर कोटितीर्थांत गुप्त झाले असें आहे. पण तो प्रकार कसाहि घडला असला तरी मुख्य गोष्ट ही कीं अल्तमशच्या माणसांनीं खणून काढलेलें महाकालेश्वराचें लिंग दुसरीकडे कोठे न जातां कोटितीर्थांत गेलें असें त्यावरून दिसतें. पुढें मंदिर पाडून त्या जागीं अल्तमशच्या हुकमाप्रमाणें बांधलेली मशीद तेथे बरेच दिवस होती.

तदनंतर ई. स. १७३४ त उज्जन शहर कै० राणोजीराव शिंदे यांच्या ताब्यांत आलें. तेव्हां त्यांचे दिवाण रामचंद्रबाबा शेणवी यांनीं मशीद पाडून किंवा कालगतीनें बहुतेक पडलेली मशीद काढून टाकून त्या जागीं, ह्मणजे अर्थात् पूर्वीं ज्या जागीं मंदिर होतें त्या जागीं, नवीन मंदिराची उभारणी केली. आणि

१. "The temple of Mahakal stands in this ward (kot) *on the site of the famous temple*

कोटितीर्थांत गुप्त झालेलें महाकाळाचें पूर्वीचें लिंग काढून त्याची त्या मंदिरांत प्राणप्रतिष्ठादि विधिपूर्वक स्थापना करविली. हल्लीं जें **श्रीमहाकालेश्वराचें** मंदिर आहे तें तेंच, **रामचंद्रबाबानें** बांधविलेलें मंदिर होय. या मंदिराच्या आवाराच्या दक्षिण, उत्तर व पूर्व या तीन बाजूचे सोपे, मंदिराच्या पूर्वेकडील नगारखान्याचा मोठा दरवाजा व उत्तरेकडील लहान दरवाजा यांच्या मुसलमानी बांधणीवरून ते त्या मशीदीच्या चौसोपीचे अवशेष असावेत, असें वाटतें; व हल्लीं त्यांचा धर्मशाळेसारखा उपयोग होत असतो.

याप्रमाणें पूर्वीचे **श्रीमहाकालेश्वर** पुन्हा स्वस्थानीं विराजमान झाल्यानंतर त्यांची नित्य-नैमित्तिक पूजा-अर्चा व उत्सव-महोत्सव यांच्या खर्चासाठीं शिंदे, होळकर व पवार यांच्याकडून चार हजार रुपयांची वार्षिक नेमणूक कायम झाली; व यांतून हल्लीं या संस्थानचा एकंदर खर्च **ग्वाल्हेर** दरबारच्या—ह्मणजे त्यांच्या उज्जनी येथील अधिकाऱ्याच्या—देखरेखीखालीं होत असतो.

**ग्वाल्हेर** दरबारांनीं या मंदिराला एक चौघडाहि अर्पण केला आहे व तो त्याच्या महाद्वारावर नित्य दोन दोन प्रहराच्या अंतरानें वाजत असतो.

देवाच्या गाभाऱ्यांत प्रवेश करण्याचें द्वार दाक्षिणाभिमुख असून त्याच्या समोर, गाभाऱ्याच्या बाहेर, दक्षिण बाजूस, नंदिकेश्वराची मूर्ति आहे; आणि गाभाऱ्याच्या आंत देवाच्या पश्चिम, उत्तर व पूर्व दिशेकडील भिंतींच्या कोनाड्यांत अनुक्रमें,

---

*destroyed by Altamash* in 1235"—Gwalior State Gazetteer (1908), Vol. I, p. 300.

गणपति, पार्वती व षडानन, यांच्या मूर्ति आहेत. गाभाऱ्यांत सर्वत्र संगमरवरी दगडाची फर्शी केलेली आहे. श्रीमहाकालेश्वराची शालुंका चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेली आहे. व त्यांच्या पुढें एक तुपाचा व एक तेलाचा असे दोन अखंड नंदादीप अष्टौप्रहर तेवत असतात.

**नित्यपूजा**—महाकालेश्वराची एक भस्मपूजा व तीन षोडशोपचार पूजा, अशा चार पूजा नित्य होतात: पंच पंच उषःकालीं **भस्मपूजा** होते, त्यांत देवाचें पंचोपचार पूजन व त्यांना चिताभस्माचें लेपन करून कांकड आरती करतात; नंतर **प्रथमपूजा** प्रातःकालीं होते; मध्यान्हीं **महापूजा** होत असते; आणि प्रदोष-कालीं **प्रदोषपूजा** होऊन शेजआरती करतात.

**श्रावणी सोमवार**—या दिवशीं श्रीमहाकालेश्वराच्या दर्शनाचें माहात्म्य विशेष असल्यामुळें आसपासच्या गांवचे लोक दर्शनासाठीं फार येतात; व मंदिरांत बरीच गर्दी असते. प्रत्येक सोमवारीं सायंकाळीं महाकालेश्वराची स्वारी—ह्मणजे, त्यांच्या चांदीच्या चलमूर्तीची पालखींतून मिरवणूक—निघत असते. ही स्वारी मंदिरांतून वाजत-गाजत निघाल्यावर प्रथम क्षिप्रातीरीं जाते; तेथे महाकालेश्वर व क्षिप्रादेवी यांची भेट होते; व तेथून निघाल्यावर श्रीगोपालकृष्णाच्या मंदिरावरून बाजारांतून मिरवीत, देव परत स्वस्थानीं येत असतात.

दसरा—मराठी राज्यांत दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं सीमोल्लंघन व शमीपूजन करण्यासाठीं राजाची, व जेथे राजे नसतील तेथे त्यांच्या मुख्य अमलदारांची, स्वारी, विद्यमान सर्व लवाजम्यानिशीं, वाजत-गाजत, निघण्याचा परिपाठ सर्वत्र आहे; व

त्याप्रमाणें ती येथेहि निघते. पण अवंतिका नगरीचे राजे श्रीमहाकाल असल्यामुळें येथील दसऱ्याच्या स्वारींत अग्रभागीं महाकालेश्वराची—त्यांच्या रौप्य मूर्तीची—पालखी असते व तिच्या मागून तेथील अधिकारी वर्ग आपआपल्या वाहनावर स्वार होऊन चालत असतो. ही महाकालेश्वराची स्वारी गोपालमंदिरा-वरून व सराफ्यांतून गांवाबाहेर जाते; व तेथे शमीपूजनाचा विधि अटोपल्यावर परत स्वस्थानीं येत असते.

**वैकुंठचतुर्दशी**—हा हरि-हर-भेटीचा दिवस होय. या दिवशीं श्रीमहाकालेश्वराची स्वारी गोपालकृष्णाच्या भेटीसाठीं गोपालमंदिरांत जाते व श्रीगोपालकृष्णाची स्वारी महाकालाच्या भेटीसाठीं महाकालेश्वराच्या मंदिरांत येत असते. या स्वाऱ्या लवाजम्यानिशीं वाजत-गाजत थाटानें निघतात. आणि महाकाले-श्वरांनीं तुलसीपत्रानें गोपालकृष्णाचें पूजन करणें व तसच गोपालकृष्णांनीं बिल्वपत्रानें महाकालाचें पूजन करणें, हा त्या उभयतांच्या भेटीचा कार्यक्रम होय.

उज्जनीस महाराणी बायजाबाई साहेबांनीं मंदिर बांधून त्यांत गोपालकृष्णाच्या मूर्तीची स्थापना केल्यानंतर त्याच्या उत्सव-महोत्सवाचा जो कार्यक्रम ठरविला, त्यांत या हरिहरभेटीची योजना झाली आहे व तेव्हांपासून ती तेथे चालू आहे.

**महाशिवरात्र**—ही पर्वणी येथे फार महत्वाची आहे. मंदिरा-च्या विस्तीर्ण आवारांत या दिवशीं मेळा भरलेला असतो. सर्व पटांगण स्त्रिया, पुरुष व मुलें, यांच्या योगानें फुलून गेलेलें असतें. त्यांत फुलें-बेलपत्री, मेवा-मिठाई, यांचीं अनेक दुकानें लागलेलीं

असतात, व उज्जनीचीं देशदेशांतरीं प्रसिद्ध असलेलीं पेवंदी, ह्मणजे कलमी, बोरें, यांचे ढीग पडलेले असतात; मंदिरांत दर्शनेच्छु लोकांची नुसती गर्दी उसळलेली असते; महाकालेश्वरावर पाणी व बेलपत्री यांचा सारखा वर्षाव होत असतो; आणि मंदिराबाहेर श्रीमहाकालेश्वरा प्रीत्यर्थ कोटेश्वरावर एकादशण्यांची झोड चाललेली असते.

शिवरात्रीच्या प्रदोषपूजेनंतर नित्याप्रमाणें देवाची शेज-आरती होत नाहीं. या दिवशीं रात्रींहि एक **महापूजा** होत असते. तिचा आरंभ प्रदोषपूजेनंतर लागलाच थोड्या वेळानें होतो. ही **महापूजा** व मुख्यत्वेंकरून त्यांतील **पंचामृतपूजा** आणि शेवटली **धान्यपूजा** व **पुष्पपूजा,** या तीन पूजा, अत्यंत प्रेक्षणीय होत. अशी महापूजा इतरत्र क्वचित् पहावयास सांपडते. यास्तव ती पाहण्यासाठीं अनेक लोक आरंभापासून शेवटपर्यंत सोंवळ्यानें देवाच्या गाभाऱ्यांत येऊन बसलेले असतात. या महापूजेचें आन्हिक बरेंच लांब-लचक असल्यामुळें तिचा आरंभ जरी रात्रीच्या दहाच्या सुमारास होतो तरी त्यांतल्या शेवटच्या पुष्पपूजेंत देवावर सर्व प्रकारच्या फुलांचा जो भला थोरला मुकुट बांधीत असतात तो बांधण्याचें काम संपतें तों दुसऱ्या दिवसाचा—पारण्याचा-सूर्योदय होत असतो.

एरव्हीं महाकालेश्वराच्या नित्य-नैमित्तिक सर्वच पूजा प्रेक्षणीय आहेत. पण त्यांतल्या त्यांत, या रात्रीच्या मध्यभागीं, प्रशांत समयीं, होणाऱ्या त्यांच्या महापूजेचा विशाल वैदिक कार्यक्रम, हा फार प्रभावशाली असून, तो संपतो न संपतो तोंच, नाना प्रकारच्या धान्य राशींच्या मध्यें स्थित असलेल्या

व अनेकविध पुष्पांचा प्रचंड मुकुट धारण केलेल्या त्या भय-कृत्भयनाशनाच्या भव्य मूर्तीचा जो अदृष्टपूर्व देखावा डोळ्यांपुढें दिसूं लागतो तो नुसता पहावा मात्र, शब्दानें त्याचें वर्णन करतां येत नाहीं.

पारण्याच्या दिवशीं सकाळचे नऊ वाजले ह्मणजे या झांकीचें विसर्जन होतें व तद्नंतर त्या दिवसाची भस्मपूजा होत असते.

या महापूजेच्या समारंभाखेरीज येथे महाशिवरात्रीचा उत्सव-हि माघ कृष्ण ६ पासून १४ पर्यंत होत असतो. त्याची माहिती पूर्वीं दुसऱ्या प्रकरणांत दिलीच आहे.

## २. श्रीहरसिद्धिदेवी.

हें स्थान रुद्रसागराच्या पश्चिम तीरावर जोगीपुऱ्यांत आहे. मंदिराच्या भोवतीं उंच दगडी कोट असून त्याला चारहि दिशेस चार द्वारें आहेत. पूर्व व उत्तर या दोन द्वारांवर बसण्यासाठीं बाराद्वाऱ्या बांधलेल्या आहेत. पूर्वेकडील दरवाजाखालीं एक लहानशी गुफा आहे. मंदिराच्या पूर्वद्वारास लागून असलेल्या रुद्रसागरांत काहीं वर्षांपूर्वीं सदासर्वकाळ विपुल पाणी रहात असे व त्यांत लाल कमळें फार होत असत. परंतु अलीकडे पावसाळ्यांत भोवतालच्या प्रदेशांतून वाहून आलेल्या मातीनें हा तलाव बराच पुरला गेला आहे. त्यांत पाणी फार कमी रहातें यामुळें आतां त्यांत कमळें होत नाहींत. अर्थात् तेथील हें नैसर्गिक सौंदर्य हल्लीं नष्ट झालें आहे.

या मंदिराची बांधणी जुनी हेमाडपंती पद्धतीची असून मजबूत आहे. मंदिर फारसें मोठें नाहीं. मध्यम प्रतीचें आहे. त्याचें

महाद्वार पूर्वाभिमुख आहे. द्वारमंडपांत व्याघ्राची दगडी प्रतिमा बसविलेली आहे. महाद्वारापुढें दोन दीपस्तंभ उभारलेले आहेत. महाद्वारांतून आंत शिरल्याबरोबर चतुष्कोण सभामंडप लागतो. तो प्रशस्त आहे; पण त्याच्या पुढचा देवीचा गाभारा अगदीं लहान आहे. दर्शनासाठीं गाभाऱ्यांत जातां येत नाहीं. सभामंडपांतून दर्शन घ्यावें लागतें.

गाभाऱ्यांत सिंहासनावर एक शिला बसविली असून तिच्यावर शेंदुर फांसलेला असतो. या शिलेवर **श्रीयंत्र** कोरलें असून मंत्रशास्त्रोक्त विधीनें त्या यंत्राची स्थापना झाली आहे असें सांगतात. हें **श्रीयंत्र** ह्मणजेच **हरसिद्धिदेवी** होय. श्रीयंत्राच्या पश्चिम बाजूस एक देवीची मूर्ति उभी आहे. पण तिचें नांव **अन्नपूर्णा** आहे; ती हरसिद्धि नव्हे. **स्कंद**पुराणान्तर्गत अवंतिखंडांत (क्षेत्रमा. अ. २०) हरसिद्धिदेवीचें माहात्म्य वर्णिलें असून त्यांत महानवमी—आश्वीन-शुद्ध नवमी—च्या दिवशीं तिला रेड्याचा बली देण्याचा विधि सांगितला आहे. त्याप्रमाणें काहीं कालपूर्वीं तेथे बलिदान होत असे, असें ह्मणतात. परंतु सांप्रत तेथे रेडा-बोकड-कोंबडा वगैरे कसलेंहि बलिदान होत नाहीं. मग तें केव्हांपासून कां बंद पडलें असेल तें असो. हल्लीं सकाळ-संध्याकाळ दोन वेळ पूजा, आरती व सप्तशतीचा पाठ हा तेथील अर्चनाचा नित्यक्रम होय.

शारदी नवरात्रांत नऊ दिवस—आश्वीन शुद्ध १ ते ९—या मंदिरांत उत्सव होतो. देवीवर नित्य नवी फुलांची माळ बांधतात; सभामंडपांत रात्रंदिवस अनेक देवीउपासक सप्तशतीच्या पाठास बसलेले असतात; दर्शनेच्छु लोकांची बरीच गर्दी असते; व मंदिराच्या उत्तर दरवाजावर प्रहरा-प्रहरानें चौघडा झडत असतो.


नवरात्राच्या पांचव्या दिवसापासून नवमीपर्यंत रोज सायंकाळीं महाद्वाराच्या पुढील दोन्हीं दीपस्तंभावर दीपमालिका उजळली जाते; व नवमीच्या दिवशीं सप्तशतींतील मंत्रानें हवन होत असतें.

**परमार** कुलांतील रजपूतांची ही देवी कुलदैवत आहे, असें ह्मणतात. **विक्रमादित्यानें** या मंदिरांत कित्येक वर्षें तपश्चर्या केल्यावर प्रसन्न होऊन देवीनें त्याला दर्शन दिलें होतें, अशी एक दंतकथा प्रसिद्ध आहे.

## ३. श्रीगोपाळकृष्ण.

**श्रीगोपाळकृष्णाचें** मंदिर उज्जनीच्या मध्यवस्तींत आहे; व त्याला **गोपाळमंदिर** ह्मणतात. तें **द्वारकाधीशाचें मंदिर**ही ह्मणवतें. कै० महाराणी बायजाबाई साहेब शिंदे यांचें **गोपाळकृष्ण** हें उपास्य दैवत होतें, ह्मणून त्या उज्जनीस रहात असतां त्यांनीं हें मंदिर बांधविलें; आणि त्यांत श्रीगोपाळकृष्णाची स्थापना केली. मंदिर बांधण्यासाठीं जागेची निवड करण्यांत बायजाबाई साहेबांनीं आपल्या निरीक्षण-कौशल्याचें व योजना-चातुर्याचें चांगलेंच आविष्करण केलें आहे. तेथे दक्षिणोत्तर वसलेल्या पटणीबाजार व सब्जीमंडी या दोन बाजार पेठा मंदिराच्या महाद्वारापुढें येऊन एकमेकीस भेटाव्या, आणि पूर्व व पश्चिम वसलेली सराफपेठ या मंदिराच्या महाद्वाराच्या समोर यावी, अशी जागा त्यांनीं मंदिरासाठीं निवडली; आणि सराफ्याकडून मंदिराकडे येणाराला दुरून **गोपाळकृष्णाचें** दर्शन होत जावें, अशा बेतानें मंदिराच्या जोत्याची उंची साधून त्यांनीं हें मंदिर बांधविलें आहे.

मंदिराचें बांधकाम सर्व दगडी व मजबूत आहे. त्याचा मुख्य भाग, ह्मणजे देवाचा गाभारा व त्यावरचें शिखर संगमरवरी



श्रीगोपाळमंदिर.

असून तादितर सभामंडप, चौसोपी, आवाराची फर्शी, महाद्वार, नगारखाना, वगैरे सर्व भाग काळ्या कुरुंदाचे आहेत. गाभाऱ्यावरचें शिखर बरेंच उंच असून त्याची बांधणी फार सुरेख आहे. गाभाऱ्याचें द्वार चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेलें आहे व त्याला दुहेरी कवाडें आहेत. आंतल्या बाजूचीं कवाडें चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेलीं आहेत आणि बाहेरच्या बाजूचीं कवाडें चांदीच्या चौकटींत बसविलेल्या हिरव्या व पांढऱ्या दगडाचीं आहेत. हीं दगडी कवाडें गजनी येथे तयार झालेलीं आहेत, असें ह्मणतात; व त्यांची घडणही कांहींशी मुसलमानी तऱ्हेची दिसते. पुढचा सभामंडप प्रशस्त व उंच असून हंड्या, झुंबरें व तसबीरा, यांनीं तो नेहमीं शृंगारलेला असतो. त्याच्या उत्तर व दक्षिण बाजूस दोन दुमजली दालनें आहेत. सभामंडपांत कीर्तन, पुराण, कृष्णलीला होत असतां, श्रवणासाठीं येणाऱ्या मंडळीपैकीं पुरुष या दालनांच्या तळमजल्यांत व स्त्रिया वरच्या मजल्यांत बसत असतात. मंदिराच्या चारहि बाजूस थोडें आवार मोकळें सोडून प्रशस्त चौसोपी बांधलेली आहे. आणि मंदिराचें महाद्वार पूर्वाभिमुख असून त्यावर नगारखाना आहे.

मंदिरांत श्रीगोपाळकृष्णाची शामवर्ण मूर्ति आणि तिच्या डावी व उजवीकडे अनुक्रमें राधिका व शंकर यांच्या गौरवर्ण मूर्ति, अशा तीन मूर्तींची स्थापना एका ओळींत झालेली आहे; आणि त्यांच्या डावीकडे राधिकेच्या, बाजूस गरुडाची मूर्ति असून उजवीकडे शंकराच्या बाजूस बायजाबाई साहेब यांची शुभ्र संगमरवरी प्रतिमा बसविली आहे. गोपाळकृष्णाच्या हनुवटींत हिरा बसविण्याची जागा केलेली आहे व त्यांत केव्हां केव्हां एक तेजस्वी

हिरा बसवीत असतात. तसेंच देवाचे रोज व सणावारीं घालण्याचे निरनिराळ्या प्रकारचे पोशाक, जडाऊ व सोन्या-मोत्यांचे अनेक अलंकार, त्यांच्या नित्यपूजेंत चांदीचीं उपकरणें, चांदीचे पलंग, वगैरे देवाचा सर्व थाट राजकीय आहे. नित्य-नैमित्तिक पूजाअर्चा व बालभोग, राजभोग, वगैरेची व्यवस्थाहि राजकीय थाटाची असून त्याच्या खर्चासाठीं चार हजार रुपयांची वार्षिक नेमणूक करून दिली गेली आहे. देवापुढें रोज पुराण, गायन, व प्रति एकादशीला कीर्तन होत असतें.

**गोकुळअष्टमी**—श्रावण वद्य ८ च्या दिवशीं या मंदिरांत देवाचा जन्मोत्सव होत असतो. या उत्सवाचा आरंभ श्रावण वद्य १ स होतो व समाप्ति श्रावण वद्य १२ स होत असते. त्यांत प्रत्यहीं देवापुढें गायन व कीर्तन होतें; अष्टमीच्या रात्रीं देवाचा जन्म होतो; नंतर द्वादशीपर्यंत रोज कृष्णाच्या मुख्य मुख्य बाललीलांचें नाट्य करतात; आणि द्वादशीच्या दिवशीं गोपालकाला होऊन उत्सव समाप्त होत असतो.

**गोवर्धनोत्सव किंवा अन्नकूट**—हा उत्सव कार्तिक शुद्ध १ च्या दिवशीं होतो. त्यांत देवापुढें षड्रस अन्नाच्या राशींची गोवर्धन-पर्वताकार रचना करतात; नंतर देवाचें पूजन, कीर्तन व गायन होऊन त्या अन्नाचें देवाला निवेदन होतें; आणि शेवटीं त्यांत देवाच्या बाल-गोपालांचें भोजन होत असतें.

**हरिहरभेट**—वैकुंठचतुर्दशीच्या दिवशीं श्रीगोपालकृष्ण व श्रीमहाकालेश्वर यांची भेट होऊन परस्पर सत्कार होतो, त्याचा कार्यक्रम पूर्वीं महाकालेश्वराच्या वर्णनांत केलाच आहे.



क्षिप्रा नदीचा घाट.

# ४. श्रीक्षिप्रानदी.

प्राचीन संस्कृत ग्रंथांत या नदीचें नांव कोठे 'सिप्रा' तर कोठे 'शिप्रा' असें दिलें आहे. पूर्वीं मेधातिथी नांवाच्या ऋषीनें आपली कन्या अरुंधति हिचें दान वसिष्ठांस करतांना त्यांच्या हातावर जें उदक सोडलें तें हिमालयावरील सिप्रानामक सरोवराचें होतें व तें खालीं पडल्यावर या नदीच्या रूपास प्राप्त झालें, अशी या नदीच्या उत्पत्तिची कथा कालिका पुराणांत दिलेली आहे. त्यावरून या नदीचें मूळचें नांव 'सिप्रा' आहे, असें दिसतें. रघुवंशाच्या प्राचीन हस्तलिखित प्रतींत तिचें नांव 'सिप्रा' असून पुढें त्याच्या छापिल प्रतींत तें 'शिप्रा' झालें आहे. मेघदूतांत "सिप्रावातः प्रियतम इव प्रार्थना चाटुकारः" (श्लो. ३१) याप्रमाणें 'सिप्रा' शब्द आहे; पण त्याच श्लोकाच्या टीकेंत "शिप्रानाम······नदी तस्यावातः शिप्रावातः । शिप्राग्रहणं शैत्यद्योतनार्थं" याप्रमाणें 'शिप्रा' शब्दाचें ग्रहण केलें आहे. अवंतिखंडांत तिचा सर्वत्र 'शिप्रा' या नांवानें उल्लेख केला आहे. यावरून तिचें मूळचें किंवा यथार्थ असें नांव 'सिप्रा' असून पुढें तें 'शिप्रा' झालें व हल्लीं तिचें जें 'क्षिप्रा' हें नांव प्रचारांत आलें आहे तो 'शिप्रा' शब्दाचा अपभ्रंश असावासें वाटतें.

उज्जन शहराचा मध्यभाग बहुतेक नदीच्या पूर्वतीराशीं येऊन भिडला आहे; व तेवढ्या तीरावर, स्नान-वंदनादिकासाठीं नदींत उतरण्या-चढण्यास बरेच सुलभ व चांगले प्रशस्त असे अनेक घाट बांधले गेले आहेत. हे घाट निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या लोकांनीं बांधविलेले आहेत; परंतु त्यांपैकीं कोणत्याहि दोन घाटांच्या-

मध्यें खंड असा मुळींच राहूं न देतां सर्व घाट एकाला एक भिडवून बांधले गेले आहेत. यामुळें त्यांच्या दक्षिण टोंकावरील नीलगंगा-संगमापासून ते थेट उत्तर टोंकावरील गंधवतीसंगमापर्यंत घाट एकच आहे असें दिसतें. त्याचप्रमाणें या घाटांवर क्षिप्रानदीचा प्रवाह काहींसा धनुष्याकृति झाला असून घाटांची रचना त्याच्याच अनुरोधानें झाली असल्याकारणानें तिलाहि तशीच धनुष्याकारता प्राप्त झाली आहे. यामुळें घाटावर कोठेहि उभे राहून पाहिलें तरी त्याचीं वर सांगितलेलीं दोन्हीं टोंकें व त्यांच्या मधला एकंदर जलप्रवाह एकदम दृष्टिमर्यादेंत येतो. शिवाय, नदीतीराशीं येऊन भिडलेला शहराचा भाग बराच उंचवट्याचा असून त्यावर सर्वत्र तशाच एकाला एक लागून असलेल्या अनेक छत्र्या, मठ, अखाडे, वगैरेच्या उंच उंच इमारती यांच्या योगानेंहि घाटांना बरीच शोभा प्राप्त झाली आहे. हा नदीच्या पूर्वतीरावरचा देखावा तिच्या पश्चिमतीरावरील वाळवंटांत जाऊन पाहिला असतां फार मनोहर दिसतो.

## ५. अंकपाद.

उज्जन शहराच्या उत्तरेस कोस-अर्धकोसावर हें क्षेत्र आहे. तेथे पूर्वीं **सांदीपनी** नांवाचे एक विद्वान ब्राह्मण रहात असत. ते महर्षी **व्यास** यांचे वंशज होते असें सांगतात[१]. **सांदीपनीच्या** आश्रमांत **श्रीकृष्ण** व **बलराम** हे विद्याभ्यासाकरितां काहीं काल येऊन राहिले होते; त्यांचा विद्याभ्यास संपल्यावर त्या उभयतां

१. हल्लीं ज्यांच्याकडे **श्रीमहाकालेश्वराच्या** भस्मपूजेचा अधिकार आहे ते आपल्यास **सांदीपनीचे** वंशज म्हणवितात व आपल्या नांवापुढें 'व्यास' हें उपपद लावीत असतात.

बंधूंनीं सांदीपनीचा समुद्रांत बुडालेला मुलगा यमाकडून परत आणून गुरूला गुरुदक्षिणा ह्मणून अर्पण केला; आणि गुरूच्या आश्रमाजवळ एक तीर्थ निर्माण करून त्याला त्यांनीं 'अंकपाद' हें नांव दिलें, तेव्हांपासून त्या तीर्थाच्या भोंवतालचा हा प्रदेश त्याच नांवानें प्रसिद्धीस आला आहे; अशी या क्षेत्राला 'अंकपाद' हें नांव प्राप्त झाल्याची कथा अवंतिखंडांत दिली आहे.[1] अंकपादतीर्थालाच विष्णुसागरहि ह्मणतात व येथील सप्तसागरांत त्याची गणना होत असते.

श्रीकृष्ण व बलराम येथे गुरुगृहीं असतां गुरुशुश्रूषेच्या निमित्तानें त्यांचा संचार भोंवतालच्या प्रदेशावर होत असे. ह्मणून त्यांच्या पादस्पर्शानें पुनीत झालेली ही भूमि वल्लभसंप्रदायांत फार पवित्र मानली गेली आहे. शिवाय, या भूभागावर अनेक पवित्र तीर्थें व देवस्थानें असून एकंदर प्रदेश फार शांत व रमणीय आहे.

अंकपादतीर्थाच्या ईशान्येस सांदीपनीचा आश्रम ह्मणून जें स्थान दाखविण्यांत येत तेथे सांदीपनीची गादी ( बसण्याचें स्थान ) असून तिच्याजवळ एक सांदीपनीची मूर्तिहि बसविलेली आहे. तिला कोणीं व्यासाची मूर्ति ह्मणतात. या स्थानाची व्यवस्था होळकर सरकारकडे आहे. जवळच चौऱ्यायशीं महादेवांपैकीं चाळीसाव्या कुंडेश्वराचें मंदिर आहे. त्यांत श्रीकृष्ण, बलराम, सुदामा व यमाकडून परत आणलेला सांदीपनीचा मुलगा, अशा चार मूर्ति बसविल्या गेल्या होत्या. त्यांपैकीं श्रीकृष्णाची मूर्ति काहीं वर्षांपूर्वीं कोणीं काढून नेली.

१. क्षेत्रमाहात्म्य अ. ३२.

बाकीच्या तीन मूर्ति तेथे अद्याप आहेत; पण त्या खंडित आहेत. आश्रमाच्या पुढेंच गोमतीकुंड आहे. सांदीपनीच्या स्नान-संध्ये-करितां भगवान् श्रीकृष्णानें या कुंडांत गोमतीनदीला आणलें होतें, असें अवंतिखंडांत वर्णन आहे[१].

अंकपादतीर्थाच्या पश्चिमेस एक जनार्दनजीचें व एक रामजीचें अशीं दोन मोठीं मंदिरें आहेत. हीं दोन्हीं मंदिरें अगदीं नवीन बांधलेलीं दिसतात. जनार्दनजीच्या पूजे-अर्चेची सर्व व्यवस्था होळकर सरकारकडे आहे. रामजीच्या मंदिराला धार सरकारकडून ५०० रुपयांची नेमणूक आहे. त्याखेरीज बैरागी संप्रदायापैकीं निरनिराळ्या पंथाचीं तेथे अनेक मंदिरें आहेत. त्यांना ' अखाडे ' म्हणतात. खाकीच्या अखाड्यांत दरवर्षी नवरात्रांत रामलीला होते व दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशीं रावणवध होत असतो.

अंकपादतीर्थाला कोणीं 'अंकपात' ह्मणतात; आणि श्रीकृष्ण व बलराम या तीर्थांत आपल्या पाट्या धुवत असत व त्यामुळें त्यांच्या पाट्यांवरील 'अंकां'चें, ह्मणजे आकड्यांचें किंवा अक्षरांचें या तीर्थांत जें 'पतन' होत असे, त्यावरून त्याला 'अंकपात' ही संज्ञा प्राप्त झाली आहे, अशी त्या नांवाची उपपत्तिहि सांगत असतात. तसेंच दुसरे कोणीं त्याला 'अंगपात' ह्मणतात व त्या नांवाचीहि काहीं तरी उपपत्ति दाखवीत असतात. परंतु त्या नुसत्या कल्पनामात्र होत.

---

१. क्षेत्रमा० अ० ६२.

## ६. अंगारकेश्वर.

अंकपादाच्या पुढें सरासरी अर्ध कोसावर क्षिप्रातिरीं श्रीअंगारकेश्वराचें स्थान आहे. या देवाला **मंगलेश्वर**हि ह्मणतात. उज्जनक्षेत्रांतील चौऱ्यायशीं सिद्धालिंगांपैकीं हा ४३ वा महादेव आहे. **मंगळ** हा भूमिपुत्र असून अवंति किंवा **मालवदेश** ही त्याची जन्मभूमि होय. तेथे ज्या जागीं मंगळाचा जन्म झाला त्या जागीं हें शिवलिंग स्थापित झालें आहे असें म्हणतात. अवंति-क्षेत्रांत सूर्यादि नवग्रहांचीं स्थानें आहेत त्यांतहि या देवाची गणना होत असते; व प्रति मंगळवारीं त्याच्या दर्शनासाठीं अनेक लोक येत असतात. **मंगळेश्वराचें** मंदिर लहानच आहे; पण तें फार प्राचीन आहे. मंदिराच्या भोंवतीं पक्का दगडी कोट आहे; व मंदिरापुढें क्षिप्रेला पक्का घाट बांधलेला आहे. क्षिप्रेच्या प्रवाहांतील या स्थलाला **मंगलतीर्थ** म्हणतात. अष्टाविंशति तीर्थयात्रा करणारे शेवटीं या तीर्थावर येतात व येथून वाजत गाजत **नागचंडेश्वराच्या** दर्शनास व तेथून पुढें आपआपल्या घरीं जात असतात.

हें स्थान प्रशान्त व रमणीय असून **मंगलतीर्थाच्या** घाटा-वरून दिसणारा सिद्धवटाकडील देखावा प्रेक्षणीय आहे.

## ७. गंगाघाट.

हें स्थान **मंगलेश्वराजवळ** आहे. इंदुरयेथील हल्लींचे सरदार किबे यांच्या पूर्वजांनीं तेथें क्षिप्रेला घाट बांधवून त्यावर **गंगेचें**

---

१. पूर्वी प्रकरण २ रें यांत या देवाच्या वर्णनावर दिलेली टीप पहा.

एक लहानसें मंदिर बांधविलें आहे, त्यावरून या घाटाला **गंगाघाट** ह्मणतात. हा घाट बराच उंच व प्रशस्त आहे. घाटाचा भव्यपणा, त्याच्या पुढचा क्षिप्रेचा निर्मल प्रवाह व तिच्या पर तीरावरचा रम्य प्रदेश, प्रेक्षणीय आहे.

## ८. महाकाली.

या देवीचें स्थान उज्जनीच्या उत्तरेस 'गड' नांवाच्या ओसाड उंचवट्यावर असल्याकारणानें तिला **गडावरची कालिका** ह्मणतात. तिच्या मंदिराचा बराचसा भाग फार प्राचीन आहे; व तो ई. स. ६६० च्या सुमारास संम्राट श्रीहर्ष यानें बांधविलेल्या एका मंदिराचा अवशेष आहे, असें सांगण्यांत येत असतें. तद्दितर भाग अर्वाचीन आहे. बाहेरून हें मंदिर मुसलमानी इमारतीच्या तऱ्हेचें दिसतें; व त्यावरून तो अर्वाचीन भाग मुसलमानी अमलदारींत बांधला गेला असावा असें वाटतें. जुनें मंदिर घोंटिव काळया दगडाचें असून त्याला हेमाडपंती पद्धतीचे कोरीव दगडी खांब आहेत. मंदिराच्या महाद्वाराच्या आंत दोहों बाजूस दोन प्रशस्त सोपे बांधलेले आहेत. या सोप्यांच्या गच्चीवर जाऊन चहूंकडे दृष्टि फिरविली असतां, **भैरवगढ**, **गंगाघाट**, **मंगळेश्वर**, भर्तृहरीची गुफा व **गडावरील गणपति** हीं स्थानें, आणि क्षिप्रानदीचा प्रवाह व त्याच्या दोन्हीं बाजूचा विस्तीर्ण प्रदेश, असा एकंदर देखावा फार रमणीय दिसतो.

मंदिराच्या गाभाऱ्यांत जी **महाकालीची** मूर्ति आहे, तिची मुद्रा फार उग्र व काहीं अंशीं भयानक अशी दिसते. हें स्थान स्वयंभु असून फार जागृत आहे, असें ह्मणतात. तिच्या जवळ

चामुंडादेवीची मूर्ति व एकादश रुद्रांपैकीं **गिरीश** रुद्राचें लिंग स्थापिलेलें आहे. गाभाऱ्याच्या पुढें आवारांत देवीच्या वाहनाची, ह्मणजे व्याघ्राची, प्रतिमा बसविलेली आहे. देवीपुढें सप्तशती व देवी-भागवत यांचे पाठ नित्य होत असतात. **शारदी** नवरात्रांत नऊ दिवस तेथे उत्सव होतो. त्यांतल्या अष्टमी व नवमी या दिवशीं होम-हवन होतें व देवीला रेड्याचा बली दिला जात असतो. पूर्वीं तेथे कुमारिकांचें बलिदान होत असे, असें सांगतात; पण आतां तें होत नाहीं व होऊं शकत नाहीं, हें सांगावयास नकोच. नवरात्रांत नऊ दिवस व विशेषतः शुक्रवार, मंगळवार, अष्टमी, नवमी, या दिवशीं मंदिरांत दर्शनेच्छु लोकांची गर्दी बरीच असते.


**महाकवि कालिदास** यांनीं याच **महाकालीच्या** मंदिरांत अनुष्ठान करून देवीचा साक्षात्कार करून घेतला व तिच्या पासून विद्वत्व व कवित्व संपादन केलें अशी दंतकथा आहे; व त्यांच्या नांवावरून ती निर्मूल नसावी असें वाटतें.

या मंदिराजवळच **कुमार हनुमान** व **सुमुख** किंवा **स्थविर विनायक**, हीं दोन प्रसिद्ध देवस्थानें आहेत. त्यांच्या जवळ एक **चतुर्मुख विष्णुचें** मंदिर असून त्यांतील मूर्ति सुरेख आहे. **कालिकेच्या** मंदिरासमोर एका जुनाट चिंचेच्या झाडाखालीं **विंध्यवासिनीचें** स्थान आहे. तिच्या जवळ पूर्वीं केव्हां तरी सती गेलेल्या स्त्रियांचें स्मारक ह्मणून अनेक स्तंभ उभारलेले आहेत. परंतु हे अनेक स्तंभ या एकाच ठिकाणीं कां उभारले जावे ? पूर्वीं केव्हां तरी अनेक स्त्रिया या एकाच ठिकाणीं सती गेल्या होत्या

कीं काय? किंवा पूर्वी येथेच जवळ पास कोठे तरी स्मशान होतें कीं काय? तें काहीं कळत नाहीं.

## ९. श्रीकालभैरव.

**श्रीकालभैरवाचें** स्थान उज्जन शहराच्या उत्तरेस अंकपाद दरवाजापासून कोस-सवाकोसाच्या अंतरावर आहे. या स्थानाला लागून एक गांव वसला आहे, त्याला भैरवगढ ह्मणतात. त्याच्या अर्ध्या-अधिक भागाला पूर्व व दक्षिण या बाजूकडून क्षिप्रानदीनें वढा दिला असल्यामुळें, मंगलतीर्थ किंवा गंगाघाट येथून त्याच्याकडे पाहिलें असतां तें एक बेटसें दिसतें. पूर्वी त्याला भैरवक्षेत्र किंवा भैरवखेडा ह्मणत असत. परंतु पुढें त्याच्या पश्चिम व उत्तर या दोन बाजूकडील मोकळ्या भागाला कोट व त्याच्या आंत एक किल्ला बांधला गेला, तेव्हांपासून तो खेड्याचा गढ होऊन **भैरवगढ** ह्मणवूं लागला. भैरवगढाच्या नैर्ऋत्येस, क्षिप्रानदीच्या उत्तर तीरावर, **कालभैरवाचें** मंदिर आहे. मंदिराखालीं क्षिप्रानदीला बराच मोठा व प्रशस्त घाट बांधलेला आहे. मंदिराच्या भोंवतीं पक्का कोट आहे; कोटाच्या आंतल्या बाजूस चौसोपी आहे; मंदिर व त्याचें महाद्वार पश्चिमाभिमुख आहे; आणि महाद्वारावर नगारखाना आहे. ही सर्व इमारत फार प्राचीन काळीं कोणीं भद्रसेन नांवाच्या राजानें बांधविलेली आहे, असें ह्मणतात. परंतु अलीकडे शेंकडों वर्षांत तिच्याकडे कोणीं लक्ष दिलेलें दिसत नाहीं. यामुळें कोट बहुतेक मोडकळीस आला आहे व चौसोपी तर साफ पडून जाऊन तिच्यावर झाडें-झुडपें वाढलीं आहेत. मंदिर, महाद्वार व नगारखाना, अद्याप कायम आहे. पडलेल्या



**सिद्धवट.**

( तेथील क्षिप्रा नदीच्या घाटासह ).

चौसोपींत जागजागीं झाडांना टेंकून छिन्न-विच्छिन्न झालेल्या अनेक मूर्ति ठेविलेल्या आहेत व त्यांपैकीं कित्येक मूर्तींवर पूर्वीं केव्हां तरी शेंदूरहि फांसला गेला आहे. या मूर्ति तेथे कोठून, केव्हां व कशा आल्या तें कळत नाहीं.

पूर्वीं अवंतिक्षेत्रांतील **अष्टभैरव** सांगितले त्यांत **कालभैरव** हे मुख्य होत. भैरवाष्टमी ह्मणजे कार्तिक वद्य ८ हा **कालभैरवाचा** जन्मदिवस असल्यामुळें त्या दिवशीं या मंदिरांत उत्सव असतो. आसपासचे शेंकडो लोक दर्शनासाठीं येतात व मंदिराबाहेर मेळा भरत असतो. कार्तिक वद्य ९ च्या दिवशीं मंदिरांत ब्राह्मण भोजन होतें व **श्रीभैरवनाथाची** मिरवणूक निघत असते. विवाहादि मंगलकार्यें निर्विघ्न सिद्धीस जावीं एतदर्थ कार्यारंभीं आणि सर्व कार्यांच्या सिद्धीसाठीं आषाढ शुक्ल पक्षांतील रविवारीं व विशेषतः अष्टमी, नवमी किंवा चतुर्दशी या दिवशीं **कालभैरवाचें** पूजन करावें, असें अवंतिखंडांत सांगितलें आहे. वैकुंठचतुर्दशी—कार्तिक शुद्ध १४—हाहि या देवाच्या पूजन-दर्शनाचा विशेष दिवस मानला गेला आहे. नित्य पूजेची व्यवस्था चांगली आहे. भैरवाष्टक, शिवकवच, यांचे पाठ व इतर मंत्र-तंत्रांच्या सिद्धिसाठीं अनुष्ठानें हीं तर या मंदिरांत प्रायः नित्यच चाललेलीं असतात.

## १०. सिद्धवट.

भैरवगढाच्या पूर्वेस हा पुराणप्रसिद्ध वट क्षिप्रातटाकीं आहे. हल्लींचा वटवृक्ष हा फार तर शें-सवाशें वर्षांचा असेल; पण मूळ त्याचें जुनें असल्यामुळें, म्हणजे जुन्या वृक्षाच्या मुळांतून तो

१. क्षेत्रमा. अ. ६४.

फुटून निघाला असल्यामुळें, तो प्राचीनच मानला जातो. वस्तुतः एकंदर वृक्षमात्रांत औदुंबर, अश्वत्थ व वट, या तीन वृक्षांत ईश्वरी तेजाचा अंश अधिक ह्मणून पृथ्वीवरील सर्वच औदुंबर, अश्वत्थ व वट, आम्हीं भारतवासी पूज्य समजतों. परंतु त्यांतल्या त्यांत या वटाचें माहात्म्य विशेष मानलें गेलें आहे. **सिद्धवटा**च्या खालचें क्षिप्रेच्या प्रवाहाचें स्थान एक तीर्थ मानलें जातें; व त्यांत स्नान करून सिद्धवटाचें दर्शन घेतलें असतां भूत-समंधाची बाधा होत नाहीं असें म्हणतात. **नागबली-नारायण-बली** याच तीर्थावर करीत असतात. तेथे वैशाख शुद्ध १४ व वैकुंठचतुर्दशी या दिवशीं मेळे भरतात.

हें स्थान जात्याच रमणीय आहे. येथील क्षिप्रानदीचें रुंद पात्र, खोल डोह व दोन-तीन वळणें घेतलेला तिचा संथ प्रवाह, मिळून एकंदर दृश्य फार मनोहर दिसतें. शिवाय, सिद्धवटा-खालच्या तीर्थावर क्षिप्रेला एक सुंदर घाट बांधलेला आहे त्याच्या योगानें त्या स्थानाला बरीच शोभा आली आहे.

याखेरीज उज्जनीस जुनीं व नवीं अनेक देवस्थानें दर्शनीय आहेत. त्यांतलीं विशेष प्रसिद्ध अशीं देवस्थानें हीं:—

१. **रणजीत हनुमान**—उज्जनीच्या उत्तरेकडे, क्षिप्रानदीच्या-पश्चिम तीरावर.

२. **चिंतामणि गणपती**—उज्जनीच्या आग्नेयीस सुमारें दीड-दोन कोसांवर, जवासा नांवाच्या गांवीं.

३. **नवग्रह**—उज्जनीच्या दक्षिणेस, त्रिवेणीसंगमावर.

४. **तिळभांडेश्वर**—मकोड्या आंब्याजवळ.

५. **अनंतनारायण**—अनंतपेठेंत, क्षिप्रातिरीं.

६. **शेषशायी**—क्षीरसागरावर.

७. **मदनमोहनजी**—सराफ्यांत ( वल्लभसंप्रदायाचें मंदिर ).

८. **रामजी**—सराफ्यांत ( कूकाजीचें राममंदिर ).


तशीच नगरकोटची राणी, लालबाई-फूलबाई, नवदुर्गा, वगैरे काहीं इतर देवस्थानेंहि प्रसिद्ध आहेत; पण तद्देशीय लोकांव्यतिरिक्त त्या देवांच्या दर्शनाला फारसे कोणीं जात नाहींत.

## प्रकरण पांचवें.

# प्रेक्षणीय स्थलें.

### १. कालियादेहाचा महाल.

क्षिप्रानदी ही कालभैरवाच्या घाटापासून पुढें गंगाघाट, मंगलघाट व सिद्धवट येथें उत्तरोत्तर अधिकाधिक खोल होत गेली असून सिद्धवटाच्या पुढें कोस-दीड-कोसावर तिच्या प्रवाहांत बराच खोल असा एक डोह झाला आहे. त्या डोहाला कालिया-देह ह्मणतात; व त्याच्या पूर्व किनाऱ्यावर एक लहानसें खेडें वसलें आहें त्यालाहि तेंच नांव दिलें गेलें आहे. या डोहाच्या पुढें जवळच क्षिप्रेच्या प्रवाहाला, तिच्या पश्चिम तीरावर, एक फांटा फुटला असून तो थोड्या दूर वहात गेल्यावर पुन्हा तिच्या मूळ प्रवाहांत मिळाला आहे; व त्यामुळें या दोन प्रवाहांच्या मधल्या उंचवट्याचें एक लहानसें बेट बनलें आहे. या बेटावर पूर्वीं एक सूर्यनारायणाचें मंदिर होतें आणि त्याच्या पश्चिमेकडील प्रवाहाच्या मध्यभागीं एक सूर्यकुंड व एक ब्रह्मकुंड (अष्टाविंशति-तीर्थयात्रेंतलें शेवटलें पितामहवापी नांवाचें तीर्थ ) अशीं दोन कुंडें होतीं. ईसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या आरंभीं माळव्याचा सुलतान नासिरुद्दीन खिलजी यानें तें सूर्यनारायणाचें मंदिर पाडून त्या जागीं चैनीनें राहण्यासाठीं एक पठाणी पद्धतीचा महाल



कालियादेहचा महाल.

बांधविला तो हा महाल होय. आणि तो कालियादेहाच्या जवळ असल्यामुळें त्याला **कालियादेहाचा महाल** ह्मणतात.

या महालाच्या तळमजल्यांत मध्यें चौकोर दिवाणखाना, त्याच्या चाराहि बाजूस चार लांबट खोल्या व चाराहि कोपऱ्यावर चार चतुष्कोण खोल्या; वरच्या मजल्यांत, पूर्वेकडील तीन खोल्यावर तशाच आकाराच्या तीन खोल्या, त्यांतल्या दोन्हीं बाजूच्या दोन खोल्यावर गोल व मधल्या खोलीवर लांबट असे तीन लदाऊ घुंमट, आणि दिवाणखान्यासकट बाकीच्या सर्व इमारतीवर गच्ची; अशा प्रकारचा हा महाल पूर्वी होता. तो बांधला तेव्हां त्याच्या चौफेर एक बसकासा, ठेंगणा, कोटहि बांघला गेला होता, असें महालाच्या नैर्ऋत्येकडे त्या वेळचा एक दरवाजा उभा आहे त्यावरून दिसतें. महालाचें बांधकाम पठाणी पद्धतीचें मजबूत व जाड असून त्यांत लागलेले बहुतेक सर्व दगड पूर्वीच्या सूर्यनारायणाच्या मंदिराचे व काहीं जैन मंदिराचे असल्याची साक्ष त्यावरील कोरीव नकशी व मूर्ति देत आहेत.

महालाच्या पश्चिमेकडील नदीच्या फांट्यांत पूर्वी **सूर्यकुंड** व ब्रह्मकुंड अशीं जीं दोन कुंडें होतीं तीं दोन्हीं नासिरुद्दीन यानें नाहींशीं करून त्या जागीं त्यानें एका पुढें एक अशीं अनेक कुंडें बांधलीं आहेत, व त्यांच्या शेवटीं उत्तरेकडे एक लहानसा धबधबा केला आहे. ईशान्य कोणांतील कुंडाच्या जागीं हमाम (स्नानगृह) बांधला आहे. हमामच्या पश्चिमेस एकापुढें एक अशा दोन घुंमट्या बसण्यासाठीं बांधल्या असून त्यांत बसून चहूंकडच्या कुंडांत खेळणाऱ्या पाण्याची व धबधब्याची मौज

पाहतां यावी याकरितां त्यांना चारहि बाजूस चार द्वारें ठेवलेलीं आहेत. त्यांतल्या पश्चिमेकडच्या घुंमटीजवळ एक वर्तुळ व एक चतुष्कोण असे दोन चक्रव्यूह केले असून त्यांत येणारें पाणी उलट-सुलट दिशांनीं फिरून शेवटीं धबधब्यांत पडतें. या घुमटीच्या पश्चिमेस एक लहान कुंड आहे, त्याला हल्लीं सूर्यकुंड म्हणतात व तेंच तीर्थ समजून त्यांत यात्रेकरू स्नानेंहि करीत असतात. त्याच्या उत्तरेस दुसरें एक मोठें कुंड आहे. त्याच्या मध्यभागीं एक घुमटी बांधली असून त्यांत जाण्यासाठीं पूर्वी चहूंकडून चार लहान लहान पूल बांधले गेले होते, असें कुंडाच्या घाटावरील खुणांखाणावरून दिसतें. परंतु त्यांपैकीं पूर्वेकडील एक पूल मात्र हल्लीं कायम असून बाकीचे तिन्हीं दिशांकडील पूल पडून गेले आहेत.

नदीच्या या पश्चिमेकडील फांट्यांत नेहमी पाण्याचा पुरवठा होत रहावा व कुंडें बारा महिने भरलेलीं असावीं, याकरितां पूर्वेकडील नदीच्या मुख्य प्रवाहास एक लहानसा बांध बांधलेला आहे. परंतु या फांट्याचें वरचें तोंड दगड-मातीनें पुरलें गेल्यामुळें सांप्रत उन्हाळ्यांत त्यांतली धार तुटते व त्यांतून कुडांत पाणी येईनासें होत असतें. तरी पण त्यांतल्या काहीं कुंडांत उन्हाळ्यांत देखील पाणी असतें, इतकेंच नव्हे, तर काहीं काहीं कुंडांतील पाणी वहात असलेलेंहि दिसतें. हें पाणी अर्थातच नदीच्या मूळ प्रवाहांतलें असून तें या कुंडांत त्यांच्या तळ जमीनीच्या थरांतून येत असलें पाहिजे. हीं कुंडें बांधलीं गेलीं तेव्हांच त्यांच्या वरच्या बाजूस, दक्षिणेकडे, एक व धबधब्याच्या खालच्या बाजूस, उत्तरेकडे, एक असे नदीच्या या फांट्यावर दोन पूलहि

बांधले गेले आहेत. परंतु त्यांतला दक्षिणेकडील पूलमात्र हल्लीं कायम असून उत्तरेकडील पूल बहुतेक पडलेला आहे. या फांट्याच्या पश्चिमतीरावर अर्धा-पाउण मैल लांबी-रुंदीच्या प्रदेशा-भोंवतीं पक्का कोट बांधवून त्याच्या आंत हरणें मोकळीं सोडलेलीं असत; व त्या आवाराला **आहूखाना** हें नांव दिलें गेलें होतें.

कुंडांच्या पश्चिमेस, दक्षिणेकडील पूलाला जोडून, एक दक्षिणोत्तर लांबच लांब दालन बांधलें गेलें आहे; व त्याच्या मध्य-भागापासून त्याचीच एक लहानशी शाखा द्वार-मंडपासारखी पूर्वेस, सूर्यकुंडाच्या पूर्वकिनाऱ्यापर्यंत, पुढें आलेली आहे. त्याची बांधणी महालाच्या बांधणीहून भिन्न, मोंगल पद्धतीची दिसते. महालाच्या बांधणींतील पठाणी पद्धतीचा अवजडपणा त्यांत नाहीं. त्याच प्रमाणें, या दालनाच्या छताचा लदाव व पुढच्या मोकळ्या दारांच्या कमानी, किंवा मेहेरापी, महालांतील छताच्या लदावापेक्षां व दारांच्या कमानींपेक्षां, बऱ्याच सुरेख आहेत. या दोन पद्धतींतील भेद थोडक्यांत सांगावयाचा ह्मणजे पठाणी पद्धतींत इमारतीच्या सौंदर्यापेक्षां तिच्या मजबूतीकडे अधिक लक्ष दिलेलें असतें; व मोंगल पद्धतींत त्याच्या उलट तिच्या मजबूतीपेक्षां सौंदर्याकडे दृष्टी ज्यास्त असते. आणि तेथे ते दोन्हीं नमूने जवळ जवळ विद्यमान असल्यामुळें त्यांतील हा भेद सहज लक्षांत येऊं शकतो.

या दालनाच्या द्वारमंडपासारख्या पुढें आलेल्या शाखेच्या एका खांबावर त्याच्या दोन बाजूस दोन लेख फारसी भाषेंत कोरलेले आहेत. हे दोन्हीं लेख एकाच वेळीं व एकाच मनुष्याच्या हातून कोरले गेले असावेत, असें त्यांतील अक्षरांच्या वळणारून

दिसतें. परंतु त्यांपैकीं एका लेखांत सन इलाही ४४ व सन हिजरी १००८ यांत अकबर बादशाह दक्षिणेच्या स्वारीवर जातांना तेथे आल्याचा उल्लेख असून दुसऱ्या लेखांत सन इलाही ४५ व सन हिजरी १००९ यांत दक्षिण व खानदेश येथे विजय संपादन करून परत लाहोरास जातांना अकबर बादशाह तेथे राहिल्याचा व त्याच वेळीं त्यानें हें दालन बांधविल्याचा उल्लेख आहे.

तसाच एक लेख सूर्यकुंडाजवळच्या घुंमटीच्या दक्षिणेकडील भिंतीवर कोरलेला असून त्यांत ‘ हीं दोन विलासमंदिरें[1]’ जहांगीर बादशाहाच्या हुकुमानें त्याच्या कारकिर्दींत बांधलीं गेलीं, असा उल्लेख आहे; व त्यावरून, ही घुमटी आणि तिच्या पूर्वेकडील घुमटी, या दोन्हीं घुमट्या जहांगीर यानें बांधविल्या असा बोध होतो. परंतु या दोन्हीं घुंमट्यांचें बांधकाम पठाणी पद्धतीचें आहे व त्यावरून त्या महालाबरोबरच बांधल्या गेल्या असाव्यात असें वाटतें. त्यांतल्या सूर्यकुंडाजवळच्या घुमटीला बाहेरच्या बाजूनें लाल दगडाची पुस्ती दिली गेली आहे, ती मात्र मागाहून दिलेली दिसते. तेव्हां ती कदाचित् जहांगीरच्या हुकुमानें दिली गेली असेल. तशीच सूर्यकुंडाच्या उत्तरेकडील मोठ्या कुंडाच्या मध्यभागीं जी घुमटी आहे, तिचें बांधकाम मोगलपद्धतीचें आहे. तेव्हां तीहि कदाचित् जहांगीर यानें बांधविली असेल. तद्व्यतिरिक्त दुसरीं कोणतींहि दोन विलासमंदिरें तेथे जहांगीराच्या काळीं बांधलेलीं दिसत नाहींत.

या नंतर दोन-अडीचशें वर्षेंपर्यंत या महालाकडे फारसें कोणीं पाहिलें नाहीं, यामुळें त्याची बरीच खराबी झाली.

१. ‘अशरतगाह.’

पेंढार गर्दीच्या काळांत तर या महालाच्या मधल्या दिवाणखान्यांत पेंढाऱ्यांचा स्वयंपाक होत असे व अकबरानें बांधविलेल्या दालनांत त्यांचे घोडे बांधले जात असत, असें सांगतात. आणि या दालनाला अद्यापहि कांहीं लोक 'अस्तबल' (स्टेबल–घोडे बांधण्याची जागा) म्हणतात, यावरून त्यांत बराच तथ्यांश असावासें वाटतें. महालाच्या भोंवतालचा कोट, त्याच्या पुढचीं कुंडें व कुंडांच्या दक्षिणेकडील पूल, यांत बरीच पड-झड झाली आहे. अकबरानें बांधविलेल्या दालनाचा उत्तरेकडील सुमारे एक चतुर्थांश भाग जमीनदोस्त झाला असून कुंडांच्या उत्तरेकडील धबधब्याच्या खालचा पूल तर वर सांगितल्याप्रमाणें बहुतेक सर्वच पडून गेला आहे. आणि आहूखान्यांत शेती व्हावयास लागून ते कांहीं काल पूर्वी उज्जन परगण्यांतील 'आहूखाना' याच नांवाचें एक लहानसें खेडें बनलें होतें.


पुढें कै० माधवराव महाराज यांनी राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर जेव्हां ते वारंवार उज्जनीस येऊं लागले, व तेथे त्यांच्या राहण्यासाठीं, बांधली गेलेली 'नवी कोठी,' त्यांनां नापसंत झाली, तेव्हां त्यांची दृष्टि या महालाकडे वळली. त्यांनीं, महालाच्या आंतील जागजागीं पडलेली चुन्याची टीप काढून टाकून सर्वत्र सारखी टीप नव्यानें करविली आणि दिवाणखान्याची व त्याच्या सभोंवारच्या खोल्यांची फर्शी (तळ-जमीन) पक्की बांधविली; त्याच्या बाहेरच्या बाजूच्या सर्व दरवाजांना व खिडक्यांना लोखंडी चौकटींत बसविलेल्या काचांचीं कवाडें लाविलीं; महालाच्या चारही बाजूस, त्याच्या बांधकामांत मिळून जाण्याजोगा व त्याच्या भव्यपणास साजेसा, लाल

दगडाचा मोंगलपद्धतीचा प्रशस्त व्हरांडा (ओसरी) नवीन बांधविला; महालाच्या भोंवतालचा शेष राहिलेला सर्व कोट पाडून टाकून चहूंकडे मैदान केलें व त्यांत नजर-बाग लाविला; वरच्या मजल्यांत पूर्वेकडील मधल्या खोलीपुढें, सुंदर ग्यालरी ( छज्जा ) बांधविली व तिच्या वरची लांबट घुमटी काढून त्या जागीं गच्ची केली; आणि महालांत सर्वत्र बिछायत, पडदे, खुर्च्या, टेबलें, वगैरे इमारतीस साजेसें इंग्रजी तऱ्हेचें सामान मांडून व विजेचे दिवे लावून त्याचें ' महाल ' हें नांव सार्थ केलें.

या खेरीज, नजरबागेच्या ईशान्येकडील कोपऱ्यांत स्वयंपाकासाठीं एक तळघर, महालापासून सरासरी दोनशें फुटाच्या अंतरावर उत्तरेकडे राजस्त्रियांच्या राहण्यासाठीं इंग्रजी तऱ्हेचा एक बंगला, व आहूखान्यांतील शेतें काढून टाकून त्याच्या जागीं पाहुण्यांच्या राहण्यासाठीं एक बंगला ( गेस्ट-हाउस ), या इमारती तेथे माधवराव महाराजांनीं नवीन बांधविल्या असून उज्जन-आगर सडकेला पांचव्या मैलावर जोडून दोन मैल लांबीची एक सडक त्यांनीं महालापर्यंत नेली आहे व तिला क्षिप्रेच्या पूर्वेकडील पात्रांत एक बसका पूल (रपट-कॉजवे) बांधला आहे.

## २. वेधशाळा.

ही **वेधशाळा** उज्जन शहराच्या दक्षिणेस क्षिप्रानदीच्या तीरावरील एका उंचवट्यावर आहे; व तेथील लोक तिला **जंतर (यंत्र) महाल** ह्मणतात. उज्जन नगरी हें भारतीय ज्योतिषाचें, ह्मणजे ग्रहादिकांच्या गणिताचें, फार प्राचीन काळापासून, केन्द्र मानलें जातें. यास्तव येथे ग्रहादिकांचे वेध घेण्यासाठीं, जयपूरचा राजा



वेधशाळा.

सवाई जयसिंग हा दिल्लीच्या बादशाहाकडून उज्जनीस सुभेदार असतां, त्यानें ही वेधशाळा, ई. सनाच्या अठराव्या शतकाच्या आरंभीं बांधविली. हा राजा स्वतः ज्योतिषज्ञ असून ज्योतिर्विद्येचा फार चाहता होता. ग्रहतारादिकांचें गणित खगोलांतील त्यांच्या स्थितिशीं पूर्ण जुळलेलें असावें, यथार्थ असावें, ह्मणून ग्रहादिकांचे वेध निरनिराळ्या स्थानांवरून घेण्यासाठीं त्यानें, जयपूर, काशी, दिल्ली, मथुरा, येथें वेधशाळा बांधविल्या, तशीच, उज्जनी हें ज्योतिष विद्येचें मुख्य पीठ असल्यामुळें येथेहि त्यानें ही वेधशाळा बांधविली; आणि ती बांधून तयार झाल्यावर त्यांतील यंत्रांच्या साह्यानें सात-आठ वर्षेंपर्यंत ग्रहांचे वेध घेऊन त्यांवरून ग्रंथ रचना करविली.[1] पुढच्या दोनशें वर्षांत या वेधशाळेकडे कोणाचेंच लक्ष न गेल्यामुळें ग्रहांचे वेध घेण्याचें काम अर्थातच बंद पडलें व वेधशाळाहि जीर्ण होऊन मोडकळीस आली. परंतु इतक्यांत, ग्वाल्हेरचे रघुनाथशास्त्रि वेलणकर यांच्या खटपटीनें उज्जनीस स्थापित झालेल्या पंडिताश्रम सभेनें या वेधशाळेची स्थिति कै. माधवराव महाराज यांच्या पुढें मांडली; व महाराजांना तिची उपयुक्तता दिसून आल्याबरोबर त्यांनीं तात्काल जयपूरच्या वेधशाळेंतील सुप्रसिद्ध ज्योतिषी गोकुलचन्द्र भावन यांना बोलावून आणून त्यांच्या देखरेखीखालीं तिचा जीर्णोद्धार केला. यामुळें सांप्रत ही वेधशाळा चांगल्या स्थितींत आहे. शिवाय हल्लीं ज्योतिषज्ञ पंडित गोविंद सदाशिव आपटे, एम. ए., बी. एससी., हे तेथील सुपरिन्टेन्डेन्ट असल्यामुळें तिची व्यवस्थाहि चांगली असून

---

१. शंकर बाळकृष्ण दीक्षितकृत भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास, पृ. २९३.

प्रेक्षकांना तिचा उपयोग समजून घेण्याच्या कामीं त्यांची फार मदत होते.

हल्लीं या वेधशाळेंत (१) **सम्राट्यंत्र**; (२) **नाडीवलययंत्र**; (३) **दिगंशयंत्र**; व (४) **भित्तियंत्र**; अशीं चार यंत्रें आहेत. हीं चारहि यंत्रे सवाई जयसिंग यानें दगड, विटा व चुना, यांनीं बांधविलेलीं आहेत. तरी पण त्यांचें बांधकाम इतकें शुद्ध व प्रमाणशीर झालेलें आहे कीं त्यांच्या साह्यानें **काल, क्रान्ति, नतांश, दिगंश**, वगैरेचें ज्ञान बिनचूक होतें. आणि या यंत्रांचा स्थूलपणा व त्यांपासून होणाऱ्या काल, क्रान्त्यादिकांच्या बोधाचा सूक्ष्मपणा प्रत्यक्ष पाहिला ह्मणजे हीं यंत्रें बांधणाऱ्या देशी गवंड्यांच्या कारागिरीचें कौतुक वाटतें. विद्यार्थ्यांना ज्योतिषाचें व्यवहारोपयोगी सामान्य ज्ञान संपादन करण्यास हीं यंत्रें पुरेशीं आहेत.

## (१) सम्राट्यंत्र.

वेधशाळेच्या आवारांत पांय ठेविल्याबरोबर दक्षिणोत्तर सुमारें ४८ फूट लांब, उत्तरेकडील शेवटावर २२ फूट उंच व कर्ण ५२ फूट, असा एक भव्य जिना लागतो; आणि त्याच्या उत्तरेकडील टोंकाजवळ, जणूं काय प्रेक्षकांना भेट देण्यासाठीं जिन्यानें हात पसरले आहेत, अशा प्रकारचे पूर्व व पश्चिम या दोन दिशांकडे ९ फुटाच्या त्रिज्येनें काढलेले दोन **वर्तुलपाद** विषुववृत्ताच्या पातळींत लाविलेले दिसतात. हे दोन्हीं वतुलपाद व जिना मिळून एकंदर इमारतीला **सम्राट्यंत्र** ह्मणतात. जिन्याची क्षितिजाशीं वक्रता उज्जयिनीच्या अक्षांशा (२३-१०) इतकी असल्यामुळें, जिन्यासमोर, त्याच्या दोन्हीं बाजूंच्या दिशेंत, ध्रुवाचा तारा

दिसतो. त्याचप्रमाणें, जिन्याच्या दोन्हीं बाजूवर क्रान्तीचे अंश ( जिन्याच्या मध्यापासून खालीं व वर दोन्हींकडे ) कोरले आहेत, त्यांवरून हवी तेव्हां सूर्याची क्रान्ति पाहतां येते. आणि जिन्याच्या दोन्हीं बाजूकडील दोन वर्तुलपादांवर प्रत्येक तासाच्या, मिनिटाच्या व त्याच्या $\frac{1}{3}$ भागाच्या रेषा कोरल्या असून त्यांपैकीं पश्चिमेच्या वर्तुलपादावर सूर्योदयापासून १२ वाजेपर्यंत व पूर्वेच्या वर्तुलपादावर १२ वाजे पासून सूर्यास्तापर्यंत पडणाऱ्या जिन्याच्या छायेवरून केव्हांहि पाहिलें असतां तास, मिनिटें व मिनिटाच्या एक-तृतीयांशापर्यंतचा ( २० सेकंदाचा ) सूक्ष्म काल समजतो.

## (२) नाडीवलययंत्र.

सम्राट्‌यंत्राच्या दक्षिणेस, एका ओट्यावर, लोढाच्या आकाराचें व सुमारें साडे सात फूट लांबीचें एक यंत्र ध्रुवाभिमुख बसविलें आहे, त्याला **नाडीवलययंत्र** ह्मणतात. त्याची उत्तरेकडील व दक्षिणेकडील साडे तीन तीन फुट व्यासाचीं तोंडें विषुववृत्ताशीं समान्तर असून त्यांच्या मध्यावर ७ इंच लांबीचा एक एक खिळा बसविलेला आहे. सूर्य उत्तरगोलार्धांत असतो तेव्हां (उत्तरायणांत) या यंत्राच्या उत्तरेकडील तोंडावर व तो दक्षिणगोलार्धांत असतो तेव्हां ( दक्षिणायनांत ) त्याच्या दक्षिणेकडील तोंडावर, त्या त्या तोंडाच्या मध्यावर बसविलेल्या खिळ्याची छाया पडते, त्यावरून स्थूलमानानें कालाचें ज्ञान होतें, ह्मणजे केव्हां किती वाजले ते कळतात. आणि त्याच्या उलट सूर्य उत्तरगोलार्धांत असेपर्यंत या यंत्राच्या दक्षिणेकडील तोंडावर व तो दक्षिणगोलार्धांत असे-पर्यंत या यंत्राच्या उत्तरेकडील तोंडावर, त्यांत बसविलेल्या

खिळयांची छाया मुळींच पडत नाहीं. तर जेव्हां सूर्य उत्तर-गोलार्धांतून दक्षिणगोलार्धांत व दक्षिणगोलार्धांतून उत्तरगोलार्धांत प्रवेश करतो तेव्हांपासून या यंत्राच्या दक्षिण व उत्तर तोंडावर त्या खिळयांची छाया पडूं लागते. यावरून शरद्-संपात व वसंत-संपात ज्या ज्या दिवशीं येतो तो तो दिवस नक्की कळतो. त्याचप्रमाणें विवक्षित ग्रह किंवा तारा उत्तर व दक्षिण यांपैकीं कोणत्या गोलार्धांत आहे हेंहि या यंत्राच्या द्वारा समजतें.

## ( ३ ) दिगंशयंत्र.

**नाडीवलययंत्राजवळ** पूर्वेस एक ३२ फूट व्यासाची वाटोळी भिंत असून तिच्या आंत दुसरी एक तशीच वाटोळी २० फूट व्यासाची भिंत आहे; व तिच्या मध्यबिंदूवर एक लोखंडी खांब चबुऱ्यासह ८ फूट उंचीचा उभा केलेला आहे. हा खांब व त्याच्या भोंवतालची आंतली २० फूट व्यासाची भिंत, या दोन्हींची उंची सारखी (८ फूट) आहे व तेंच **दिगंशयंत्र** होय. बाहेरची ३२ फूट व्यासाची भिंत ही केवळ त्या यंत्राच्या संरक्षणार्थ आहे असें दिसतें. खांबाच्या भोंवतालच्या, आंतल्या भिंतीवर पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर, या दिशांच्या खुणा केल्या असून त्यांपैकीं पूर्व व पश्चिम या दोन दिशांच्या खुणांपासून त्यांच्या दोन्हीं बाजूस दक्षिण व उत्तर या दिशांच्या खुणांपर्यंत जे चार वर्तुलपाद ( वृत्ताचा $\frac{1}{4}$ ) होतात, त्यांत ९०।९० अंशांच्या खुणा रेषांनीं दाखविल्या आहेत. यंत्राच्या मध्यबिंदूवर उभा असलेल्या खांबाच्या टोंकास दोरीचें एक टोंक बांधून ती दोरी विवक्षित ग्रह किंवा तारा याच्या दिशेंत ताणून धरली असतां तो ग्रह किंवा तारा, पूर्व किंवा पश्चिम बिंदूपासून

दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे किती अंशावर आहे हें समजतें. अर्थात् विवक्षित ग्रहाच्या किंवा ताऱ्याच्या दिशेंत ताणून धरलेली दोरी भिंतीवरील ज्या अंश-रेषेला स्पर्श करते तेच त्या ग्रहाचे किंवा ताऱ्याचे दिगंश होत. याप्रमाणें कोणत्याहि ग्रहाचे किंवा ताऱ्याचे दिगंश या यंत्राच्या साह्यानें काढतां येतात. ह्मणून त्याला **दिगंशयंत्र** ह्मणतात. आणि कोणत्याहि ग्रहाचे किंवा ताऱ्याचे दिगंश कळले ह्मणजे त्याचें आकाशांतील स्थानहि निश्चित करतां येतें.

## ( ४ ) भित्तियंत्र.

**दिगंशयंत्राच्या** पश्चिमेस २२ फूट लांबीची, सुमारें तितक्याच उंचीची व सात फूट रुंदीची, भिंत दक्षिणोत्तर दिशा साधून बांधलेली आहे, तिला **भित्तियंत्र** ह्मणतात. या भिंतीच्या पूर्व बाजूस तिच्या वरच्या उत्तर व दक्षिण टोंकाजवळ भिंतींत दोन खिळे २० फुटाच्या अंतरानें बसविले असून त्यांच्यापासून २० फुटाच्या त्रिज्यांनीं दोन **वर्तुलपाद** काढले आहेत व त्यांवर खालपासून वर खिळ्यापर्यंत ९०।९० अंशांच्या खुणा केल्या आहेत. **सूर्य** दक्षिणेकडे असेल तेव्हां दक्षिणेकडील खिळ्याच्या टोंकास व तो उत्तरेकडे असेल तेव्हां उत्तरेकडील खिळ्याच्य टोंकास, दोरीचें एक टोंक अडकवून ती दोरी, भिंतीवर मध्यान्हकालीं पडणाऱ्या खिळ्याच्या छायेच्या रेषेंत, वर्तुलपादापर्यंत ताणून धरली असतां, सूर्याची **क्रांति** व त्याचे **नतांश** कळतात; तारीख २१ मार्च व २३ सेप्टेंबर या दिवशीं **उज्जनीचे अक्षांश** नक्की समजतात; आणि तारीख २३ डिसेंबर व २२ जून रोजीं सूर्याच्या **परमक्रांतीचें**, ह्मणजे **पृथ्वीच्या** व्यासाचें सूर्याच्या

मार्गाशीं असलेल्या तिर्यक्त्वाचें, यथार्थ ज्ञान होतें. याखेरीज, विवक्षित ग्रह किंवा तारा, उत्तर व दक्षिण यांपैकीं कोणत्या गोलार्धांत आहे हें जसें नाडीवलययंत्राच्या द्वारा कळतें, तसेंच तो पूर्व व पश्चिम यांपैकीं कोणत्या गोलार्धांत आहे हें, या यंत्राच्या द्वारा कळतें; व शिवाय त्या ग्रहाचा किंवा ताऱ्याचा याम्योत्तर लंघनकालहि या यंत्राच्या साह्यानें समजतो.

## ३. भर्तृहरीची गुफा.

गडावरच्या कालिकेच्या नैर्ऋत्येस थोड्या अंतरावर क्षिप्रातिरीं **भर्तृहरीची गुफा** ह्मणून प्रसिद्ध असलेलें एक प्राचीन स्थान आहे. या गुफेचा पूर्वेकडील भाग बहुतेक सर्व मातींत दडलेला आहे. पश्चिमेकडील भागहि पूर्वीं तसाच मातींत दडलेला असावा, असें तेथील परिस्थितीवरून दिसतें. परंतु त्या भागाची माती नदीच्या पुरांत वाहून गेल्यामुळें हल्लीं तो भाग बराच मोकळा झाला आहे. क्षिप्रेच्या कांठीं उभे राहून या मोकळया भागाकडे पाहिलें असतां, मध्यें एक चतुष्कोण मंडप किंवा गर्भगृह व त्याच्या चारहि बाजूस जोडून पुढें वाढविलेलीं चार दालनें, अशा प्रकारची, सोंगट्याच्या पटाच्या आकाराची, ही इमारत दिसते. आंतून ही इमारत दुमजली आहे व तिच्यावर दगडी पटाव आहे. खालच्या मजल्यांत सूर्याचा प्रकाश येण्यास मुळीं मार्गच नसल्यामुळें त्यांत सर्वत्र अंधार असतो; व तेथे बरोबर दिवा घेऊन जावें लागतें. या इमारतीच्या रचनेवरून व त्यांत लागलेल्या खांबांच्या आकृतीवरून तो फार प्राचीन काळीं बांधलेला जैनाचा विहार असावा, अथवा दक्षिणेकडे शैवसांप्रदायिकांनीं बांधविलेलीं शिवालयें असतात तसें तें शिवालय

असावें, व त्याला 'गुफा' हें नांव मागाहून दिलें गेलें आहे, असें वाटतें. या इमारतीच्या आसपास आणखीहि काहीं जैनी इमारती पूर्वीं असल्या पाहिजेत. कारण जैन मंदिरांतून व विहारांतून निघालेले अनेक दगड तेथे इतस्ततः पडलेले व मागाहून तयार झालेल्या तेथील इमारतींत लागलेले दिसतात.

या इमारतीच्या दक्षिणेकडून तिच्या आवारांत शिरल्या-बरोबर डावीकडे एक पक्की बांधलेली दगडी ओसरी लागते. ही अलीकडे बांधलेली आहे. प्राचीन इमारतीशीं तिचा काहीं संबंध नाहीं. ही ओसरी दुहेरी, ह्मणजे दुदालनी आहे. त्यांतील प्रत्येक खांब निरनिराळ्या आकाराचा व त्यावरील कोरीव कामहि निरनिराळ्या प्रकारचें असल्यामुळें ते खांब निरानिराळ्या अनेक इमारतींतून निघून तेथे आले असावेत असें अगदी उघड दिसतें. या ओसरींत एक गादी ठेविली असून तिची नित्य पूजा होत असते व ती **भर्तृहरीची गादी** ह्मणून सांगण्यांत येतें.

तेथून पुढें थोडे चढून गेल्यावर गुफेचा दरवाजा लागतो. त्यांतून आंत गेल्यावर दुसरा एक दरवाजा लागतो. त्यांतून पुढें जाऊन एका वांकड्या-तिकड्या व अत्यंत संकुचित जिन्यानें खालीं उतरलें असतां गुफेंत प्रवेश होतो. तेथें एका ठिकाणीं भर्तृहरीची धुनी दाखवितात. या धुनीवरील पटावाचा एक दगड तुटला असून तो तेथेच अडकलेला आहे. त्याला भर्तृहरीनें आपल्या हाताचा आधार देऊन योगबलानें तेथेच थोपवून धरलें आहे असें सांगण्यांत येत असतें. दुसऱ्या एका बाजूस भर्तृहरीचा काशीस जाण्याचा गुप्त मार्ग दाखवितात. पण तो हल्लीं बुजलेला आहे. त्याच्या जवळ एक लहानसा चतुष्कोण दगड खांबासारखा उभा

करून ठेविला आहे; व त्यावर, एकावर एक अशा लहान लहान दोन मूर्ति कोरलेल्या आहेत. या दोन्हीं मूर्ति जैनांच्या आहेत असें स्पष्ट दिसतें. परंतु त्या दाखवितांना, **गोपीचंद, कानीफानाथ, जालंदरनाथ, गोरखनाथ, भर्तृहरी**, यांपैकीं कोणतीं तरी दोन नांवें—अर्थात् वेळेवर आठवतील किंवा सुचतील तीं—सांगण्यांत येत असतात.

हें स्थान **नाथ**पंथी लोकांच्या ताब्यांत आहे; व हल्लीं तेथें, कानांच्या मध्यभागीं करंगळी जाईल एवढीं मोठालीं छिद्रें पाडून त्यांत कसलींशीं काळसर कुंडलें अडकविणारे काहीं **नाथ** रहात असतात. त्यांतल्या मुख्याला ' पीरजी ' म्हणतात. या **नाथां**-पैकीं कोणीं तरीं **गुंफें**तील स्थानें दाखविण्यासाठीं प्रेक्षकांबरोबर दिवा घेऊन येत असतो. तेव्हां सर्व स्थानें पाहून आल्यानंतर **पीर**जीला यथाशक्ति काहीं तरी भेट द्यावी लागते, हें सांगावयास नकोच.

## ४. पीर मछंदरची कबर.

**भर्तृहरी**च्या गुंफेच्या उत्तरेस, सरासरी दीड-दोन फर्लांग ( पाव मैल ) वर **क्षिप्रा**तिरीं, ही **कबर** आहे. मूळची ही **गोरक्षना**-थाचे गुरु **मत्स्येंद्र**नाथ यांची किंवा त्या नांवाच्या दुसऱ्या कोणीं **नाथाची समाधि** असून मुसलमानी अमलदारींत ती **कबर** मानली गेली व **समाधी**च्या ओट्यावर **कबरे**चें चिन्ह बांधलें गेलें असें सांगतात. ही **कबर** दहा फूट लांब-रुंद अशा चारस ओट्यावर असून तिच्यावर एक लहानशी, सरासरी पांच फूट लांबी-रुंदीची, घुंमटी बांधली आहे व बाकीचा ओटा मोकळा सोडला आहे. **चौरस** ओटे **समाधी**चे बांधतात व **कबरे**चे ओटे प्रायः लांबट



ख्वाजा शकेबची मशीद.

बांधीत असतात. आणि हा ओटा ज्या अर्थीं चौरस आहे त्या अर्थीं वरील दंतकथा निर्मूल नसावी असें वाटतें.

## ५. रूमीचा मुकरबा.

भर्तृहरीच्या गुफेच्या अग्नेयीस हा षट्कोनी मुकरबा ( मकबरा ) आहे. ही इमारत चार-पांचशें वर्षांची जुनी असून, बांधली तेव्हां ती सुंदर दिसत असेल. परंतु हल्लीं ती फार जीर्ण झाली असून त्यांतला बराच भाग अगदीं मोडकळीस आला आहे. आसपासचे शेतकरी आपल्या गुरांचें वैरण सांठविण्याच्या कामीं सांप्रत या इमारतीचा उपयोग करीत असतात. पूर्वीं कोणीं एक बराच मोठा रूमी, म्हणजे तुर्की, सौदागर या प्रदेशांत आला होता तो येथे मरण पावला. त्याच्या कबरेवर हा मुकरबा, त्याच्या साथीदारांनीं किंवा आप्तांनीं बांधविलेला आहे. म्हणून तो रूमी ( तुर्की ) चा मुकरबा म्हणवतो, असें काहीं लोकांचें सांगणें असून काहीं मुसलमानांचें म्हणणें असें आहे कीं, पूर्वीं दिल्लीच्या बादशाचा एक मुख्य सेनापति येथे राहात होता त्याची ही कबर आहे; व तो जातीचा तुर्क होता, म्हणून त्याच्या कबरेला रूमी (तुर्की) चा मकबरा म्हणतात.

## ६. नवी कोठी.

हा एक भव्य राजवाडा आहे. कै० माधवराव महाराज अल्पवयी असतां कौन्सिल ऑफ रीजेन्सीच्या वेळीं, ई० स० १८८७-८८ च्या सुमारास, तो येथे महाराजांच्या राहण्यासाठीं बांधला गेला. मूळच्या योजनेंत त्याच्या भोंवतीं विस्तीर्ण बाग व पार्क व्हावयाची होती. यास्तव या राजवाड्यासाठीं उज्जनीपासून

तीन मैल अंतरावर पूर्वेकडे एक चौरसमैल मोकळें मैदान पसंत केलें गेलें; व तेथें सुमारें आठ लक्ष रुपये खर्च करून हा वाडा बांधला गेला. याच्या बांधकामांत हिंदुस्थानी, मुसलमानी व इंग्रजी, या तीन्हीं पद्धतीचें मिश्रण केलें गेलें आहे. तें दिसण्यांत चमत्कारिक दिसतें. परंतु हा वाडा बांधून तयार होतो तोंच महाराजांना राज्याधिकार मिळून ते उज्जनीस फिरतीवर आले व त्यांनीं हा वाडा नापसंत केला. तेव्हां त्याच्या भोंवतीं बाग वगैरे जें व्हावयाचें होतें त्यांतलें काहीं झालें नाहीं व त्यामुळें या वाड्याच्या भोंवतीं बरेंच मोठें मैदान ओसाड पडलें आहे. हल्लीं या वाड्यांत सर्व सरकारी कचेऱ्या—रेव्हिन्यू, जुडीशियल, पुलिस वगैरे खात्यांच्या लहान मोठ्या सर्व अधिकाऱ्यांची ऑफिसें—आहेत. आणि त्याच्या भोंवतालच्या मोकळ्या जमीनीपैकीं काहीं जमीन शेतकीं खात्याच्या स्वाधीन झाली असून त्यांत त्या खात्याकडून शेतकीचे प्रयोग होत असतात.

## ७. महाराजवाडा.

प्राचीन काळीं विक्रमादित्य, भोजदेव, वगैरें राजांचे महाल श्रीमहाकालेश्वराच्या मंदिराच्या जवळ-पास बांधलेले होते अशा दंतकथा आहेत; व बहुधा त्याच परंपरेस अनुसरून कै० दौलतराव महाराज शिंदे यांनीं हा वाडा, महाकालेश्वराच्या मंदिराजवळ ई० सन १८०८ त बांधविला. आणि तदनंतर त्यांनीं आपली राजधानी जरी येथून हलवून ग्वाल्हेरीस नेली, तरी ते येऊन-जाऊन कधीं-मधीं त्यांत रहात असत. त्यांच्या नंतर त्यांच्या पत्नी बायजाबाई साहेब उज्जनीस राहूं लागल्या तेव्हां त्याहि बहुधा

त्याच वाड्यांत रहात असाव्या. परंतु बायजाबाई साहेब येथून गेल्यावर मात्र त्या वाड्याकडे बहुतेक दुर्लक्षच झालें; व त्यामुळें तो बराच मोडकळीस आला. तेव्हां ई० सन १८६०-६५ च्या सुमारास, त्याचा दक्षिणेकडील बव्हशीं पडलेला भाग अजीबाद काढून टाकून तेथे मोकळें मैदान केलें; पश्चिमेकडील मागला चौक जीर्ण झाला होता तेथील जुनी इमारत काढून तिच्या जागीं नवी चौसोपी बांधली; उत्तरेकडील तशाच पडक्या भागावर शिपाई वगैरे लोकांच्या राहण्यासाठीं चाळीसारख्या काहीं खोल्या बांधविल्या; आणि मधल्या मुख्य चौकाची दुरुस्ती करून तो मात्र कायम ठेविला गेला. अर्थात् हल्लीं, दौलतराव महाराज यांनीं बांधविलेल्या वाड्यापैकीं मुख्य चौक तेवढा शिल्लक राहिला आहे, व त्यालाच सांप्रत **महाराजवाडा** म्हणतात. बाकीची चौसोपी वगैरे सर्व इमारत नवी आहे. हल्लीं या वाड्यांत मुलांच्या हिंदी व मराठी प्राथमिक शाळा आहेत.

## ८. चोवीस खांबी दरवाजा.

उज्जन शहराच्या दक्षिणेस व शहरापासून अगदी विलग असा जो एक उंचवटा आहे व ज्याच्या मध्यभागीं **श्रीमहाकालेश्वराचें** मंदिर आहे, त्याच्या सभोंवार पूर्वीं भला भक्कम कोट होता. त्या कोटाचा हा उत्तरेकडील दरवाजा, म्हणजे वेस होय. त्याच्या दोन्हीं बाजू दोन दोन मजली पडव्यासारख्या बांधल्या असून त्यावर चतुष्कोण छत उभारलें आहे; आणि प्रत्येक बाजूस एकावर एक असे बारा बारा, मिळून एकंदर चोवीस दगडी खांब उभे करून त्यांचा त्या छतास आधार दिला आहे. म्हणून या दरवाजाला **चोवीस खांबी दरवाजा** म्हणतात.

महाकालेश्वराच्या प्राचीन मंदिराभोंवतालचा कोट शंभर गज उंच होता असें फरिश्ता यानें आपल्या तवारीखमध्यें लिहिलें असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या कोटाचा हा दरवाजाहि तसाच भव्य आहे. " सहस्रपद् विस्तीर्ण महाकालवनं शुभम् । द्वारं महर्घरत्नाद्यैः खचितं सौम्यादिग्भवम् " असें त्याचें वर्णन प्राचीन ग्रंथांत आढळतें; व त्यावरून महाकालेश्वराच्या प्राचीन मंदिराचें म्हणजे त्याच्या भोंवतालच्या कोटाचें हें उत्तराभिमुख महाद्वार असावें असें वाटतें.

हा दरवाजा फार प्राचीन काळीं कोणीं तरी हिंदु राजानें बांधविलेला आहे असें त्याच्या बांधकामावरून दिसतें. त्यांत हल्लीं कोठे कोठे जुन्या हिंदु किंवा जैन मंदिराच्या निरनिराळया भागाचे दगड लागलेले दिसतात; परंतु मुसलमानी अमलदारींत तेथील अनेक हिंदु व जैन मंदिरें पाडलीं जाऊन ठिकठिकाणीं त्यांच्या दगडाच्या राशी पडल्यानंतर तेथील कोणीं तरी अधिकाऱ्यानें या दरवाजाचा जीर्णोद्धार करतांना त्यांत ते दगड लाविले असावेत, असें मानतां येतें. अलीकडे हा दरवाजा पुन्हां मोडकळीस आला होता. परंतु काहीं वर्षांपूर्वीं दरबारच्या पुराण-वस्तुसंरक्षक खात्यानें त्याची डागडूजी करून त्याच्या प्राचीन-त्वाची ओळख बुजूं न देतां त्याला हल्लीं बऱ्या स्थितींत ठेविलें आहे.

कोणीं हा दरवाजा विक्रमादित्याच्या महालाचा तर कोणीं भोजराजाच्या महालाचा असावा अशीं अनुमानें रचलीं आहेत; परंतु वर दिलेल्या श्लोकाकडे पाहिलें असतां तीं सर्व अनुमानें चुकीचीं दिसतात. त्याचप्रमाणें या दरवाजाच्या बाहेरच्या बाजूस शेंदुर फांसून लोक त्याला हल्लीं महामायादेवी ह्मणूं

लागले आहेत. अवंतिखंडांतील क्षेत्रमाहात्म्यांत महामाया-देवीचा अनेक ठिकाणीं उल्लेख केलेला आहे; परंतु सांप्रत ती देवी तेथे कोठे दिसत नाहीं. कदाचित् त्या देवीचें मंदिर पूर्वी या दरवाजाच्या जवळ-पास कोठे तरी असेल. आणि पुढें मुसलमानी अमलदारींत तें मंदिर उध्वस्त झाल्यानंतर काहीं दिवसांनीं पूर्वीच्या स्मरणाचा आधार घेऊन या दरवाजालाच लोक महामाया मानूं लागले असावेत. पण तें कसेंहि घडलें असलें तरी हल्लींच्या व्यवहारांत हा दरवाजाच महामाया बनला आहे. नवरात्रांत व एरव्हींहि महामाया म्हणून लोक त्याचीच पूजा-अर्चा करतात व रेडे-बकरे वगैरे महामायेला द्यावयाचे बलींहि त्यालाच दिले जात असतात !

## ९. राणोजीराव शिंदे यांची छत्री.

शिंद्यांच्या राजघराण्याचे मूळ पुरुष राणोजीराव शिंदे हे ई० स० १७४५त सुजालपूरजवळ परलोकवासी झाले. तेथे त्यांची एक सुंदर छत्री बांधविलेली आहे. परंतु उज्जन हें त्यांच्या राहण्याचें मुख्य ठिकाण म्हणून तेथेहि त्यांचें स्मारक असावें या दृष्टीनें त्यांची ही छत्री बांधविली गेली आहे. ही छत्री क्षिप्रातिरीं छत्रीघाटावर आहे. छत्रीचें बांधकाम मजबूत असून घाटावरून दिसणारा तिचा एकंदर देखावा भव्य दिसतो.

## १० बायजाबाईची छत्री.

महाराणी बायजाबाई साहेब—कै० दौलतराव महाराजांच्या पत्नी—उज्जनीस रहात असतां, त्यांनीं आपल्या हयातींतच

तेथे ही आपली छत्री बांधवून ठेविली आहे. ही छत्री क्षिप्रातटाकीं रामघाटावर आहे. घाटावरील अनेक जुन्या धर्मशाळा छत्रीपुढें घेऊन त्यांच्या मागील भिंतीवर छत्रीच्या महाद्वाराची उभारणी केली गेली आहे. छत्रीचें एकंदर बांधकाम काळया घडीव दगडाचें व मजबूत आहे. छत्रीच्या मुख्य दरवाजांतून आंत शिरलें कीं समोर एक लहानसें मंदिर दिसतें. त्यांत गोपाळ-कृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली गेली असून देवाजवळ एका बाजूस बायजाबाईची संगमरवरी प्रतिमा बसविली आहे. मंदिराच्या चारहि बाजूस प्रशस्त चौसोपी बांधली आहे. रामघाटावरून या छत्रीचा देखावा सुंदर दिसतो. बायजाबाईचा देहांत ब्रह्मावर्तास गंगातिरीं झाला. तेव्हां उज्जन येथे त्यांची छत्री हें अर्थातच त्यांचें नुसतें स्मारक मात्र होय.

## ११. जीजामहाराजांची धर्मशाळा.

ही धर्मशाळा देवासच्या सडकेवर स्टेशनच्या जवळ आहे. कै० माधवराव महाराज यांच्या मातुश्री सख्याराजासाहेब यांनीं ही धर्मशाळा आपल्या खासगी खर्चानें कांहीं वर्षांपूर्वीं बांधविली. तिची इमारत दुमजली असून बांधकाम सर्व दगडी व मजबूत आहे. मागल्या बाजूस एक लहानसा बाग लाविलेला आहे. धर्मशाळेंत सर्व प्रकारच्या व सर्व वर्गाच्या हिंदु लोकांना राहण्याच्या निरनिराळ्या सोयी केल्या गेल्या आहेत. त्याखेरीज या धर्मशाळेंत सरकारी खर्चानें सदावर्त ठेविलें गेलें आहे; व त्यांतून साधु-संत वइतर गरीब प्रवाशांना शंभर पात्रांपर्यंत कोरडा शिधा धर्मार्थ दिला जात असतो. माधवराव महाराज आपल्या मातुश्रीला ' जीजामहाराज '



कै० मातुश्री जीजामहाराज शिंदे.

( सख्याराजा साहेब. )

म्हणत असत, त्यावरून या धर्मशाळेचें **जीजामहाराजांची धर्मशाळा** हें नांव प्रचारांत आलें आहे.

## १२. बिनानींवची मशीद.

ही **मशीद** ( मस्जिद ) अनंतपेठेंत आहे. मुसलमानी अमलदारींत एक **जैन मंदिर** पाडून त्याच्या पायावर ही मशीद उभारली गेली आहे. ती बांधण्यासाठीं निराळी नीव, ह्मणजे पाया, खणावा लागला नाहीं. ह्मणून तिला **बिनानींवची मशीद** ह्मणतात. **मशी**दीच्या बांधकामांत दगड, विटा, वगैरे मसाला व दगडी खांब सर्व पूर्वींच्या **जैन मंदिराचे** लागले आहेत. मंदिराचा **द्वारमंडप** न पाडतां तसाच कायम ठेविला असून तो **मशीद** बांधतांना तिच्या दरवाजास जोडून घेतला आहे. **मशीदीच्या** भिंतींत लागलेल्या **मंदिराच्या** दगडांपैकीं काहीं दगडांवर कोरलेली नकशी तशीच कायम असून काहीं दगडावरील नकशी खरडून काढलेली दिसते. **कदाचित्** त्या जागीं काहीं मूर्ति कोरलेल्या असतील, व त्या **मशीदींत** नकोत, ह्मणून ते दगड खरडले गेले असावेत, असा तर्क होतो. मशीद बहुतेक उपेक्षित स्थितींतच आहे; पण अद्याप उभी आहे. तिच्या दरवाजावर अरबी लिपींत कोरलेला एक शिला-लेख आहे, त्यावरून ही मशीद माळव्याचा सुभेदार दिलावरखां घोरी याच्या अमलदारींत सन हिजरी ८०६ (ई. स. १३९७) त बांधून तयार झाली असें दिसतें.

## १३. ख्वाजा शकेबची मशीद.

ही **मशीद** उज्जन शहराच्या **दक्षिण** भागांतील **सखीपुऱ्यांत रंगबावडी** (पुष्करसागर) स लागून आहे. **दिल्लीच्या मोगल बादशा-**


ह्यांच्या सुभेदारांपैकीं कोणीं ख्वाजा शकेब या नांवाचा माळव्याचा सुभेदार होता, त्यानें ही मशीद बांधविली. उज्जन येथील मुसलमानी इमारतींपैकीं ही एक जुनी सुप्रसिद्ध इमारत आहे.

## १४. बोहोऱ्यांचा मकबरा.

हा **मकबरा** सब्जीमंडींत आहे. उज्जनीस बोहोरे लोकांची वस्ति पूर्वीपासून बरीच आहे. यास्तव त्यांच्या मुख्य मुल्लाजीचे ( धर्माध्यक्षाचे ) कोणीं तरी वंशज, त्यांचे प्रतिनिधि ह्मणून, तेथे राहतात. त्यांतल्या काहीं पुरुषांच्या कबरा तेथे असून त्यावर बांधलेला हा **मकबरा** आहे. हल्लीं ज्या मुसलमानी इमारती तेथे आहेत त्यांत इतकी सुंदर व प्रेक्षणीय इमारत दुसरी कोणतीहि नाहीं. तेथील व्यवस्थाहि श्रीमंती थाटाची व उत्तम आहे.

## १५. एक सुरेख छत्री.

पूर्वींचा कागदीपुरा व आलपुरा यांच्या पश्चिमेस क्षिप्रातिरीं, वडाच्या चौकीच्या दक्षिणेकडील एका उंचवट्यावर एक लहानशी **छत्री** आहे. ही छत्री कोणाची व केव्हां बांधविली हें काहीं कळत नाहीं. परंतु तिची बांधणी फार सुरेख व तिच्यावर नखशिखांत केलेलें कोरीव काम फारच प्रेक्षणीय आहे. त्यांत कोरलेल्या दशावतारांच्या मूर्ति व इतर देवतांच्या मूर्ति यांची कोणीं बरीच तोड-फोड केली आहे. छत्रीच्या खांबावर कोरलेल्या सुंदर मोरांच्या मानाहि झाडून सर्व तोडून टाकल्या आहेत; व इतरत्रहि काहीं तोड-फो केली आहे. तरी पण छत्रीचा प्रेक्षणीय भाग अद्यापहि बराच शिल्लक आहे.



बोहोऱ्यांचा मकबरा.

छत्रीच्या बांधकामावरून ती बहुधा शे-सवाशें वर्षांच्या आंतच केव्हां तरी बांधली गेली असावी असें दिसतें. कोणीं ही छत्री देवासच्या राजाची तर कोणीं धारच्या राजाची आहे, असें सांगतो; आणि धारच्या एका राजाचें देहावसान उज्जनीस झाल्याचें ऐकण्यांतहि येतें. पण हे राजे कोणते, केव्हां दिवंगत झाले व त्यांचीच ही छत्री आहे कीं काय, याविषयीं विश्वसनीय माहिती अद्याप मिळाली नाहीं.

## १६. मौलानासाहेबाची दर्गाह.

अजमेरचे ख्वाजा मुईनुद्दीन चिष्ती यांचे मुरीद ( शिष्य ) ख्वाजा मुगीसुद्दीन चिष्ती यांची ही कबर आहे. ही कबर क्षिप्रातिरीं, राणोजीराव शिंदे यांच्या छत्रीच्या उत्तरेस उंचवट्यावर आहे. कबर सामान्य प्रतीची आहे, तिच्यावर मकबरा, घुमटी, वगैरे कांहीं नाहीं; पण हे मौलाना आपल्या गुरूसारखे सिद्धपुरुष होते असें मुसलमान लोक मानतात व त्यांच्या या कबरेला ते बराच मान देतात.


## १७. भैरवगढचा किल्ला.

भैरवगढच्या पुलावरून उतरून दोन फर्लांग पुढें (भैरवगढाकडे) गेलें कीं हा किल्ला दिसतो. किल्ल्याचें बांधकाम फार मजबूत आहे. तो कोणीं केव्हां बांधला याविषयीं माहिती मिळाली नाहीं; पण त्याच्या बांधकामावरून तो मुसलमानी अमलदारींत बांधलेला दिसतो. हल्लीं त्यांत माळव्याचा सेन्ट्रल जेल आहे.

या जेलांत हातमागावर कैदी लोकांकडून कापड विणवून घेतलें जातें; सूत सर्व देशी मिलचें वापरलेलें असतें; सतरंज्या,

बिछान्यांत हांथरण्या-पांघरण्याच्या चादरी, शर्टिंगचें ट्विल, सर्व प्रकारचे टॉवेल्स, हातरुमाल, खादीचीं ठाणें, पलंगपोस व पलंगाची नवार, या जिनसा चांगल्या होतात; व बाजारच्या मानानें स्वस्तहि पडतात.

इतिशम्.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# परिशिष्ट १ लें.

## मुसलमानी अमलांतील व्यापारी दळण-वळणाचे मार्ग.

**उज्जन** शहर हें आर्यकालापासून मुसलमानी अमलदारीपर्यंत परदेशांशीं चालणाऱ्या भरतखंडाच्या व्यापाराचें केंद्र बनलें होतें. परंतु त्या कालीं येथील मालाची ने-आण करण्याचे, मार्ग कोणकोणते होते याविषयीं निश्चयात्मक अशी कांहीं माहिती मिळत नाहीं. "चहार गुलशन" नांवाच्या फारशी ग्रंथावरून यदुनाथ सरकार यांनीं आपल्या "इंडिया ऑफ औरंगजेब" या इंग्रजी ग्रंथांत ( चाप्टर ५ वें ) मुसलमानांच्या कालीं चालू असलेले कांहीं मार्ग दिले आहेत. परंतु ते मुसलमान बादशाहांच्या दक्षिणेकडील स्वाऱ्यांवर जाण्या-येण्याचे मार्ग दिसतात. उज्जनीच्या व्यापाराशीं त्यांचा तादृश संबंध दिसत नाहीं. तदनंतरच्या इंग्रजी अमलदारींत ईस्ट इंडिया कम्पनीनें ई. स. १८२० त छापून प्रसिद्ध केलेल्या भरतखंडाच्या टोपोग्राफिकल सर्व्हेच्या नकाशांत या देशाच्या चारहि दिशांकडून येऊन उज्जनीस एकवटणारे अनेक मार्ग दाखविले आहेत; व निश्चयात्मक असें यद्यपि त्यांसंबंधानेंहि कांहीं सांगतां येत नाहीं, तथापि ते एकीकडे पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांशीं व दुसरीकडे उज्जनीवरून बहुतेक मोठमोठ्या शहरांशीं

जोडले गेले आहेत, यावरून तेथील व्यापारी दळण-वळणाचे पूर्वीचे जुने मार्ग बहुधा तेच असावेत असें वाटतें. अर्थात् ते निश्चित नसले तरी संभवनीय आहेत. यास्तव, त्यांपैकीं उज्जनीचा या देशांतील मुख्य मुख्य शहरांशीं संबंध जोडणारे काहीं मार्ग आह्मीं येथे देत आहोंत.

## १. उज्जन-भडोच-सूरत.

| | | |
|---|---|---|
| १. उज्जन. | ५. तांडा. | ९. बडोदा. |
| २. बदनावर. | ६. दोहद. | १०. जंबुसर. |
| ३. राजोद. | ७. गोध्रा. | ११. भडोच. |
| ४. पेटलावद. | ८. कालोल. | १२. सूरत. |

## २. उज्जन-अहेमदाबाद-वढवाण.

| | | |
|---|---|---|
| १. उज्जन. | ५. तांडा. | ९. वीरमगांव. |
| २. बदनावर. | ६. दोहद. | १०. वढवाण—व |
| ३. राजोद. | ७. गोध्रा. | तेथून पुढें काठिया- |
| ४. पेटलावद. | ८. अहेमदाबाद. | वाडांतील इतर शहरें. |

## ३. उज्जन-अजमेर-बीकानेर.

| | | |
|---|---|---|
| १. उज्जन. | ५. कोटा. | ९. नागोर. |
| २. आगर. | ६. बूंदी. | १०. बीकानेर—व |
| ३. सुसनेर. | ७. फतेगड. | तेथून पुढें मारवाडां- |
| ४. सुनेल. | ८. अजमेर. | तील इतर शहरें. |

## ४. उज्जन-आग्रा-लाहोर.

१. उज्जन.
२. शाहजहांपूर.
३. सारंगपूर.
४. खुजनेर.
५. राजगड.
६. चांचर्डा.
७. राघोगड.
८. बदरवास.
९. बूढा डोंगा.
१०. कोलारस.
११. शिवपुरी.
१२. नरवर.
१३. नोनची सराय.
१४. अंत्री.
१५. ग्वाल्हेर.
१६. नूराबाद.
१७. धोलपूर.
१८. आग्रा.
१९. फर्रा.
२०. मथुरा.
२१. चौमुहा.
२२. कोसी.
२३. फरीदाबाद.
२४. दिल्ली.
२५. सोनपत.
२६. पानपत.
२७. करनाल.
२८. थानेश्वर.
२९. अंबाला.
३०. सरहिंद.
३१. लुधियाना.
३२. कपूरथला.
३३. अमृतसर.
३४. लाहोर—व तेथून पुढें पेशावर वगैरे.

## ५. उज्जन-प्रयाग-काशी.

१. उज्जन.
२. शाहजहांपूर.
३. शुजावलपूर.
४. सीहोर.
५. भोपाळ.
६. भेलसा.
७. बासोदा.
८. राहतगड.
९. सागर.
१०. हीरापूर.
११. बिजावर.
१२. बुचोन.
१३. गुढा.
१४. चित्रकोट.
१५. चौंरा.
१६. शाहापूर.
१७. प्रयाग.
१८. झूसी.
१९. सैदाबाद.
२०. गोपीगंज.
२१. महाराजगंज.
२२. काशी (बनारस) व तेथून पुढें पटना, कलकत्ता, वगैरे.

## ६. उज्जन-औरंगाबाद-हैदराबाद.

| | | |
|---|---|---|
| १. उज्जन. | ७. बऱ्हाणपूर. | १३. बीड. |
| २. इंदूर. | ८. मल्कापूर. | १४. दारूर. |
| ३. महेश्वर. | ९. निजामाबाद. | १५. बालकी. |
| ४. मुलथान. | १०. फूलमढी. | १६. बेदर. |
| ५. भीकणगांव. | ११. औरंगाबाद. | १७. गोलकोंडा. |
| ६. घोडा. | १२. पैठण. | १८. हैदराबाद. |

## ७. उज्जन-औरंगाबाद-बीजापूर.

| | | |
|---|---|---|
| १. उज्जन. | ७. बऱ्हाणपूर. | १३. श्रीगोंदें. |
| २. इंदूर. | ८. मल्कापूर. | १४. पेडगांव. |
| ३. महेश्वर. | ९. निजामाबाद. | १५. बारामती. |
| ४. मुलथान. | १०. फूलमढी. | १६. पंढरपूर. |
| ५. भीकणगांव. | ११. औरंगाबाद | १७. मंगळवेढें. |
| ६. घोडा. | १२. अहेमदनगर. | १८. बीजापूर. |

———:o:———

# परिशिष्ट २ रें.

## प्रवाशांना उपयुक्त माहिती.

### १. कोठें उतरावें ?

उज्जनीस **जीजामहाराजांची धर्मशाळा** व **हॉटेल** या दोन जागा प्रवाशांना उतरण्यास फार सोयीच्या आहेत. रेल्वे स्टेशन-पासून **धर्मशाळा** सरासरी एक फर्लांग अंतरावर असून तेथून पुढें अर्ध फर्लांगावर **हॉटेल** आहे. **धर्मशाळेंत** सर्व प्रकारच्या व सव वर्गांच्या **हिंदु** लोकांना तीन दिवस राहतां येतें. जागेचें भाडें द्यावें लागत नाहीं. धर्मशाळेंत निरनिराळ्या जातींसाठीं निर-निराळ्या स्वयंपाकाच्या जागा आहेत; सर्वत्र पाण्याचे नळ आहेत; व ज्यांना जरूर असेल त्यांना स्वयंपाकाचीं भांडींहि, तेथील व्यवस्थापकाजवळ मागितलीं असतां मिळतात. **धर्मशाळेला** जोडून वाण्याच्या दुकाना ठेविलेल्या आहेत; व जवळच गुजराथी ब्राह्मणाच्या **खाणावळी**हि आहेत. **हॉटेलांत हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन,** वगैरे सर्वांना उतरतां येतें; व हवे तितके दिवस राहतां येतें. परंतु तेथें प्रत्येक खोलीस दररोज दीडरुपयाप्रमाणें भाडें द्यावें लागतें.

ज्याला उज्जनीस यात्रा करावयाची असेल त्यानें या धर्मशाळेंत किंवा हाटेलांत उतरण्यापेक्षां गावांत उतरणें

विशेष सोयीचें आहे. गावांत नदीच्या कांठीं मुंबईवाल्याची एक व हरसिद्धि दरवाजाजवळ गजाधराची एक अशा दोन धर्मशाळा चांगल्या आहेत.

## २. वाहतुकीचीं साधनें.

**मोटार** ( टॅक्सी ) व **तांगे** हीं तेथील वाहतुकीचीं साधनें होत. **मोटारीचें** भाडें सामान्यतः दर मैलास आठ आणे याप्रमाणें पडतें. देवासदरवाजाजवळ मोटारी भाड्यानें मिळतात. आणि देवास-दरवाजा व गोपाळमंदिर हीं **तांगे** उभे राहण्याचीं दोन मुख्य स्थलें (नियमित स्टॉन्ड्स) असून म्युनिसिपालिटीनें त्यांच्या भाड्याचे दर पुढें दिल्याप्रमाणें ठरविलेले आहेत :—

### १. स्थलपरत्वें ठरलेलें भाडें.

| | पहिला वर्ग. | | दुसरा वर्ग. | | तिसरा वर्ग. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | रु. | आ. | रु. | आ. |
| **१. देवास-दरवाजा ( रेल्वे-स्टेशन ) पासून—** | | | | | | |
| (१) नदीदरवाजा, दाणीदरवाजा, अनन्तपेठ, हरसिद्धिदरवाजा, कालिया-देह दरवाजा, बुधवाऱ्या हाट, तेलीवाडा. | ० | ६ | ० | ४ | ० | ३ |
| (२) जीवाजीगंज, अबदालपुरा, उर्दू-पुरा, अंगपाद-दरवाजा, पीपलीनाका. | ० | ७ | ० | ६ | ० | ५ |
| (३) भैरवगड, कालिकादेवी, मंगळेश्वर. | ० | १२ | ० | ८ | ० | ६ |

| | रु. | आ. | रु. | आ. | रु. | आ. |
|---|---|---|---|---|---|---|
| (४) जीजामहाराजांची धर्मशाळा, हॉटेल, सराय. | ० | ४ | ० | ३ | ० | २ |
| (५) नवी कोठी ( कचेऱ्या ) ... | ० | १० | ० | ८ | ० | ६ |
| (६) कालियादेहाचा महाल ... | १ | ४ | १ | ० | ० | १२ |
| २. गोपाळमंदिरापासून— | | | | | | |
| (१) भैरवगड, कालिकादेवी, मंगळेश्वर. | ० | ८ | ० | ६ | ० | ६ |
| (२) कालियादेहाचा महाल ... | १ | ४ | १ | ० | ० | १२ |
| (३) रेल्वे स्टेशन, जीजामहाराजांची धर्मशाळा, हॉटेल. | ० | ६ | ० | ४ | ० | ३ |

## २. कालपरत्वें ठरलेलें भाडे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पहिला तास ... ... | ० | १२ | ० | ८ | ० | ६ |
| २. दुसरा तास ... ... | ० | ८ | ० | ६ | ० | ४ |
| ३. तिसरा व त्याच्या पुढचा प्रत्येक तास. | ० | ६ | ० | ४ | ० | ३ |
| ४. अर्धा दिवस किंवा पांच तास ... | २ | ४ | १ | ८ | १ | ० |
| ५. संपूर्ण दिवस किंवा नऊ तास ... | ३ | ८ | ३ | ० | २ | ० |

* **मोटार** किंवा तांगा यांत बसतांना त्यांचा **वर्ग व नंबर** टिपून घ्यावा; आणि उतरतांना त्यांत काहीं सामान चुकीनें राहून गेल्यास त्याची वर्दी, वाहनाचा वर्ग व नंबर यांसह जवळच्या पोलिस चौकींत द्यावी.

## ३. तीर्थोपाध्याय.

या क्षेत्रांत वंशपरंपरागत उपाध्येपणाची वृत्ति गुर्जर-गौड, औदीच्य, वगैरे एतद्देशीय ब्राह्मणांकडे आहे. दाक्षिणात्यांकडे ही वृत्ति नाहीं. यामुळें तेथें यात्रेसाठीं येणाऱ्या दक्षिणी ब्राह्मणांना यात्रेसंबंधी श्राद्धादि समंत्रक कृत्यें आपआपल्या शाखेच्या दक्षिणी ब्राह्मणांच्या द्वारा करावीं लागतात; व तीर्थांवर होणारीं स्नान-दानादि कृत्येंमात्र आपआपल्या तीर्थोपाध्यायाच्या द्वारा करावयाचीं असतात. परंतु जे यात्रेकरू तेथे अगदीं अपरिचित असतात, ज्यांचे तेथील तीर्थोपाध्याय पूर्वीं कधीं कोणीं ठरलेले नसतात, किंवा असून त्यांचें नांव, पत्ता, वगैरे त्यांच्या विषयीं ज्यांना काहीं माहिती नसते, त्यांची तेथील यात्रेच्या कामीं केव्हां केव्हां गैरसोय, व क्वचित् फसगत होण्याचाहि बराच संभव असतो. यास्तव, अशा यात्रेकरूंनीं आपआपल्या शाखेच्या धर्माधिकाऱ्याला किंवा कोणीं विद्वान ब्राह्मणाला अगोदर भेटून, व त्याच्या द्वारा आपआपल्या तीर्थोपाध्यायाचा शोध करून किंवा ( पत्ता न लागल्यास ) एखाद्या योग्य ब्राह्मणाला उपाध्येपणा देऊन, नंतर यात्रा करणें चांगलें.

## ४. उज्जन येथील सुप्रसिद्ध स्थलें पाहण्याचा क्रम.

या पुस्तकाच्या चवथ्या व पांचव्या प्रकरणांत वर्णिलेलीं व इतर स्थलें पुढें दिलेल्या क्रमानें पाहण्यांत प्रत्यहीं सकाळीं ३-४ तास व सायंकाळीं ३-४ तास घालविल्यास तीं सर्व स्थलें स्वस्थपणें तीन दिवसांत पाहतां येतात. परंतु ज्यांना तितकी सवड नसेल त्यांना, पुढें मोठ्या टाइपांत दिलेलीं व * या खुणेनें दाखविलेलीं मुख्य मुख्य स्थलें, एका दिवसांतहि पाहतां येतील.

## १. पहिल्या दिवशीं—(१) सकाळीं.

| | |
|---|---|
| *१. वेधशाळा. | *६. श्रीहरसिद्धिदेवी. |
| *२. ख्वाजाशकेबची मशीद. | *७. क्षिप्रानदीचे घाट. |
| *३. चोवीस खांबी दरवाजा. | ८. बायजाबाई शिंदे यांची छत्री. |
| ४. महाराजवाडा. | ९. राणोजीराव शिंदे यांची छत्री. |
| *५. श्रीमहाकालेश्वर. | १०. मौलाना साहेबाची दरगाह. |

## (२) सायंकाळीं.

| | |
|---|---|
| ११. श्रीरणजीत हनुमान. | १६. श्रीगोपाळ मंदिर. |
| १२. एक सुरेख छत्री. | १७. श्रीराममंदिर ( कूकाजीचें ). |
| १३. श्रीअनंतनारायण. | १८. श्रीमदनमोहनजीचें मंदिर. |
| *१४. बिनानीवची मशीद. | १९. श्रीशेषशायी. |
| *१५. बोहोऱ्यांचा मकबरा. | २०. श्रीकाल-काम-परशुराम. |

## २. दुसऱ्या दिवशीं—(१) सकाळीं.

| | |
|---|---|
| २१. श्रीतिलभांडेश्वर. | २८. कुमार मारुती. |
| *२२. सांदीपनीचा आश्रम. | *२९. भर्तृहरीची गुफा. |
| *२३. अंकपाद. | ३०. रूमीचा मकबरा. |
| *२४. गंगाघाट. | ३१. पीर मछंदर. |
| *२५. श्रीअंगारकेश्वर | *३२. सिद्धवट. |
| *२६. श्रीकालिकादेवी | *३३. भैरवगढचा किल्ला. |
| २७. स्थविर विनायक. | *३४. श्रीकालभैरव. |

## (२) सायंकाळीं.

*३५. कालियादेहाचा महाल.

## ३. तिसऱ्या दिवशीं—(१) सकाळीं.

३६. वॉटर वर्क्स. ३८. चिंतामण गणपति.
३७. नवग्रह ( त्रिवेणीवर ).

## (२) सायंकाळीं.

३९. माधव कॉलेज. ४१. हॉटेल.
४०. जीजामहाराजांची धर्मशाळा. ४२. नवी कोठी.

या पुढें शेवटीं उज्जयिनीचा (भैरवगढसहित) नकाशा जोडला आहे त्यांत हीं स्थलें याच अनुक्रमांकांनीं दाखविलीं आहेत.

हीं स्थलें पाहण्यासाठीं तांग्यांतून किंवा मोटारींतून जाणारांनीं वेधशाळा पाहून परत महाकालेश्वराच्या मंदिरांत आल्यावर, वाहन बिनानींवच्या मशीदीवर पाठवून द्यावें; आणि हरसिध्दीच्या मंदिरांत पायीं जाऊन तेथून क्षिप्रानदीच्या घाटांवर उतरावें व घाटांवरील सर्व स्थलें पाहून अनंतनारायणाच्या बाजूनें वर चढल्यानंतर बिनानींवच्या मशीदीजवळ परत वाहनांत बसून पुढें जावें.

वेधशाळा पाहण्यासाठीं जाणारांनीं, तेथील यंत्रें समजावून देणारा कोणीं तरी माहितगार बरोबर नेणें चांगलें. वेधशाळेचे सुपरिन्टेन्डेन्ट यांच्या द्वारा तशी व्यवस्था करून घेतां येते. कालियादेहाचा महाल पाहण्यासाठीं तेथील प्यालेस सुपरिन्टेन्डेन्ट यांची परवानगी घ्यावी लागते. भैरवगढच्या किल्ल्यांतील जेल व त्यांतील विणकामें वगैरे सांयकाळचे पांच वाजण्यापूर्वी जेलरच्या परवानगीनें पाहतां येतात.

———:०:———

# श्रीअनुभवामृत.

---

## अमृतवाहिनी नामक टीकेसहित.

संतशिरोमणी **श्रीज्ञानेश्वर** महाराजांच्या 'अमृतानुभव' या नांवानें लोकांत प्रसिद्ध असलेल्या **श्रीअनुभवामृत** नामक सर्व-श्रेष्ठ पण दुर्बोध ग्रंथावर श्रीयुत रामचंद्र बळवंत डोंगरे यांनीं प्रचलित मराठी भाषेंत **अमृतवाहिनी** नामक विस्तृत टीका लिहिली आहे; व ती श्रीगोंदें येथील ह. भ. प. ज्ञानेश्वरबोआ केणे यांनी छापवून प्रसिद्ध केली आहे. **केसरी** ( २२।८।२९ ) कार ह्मणतात "अशा टीकेच्या आधाराशिवाय स्वतंत्र बुद्धीनें हा ( अनुभवामृत ) ग्रंथ लावणारे वाचक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके तरी आढळतील कीं नाहीं ही शंकाच आहे. अर्थातच ही टीका वाचकांपुढें माडण्यांत तिचे लेखक व प्रकाशक यांनीं महाराष्ट्रावर महदुपकार केले आहेत.........वेदान्ताचीं उच्च तत्त्वें ज्यांना थोडक्यांत एकत्र पहावयाचीं असतील त्यांना अनुभवामृत ग्रंथ ह्मणजे एक अमोलिक ठेवा आहे; आणि तो ठेवा वाचकांना दुर्बोध वाटत असल्यामुळें या अमृतवाहिनी टीकेने तो सर्वांना सुलभ करून सोडला आहे".

ग्रंथाची पृष्ठसंख्या ७००. सुरेख व मजबूत कापडी बांधणी. किंमत साडेचार रुपये. टपालखर्च वेगळा. पुस्तकें **श्रीगोंदें, जि० अहमदनगर,** येथे प्रकाशकाकडे मिळतात.

---

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | ५ | अस | असें |
| ५ | ५ | पडक | पडकें |
| ,, | १३ | ळींची | हळींची |
| ,, | २३ | यांत पृ. २९८ | यांत भा. १ पृ. २९८ |
| ६ | १६ | त्याच | त्याचें |
| ७ | २ | भलतचें | भलतेंच |
| ,, | १३ | दुःखोन्दार | दुःखोद्धार |
| ९ | १४ | ६५ ते १०६ | ९० ते १०६ |
| ,, | १५ | ९० ते ४२ | ६५ ते ४२ |
| ११ | पृष्ठांक. | ... | ११ |
| १३ | २ | पुण्यैःकृतमिव | पुण्यैर्हृतमिव |
| ,, | १८ | खालावलल्या | खालावलेल्या |
| १९ | ९ | तरा | तरी |
| २३ | १३ | करवन | करवून |
| २४ | २० | अस | असें |
| २७ | १६ | ई. स. च्या पहिल्या | ई.स. च्या पूर्वी पहिल्या |
| २८ | १६ | कलेन | कलेने |
| ३० | २४ | वतांना | घेतांना |
| ३२ | ११ | राजांस | राज्यें |
| ३४ | १ | सिद्धान्तज्योतिषविद्येची | सिद्धान्तज्योतिषविद्येचें |


| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३९ | ७ | यानें | त्यानें |
| ४० | ७ | महश्वर | महेश्वर |
| ४९ | १ | स्वत | स्वतः |
| ५१ | २३ | नसबदारी | मनसबदारी |
| ५२ | ६ | तेहां | तेव्हां |
| ५५ | १ | मंदिरांत | मंदिरांत |
| ५६ | ८ | रंतु | परंतु |
| ६० | पृष्ठांक. | ... | ६० |
| ६१ | १ | ाकंबहुना | किंबहुना |
| ६९ | १ | केलल्या | केलेल्या |
| ७९ | २४ | वर्णन | वर्णनें |
| ८२ | १३ | महिनपर्यंत | महिनेपर्यंत |
| ८३ | ७ | तुंगभद्रत | तुंगभद्रेंत |
| ,, | १५ | हल्ला | हल्लीं |
| ,, | १८ | मळा | मेळा |
| ,, | १८ | अस. | असें |
| ,, | १९ | असल्यामुळ | असल्यामुळें |
| ८५ | २ | कालान | कालानें |
| ८७ | ५ | निशाण | निशाणें |
| ८९ | १५ | पाहण्यासाठीं | पाहुण्यासाठी |
| ,, | १९ | यतात | येतात |
| ९० | २ | पुढें | मागें |
| ९२ | ३ | तिच | तिचें |
| ९३ | १२ | तच | तेंच |
| ,, | १८ | मृळची | मूळची |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९५ | १६ | त्यांच | त्यांचें |
| ,, | २४ | परंत | परंतु |
| ९६ | १६ | एकवटलेला | एकवटलेलीं |
| ९७ | १५ | सायशभाष्य | सायणभाष्य |
| १२५ | २१ | दितीयं | द्वितीयं |
| १२६ | ११ | आह | आहे |
| १४० | २१ | नाहा | नाहीं |
| १५४ | १३ | तसच | तसेंच |
| १५८ | पृष्ठांक. | ८ | १५८ |
| ,, | १२ | ह | हें |
| १६० | २३ | केलाच | दिलाच |
| १६३ | १५ | येत | येतें |
| १६५ | २० | तेथ | तेथें |
| १६८ | ८ | वढा | वेढा |
| १७५ | १ | गेल | गेले |
| १७७ | १० | सांगितल्याप्रणाणें | सांगितल्याप्रमाणें |
| १८३ | १८ | खिळ्याच्य | खिळ्याच्या |
| ८६ | २० | चारस | चौरस |
| ९४ | २० | तोड-फो | तोड-फोड |
| २०५ | २ रें ७ | सव | सर्व |

# उज्जयिनी शहराचा

(भैरवगढ़ साहित)

स्केल ४ इंच = १ मैल.





नं० १ कडे

| नं० | |
|---|---|
| १ | हीं स्थळें उज्जन शहरा बाहेर असल्या मुळे या नकाशांत दारबविली गेली नाहींत. |
| ३५ | |
| २६ | |
| ३७ | |
| ३८ | |
| ४९ | |
| ४२ | |

# नकाशा
## उज्जयिनी शहराचा
### (भैरवगड सहित)

स्केल ४ इंच = १ मैल.




ही स्थलें उज्जन शहरा बाहेर असल्या मुळें या नकाशांत दाखविली गेली नाहींत.